: संशोधन विषयाचे नाव :


# ‘‘मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती हंबीरराव मोहिते यांचे योगदान’’

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे
यांच्या तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत
इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर करावयाचा शोध प्रबंध

**संशोधक**
संतोष सितारा‍म पाटील

**मार्गदर्शक**
डॉ. अनिल सिंगारे

फेब्रुवारी २०१३



# सेनापती हंबीरराव मोहिते

(कार्यकाळ इ.स.१६७४ ते १६८७)



# प्रमाणपत्र

संतोष सिताराम पाटील यांनी **'मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती हंबीरराव मोहिते यांचे योगदान'** या विषयावर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यावाचस्पती इतिहास पदवीसाठी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या हा प्रबंध लिहिला असून तो इतर कोणत्याही विद्यापीठात कुठल्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ :
दिनांक :

मार्गदर्शक
डॉ.अनिल सिंगारे
एम.ए., एम.फिल., पीएच्.डी.(इतिहास)
प्रपाठक आणि मार्गदर्शक
संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
गंगाखेड
ता.गंगाखेड जि. परभणी

# प्रतिज्ञापत्र

"**मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती हंबीरराव मोहिते यांचोद्योग** या विषयावरील शोधप्रबंध मी, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या कला विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी परीक्षेसाठी लिहिलेला आहे. या शोधप्रबंधातील कोणताही भाग मी अन्यत्र कोणत्याही पदवी अथवा परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ :
दिनांक :

संशोधक
संतोष सिताराम पाटील
एम.ए., बी.एड., एम.फिल.
बसवेश्वर नगर, थोडगा रोड,
अहमदपूर जि.लातूर

# अनुक्रमनिका



| अ.क्र | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| | **प्रकरण पहिले** | (१-३०) |
| | **मोहिते घराण्याचा इतिहास** | |
| १ | प्रस्तावना | |
| २ | मोहिते घाराणे | |
| १ | ९६ कुळीतील मोहिते | |
| २ | मोहिते घराण्याची कोष्टक | |
| ३ | मोहिते घराण्याची वंशावळ | |
| ४ | मोहितेंच्या उदयाची पार्श्वभूमी | |
| १ | रतोजी मोहिते | |
| २ | तुकोजी मोहिते | |
| ३ | निजामशाहीतील कार्य | |
| ४ | तुकोजी मोहित्यांचा परिवार | |
| ५ | भोसले घराणे | |
| ६ | जाधव घराणे | |
| ७ | सालप्याची लढाई | |
| ८ | संभाजी व धारोजी मोहिते यांना दिलेली इनाम पत्रे | |
| ९ | सारांश | |

| प्रकरण दुसरे<br>हंसाजीचे बालपण व सेनापतीपदी नियुक्ती | | (३१-९०) |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | |
| २ | हंसाजीचा जन्म | |
| ३ | हंसाजी मोहिते यांचा सैन्यात प्रवेश | |
| ४ | हिंदवी स्वराज्य | |
| ५ | हिंदवी स्वराज्याचे सेनापती | |
| १ | मानकोजी दहातोंडे | |
| २ | नेताजी पालकर | |
| ३ | प्रतापराव गुजर | |
| ६ | हंसाजी मोहिते (हंबीरराव) यांची सरसेनापतीपदी नियुक्ती | |
| १ | नेसरीचे युद्ध | |
| ७ | शिवराज्याभिषेक आणि सेनापती हंबीरराव मोहिते | |
| ८ | सेनापतींचे सैन्य व त्याची व्यवस्था | |
| १ | सैन्य | |
| २ | सैनिकांची शस्त्रास्त्रे | |
| ३ | वेशभूषा | |
| ४ | सैन्याचे शिकवण | |
| ५ | हेर खाते | |

| | | |
|---|---|---|
| ६ | किल्ले प्रशासन | |


IV


| | | |
|---|---|---|
| ७ | युद्ध पद्धती | |
| ८ | गणिमीकावा युद्ध तंत्राची रुपरेषा | |
| ९ | शिवराज्याभिषेका नंतरच्या युद्ध मोहिंमा | |
| १ | बहादूर गडाची मोहिम | |
| २ | मोगलांचे प्रदेश लुटले | |
| ३ | विजापुरच्या आदिलशाहिशी संघर्ष | |
| १० | सारांश | |
| | **प्रकरण तिसरे** **दक्षिण दिग्वीजय व सेनापती हंबीररावांचे कार्य** | (९१-१४०) |
| १ | प्रस्तावना | |
| २ | सेनापती हंबीररावांनी लासूर लुटले | |
| ३ | विजापुरचे आदिलशाही दरबारातील राजकारण | |
| ४ | दक्षिण भारतातील राजकारण | |
| ५ | शहाजी राजांची जहागीर | |
| ६ | दक्षिण मोहिम | |
| ७ | इतर राज्यांच्या सैन्यांची स्थिती | |
| ८ | दक्षिण मोहिमेची कारणे | |
| ९ | दक्षिण मोहिमेचा मार्ग | |
| १० | सेनापती हंबीररावांच्या विजयाने मोहिमेला सुरुवात | |

| | | |
|---|---|---|
| ११ | कुतूबशहाची भेट | |

V

| | | |
|---|---|---|
| १२ | दक्षिणेत सेनापती हंबीरराव मोहिते | |
| १ | जिंजीवर मराठ्यांचे वर्चस्व | |
| २ | शेरखानाचा पराभव | |
| ३ | सेनापती हंबीरराव मोहिते व व्यंकोजी राजे यांच्यातील युद्ध | |
| ४ | वेल्लोरच्या किल्ल्यास वेढा | |
| १३ | सारांश | |
| | **प्रकरण चौथे** (१४१-१७८)<br>**छत्रपती शिवरायांचे निधन व सेनापती हंबीररावांची भूमिका** | |
| १ | प्रस्तावना | |
| २ | दक्षिण मोहिमेची सांगता | |
| ३ | महाराष्ट्रातील घटना | |
| ४ | सेनापती स्वराज्यात परतले | |
| ५ | युवराज संभाजी राजे दिलेरखानाकडे | |
| ६ | भुपाळ गडावर मोगलांचे वर्चस्व | |
| ७ | सेनापती हंबीररावांची जालनापुरवर स्वारी | |
| ८ | युवराज संभाजी राजांना स्वराज्यात आणण्याचे हंबीररावांचे प्रयत्न | |
| ९ | छत्रपती शिवरायांचे रायगडावर निधन आणि बंडखोरांचे कारस्थान | |
| १० | सेनापती हंबीरराव मोहिते यांची निर्णायक भूमिका आणि इतिहासाला कलाटनी | |

| | | |
|---|---|---|
| १ | सेनापती हंबीररावांची बंडखोर मंत्र्याना पत्र | |
| २ | संभाजी राजांचे सेनापती हंबीररावांना पत्र | |


VI


| | | |
|---|---|---|
| ११ | सेनापती हंबीरराव मोहितेंच्या सहकार्यानी युवराज संभाजी राजे छत्रपती पदावर | |
| १२ | छत्रपती संभाजी राजांचे प्रधान मंडळ | |
| १३ | सारांश | |
| **प्रकरण पाचवे** (१७९-२३०)<br>**सेनापती हंबीररावांच्या युद्ध मोहिमा** | | |
| १ | प्रस्तावना | |
| २ | हिंदवी स्वराज्याचा राज्य विस्तार | |
| ३ | मोगलांचे उत्तरेतील राजकारण | |
| ४ | छत्रपती संभाजी राजांच्या कार्यकाळातील सेनापतींच्या युद्ध मोहिमा | |
| १ | बुऱ्हाणपुर लुटले | |
| १ | जामा मशीद | |
| २ | पीर बेन्ना मशीद | |
| ३ | अहुखाना किंवा मृग उद्यान | |
| ४ | मिर्झा राजे जयसिंह राजांची छत्री | |
| ५ | पाणी पुरवठ्याची व्यवस्था | |
| २ | औरंगाबादेत दहशत | |
| ३ | नळदुर्ग किल्ल्यावर हल्ला | |
| ५ | मोगल सम्राट औरंगजेबाची स्वराज्यावर स्वारी | |

| | | |
|---|---|---|
| १ | औरंगजेबाच्या सैन्याच्या छावणीचे स्वरून | |
| २ | औरंगजेबाचा तंबु | |


VII


| | | |
|---|---|---|
| ६ | स्वराज्यात पुन्हा कट कारस्थाने | |
| ७ | औरंगजेब दक्षिणेत दाखल | |
| ८ | रामसेजचा वेढा व सेनापती हंबीररावांची शर्थिचे प्रयत्न | |
| ९ | सेनापती हंबीररावांच्या शौर्यांची मोगली सैन्यात दहशत | |
| १ | सेनापती हंबीररावांचा  कुलीचखानाशी सामना | |
| २ | सेनापती हंबीररावांच्या शहाजादा आज्जमशी लढाई आणि विजय | |
| ३ | सेनापती हंबीररावांची कल्याण-भिवंडीच्या परिसरातील लढाई | |
| १० | सेनापती हंबीररावांच्या कर्तृत्वामुळे मोगलांच्या पदरी निराशा | |
| ११ | सारांश | |
| **प्रकरण सहावे** (२३१-२६१)<br>**औरंगजेबाचे बदलते धोरण व सेनापतींच्या आक्रमक लढाया** | | |
| १ | प्रस्तावना | |
| २ | सेनापती हंबीररावांची दुसऱ्यांदा शहाबुद्दीन खानाशी लढाई | |
| ३ | सेनापती हंबीररावांचे आदिलशाही वाचविण्याचे प्रयत्न | |
| ४ | सेनापती हंबीरराव वऱ्हाड, खानदेश व बागलान प्रदेशात | |
| ५ | सेनापती हंबीररावांचे बेळगाव वाचविण्यासाठीचे प्रयत्न | |

| | | |
|---|---|---|
| ६ | वाईची लढाई-सेनापती हंबीररावांचा मृत्यू | |
| ७ | सेनापती हंबीररावांच्या इतर कार्यासबंधीची पत्रे | |
| ८ | सारांश | |


VIII


| **प्रकरण सातवे** (२६२-२७१) **निष्कर्ष** | | |
|---|---|---|
| १ | सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोहिते घराण्याचा नाव लौकिक वाढविला | |
| २ | छत्रपती शिवरायांनी सेनापती पदी केलेली निवड हंबीररावानी सार्थ ठरविली | |
| ३ | अजोड कर्तृत्वाचा महान योद्धा | |
| ४ | निर्लोभी सेनापती | |
| ५ | न्यायप्रिय सेनापती | |
| ६ | छत्रपती संभाजी राजांचा मार्गदर्शक | |
| ७ | जेष्ट मुत्सद्दी व राजकारणी | |
| ८ | स्वराज्याचा दृष्टा सेनापती | |
| ९ | महान विजेता | |
| १० | सहिष्णुतावादी सेनापती | |
| ११ | चारित्र्य संपन्न सेनापती | |
| १२ | शिवतंत्राचा पुरस्कर्ता | |
| १३ | उत्कृष्ट प्रशासक | |
| १४ | आदर्श सेनापती | |

| | | |
|---|---|---|
| १५ | मराठ्यांचा आदर्श मावळा | |
| १६ | सारांश | |
| **संदर्भ ग्रंथ सुची** | | २७२-२८१ |




# Šú□Ö×-Ö¤ìü¿Ö

**"मराठ्यांच्या इतिहासातील सेनापती हंबीरराव मोहिते यांचे योदान "** या विषयावर संशोधन करताना मनपुर्वक आनंद होत आहे. माझे मार्गदर्शक प्रा.डॉ.अनिल सिंगारे गंगाखेड येथील संत जनाबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय इतिहास विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. संशोधनाच्या संदर्भात माझ्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत होते त्या संदर्भात डॉ. अनिल सिंगारे सर यांच्याशी अनेक वेळा चर्चा झाली. त्या चर्चेचे फलित म्हणजे प्रस्तुत विषयाची निवड होय. ज्ञानासाठी भटकरणाऱ्या चिखलाच्या गोळयाला आकार देणाऱ्या या माणसाकडे संशोधन करण्याची इच्छा व्यक्त केली आणि सरांनी माझ्यातील जिज्ञासूवृत्ती लक्षात घेऊन त्यांनी मला संशोधनासाठी होकार दिला. गुरूवर्य प्रा.डॉ.अनिल सिंगारे सरांनी वेळोवळी सूचना देऊन मार्गदर्शन केले, त्यामुळे हा शोधप्रबंध पूर्णत्वास आला. त्याबद्दल मनापासून डॉ. अनिल सिंगारे सरांविषयी सद्‌भाव व्यक्त करण्याऐवजी सदैव त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोकरावजी पाटील एकंबेकर, सचिव ॲड.सी.पी.पाटील, वकील संघाचे अध्यक्ष ॲड.अभय पाटील या ज्येष्ठांनी माझ्याबद्दल आत्मीयता दाखवून एक नवी प्रेरणा दिली. त्यांचा मी शतशः ऋणी आहे. महात्मा फुले परीवार अहमदपूर यांनी सहकार्य केले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथील इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कुंबोजकर मॅडम, डॉ.कारेकर सर, डॉ.जी.एस.पाटील, गुरुवर्य डॉ.शिवदे सर, प्रा.मगरे ए.ओ., डॉ.एल.एच.पाटील,

प्रा.एच.आर.जाधव, डॉ.ओमशिवा लिगाडे, प्रा.गोविंद शेळके, माझे सहकारी मित्र डॉ.गंगथडे रमेश, प्रा.बी.के.मोरे, रामराव पाटील, शिंदे ज्ञानेश्वर, शिवराज पाटील, डाके किशोर, प्रा.शिळे गोविंद, प्रा.साठे संजय, प्रा.मरवले मनोज, प्रा.मोरे सतीश, प्रा.बेले, प्रा.संतोषगायकवाड, प्रा.कांबळे बी.एस., प्रा.डॉ.सुर्यवंशी, जी.आर.इंद्राळे आदींचे सहकार्य या शोधप्रबंधासाठी अत्यंत मोलाचे ठरले. तसेच ग्रंथपाल पी.एम. इंगळे कार्यालयीन मुख्यलिपीक श्री.बी.के.पाटील व व्ही.डी.गुरनाळे यांचेही आभार !

माझ्या आवतीभोवतीच्या माणसांचे व त्यांच्या वृत्ती -प्रवृत्तींचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची ज्यांनी मला सवय लावली ते आदरणीय मा झे आई सौ.पार्वतीबाई व वडील सिताराम पाटील व संशोधन कार्य सफल करण्यासाठी महत्वपूर्ण प्रोत्साहन देणारी माझी पत्नी सौ.सुजाता पाटील व कन्या समिक्षा व चि.शिवतेज यांनी आवड निर्माण करून वेळोवेळी प्रोत्साहन दिले. म्हणून त्यांचा अंत:करणापासून ऋणी आहे.

प्रबंधाचे बाह्यांग व्यवस्थित व अचूक व्हावे म्हणून अतिशय मनापासून तन्मयतेने प्रकरण टंकलेखन करून अक्षर जुळणीचे काम करणारे आदरणीय श्री प्रशांत डोंगळीकर व प्रतिभाताई डोंगळीकर यांनी केले. त्यांच्याकडे असलेल्या दूरदृष्टीमुळे प्रबंध अचूक होण्यास मदत झाली. त्यांचेही आभार ! संशोधनाच्या या तीन वर्षाच्या कालावधीत प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार !

संशोधक
संतोष सिताराम पाटील
बसवेश्वर नगर, थोडगा रोड,
अहमदपूर जि.लातूर
भ्रमणध्वनी : ९४२३३९९०५९

# प्रकरण पहिले

# मोहिते घराण्याचा इतिहास

## १) प्रस्तावना :

छत्रपती शिवरायांच्या नेताजी पालकर या सेनापतीने अफजलखान स्वारीच्या प्रसंगी वाईला आणि मिर्झाराजे जयसिंग यांच्या संघर्षाप्रसंगी पन्हाळ्यावर येण्यास उशीर केला त्याबद्दल छत्रपतींची त्यांच्यावर नाराजी झाली आणि त्या नाराजीमुळे नेताजी पालकर शत्रुपक्षात सामील झाले. त्यानंतर कुडतोजी गुजर हे 'प्रतापराव' या पदवीने सेनापती झाले. सेनापती प्रतापरावाने बहलोलखान प्रसंगी त्याला अभय दिल्यामुळे राजांची त्यांच्यावर गैरमर्जी झाली. या ईर्षेने प्रतापरावांनी आपल्या सहा सहकार्यांच्या साहाय्याने नेसरी खिंडीत बहलोलखानवर तुटून पडले यावेळी झालेल्या संघर्षात प्रतापरावांना वीरमरण आले. त्यावेळी राजांच्या समोर सेनापती निवडीचा प्रश्न निर्माण झाला. शेवटी शिवरायांनी हंबीरराव मोहिते यांना सेनापती पदावर नियुक्त केले. या राजांच्या निर्णयामुळे छत्रपती संभाजी राजांनाही मागे वळून पहावे लागले नाही. हे हंबीररावांच्या कार्यावरुन लक्षात येते.

सेनापती हंबीरराव मोहिते हे मातब्बर नव्हते तर त्यांचे वडील विजापूरच्या आदिलशाहीमध्ये तळबीड गावचे पाटील होते. ते शहाजी राजांच्या सैन्यात दाखल झाले. नंतर ते सुप्याचे सुभेदार झाले. सुपे हा प्रदेश आदिलशाहाने जहागीर म्हणून शहाजी राजांना दिलेला होता. यावेळी राष्ट्रमाता जिजाऊ व पुत्र शिवाजी राजे कारभार पाहात होते. येथील गैरकारभारामुळे पुत्र शिवाजी राजांनी त्यांना शहाजी राजांकडे परत पाठवले. त्यावेळी त्यांचे पुत्र हंबीरराव पागेत नौकरीस लागले असावे आणि स्वकर्तृत्वाने अनेक पदावर त्यांनी काम केले. नेसरी प्रकरणाच्या वेळी हंबीरराव चिपळूण प्रांतामध्ये सैन्याची छावणी करुन होते. नेसरीला प्रतापरावांना वीरमरण येताच हंबीररावाने सर्व मराठा सैन्याला एकत्र करुन बहलोलखान व दिलेरखान यांना हुलकावण्या देत स्वराज्यापासून दूर

ठेवले व नंतर हंबीरराव हे सेनापती झाले. छत्रपती शिवरायांनी हंबीररावांना सेनापती पदी कसे नेमले याबाबतची सर्व माहिती प्रस्तुत प्रबंधामध्ये सांगितली आहे.

छत्रपती शिवरायांच्या दक्षिण दिग्विजयांच्यावेळी हंबीररावांचे कर्तृत्व खरे उजळून आले. या मोहिमेत दक्षिणेचा मार्ग मोकळा करुन महत्त्वाची त्यांनी भूमिका बजावली. बेळगांव भागात राजांची पायदळ होती. यावेळी हंबीरराव आपले घोडदळ घेऊन शिवरायांनी भागानगरकडे जाणार मार्ग मोकळा करुन दिला. अशावेळी हुसेनखान मियानासोबत झालेल्या संघर्षाची माहिती प्रस्तुत प्रबंधामध्ये सांगितलेली आहे.

सप्टेंबर १६७७ मध्ये जिंजीवर शिवरायांनी वर्चस्व मिळविल्यानंतर तेथील कारभाराची जबाबदारी हंबीररावांवर सोपविली होती. शिवरायांचा सावत्र भाऊ संताजी तेथे होता. अशावेळी व्यंकोजीने जिंजीवर हल्ला केला. त्यावेळी तेथून व्यंकोजीस त्यांनी परतावून लावले. तेथील सर्व किल्ल्यांची व्यवस्था हंबीररावांनी लावली असावी व मोघलांपासून त्यांचे रक्षण केले असावे याबाबतची सर्व माहिती प्रस्तुत प्रबंधामध्ये देण्याचा प्रयत्न केला आहे.

छत्रपती शिवरायांच्या निधनानंतर स्वराज्यात अराजकता निर्माण होऊ नये यासाठी सेनापती हंबीररावांनी महत्त्वाची भूमिका बजावली सर्व मराठा सैन्याला एकत्र करुन युवराज संभाजी राजांना छत्रपती या पदावर बसवून हंबीरराव हे त्यांच्या पाठीशी उभे राहिले. मोघल सम्राट औरंगजेबाच्या रुपाने स्वराज्यावर चालून आलेल्या संकटाचा सामना करत बुऱ्हाणपूरची मोहिम यशस्वी करुन दाखविली. छत्रपतींच्या स्वराज्यात मोघलांचा शिरकाव होऊन दिला नाही. सेनापती हंबीररावांनी कुठेही तुंबळ अशा लढाया केल्या नाही. पण एका मातब्बर सेनापती प्रमाणे सर्व युद्धाचे संचलन ते मोठ्या कुशलतेने करीत असत.

छत्रपती शिवरायांच्या संताजी घोरपडे कान्होजी आंग्रे सारख्या अनेक सेनापतींची चरित्रात्मक कामगिरी लिहिली गेली. मात्र एक तप सेनापती पदावर राहिलेल्या हंबीररावांचे कार्य

लिहिले गेले नाही. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासातील ही उणीव प्रस्तुत प्रबंधाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

## २) विषय निवडीची कारणे

१) सेनापती हंबीरराव मोहितेच्या जिवन चरित्राचा अभ्यास करणे.

२) स्वराज्यातील सेनापती व सैन्याच्या माहितीचा अभ्यास करणे.

३) सेनापती हंबीररावांच्या योगदाना बाबत माहिती मिळविणे.

४) सेनापती हंबीरराव आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या सबंधाचा अभ्यास करणे.

५) सेनापती हंबीरराव व छत्रपती संभाजी महाराजांच्या संबंधाचा अभ्यास करणे.

६) सेनापती हंबीररावांच्या मराठ्यांच्या इतिहासातील प्रभावांचा अभ्यास करणे.

## ३) गृहितके

१) सेनापती हंबीरराव मोहिते उत्तम लढवय्ये होते.

२) सेनापती हंबीरराव मोहिते तत्वनिष्ठ राज्यकर्ते होते.

३) सेनापती हंबीरराव मोहिते छत्रपती शिवाजी महाराजांचे विश्वासू सहकारी होते.

४) सेनापती हंबीरराव मोहिते उत्तम प्रशासक होते.

५) सेनापती हंबीरराव मोहिते छत्रपती संभाजी महाराजांचे उत्तम मार्गदर्शक होते.

६) सेनापती हंबीरराव मोहिते हे न्यायप्रिय राज्यकर्ते होते.

७) सेनापती हंबीरराव मोहिते शिवशाहीच्या छत्रपती शिवाजी व छत्रपती संभाजी महाराज ह्या दोन्ही छत्रपतींचे एकनिष्ठ सेनापती होते.

## ४) संशोधन पद्धती

१) वर्णनात्मक संशोधन पद्धती.

२) ऐतिहासीक संशोधन पद्धती.

३) सर्वेक्षणात्मक पद्धत

४) संशोधन पद्धतीची साधने :

१) प्रथम व दुय्यम दर्जाच्या साधनांच्या आधारे प्रबंध तयार करणे.

२) स्थळांना भेटी

३) तत्कालीन कागदपत्रांचा अभ्यास करणे.

## ५) मोहिते घराणे

भारताच्या इतिहासात विशेषतः दक्षिण भारताच्या इतिहासात सतरावे शतक अतिशय महत्त्वाचे आहे. चैतन्यहीन बनलेल्या वर्षानुवर्षे परकियांच्या वर्चस्वाखाली जीवन जगणाऱ्या खंडप्राय देशाला स्वःताची जाणीव करुन देण्याचे कार्य मराठ्यांनी केले. अशा मराठी सत्तेचा उदय ही या शतकातील महत्त्वाची घटना समजली जाते. मध्ययुगीन बहमनी साम्राज्यातून निर्माण झालेल्या सत्ताना नामोहरम करुन मराठ्यांनी स्वराज्य स्थपन केले. पुढे मोगल साम्राज्य खिळखिळे करुन दिल्लीच्या सिंहासनाचे नियंत्रण आपल्याकडे घेतले. हे केवळ छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे फलित होते.[१]

मराठी सत्तेविषयी मराठ्यांचा आद्य इतिहासकार ग्रँड डफ [२] म्हणतो की, इंग्रजांनी भारत जिंकला तो मराठी सत्तेचा शेवट करुनच, अशा मराठी सत्तेचा उदय विकास व अस्त या बाबतचे कोडे उलगडण्यासाठी देशी व परकिय इतिहासकारांनी १७व्या शतकापासून ते आजपर्यंत अनेकदा प्रयत्न केले आहेत. पोर्तुगीज इतिहासकार कास्मोइग्वार्द याने इ.स.१६६५ मध्ये पहिले शिवचरित्र लिहिले. तर रॉबर्ट ऑर्म, एल्फिन्स्टन, स्कॉटवेअरिंग, ग्रँड डफ , किंकेड इत्यादी युरोपीयन इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासावर विपूल प्रमाणात लेखन केले आहे. त्यामुळे संपूर्ण जगाला मराठ्यांच्या इतिहासाबाबत माहिती मिळाली. मराठ्यांची प्रेरणा घेऊन अनेक महापुरूष उदयास आले. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन हा शिवशाहीचा पुरस्कर्ता होता. [३] देशामध्ये स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करणारे महात्मा जोतीराव फुले यांना प्रेरणा देणारा मराठ्यांचा इतिहास होता.

छत्रपती शिवरायांनी ४०० वर्षाच्या परकिय यवण सत्ताधिशांच्या या अन्यायी शक्तीपासून मराठी जनतेस मुक्तकेले. आनंदनामसंवत्सरे शके १६९६ ज्येष्ठ शु. १२ घटी २१ पळे ३४ तीन घटीका रात्र उरली तेव्हा क्षत्रियकुलावंतस शिवाजीराजे भोसले सिंहासनी बसले... येणे प्रमाणे राजे सिहांसनारुढ झाले. या युगी सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ पादशाहा मऱ्हाटा पादशाहा एवढा छत्रपती झाला ही काही सामान्य जाली नाही. [४] शिवरायांचा पोर्तुगीज चरित्रकार कास्मो-इ-ग्वार्द म्हणतो. शिवाजी महाराज लोकांना चांगली वागणूक देतात आणि त्यामुळे लोक त्यांच्याकडे प्रेमाणे व विश्वासाने पहातात. त्यांचे सर्व प्रजाजन त्यांच्यावर प्रेमकरतात. कोणतेही बक्षिस अथवा शिक्षेमध्ये अतिशय निः पक्षपाती असतात. या बाबतीत त्यांनी जीवनामध्ये कोणत्याही व्यक्तीवर अन्याय केलेला नाही त्यांचे शौर्य व त्यांच्या चांगल्या वागणुकीमुळे त्यांच्यावर सर्व माणसे प्रेम करतात. न्यायव्यवस्थेत कुठल्याही न्यायाधिशांशी चर्चा न करता ते आपल्या प्रजेला सुखी ठेवतात. त्यांच्या या प्रसिद्धीमुळे ते सगळ्या हिंदूस्थानामध्ये दरारा बसविणारा तसेच प्रजेची काळजी घेणारा सर्वश्रेष्ठ राजा म्हणून ओळखला जातो. रामचंद्र आमात्य[५] 'आज्ञापत्र' ग्रंथात म्हणतात, 'तीर्थरुप कैलासवासी महाराज साहेब यवताश्रेय असता त्यापासून पुणे आदिकरुन स्वल्प स्वास्ता स्वतंत्र मागून घेवून पंधरा वर्षाचे वय असता त्या दिवसापासून तितके स्वल्पमात्र स्वास्तेवर उद्योग केला. ...केवळ नूतन सृस्टीच

निर्माण केली.' हे सारेकरताना महाराजांच्या प्रशासनामध्ये व लष्करामध्ये सेवेत असलेल्यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे.

छत्रपती शिवरायांनी १७व्या शतकामध्ये अठरा पगड जाती धर्माच्या माणसांना एकत्र करुन हिंदवी स्वराज्य निर्माण केले. त्यांच्या कार्यात महाराष्ट्रामध्ये निंबाळकर, शिर्के, मोरे, जगताप, शिळीमकर, बादल, मोहिते, जाधवराव इत्यादी घराण्यांनी योगदान दिले. पूर्वी या घराण्यातील माणसे परकियांच्या चाकरीत धन्यता मानून रक्ताचे पाणी करीत होती. तत्कालीन दक्षिण भारतामध्ये मध्ययुगात बहमणी साम्राज्यातून निर्माण झालेल्या सत्तामध्ये मराठा घराण्यातील अनेक शूर व पराक्रमी माणसे सेवा चाकरी करीत होती. त्यातील मोहिते घराणे हे अहमदनगरच्या निझामशाहीमध्ये रतोजी मोहिते नावाच्या व्यक्तीच्या कार्यामुळे 'बाजी' हा किताब मिळालेला होता. तेंव्हापासून हे घराणे इतिहासाला ज्ञात झाले.

इतिहास संशोधक डॉ.कुलकर्णी अ.रा.यांनी आपल्या 'आ ज्ञापत्र' नावाच्या ग्रंथात मराठ्यांच्या ९६ कुळी अडनावाची यादी दिलेली आहे ती खालील प्रमाणे.

## १) ९६ कुळी मराठ्यांची आडनावे

१) अहीर २) आंगणे ३) आंग ४) इंगळे ५) इचारे ६) कदम ७) काकडे ८) काळे ९) कोकाटे १०) खडतरे ११) खंडागळे १२) खैरे १३) गवस १४) गव्हाणे १५) गायकवाड १६) घाटगे १७) चव्हाण १८) चालके १९) जगताप २०) जागदाळे २१) जगधने २२) जाधव २३) जालिंदरे २४) ठाकूर २५) ढमढेरे २६) ढमाले २७) ढवळे २८) ढकणे २९) ढोणे ३०) तावडे ३१) तुवार ३२) तेज ३३) थोटे ३४) थोरात ३५) दरबार ३६) दळवी ३७) दाडे ३८) दाभाडे ३९) देवकाते ४०) धायबर ४१) धुमाळ ४२) नलाडे ४३) निकम ४४) निसाळ ४५) पवार ४६) पाठारे ४७) पांढरे ४८) पानसरे ४९) पारटे ५०) पालव ५१) पालांडे ५२) पिंगळे ५३) पिसाळ ५४) फडतरे ५५) फाकडे ५६) फाटक ५७) फाळके ५८) बागराव ५९) बागवे ६०) बांडे ६१) बाबर ६२) भागवत ६३) भोईटे ६४) भागले ६५) भोवरे ६६) भोसले ६७) मधुरे

६८) महाडीक ६९) महाबर ७०) माने ७१) मालप ७२) मालुसरे  ७३) मुलिक ७४) मोरे ७५) मोहिते ७६) यादव ७७) रसाळ ७८) राऊत ७९)राणे ८०) रेणसे ८१) लाड ८२) वाघ ८३) शंखपाळ ८४) शिताळे ८५) शिंदे ८६) शिरके ८७) शेलार ८८) सावादे ८९) सालवे ९०) सावंत ९१) साळुंखे ९२) सिसोदे ९३) सुर्वे  ९४) हंडे ९५) दरफळे ९६) क्षीरसागर.[६] इत्यादी असून मोहिते घराणे हे ९६ कुळीतील होते.

महाराष्ट्रातील ख्यातनाम ९६ कुळीतील मोहित्यांचे उपकूळ व इतर माहिती 'शिवाजी निबंधावली' या ग्रंथात प्राप्त झाल्याने हे घराणे प्रतिष्ठीत व ऐतिहासिक होते.


## २) ९६ कुळीतील मोहिते घराण्याचे कोष्टक

| कुळीचे नाव | वंश | गोत्र | गादी | निशाण | देवक | उपकुळे |
|---|---|---|---|---|---|---|
| चव्हाण | सुर्यवंशी ऋग्वेद | अभंग | संबरीगड रणथंब | श्वेत | अष्टव | मोहिते, वाकडे, पारदी, रणदिवे, दहिवे, वदुकई, डुरे, गव्हाणे, ढवळे, तावेडे, हंबीरराय, काशीद, भोर, तांबे, नाइके, मालसिंगे, दुसिंगे, ढेरे, मते, ढोंबरे, चोभे, भापकर, नवले, चोथे, चोहटमैल, कडु, अडसुळे[७] |

सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या घराण्याची वंशावळ प्राप्त  झाली असून या वंशावळीत हंबीरावांचे आजोबा 'रतोजी मोहिते' यांच्या पासून असल्याचे ऐतिहासिक साधन ग्रंथातून प्राप्त झालेले आहे. रतोजी मोहितेच्या पूर्वजाविषयीची माहिती पुराव्या अभावी प्राप्त झालेली नाही म्हणून मोहिते घराणे हे रतोजी या व्यक्ती पासून इतिहासाला माहिती मिळत आहे.

अशा ऐतिहासिक घराण्याची वंशावळ डॉ.शिवदे सदाशिव यांनी 'सेनापती हंबीरराव मोहिते' नावाच्या ग्रंथात दिलेली आहे.

## ३) मोहिते घराण्याची वंशावळ




या वंशावळी बाबतची माहिती खालील प्रमाणे दिलेली आहे.

## ४) मोहितेंच्या उदयाची पार्श्वभूमी

इ.स.१३४७ मध्ये स्थापन झालेल्या बहमणी सत्तेला दक्षिण भारताच्या इतिहासात पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात उतरती कळा लागली. या घराण्याच्या राजधान्या दौलताबाद, गुलबर्गा, बिदर असून इराक, इराण, अरबस्थान आणि आफ्रिका येथून अनेक परकिय मुसलमान मोठ्या पदावर आलेले होते. विशेषतः बहमणीचा सेनापती खलफ हसन बसरी त्याचा वजीर खाजा महंमूद गावान हे परदेशी मुस्लिम होते. तेंव्हा पुर्वीपासून दक्षिणेत स्थायिक झालेले मुस्लिम आणि परदेशातून आलेले मुस्लिम यांच्यात स्पर्धा होऊन कलहाला सुरुवात झाली आणि त्यातून बहमणी घराणे हे खिळखिळे बनले.

बहमणी राज्याच्या दरबारातील परकिय व स्थानिक मुस्लिम नेते हे पुढे स्वतंत्र राज्याचे संस्थापक बनले. युसूफ आदिल शहाने विजापूर येथे आदिलशाही राज्य स्थापन केले. कुली कुतुबशहाने गोवळकोंडा या ठिकाणी कुतुबशाही राज्य स्थापन केले. तर मलिक बरिद याने बिदर या ठिकाणी 'बरीदशाही' राज्य स्थापनकेले. हे तिन्ही घराणे परकिय होते. दक्षिण मु स्लिम नेत्यांनी स्थापन केलेले घराणे म्हणजे अहमदनगरची निझामशाही व वऱ्हाडची इमादशाही ही राज्ये होते. वऱ्हाडच्या इमादशाहीचा संस्थापक फतेउल्ला इमादउल मुल्क हा मुळचा ब्राह्मण असून विजयनगर आणि बहमणी संघर्षात कैद होवून बाटला गेला. तर निझामशाही घराण्याचा संस्थापक मलिक अहमदचा पिता हा मलिक नायब निजाम उलमुल्क हा ब्राह्मण असून परभणी जिल्ह्यातील पाथरीचा तो कुलकर्णी होता. [९] तोही विजयनगार आणि महमणी यांच्यात झालेल्या संघर्षातकैद होऊ न बाटवला गेला. स्वकृर्तृत्वाने राज्याच्या वेवेगळ्या तो पदावर आला मलिक नायब निजाम उलमुल्क व मुख्यप्रधान खाजा महमूद गावान यांच्यात पूर्व वैमनस्य होते. त्यातून इ.स. १४८१ मध्ये खाजा महमूद गावानचा वध झाला.[१०] आणि मलिक नायब निजाम उलमुल्क हा राज्याचा मुख्य प्रधान बनला. पण दरबारातील परदेशी मुस्लीमांच्या विरोधामुळे त्याला आपले स्थान टिकवित । आले नाही. इ.स.१४८५ मध्ये निजाम उलमुल्कचा खून झाला. त्यावेळी त्याचा मुलगा मलिक अहमद हा जुन्नर येथे बहमणी राज्याचा सुभेदार म्हणून काम करीत होता. वडिलांच्या वधानंतर तोही बहमणी राज्यातून वेगळा झाला आणि त्याने इ.स.१४८५ मध्ये महाराष्ट्रात जुन्नर या ठिकाणी स्वतंत्र घराण्याची स्थापना केली. कालांतराने आपल्या राज्याची राजधानी जुन्नर ऐवजी अहमदनगरची उभारणी करुन निझामशाही घराण्याची राजधानी बनविली. इ.स.१४८५ पासून इ.स.१६३६ पर्यंत या घराण्याने अहमदनगर येथून महाराष्ट्रात राज्यकारभार केला. पण इ.स.१४८५ ते इ.स.१४९० पर्यंत आपले स्वतंत्र स्थान टिकविण्यासाठी बहमणी सैन्याशी बऱ्याचदा लढावे लागले. शेवटी १९ जून १४९० रोजी निकापूरच्या युद्धातील विजयाने स्वतःचे अस्तित्व स्पष्ट झाले.[११]

"इ.स.१४९० ते इ.स.१५०९ पर्यंत मलिक अहमदने आपले राज्य जुन्नर, पुणे, नगर, नाशिक, बीड, कुलाबा, औरंगाबाद पर्यंत निर्माण केले."[१२]

मलिक अहमदचा मुलगा बुरहान निझामशहा याने ४४ वर्षापर्यंत "इ.स.१५०९ ते इ.स.१५५३ पर्यंत" राज्यकारभार केला. याने वऱ्हाडचा पाथरी जिल्हा नांदेड व उस्मानाबाद जिल्ह्याचा काही भाग आपल्य राज्याला जोडला. याच्या काळात शिया व सुन्नी पंथाविषयी दरबारात वाद झालेले होते. पण बुरहान निझामशहाने शिया पंथ स्वीकारुन वाढविण्यासाठी प्रयत्न केले. शेवटी इ.स.१५५३ मध्ये मृत्यु झाला.

बुरहान निझामशहाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा हुसेन निझामशहा हा इ.स.१५५३ मध्ये सत्तेवर आला, त्याने विजापूर व गोवळकोंड्याशी तह करुन विजय नगरच्या सत्तेशी संघर्ष केला होता. त्यातून इ.स.१५६५ च्या तालिकोटच्या लढाईत विजयनगरचा दारुन पराभव झाला. त्या राज्याचा काही प्रदेश निझामशहाला मिळाला त्याने इ.स.१५६५ पर्यंत राज्यकारभार केला. त्याचा अल्पवयीन मुलगा मुर्तझा निझामशहा गादीवर आला. याच्या काळात मुख्य प्रधान असलेला सलाबतखान व सेनापती सय्यद मुर्तझा यांच्यात परकिय मुसलमान व स्थानिक मुसलमान असा वाद होऊन दरबारात बंडाळी सुरू झालेली होती.[१४] तेव्हा लष्करी सेवा करीत असताना उद्‌भवलेली बंगळी 'रतोजी मोहिते' नावाच्या सरदाराने मोडून काढली होती. [१५] तेंव्हा मुर्तझा निझामशहाने मोहितेंना "बाजी" हा किताब [१६] देऊन मोठा सन्मान केलेला होता. हा रतोजी मोहिते, मोहिते घराण्याचा इतिहासाला ज्ञात असलेला पुरूष आहे. तेंव्हापासून त्यांचे वंशच स्वतःला बाजी मोहिते म्हणवून घेऊ लागले. पण साधनाच्या अभावामुळे रतोजी मोहिते यांच्या पूर्वजासंबंधी अद्याप माहिती उपलब्ध होऊ शकली नाही.

## १) रतोजी मोहिते

रतोजी मोहिते यांनी मुर्तझा निझामशहाच्या इ.स.१५८८ पर्यंत अतिशय इमान इतबारे निझामशाहीची सेवा केलेली होती. या काळात आर्थिक, लष्करी परिस्थिती सुधारलेली होती. मोगलांचा सरदार अझिझ कोका हा निझाम राज्यावर चालून आलेला होता.पण राज्याची स्थिरता पाहून

इ.स.१५८६ मध्ये तो परतगेलेला होता. कारण रतोजी मोहिते सारखी मराठा सरदार मंडळी एक निष्ठेने सेवा करीत होती.

इ.स.१५८४ मध्ये मुर्तझा निजामशहाने इब्राहीम आदिलशहाच्या बहिणीशी आपला मुलगा मिरान हुसेन शहा यांच्याशी लग्न लावल्यामुळे दक्षिणेतील या दोन शाह्या वैवाहिक संबंधाने जोडल्या गेल्या. त्यामुळे या दोन शाह्यांचा सलोखा १५८८ पर्यंत टिकून होता. पण मुर्तझा निजामशहाला आपला मुलगा मिराजशहा आपल्या विरुद्ध उठेल या भितीने त्याला ठार मारण्याचा त्याने प्रयत्न केला. तेंव्हा रतोजी मोहिते व इतर सरदार आणि आदिलशाही सरदारही मुर्तझावर नाराज होऊन काहींनी मिरानशहाशी संन्धान बांधले. तेंव्हा मिराजशहाने उघड उघड बंड पुकारले आणि मुर्तझाला ठार केले.

निजाम मिराजशाहाने जवळपास दहा महिने सत्ता मिळवून आपल्या विरुद्ध असलेल्या लोकांना ठार करण्याचे सत्रच सुरु केले. शेवटी १५ मार्च १५८८[१७] रोजी वझीर मिर्झाखानने त्यास ठार केले व मिराजशहाच्या दोन मुलापैकी इस्माईलशहा नावाच्या लहान मुलाला गादीवर बसविले व स्वतःच्या विचाराने सत्तासुत्रे मिर्झाखान चालवू लागला. तेंव्हा मिर्झाखान व जमालखान यांच्यात वैमनस्य निर्माण झाले. मिर्झाखान परकिय मुस्लीम होता. त्याने जमालखान व इतर सरदाराना वाईट वागणूक देऊ लागला. अशावेळी जमालखानाच्या पाठीशी रतोजी मोहिते खंबीरपणे उभे राहिले असावेत. फलटनचे वणंगपाळ निंबाळकर सोबत असावेत सोबत मालोजी व विठोजी भोसले होते. जमालखानानेच वंनगपाळ निंबाळकरांना कोल्हापूर प्रांताच्या मोहिमेवर पाठविले होते. त्यांच्या सैन्यात मालोजी व विठोजी भोसले होते. सोबत रतोजी मोहिते असावेत या ठिकाणी केवळ "मराठा सरदारांनी पराक्रम केल्यामुळे वनगपाळला विजय मिळवून दिलेला होता.''[१८] वनगपाळ यांच्या शिफारशीमुळे रतोजींना तळबीडची जहागीर दिलेली असावी. निजामशाहीत असताना कित्येक मुकासे फौजेच्या खर्चासाठी दिलेले होते. त्यांच्याकडे उत्तम असे सैन्य होते. 'तळबीड' या ठिकाणी त्याच्या सैन्याचा तळ होता. लवकरच त्यांचा मृत्यु झाला असावा. नेमका त्यांचा मृत्यु केंव्हा व

कसा  झाला. या बाबत निश्चित सांगता येत नाही. कोल्हापूर प्रांताचा संघर्ष इ.स.१५८९ -९० असा होता. याच्या आसपास त्यांचा मृत्यु झालेला असावा.[१९]

## २) तुकोजी मोहिते

इ.स.१५९१-९५ या काळात बुऱ्हाण निझामशहा द्वितीय सत्तेवर होता. त्याने सोलापूर जिंकून घेण्यासाठी प्रयत्न केले पण त्यामध्ये अपयश आले शेवटी इ.स.१५९५ मध्ये त्याचा मृत्यु झाला. त्यानंतर त्याचा मुलगा इब्राहीम नि झामशहा गादीवर आला. पण नळदूर्ग येथे विजापूरच्या आदिलशाही विरुद्धच्या लढाईत ऑगस्ट १९९५ मध्ये मारला गेला.

इब्राहीम निजामशहाच्या मृत्युनंतर त्याचा दिवान मिआन मंजू अथवा राजू यांनी अहमद नावाच्या एका मुलास अहमदनगरच्या गादीवर बसविले. पण हा मुलगा निझामशाहीचा खरा वारस नाही असा वाद निजामशाही दरबारात निर्माण झाला. त्यावेळी मिआन राजुनेगुजरातचा सुभेदार मुरादची मदत मागितली. मुरादने सन १५९६ मध्ये अहमदनगरला वेढा दिला त्यावेळी चांदबीबी ऊर्फ चांद सुलताना ही अहमदनगरच्या मारल्या गेलेल्या सुल्तान इब्राहीमची आत्या आणि विजापूरचा सुल्तान अली आदिलशहा पहिला याची विधवा पत्नी होती यावेळी ती अहमदनगर येथे होती. तिने अहमदनगरचे संरक्षण केले. [२०] मोगलाविरुद्ध या संघर्षात लखुजी जाधव हा बारगिर मराठा सैन्याचा नेता होता. या सैन्यात रतोजीचा मुलगा तुकोजी मोहिते असावेत. कारण यावेळी लखुजी जाधवने चांदबीबीला सर्वातोपरी मदत केली होती. तेंव्हापासून अहमदनगरच्या सैन्यांत तुकोजी मोहितेंनी उत्तम कामगिरी केलेली होती.

मोगलांनी पुन्हा चार वर्षानी म्हणजे सन १६०० मध्ये अहमदनगरवर स्वारी केली. यावेळी चांदबीबीने गोवळकोंडा आणि विजापूरच्या फौजा मदतीस बोलविल्या. या शाह्याच्या दोन्ही फौजा आणि दरबारातील लखुजी जाधव, तुकोजी मोहिते वगैरे मराठा सरदारांनी मोगलाशी टक्कर दिली आणि निजामशाही वाचविल्याचा यशस्वी प्रयत्न केला. दुर्देवाने निजामशाही दरबारातील हमीदखानाने चांदबीबीच्या दिवानखाण्यात शिरुन तिचा अचानकपणे खून केला. त्यामुळे शेवटी

मोगलांचे सैन्य अहमदनगरचा किल्ला म्हणजे निजामशाहीची राजधानी आपल्या ताब्यात घेण्यास यशस्वी झाले.

सत्तेसाठी निजामशाहीच्या दरबारातील या अंतर्गत संघर्षामध्ये मराठा सरदारानी प्रभावी भूमिका पार पाडली. हा काळ तुकोजी मोहिते यांचा उमेदीचा काळ होता. परंतु पर्शियन तावारिका अथवा चरित्रात मराठा सरदाराच्याकार्याचाच नव्हे तर त्यांच्या नावाचा देखिल उल्लेख केल्याची नोंद नाही. क्वचितकाही ठिकाणी तुकोजी मोहिते यांच्या कार्याची माहिती मिळते. वास्तविक निजामशाही दरबारात अंतर्गत गटबाजीच्या राजकारणात, अंतर्गत संघर्षात आणि शाह्यांच्या परस्पर विरोधी संघर्षात आणि मोगलाविरुद्धच्या संघर्षात मराठा सरदारांनी प्रमुख भूमिका बजावली होती. मराठा सरदार हे शाही सत्तेचे प्रमुख आधारस्तंभ होते. पण लखुजी जाधव, मालोजी भोसले यांच्या सोबत तुकोजी मोहितेंनी कार्य केले पण इतिहासकार फिरिस्ता आणि सय्यदअली यांनी या मराठा सरदारांच्या नावांचा देखिल उल्लेख केलेला दिसत नाही. यावरुन स्पष्ट दिसते की, मराठा सरदारांना आपला पराक्रम आणि शौर्य गाजविण्यास वाव मिळत असला तरी त्यांच्या पराक्रमाचे आणि शौर्याचे योग्य चिज होत नव्हते. त्यांनी मिळविलेले विजय हे मुस्लिम नेतृत्वाच्या नावावर नोंदविले जात होते.

## १) निजामशाहीचा वजीर मलिक अंबरच्या नेतृत्वाखालील कार्य

अहमदनगरच्या निजाम शाहीचा वजीर मलिक अंबर हा मुळचा आफ्रिकेतील ॲबेशियन असून अत्यंत हीन दर्जाचा गुलाम पण अतिशय महत्त्वाकांक्षी व्यक्ती होता. स्वकर्तृत्वाने वजीर पद मिळविले होते आणि निजामशाहीची संपूर्ण सत्ता आपल्या हातामध्ये लखुजी जाधव, भोसले सारखे मातब्बर मराठा सरदार घेत होते. लखुजी जाधव हे मराठा बारगिर सैन्याचा सेनापती होता आणि ते दहा हजारी मनसबदार होते यांच्या सोबत सैन्यामध्ये तुकोजी मोहिते असावेत. परंतु शाही मु स्लिम धोरणानुसार मराठ्यांना स्वतंत्र मोहिमांचे नेतृत्व देण्याबाबत एकमत असल्यामुळे दरबारातील सर्व मराठा सरदारांना मुस्लीम सरदारंच्या नेतृत्वाखाली कार्य करावे लागत होते. सुरुवातीला मलिक

अबंरच्या काळात  दरबारातील सर्व सरदार प्रामाणिकपणे सेवा चाकरी करीत होते. त्यामुळे इ.स.१६०६ पर्यंत मलिक अंबरला विस्कटलेली राज्याची घडी बसविता आली. मोगल-निजामशाही यांच्यातील संघर्षात मोगलांना  निजामशाहीशी इ.स.१६१० मध्ये मानहानीकारक तह करावा लागला व माघार घ्यावी लागली[२१] मलिक अंबर याला हे केवळ सरदारांच्या पाठींब्यामुळे शक्य झाले.

इ.स.१६०६ मध्ये मोगलांचा सम्राट म्हणून जहाँगीर सत्तेवर आलेला होता. जहाँगीरने दक्षिण भारत जिंकण्याचे कार्य हाती घेतले आणि पंधरावीस वर्ष पावेतो त्या दृष्टीने प्रयत्न केले. परंतु ते प्रयत्न मलिक अंबरने हाणून पाडले याचे बरेचसे श्रेय लखुजी जाधवराव, मालोजी राजे भोसले, शहाजी भोसले आणि तुकोजी मोहिते या सरदाराकडे जाते. [२२] मोगलाचा पराभव झाल्याने इ.स.१६१५ मध्ये सम्राट जहाँगीरने शहाजादा खुर्रम ऊर्फ शहाजहान याला पूर्ण तयारीनिशी निजामशाहीचा मुलूख हस्तगत करण्यासाठी रवाना केले. यावेळी मलिक अंबरनेही पराक्रमाची शर्थ केली पण शेवटी परिस्थिती ओळखून त्याने माघार घेतली. मोगलाशी तडजोड करुन दौलताबादच्या किल्याव्यतीरिक्त निजामशाहीचा सर्व मुलूख मोगलांना दिला. [२३] या  संदर्भात जहाँगिर आपल्या आत्मचरित्रात लिहितो की, ८ मार्च १६१६ मध्ये मलिक अबंरचा पुरा मोड झाल्याची बातमी आली मलिक अंबरवर काही सरदार रागावून शहाजवाजखानाकडे आले त्यांची बाळापूरला भेट झाली. त्या सरदारामध्ये उदाराम देशमुख, याकुतखान आणि इतर मुसलमान सरदार, बारगिरीतील लखुजी जाधवराव, बापूकाटे इत्यादी सरदार होते. त्यांचा मानसन्मान करुन त्यांना बरोबर घेऊन शहानवाजखान बाळापूरहून निघाला मलिक अंबरास उधळून लावले. रियासतकार गो.स. सरदेसाई या लढाईला रोशनगावची लढाई असे संबोधून या लढाई संबंधी पुढील माहिती देतात. मलिक अंबरने सरदार जमवून युद्धाची तयारी केली. इखलसखान, म्हालदारखान, शहाजी भोसले, जाधव, बाबाजी काटे, उदाराम देशमुख असे अनेक सरदार जमा झाले. जालना-खडकी च्या दरम्यान दोन्ही सैन्य अनेक दिवस युद्धासाठी सज्ज होऊन राहीली. पण एकदम चालून जाण्याची छाती कोणासही होईना काही काळ भेदनीती आणि गनिमीकावा युद्ध पद्धतीचा अवलंब केला. त्यात मोगलांना बरेच यश आले शहानवाजखानाने निजामशाहीतील अनेक सरदार फितवून आपल्या बाजूस आणले

आणि बाळापूर येऊन ते बादशाही लष्करात सामील झाले. तेंव्हा मलिक अंबरवर आणि बाणीचा प्रसंग ओढवला.[२४]

या घटनेपासून निजामशाहीमध्ये अनेक मराठा सरदार मलिक अंबरवर नाराज होऊन इतरत्र सुल्तानकडे रुजू झाले. लखुजी जाधवांनी निजामशाही सोडली तर शहाजी भोसले हे निजामशाहीतच होते. पण तुकोजी मोहिते हे नेमके कोणाकडे होते याबाबत निश्चित सांगता येत नाही. कारण आजमितीला पुरावा उपलब्ध नाही, मात्र डॉ.शिवदे सदाशिव यांनी आपल्या 'सेनापती हंबीरराव मोहिते' ग्रंथात सेनापती हंबीररावांचे आजोबा म्हणजे तुकोजी मोहिते या विषयीची माहिती दिलेली आहे. कऱ्हाड (जि.सातारा) जवळील वसंतगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या तळबीड या गावी मोहिते घराण्यातील रतोजी मोहिते यांचा पुत्र तुकोजी मोहिते हे शाही कामगिरीसाठी फिरत असताना यागावातील काही मंडळींनी आमच्या गावची पाटीलकी डोमगुडे या मूतालीकाने आमच्याच घराण्यातील माणसाला मारुन जबरदस्तीने स्वतःकडे घेतली आहे. आपण या डोमगुडेच्या काटा काढून आम्हाला आमची पाटीलकी मिळवून द्यावी अशी विनंती तुकोजीरावांना केली, ती मोहित्यांची म्हणजेच चव्हाण घराण्याचीच पाटीलकी होती. तत्कालीन सरदार मंडळीना देशमुखी आणि पाटीलकी ही वतने प्रामाणिक असत आणि या वतनासाठी त्यांची स्पर्धा चातल होती.[२५] तळबीडची जहागीर रतोजी मोहित्यांना निजामशाहाने दिलेली होती. कारण जमाल खानाच्या नेतृत्वाखाली फलटनकर वणगोजी नाईक निंबाळकर सोबत आदिलशाही बरोबर कोल्हापूर परिसराच्या लढाईमध्ये निंबाळकरांना विजय मिळालेला होता. तेंव्हा रतोजी मोहितेंनी तळबीड या ठिकाणी आपले वतन निश्चित केले होते. या वतनासंबंधीचा वाद तुकोजी मोहित्यांनी सोडविला तेंव्हापासून तळबीडकर मोहिते पाटील किंवा देशमुख म्हणून ते ओळखू लागले.

## २) तुकोजी मोहितेंचा परिवार

तुकोजी मोहिते यांना संभाजी, धारोजी ही मुले तर तुकाबाई नावाची कन्या होती. निजामशाहीमध्ये असताना तुकोजी मोहिते यांनी आपले सोयरसंबंध महाराष्ट्रातील घोरपडे व घाटगे

यांच्याशी जुळविले होते. आपला जेव्हा मुला संभाजी मोहिते यांना घाटगे घराण्यातील गंगाबाई नावाच्या मुलीशी विवाह लावून दिलेला होता. तर लहान मुलधारोजी यांचा विवाह घोरपडे घराण्यातील सुत्राबाई नावाच्या मुलीशी लावून दिलेला होता. तत्कालीन काळामध्ये जाधव, भोसले, घाटगे, घोरपडे, काटे, देशमुख इत्यादी मराठा घराणी निजामशाहीमध्ये होती. पण मलिक अंबरच्या कालखंडात काही मराठा सरदार मंडळीनी आपापली सरदारकी टिकविण्यासाठी इतरत्र गेल्याचे दिसून येते म्हणूनच घाटगे व घोरपडे हे आदिलशाहीत रुजू झाले असावेत.

तुकोजी मोहिते यांच्या मृत्युसंबंधी आजमितीला साधने उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा मृत्यु कोठे व कधी झाला याबाबत निश्चित सांगता येत नाही. पण इ.स.१६२२ मध्ये घाटगे व घोरपडे यांनी संभाजी व धारोजी मोहिते यांना आदिलशाहीच्या सेवेत आणले. [२६] यानंतर मोहितेंचा सोयरसंबंध भोसले घराण्याशी शहाजी राजांच्यामुळे आला.

## ३) भोसले घराणे

भोसले व मोहिते घराणे ही ऐतिहासिक व सोयर संबंधाने एकत्र आलेली महाराष्ट्रातील घराणे आहेत. मोहिते घराण्यासंबंधीचे संशोधन करताना जाधव, भोसले, घाटगे, घोरपडे, काटे, निंबाळकर, देशमुख इत्यादी अनेक मराठा घराण्यातील संबंधाबाबत माहिती प्राप्त झाली. मुख्यत्वे भोसले घराण्यातील शहाजी राजे आणि शिवाजी राजे व त्यांचे पुत्र राजाराम महाराज यांच्याशी वैवाहिक संबंधाने मोहिते घराणे एकत्र आले, त्यामुळे मोहिते घराण्याविषयाचे संशोधन करीत असताना भोसले घराण्यातील मालोजी राजे, विठोजी राजे, शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज यांच्याशी प्रेमाचे जिव्हाळ्याचे नात्याचे संबंध असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे भोसले घराण्याच्या संशोधनात्मक आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

वेरुळचे भोसले घराण्यातील मालोजी राजे हे अहमदनगरच्या निजामशाहीत एक मातब्बर सरदार म्हणून उदयास आले. मालोजी राजांना एक विठोजी नावाचा भाऊ असून मालोजीचा विवाह फलटणच्या वणगोजी नाईक निंबाळकर यांची कन्या दिपाबाई हिच्याशी झालेला होता. यांच्या पोटी

१८ मार्च १५९४ रोजी शहाजी नावाचा मुलगा झाला पुत्रप्राप्तीमुळे भोसले घराण्यात सर्वानाच खूप आनंद झाला. दोन वर्षानंतर त्यांना दुसरा शरिफजी नावाचा मुलगा झाला.

## ४) जाधव घराणे

प्राचीन महाकाव्यामध्ये 'यादव' घराण्याच्या यदू व्यक्तीरेखेपासून यादव शब्दप्रयोग पुढे आला. नंतर यादवापासून 'जाधव' हा शब्द रुढ झाला. म्हणजेच यादव ऊर्फ जाधव घराणे अतिप्राचीन घराणे असून मध्ययुगात सिंघनदेव नावाच्या व्यक्तीने देवगिरी या ठिकाणी यादव घराण्याची स्थापना केली. इ.स.१२७१-१३०९ च्या काळात रामदेवराय नावाचा पराक्रमी राजा होऊन गेला. उत्तरेतील खिलजी घराण्यातील अल्लाउद्दीन खिलजीने इ.१२९६ मध्ये यादव साम्राज्यावर आक्रमण केले. तेंव्हापासून मुस्लिम सत्तांचे वर्चस्व द.भारतामध्ये निर्माण झाले. मात्र अहमदनगरच्या निजामशाहीमधील मुर्तजा निजामशहा (६ जून १५६५ ते १४ जून १५८८) हा सत्तेवर होता.[२७] यादव ऊर्फ जाधव घराण्यातील लखुजी नावाच्या व्यक्तीने सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) या ठिकाणी १५७३ मध्ये आपल्या घराण्याची स्थापना केली. सिंदखेड हेच आपल्या राजधानीचे ठिकाण म्हणून त्यांनी आपल्या जहागिरीचा कारभार पाहू लागले. देवगिरीच्या यादवानंतर लखुजीने जाधव घराण्याला उर्जितावस्था प्राप्त करुन दिली.

लखुजी जाधव यांचा विवाह फलटणच्या वणगोजी नाईक निंबाळकर यांची बहीण म्हाळसाराणी असे असून यांच्या पोटी १२ जानेवारी १५९८ रोजी कन्यारत्न झाले. त्याचे नाव जिजाऊ असे ठेवण्यात आले. (छत्रपती शिवरायांची माता) जिजाऊचा विवाह इ.स.१६१० मध्ये शहाजीराजे भोसले यांच्याशी दौलताबाद या ठिकाणी लखुजी जाधवांनी लावून दिला. तेंव्हापासून भोसले-जाधव घराणे नातेसंबंधाने एकत्र आले. पूर्वी भोसले-जाधव या दोन घराण्यामध्ये चांगली मैत्री होती. लखुजी जाधवांच्या सोबत निजामशाहीमध्ये मालोजी व विठोजी भोसले मातब्बर सरदार म्हणून होते. फलटनच्या निंबाळकर घराण्याशी असलेल्या आप्त संबंधामुळे त्यांच्यात अतुलनीय असा स्नेह निर्माण झाला होता.

शहाजी राजे भोसले व जिजाऊ यांच्या विवाहाप्रसंगी मालोजी राजे ह्यात नव्हते. मालोजी राजांच्या निधनामुळे निजामशाहास फार दुःख झाले एक पराक्रमी सरदार गेल्यामुळे त्याला आपले सैन्यबळ कमकुवत झाले असे वाटू लागले. त्याने विठोजी राजासह, मालोजीराजांच्या दोन्ही पुत्रांचे सांत्वन केले. मालोजीराजांची जहागिरी त्यांच्या मुलांकडे तशीच चालू ठेवली तसेच मालोजीराजांचा 'राजा' हा किताम त्यांचे थोरले पुत्र शहाजी यास बहाल करण्यात आला. [२८] "उत्तम लक्षणांनी युक्त व सर्व संपत्तीचे आगार असा शरीफजीचा भाऊ जो शहाजी त्यास 'राजा' शब्द शोभू लागला." (तो राजा झाला) शहाजी राजांच्या नावे चुलते विठोजी जहागिरीचा कारभार सांभाळू लागले.

शहाजी व शरीफजी या दोन बंधुच्या विवाहानंतर इ.स.१६१३ मध्ये विठोजीचा मृत्यु झाला. आता जहागिरीची सर्व जबाबदारी शहाजी राजावर येऊन पडली. राजनीती व युद्धकौशल्य यामध्ये आता ते चांगले परिपक्व झाले होते. निजामशाहीचा पंतप्रधान मलिक अंबर हा त्यांच्यावर चांगलाच खूष होता. तो त्यांच्यावर महत्वाच्या जबाबदाऱ्या सोपवित होता.

इ.स.१६०९-१० या वर्षात मलिक अंबरने लखुजी जाधव व इतर मराठा सरदारांच्या मदतीने मोगलाचा बराचसा प्रदेश जिंकून घेतला होता. कारण यावेळी दिल्ली दरबारामध्ये सम्राट अकबराचा मृत्यु झाल्याने त्याचा पुत्र जहाँगीर हा मोगलांचा सम्राट बनलेला होता. त्याने पुत्र परवेझच्या नेतृत्वाखाली दक्षिण मोहिम काढलेली होती. पण निजामशाही सैन्याने मोगल सैन्याचा पराभव केलेला होता. १६१० मध्ये अहमदनगरचा किल्ला मोगलांकडून मिळाला होता.

इ.स.१६१६ मध्ये पुन्हा मोगल नि झामशाही संघर्ष झालेला होता. यावेळी मलिक अंबरने प्रयत्न करुनही शेवटी पराभव स्वीकारावा लागला. या प्रसंगाबाबत रियासतकार गो.स. सरदेसाई रोशन गावची लढाई असे संबोधून या प्रसंगापासून लखुजी जाधवान सारखी शूर व पराक्रमी निजामशाहीतील सरदार मोगलांना जाऊन मिळाले. नंतर इ.स.१६२० मध्ये पुन्हा लखुजी राजे निजामशाहीत रुजू झाले होते.

इ.स.१६२० मध्ये मलिक अंबरने मोगलाविरुद्ध तिसरा लढा दिला तेव्हा लखुजी जाधवा, शहाजी राजे व इतर मराठा सरदार, मलिकअंबरच्या पक्षाकडून लढताना दिसतात यावेळच्या युद्धात मलिक अंबरचा पराभव झालेला होता.[२९] तेंव्हा मलिक अंबरने लखुजी जाधव यांना कारणीभूत ठरविले असल्याने लखुजी पुन्हा मोगलांच्या चाकरीत रुजू झाले होते.

मोगल-निझामशाही संघर्षाच्या वेळी मराठा बारागिरामध्ये संभाजी मोहिते व धारोजी मोहिते हे दोघे उदयास येवून त्यांनी आपलेकृर्तृत्व दाखवून ा दिले असावेत. दरम्यानच्या काळात घाटगे व घोरपडे घराण्यातील मुलींशी त्याचा विवाह झालेला होात. या आदिलशाहीतील घोरपडे व घाटगे सदरारांनी आपल्या जावयास आदिलशाही दरबारात इ.स.१६२२ मध्ये रुजू केले. [३०] दोघेही आदिलशाहीची इमानइतबारे सेवा चाकरी करु लागले.

निजामशाहीमध्ये मलिक अंबरचे पूर्णतः वर्चस्व निर्माण झालेले होते. त्यामुळे निजामशाहीचे दिवसेनदिवस भरभराट होत होती. याचा हेवा विजापूरच्या आदिलशाहीला व मोगलांना वाटत होता. दोन सत्ताशी हात मिळवणी करुन मलिक अंबरला धडा शिकविण्यासाठी प्रयत्न करु लागले. इ.स.ऑगस्ट १६२४ मध्ये भातवडी या ठिकाणी मलिक अंबर व मोगल आणि आदिलशाही यांच्यात लढाई झाली.[३१] झालेल्या लढाइत मलिक अंबरचा विजय झाला. यावेळी मलिक अंबरच्या पक्षातील शहाजी व शरीफजी भोसले यांनी अद्वितीय पराक्रम केलेला होता. केवळ भोसले बंधुच्या शौर्यामुळेच हा निजामशाहीला मिळालेला विजय होता. पा या युद्ध प्रसंगी शहाजींचा बंधू शरीफजी हा ठार झाला होता. त्यामुळे शहाजीराजे युद्धात विजय मिळनही दुःखी झाले होते. येथील युद्धाचे वर्णन कवींद्र परमानंदाने आपल्या 'शिवभारत' ग्रंथामध्ये केलेले आहे. 'मलिक अंबर नगारे व शिंगे यांच्या जयघोषात निजामशाहाच्या भेटीस त्वरीत निघाला'[३२] निजामशाहाने मलिक अंबर व इतर सरदारांचे कौतूक केले, भेट वस्तूही दिल्या पण शहाजीराजाना कसल्याही प्रकारची विचारपूस केलेली नव्हती. त्यामुळे शहाजी राजांना निजामशाहाचा राग आला. आता आपणास येथे सेवा करणे अवघड आहे असे समजून त्यांनी थेट पुणे आपल्या जहागीरामध्ये आले. याबाबत रियासतकार सरदेसाई म्हणतात 'शहाजीचा पराक्रम पाहून मलिक अंबरास तो

डोईजड वाटू लागला. तारुण्यांचे रक्त शहाजीचे अंगी सळसळत असल्यामुळे उभयत ात धुसपूस उत्पन्न होऊन शहाजीचा घटक्रोघटकी अपमान होऊ लागला. बहुधा मलिक अंबरने त्याची जहागीर काढून घेतली.' त्यामुळे शहाजीराजांनी निजामशाहीचा त्याग करुन पुणे जहागीरीत दाखल झाले.

भातवडीच्या लढाईत आदिलशाहीचा पराभव होऊन आदिलशाही सरसेनापती मुल्ला महमद मारलागेल्यामुळे आदिलशाही कमकुवत झालेली होती. अशा वेळी कर्त्या शक्तीशाली सरदाराची गरज आदिलशाही होती. शहाजीराजे निजामशहावर नाराज झाल्याचे समजताच इब्राहीम आदिलशहाने शहाजी राजांना आदिलशाहीत येण्याचे निमंत्रण दिले. शहाजी राजांनी आदिलशहाचे निमंत्रण त्वरीत स्वीकारले, आदिलशहाने त्यांचे जंगी स्वागत केले. शहाजी राजांना 'सरलष्कर' पदावर नियुक्त केले. आदिलशहाच्या सैन्यांचे ते प्रमुख बनले व मावळा प्रदेश हस्तगत करण्याची कामगिरी दिली हे २८ जुलै १६२६ च्या पत्रावरुन समजते. 'अजर मेहरबान शहाजी राजे सरलष्कर दामदौलहू कारकून परगणे पुणे यास'[३३] या पत्रावरुन त्यांना मिळालेले सरलष्करपद व कामगिरी याची माहिती मिळते.

## ५) सालप्याची लढाई आणि मोहित्यांचा पराक्रम (ऑक्टोबर १६२५ )

आदिलशाहीमध्ये शहाजींच्या आधी घाटगे व घोरपडे यांच्या आग्रहामुळे संभाजी व धारोजी मोहिते बंधु रुजू झालेले होते. त्यांच्यामुळेच आदिलशाही दरबारात त्यांचे वजन होते. मराठा सरदार म्हणून आदिलशहा त्यांच्यावर वेगवेगळया जबाबदाऱ्या सोपवित होता. त्या जबाबदाऱ्या एकनिष्ठेने मोहिते बंधु पूर्ण करत असत. अशा काळामध्ये शहाजी राजे भोसले हे आदिलशाही सैन्यांचे सरलष्कर म्हणून रुजू झालेले होते. आदिलशाहाच्या वतीने पुणे प्रातांवर आपला अमल बसवित असताना निजामशहा व मलिक अंबरने शहाजींचा बिमोड करण्यासाठी निजामशाही सेनानी साबाजी अनंत याची नेमणूक केलेली होती. सोबत देशमुख कान्होजी जुझांरराव तीनशे सैन्यासोबत होता. या सैन्यांनी शहाजी राजांना सालप्याच्या घाटामध्ये गाठले. महजरात उल्लेखिल्या प्रमाणे 'साहाजी भोसला येदिलशाही यासि सोसमाल दे वया बा साहेब (साबाजी अनंत) नामजादी घेऊन

आले. शहाजीसगोसमाल देऊनु गनिमास सालपा घाटी कोंडिला' [३४] या प्रसंाी शहाजी राजा सोबतच्या आदिलशाही सैन्यात संभाजी व धारोजी मोहिते बंधुनी पराक्रमाची शर्थकेली. निजामशाही सैन्याचा जबरदस्त पराभवकेल्यामुळे निजामशाही सैन्य सैरावैरा पळू लागले. तर देशमुख कान्होंजी झुंझारराज मारला गेला. शहाजीराजानवर निजामशाहीचा आकस्मीत हल्ला होता. पण मोहिते बंधुमुळे शहाजी राजांना या सालप्याच्या युद्धात विजय मिळाला असल्यामुळे शहाजी राजांनी मोहिते बंधुचे आभार मानले. याचे रुपांतर नात्यामध्ये झाले. लक्करच मोहिते बंधुनी आपली तुकाबाई नावाच्या बहिणीचा विवाह शहाजी रांजाशी लाऊन दिला. रियासतकार सरदेसाई यांच्या मते, 'शहाजी-तुकाबाई यांचा विवाह इ.स.१६२४-२५ च्या काळात झाला.' तर बेन्दे यांनी 'शहाजी-तुकाबाई विवाह इ.स.१६२५ मध्ये झाला असून तुकाबाई ही संभाजी मोहिते यांची कन्या होती असा उल्लेख केलेला आहे.' मात्र सालप्याच्या लढाईनंतर शहाजी -तुकाबाई विवाह झाला. कारण या अगोदर मोहिते-भोसले संबंध जिव्हाळ्याचे नसल्याचे दिसून येतात. तसेच तुकाबाई ही संभाजी मोहित्यांची कन्या नसून ती बहीण होती. विवाहानंतर शहाजी राजांनी आदिलशाना विनंती करुन संभाजी व धारोजी मोहिते यांना तळबीडची व बालाघाटची देशमुखी मिळवून दिली. याचा पुरावा आदिलशहाच्या १० जानेवारी १६२६ च्या एका फर्मानावरुन मिळतो.

"शि.घ.ले. ३७१ व सा.ले.२३ फर्मान भाषांतर श.१५४७ पौष व ७

सु.१०२६ रखर २१ इ.स.१६२६ जाने.१०

(इब्राहीम अदिलशहा) कारकून किले पनाळा


शहाजी भोसले सरलष्कर यांनी अर्जदास्त केला की, 'कर्यात तळबीडची देसगत व किले पन्हाळ्याचे हक्क समजी (संभाजी) व धारोजी मोहिते यास द्यावी. हाली ही देसगत ओसाड आहे.' त्यावरुन पातशहानी भोसले सरलष्कर व मोहिते यांचा अर्ज खातिरेस आणून देसगत मोहित्यास बहाल केली."[३५]

त्यातील मजकूर फारशी व मोडी लिपीत दिला आहे. अशाच मजकुराचा मोडी लिपीतील कागद सापडला त्याचे लिप्यंतर पुढे दिले आहे.

" + + + शहाजी भोसले सरलष्कर यांनी पादशाही हुजुरास अर्ज केला की देशगत कर्यात तळबीड व कर्यात बालेघाट किल्ले मजकूर पुरुष दर पुरुष मिरास तंबाजी व धारोजी मार हल्ली देशगत महकूर रिकामी पडली आहे. कोणी येक मनुष्य त्या जाग्यावर नाही. पादशहाचा फर्मान + + देशात + + पूर्वीप्रमाणे संभाजी व धारुजी मोहिते मुकरर करुन + + दुमाला उभयता मशार जिल्हे मजकूर देशगतीचे काम उभयता याजकडून + + घेत जावे. सरलष्कराचे विनंतीवरुन अयनाली नकल दप्तरी दाखल करुन असल परत द्यावे. पादशाहांचे हुकुमावरुन चालावे सिका करुन + +'[३६]

## मोडी लिपीतील फर्माण पृ.२५

ताराबाई कालीन पत्रे खंड-१



सरलष्कर शहाजी राजांनी संभाजी व धारोजी मोहित्यांची शिफारस करताना तळबीड व बालाघाटची देशमुखी त्यांना का द्यावी या विषयी कळविले होते. तळबीड व बालाघाटची देशमुखी मोहिते घराण्याची होती ती पुढे पिढ्यानपिढ्या मोहिते घराण्याकडे रहावी म्हणून शिफारस केल्याचा उल्लेख ताराबाई कालीन कागदपत्रावरुन समजतो.

तळबीडची देशमुखी तुकोजी मोहित्यांनी मिळविली होती. पण आदिलशाही-निजामशाही संघर्षामुळे येथील परिसर ओस पडलेला होता. याची जाणीव शहाजी राजांना व मोहिते यांना होती. पण अद्याप पर्यंत त्यांना मिळाली नसल्याने आणि शहाजी राजांचे वैवाहिक संबंध प्रस्थापीत झाल्यामुळे आदिलशहाकडे देशमुखी बाबत शिफारस करुन ती मिळवून दिलेली होती. तेंव्हा पासून तळबीडचे पाटील किंवा देशमुख म्हणून आदिलशाहीमध्ये नावारुपास आलेले होते.

संभाजी व धारोजी मोहिते हे मोठे पराक्रमी आदिलशाही सेनानी होते. त्यांच्या पराक्रमाचे वेळोवेळी आदिलशहानेकौतूक केल्याचे अनेक आदिलशाही फर्मानात पहावयास मिळते. तळबीडकर मोहित्यांची ही फर्माने प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ.आप्पासाहेब पवार यांनी ताराबाईकालीन कागदपत्रामध्ये (खंड-१) मध्ये प्रकाशित केली आहेत.

## १) संभाजी व धारोजी मोहिते यांना दिलेले इनामपत्र

१) "अज रख्तखाने मोत हजरती राजश्री साटेराऊ राजे साहेसाो दामदौलतहु ताा कारकूणानी व मोकदमनि व दर वस्तीचे कसबे तलबीड किले पनाला बिदानंद की दहाय सुर सन तीसा अशरीन अलफ, माो अनाम संभाजी मोहिते व धारोजी मोहिते देहाये कर्यात मजकूर मर्द हलालखोर अजि सबब मरामती इनाम दरगावास कर्याती मजकूर बाा पाटील मौजे मालगाव चावर. ।।. व मौजे उरल चावर. व मौजे मुढे चावर. ।।. मौजे वलेफळे चावर. ।।. मौजे रिविळे चावर. ।।. व कसबे मजकूर चावर. ।। येकूण पड जमीन दर गावास पडीचे ++ व देखील कुलबाव अज मरामती केले असे ++ दिवाण नफराईत करतील हाये ये हाक सदरहू जमीन इनाम दस्तीबाद राखुनु हदमहदूद घालून बाऔलादी व अफलादी देसाई मुजास दुमाला केला असे दुमाला करणेस

दरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे. तालीक लिहून घेऊनु असल देसाई मजकुरास दिजे मार्तब असे तारिख ७, माहे साबान[३८]

सदरील इनामपत्र संभाजी व धारोजी मोहिते यांच्या कामगिरीवर खूष होऊन महम्मद आदिलशाहाने २३.०३.१६२९ रोजी दिलेले आहे. त्यानुसार संभाजी व धारोजी मोहिते यांना त्यांच्या खर्चासाठी पाटीलकीचे अधिकार मोहिते बंधुना दिलेले होते तसेच मालगाव, उरल, मुढे, वलेफळे, कोरविळे, कसबे या सहा गावाबाबतचे अधिकार देण्यात आले होते.

तसेच मुहम्मद आदिलशाहाच्याच्या काळात युद्ध मोहिमेत धारो जी मोहिते यांनी उत्तम कामगिरी केल्यामुळे शाबासकी देणाऱ्या पत्राची नक्कल

२) 'सर्व शुरातील मुख्य व सर्वासन्नीधचे काम + + तील प्रमुख राजश्री धारोजी राजे मोहिते यासी आज्ञा केली अैसीजे तुम्ही पादषाही आत्यंत कृपेने व पादषाही मेहर्बानगीने योग्यता वाढविण्याने श्रेष्ठता पावोन जाणावे की तुम्ही युद्धप्रसंगी पुर्ण पराक्रमाने युत्ध केले आणि शत्रुकडील फौजेचा मोड केला व शत्रुचे जमातीस तरवारीचे धारेने भाजुन घेतले. म्हणीजे मोठा शस्त्र पराक्रम केला हे सर्व वर्तमान सरकारात जाहीर राहाले. शाबास तुमची व तुम्ही निरंतर संतोषात असा कारण की तुम्ही लढाईचे दिवशी बहुत शुरत्व केले ही गोष्ट पादषाही कपेस पात्र जाहाली. या उत्तम सेवेचे फळ तुम्हास दिवसेंदिवस अधिक प्राप्त होऊन सरकारातून कृपाळू होऊन तुमची योग्यता वाढविली जाईल. ताा १३, माहे राकार सन १०४०

सदरील पत्र आदिलशाही सरदार मुस्तफाखान याने धारोजी मोहिते यांना त्यांच्या कार्याचे कौतूक करुन संपूर्ण आदिलशाहीमध्ये योग्यतापूर्ण कामगिरीमुळे तुमची योग्यता वाढविण्यासंदर्भात केलेला पत्र व्यवहार होता.[३९]

३) धारोजी मोहिते यांनीकठीण प्रसंगी आमच्या बरोबर मोठा पराक्रम गाजविला असे रणदुल्लाखान याने कळविल्यावरुन बादशहाने खूष होऊन धारोजी मोहिते यांना उंची पोषाख पाठविला.

या संदर्भातील खालील पत्र

'सर्व शुरातील मुख्य व सर्व संन्नीधचे कामदारातील प्रमुख राजश्री धारोजी मोहिते यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही पादशाही कृपेने श्रेष्ठता पावोन जाणावे की हाली सर्वश्रेष्ठ वजीरातील मुख्य व सर्व मुसलमान जातीचे अमीर लोकातील श्रेष्ठ व सर्व खान मंडळातील योग्य व थोरपणा व संभावितपणाची आहे रहाणी ज्याची व भारीपणा व शुरत्वाजी आहे योग्यता ज्याच व पादशाही कृपेस योग्य व उंचेत्वास थोरपणास फारच लायक व रणभूमितील व युद्ध प्रसंगातील धीर व महान पराक्रमी शुर व संदरपणाचे आहे चीन ज्यास व साप्रतचे रस्तुमच असे जे रणदुल्लाखान यांणी लिहीले की दौलतीचे कल्याण इच्छिणार राजश्री धारोजी मोहिते याणी महान कठीण प्रसंगाचे समई यश प्राप्तीचे वेलेस आमचे समक्ष बहुत पराक्रम केला म्हणोन सरकारात विनंतीपत्र लिहून पाठविले व मुलुख घेऊन फते जाल्याचे व शुरत्वाने शत्रु पराजय करुन यश प्राप्तीची खुष खबर म्हणेन संतोषाने वर्तमान जाहीर केले ते ऐकोन स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन तुम्हास भारी किमतीचा पोषाख प।। आहे. यात सहस्त्रावधी प्रकारचे कल्याण आहे असे जाणोन आंती आदेर करुन घेऊन जीवदारभ्य असीच स्वामी सेवा करण्याविसी कंबर बांधून सेवा करुन पादषाही अत्यंत कृपेस पात्र होऊन योग्यता पावोन असावे आणि निरंतर विनंतीपत्र पाठवित जावे व सांप्रतचे केवळ रुस्तुमच व शुरत्वाचे आहे चिन ज्यास असे जे रणदुल्लाखान हे दौलतीचे कल्याणार्थ तुम्हास आज्ञा करतील त्यातच आपले सर्व कल्याण आहे असे जाणोन त्याचे आज्ञेत वागावे व त्याचे हुकुमाविसी कदापी विरुत्ध वागो नये आणि कधीही आंतर करु नये.

तारीख १२, रमजान, सन १०४५'[४०]

४) धारोजी मोहिते यांनी प्राण पणास लावून राजसेवा केल्याचा उल्लेख

हे पत्र दि.३०.०४.१६३७ रोजी पाठविले आहे

सर्व मूलूक इश्वराचा आहे

मोहर तालिक

राजश्री धारोजी राजे मोहिते यासी आज्ञा केली अैसीजे तुम्ही पादशाही आत्यंत कृपेने व पादषाही मेहबनिाी व योग्यता वाढविण्याने श्रेष्ठता व थोरपणा पावोन जाणावे की हाली संभावितपणाची आहे रहाणी ज्याची व शुरत्वाचे आहे चिन्ह ज्यास व श्रेष्ठ आहे स्थान व योग्यता ज्याची व आत्यांतकृपा करावयास योग्य व उपकार व प्रिती करण्यास पात्र असे जे आंबरखान नवल्ली याणी सर्व जालेला माार लिहीला की धारोजी राजे मोहिते याणी स्वामी सेवेस प्राण अर्पण करावा अशा प्राकरची सेवा करण्यात किंचीतही आंतर केले नाही व धन्याचे चाकरीत जीव खर्च करावा यदर्थी काही येक बारीक विचार मनात न आणिता आंतर न करिता स्वामी सेवा करुन दाखविली म्हणोन लिहीले ते जाहीर जाले त्याजवरुन तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे तरी तुम्ही सत्य जाणावे की ही शेवा स्वामीचे मनोदयनुरुप तुम्ही केली त्या उत्तम शेवेचे फळ दिवसे दिवस तुम्हास आदिक प्राप्त होऊन तुमची योग्यता वाढविली जाईल.

ताा.१४, माहे जिल्हेज, सन १०४६.[४१]

ताराबाई कालीन कागदपत्रामधील डॉ.अप्पासाहेब पवार यांनी संपादीत कागदपत्रे ही मोहिते घराण्यावर असून संभाजी व धारोजी मोहिते यांनी आदिलशाहीमध्ये केलेल्या कामगिरीची माहिती मिळते यांनी अनेक युद्धमोहिमानमध्ये अतूलनीय पराक्रम केल्याचे दिसून येते. म्हणूनच त यांच्या कार्याची परतफेड आदिलशहाने तळबीड व सभोवतालच्या परिसरातील देशमुखीचे अधिकार हे त्यांचे कार्यकर्तृत्व स्पष्ट होते. त्याचे उर्वरित आयुष्य आदिलशहाची इमानइतबारे सेवाकरीता करण्यात गेलेले होते. हाच वारसा व अधिकार त्यांच्या वारसांना आदिलशहाने दिलेले होते.

## सारांश :

सेनापती हंबीरराव मोहिते यांचे 'मोहिते' घराणे हे ऐतिहासिक घराणे असून साधना अभावी या घराण्याची प्राचीन परंपरा उपलब्ध झालेली नसून मध्ययुगातील निझामशाहीच्या कार्यकाळात या घराण्याचा ज्ञात पुरुष रतोजीच्या पासूनची माहिती प्राप्त होते. रतोजी मोहिते हे निझामशाहीतील एक वजनदार मराठा सरदार म्हणून परीचित होते. त्यांनी दरबारात निर्माण झालेली बंडाळी मोडून काढलेली होती तेव्हापासून त्यांचे कर्तृत्व पुढे आलेले होते. यांना तुकोजी व संभाजी नावाची दोन मुले होती. संभाजीपेक्षा तुकोजी हा कर्तृत्वान मुलगा होता. त्यांनी निझामशाहीमध्ये वडीलांचा वारसा चालवलेला होता. तळबीडची पाटीलकी मिळवलेली होती. तेव्हापासून मोहिते घराणे हे तळबीडचे देशमुख घराणे म्हणून नावारुपाला आलेले होते.

तुकोजींना संभाजी व धारोजी हे मुले होती. यांचा विवाह आदिलशाहीतील घाटगे व घोरपडे घराण्याशी लावलेला होता. पुढील काळात या दोघांनी आदिलशाहीमध्ये नोकरी पत्करुन आपले तळबीडचे वतन सांभाळले होते. इमान इतबार त्यांनी आदिलशाहीची सेवा चाकरी केल्याचे अनेक कागदपत्रातून पाहावयास मिळते. शाहीजीराजे भोसले यांच्याशी नाते संबध त्यांनी निर्माण केले असल्याने त्यांची प्रतिष्ठा फारच वाढलेली होती. त्यामुळे मराठ्यांच्या इतिहासात त्यांच्या घराण्यात अतिशय महत्व प्राप्त झाल्याचे दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ :


१) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपा) - मराठ्यांचा इतिहास खंड पहिला, पुणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन, २००६, पृ.३६६.

२) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. - पूर्वोक्त, पृ.७.

३) शिखरे चंद्रशेखर - प्रतिइतिहास, पुणे, जिजाई प्रकाशन, २००७, पुरस्कार.

४) डॉ.शिवदे सदाशिव - सेनापती हंबीरराव मोहिते, पुणे, डायमंड पब्लिकेशन, २००७, पृ.१.

५) डॉ.शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.७.

६) डॉ.कुलकर्णी अ.रा. - आज्ञापत्र, पुणे, डायमंड पब्लिकेशन, २००७, पृ.२२०.

७) केळकर न.चि. - शिवाजी - निबंधावली २, पुणे, रायगड स्मारक मंडळ व भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३०, पृ.५६, ५७.

८) डॉ.शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.४.

९) शिखरे चंद्रशेखर - पूर्वोक्त, पृ.७.

१०) प्रा.देशपांडे वसंत - मध्ययुगीन भारताचा इतिहास, नांदेड, अभय प्रकाशन, १९९८, पृ.८६.

११) डॉ.कुंठे - अहमदनगरची निझामशाही, मुंबई, मुरली प्रकाशन, १९६२, पृ.२३.

१२) प्रा.देशपांडे वसंत - पूर्वोक्त, पृ.१०६.

१३) प्रा.देशपांडे वसंत - पूर्वोक्त, पृ.१०७.

१४) डॉ.कुंठे - पूर्वोक्त, पृ.२३०.

१५) देशमुख विजय (संपा) - शिवविजय रौप्य मोहत्सवी कार्य गौरव समिती नागपूर, प्रथम आवृत्ती १९९२, पृ.१८.

१६) डॉ.शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.२.

१७) बेन्द्रे वा.सी. - मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची चिकित्सक चरित्रे, मुंबई, पहिली आवृत्ती १९६७, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर १४, पृ.९६.

१८) प्रा.डॉ.बाहेकर एस.ए. - राजमाता-राष्ट्रमाता जिजाऊ, जळगाव, कसब प्रकाशन, २००७, पृ.१२२.

१९) प्रा.देशपांडे वसंत - पूर्वोक्त, पृ.११०.

२०) दळवी गो.दा.(संपा) - मराठा कुळाचा इतिहास, भाग १, जाधव घराण्याची कैकियत, मुंबई, १९९२, पृ.२५.

२१) प्रा.देशपांडे वसंत - पूर्वोक्त, पृ.११३.

२२) Indian Historical Quartly - Calcutta, September १९९३, P-५६.

२३) बेंद्रे वा.सी. - खाजगी दप्तर, अनुवादित बुसातीन-इ सलातीन (मराठी अनुवाद) अर्थात विजापूरची आदिलशाही, पृ.७२, ७३.

२४) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत, भाग १, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन,१९१०, पृ.४०, ४१.

२५) डॉ.शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.३.

२६) डॉ.शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.३.

२७) प्रा.डॉ.बाहेकर एस.ए. - पूर्वोक्त, पृ.९८.

२८) दिवेकर सदाशिव - शिवभारत-कविंद्र परमानंदक्रत, पुणे, शब्देवेध प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९९८, पृ.१७.

२९) प्रा.डॉ.बाहेकर एस.ए. - पुर्वोक्त, १५८.

३०) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त पृ.१५८.

३१)	सरदेसाई गो.स. - पूर्वोक्त, पृ.५२.

३२)	दिवेकर सदाशिव - पूर्वोक्त, पृ.३८.

३३)	केळकर न.चि. व आपटे द.वि.(संपा) - शिवकालीन पत्र-सार-संग्रह-खंड१, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३०, पृ.५२.

३४)	बेंद्रे वा.सी. - मालोजी राजे आणि शहाजी महाराज यांचे चरित्र, मुंबई दादर, १९६७, पृ.२४२.

३५)	केळकर न.चि. व आपटे द.वि.(संपा) - पूर्वोक्त, पृ.५३.

३६)	डॉ.पवार अप्पासाहेब - ताराबाई कालीन कागदपत्रे खंड १ कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला, १९६९, पृ.२४.

३७)	डॉ.पवार अप्पासाहेब - पूर्वोक्त, पृ.२५.

३८)	डॉ.पवार अप्पासाहेब - पूर्वोक्त, पृ.२६.

३९)	डॉ.पवार अप्पासाहेब - पूर्वोक्त, पृ.२७.

४०)	डॉ.पवार अप्पासाहेब - पूर्वोक्त, पृ.३३.

४१)	डॉ.पवार अप्पासाहेब - पूर्वोक्त, पृ.३४.

# प्रकरण दुसरे
# हंसाजीचे (हंबीररावांचे) बालपण व सेनापतीपदी नियुक्ती

## १) प्रास्तावना :

महाराष्ट्राच्या इतिहासात १७ वे शतक राजकीय परिवर्तनाचे शतक होते. या परिवर्तनाचे प्रणेते छत्रपती शिवाजी महाराज होते. त्यांच्या राजकीय धोरणाची, दूरदृष्टीची आणि कर्तृत्वाची प्रेरणा घेऊन याच शतकाच्या उत्तरार्धात मराठी समाज नव्या ध्येयाने जागृत झाला. त्याने आपल्या अस्मितेचा ठसा त्या काळावर आणि नंतरच्या सुमारे १५० वर्षाच्या इतिहासावर उमटविला.

महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरील सत्तांशी संघर्ष करुन महाराष्ट्रामध्ये 'हिंदवी स्वराज्य' निर्माण केले. त्यामुळे मराठ्यात राजकीय चैतन्य निर्माण होऊन स्वराज्य, स्वधर्म व संस्कृती यांच्या रक्षणार्थ प्रसंगी प्राणांचेही मोल देणारे अनेक मराठा घराणी व कर्तबगार पिढी महाराष्ट्रामध्ये उदयास आली.'[१] अशा मराठा घराण्यापैकीच मोहिते हे एक घराणे होय. हे घराणे १६व्या शतकापासून अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये लष्करी सेवा चाकरी करीत होते. १७व्या शतकाच्या पूर्वाधात विजापूरच्या आदिलशाहीमध्ये अनेक युद्ध मोहिंमामध्ये इमानइतबारे आपले कर्तृत्व सिद्ध केल्याने 'तळबीड' (ता.कराड जि.सातारा) ची देशमुखी मिळालेली होती. तेंव्हापासून ते तळबीडचे (बाजी मोहिते) देशमुख म्हणून ओळखले जाऊ लागले. त्या परिसरात त्यांनी चांगलेच वैभव प्राप्त केले होते.

## २) हंसाजीचा जन्म

मोहिते घराणे हे महाराष्ट्रातील कर्तृत्वसंपन्न घराण्यापैकी होते. इतिहासाला ज्ञात असलेल्या मोहिते घराण्यातील रतोजी मोहिते यांना तुकोजी मोहिते नावाचा कतृत्ववान मुलगा होता. त्यानेच तळबीडच्या पाटीलकीचा वाद मिटवून तेथील पाटीलकी मोहिते घराण्याकडे घेतली होती. तेंव्हापासून तळबीडचे मोहिते पाटील किंवा देशमुख म्हणून ओळखू लागले.

तुकोजी मोहिते यांना संभाजी व धारोजी अशी मुले असून तुकाबाई नावाची मुलगी होती. यांचे सोयर संबंध तत्कालीन घाटगे, घोरपडे व भोसले घराण्याशी निर्माण झालेले होते. मोहिते घराण्यातील संभाजी मोहिते यांना हरिफराय, हंसाजी, शंकराजी आणि सोयराबाई व अण्णुबाई अशी पाच मुले होती. पण यांच्या जन्म व मृत्यु संबंधीचे पुरावे अद्यापही मिळाले नसल्यामुळे त्यांचा कालखंड कोणता होता हे निश्चित सांगता येत नाही. परंतु तत्कालीन ऐतिहासिक घटनांचा संदर्भ घेऊन काही अंशी अंदाज बांधता येतो.

प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ.आप्पासाहेब पवार यांनी 'ताराबाईकालीन कागदपत्रे, खंड पहिला' मध्ये संभाजी व धारोजी मोहितेच्या पराक्रमा संबंधीच ी अनेक कागदपत्रे प्रकाशित केलेली आहेत. संभाजी व धारोजी मोहिते यांनी आदिलशाहीमध्ये चांगली कामगिरी केल्याचे स्पष्ट होते. तर डॉ.जयसिंगराव पवार यांनी 'शिव-विजय' ग्रंथात, पान क्रमांक अठरा वर संभाजी व धारोजी मोहितेंचा विवाह घाटगे व घोरपडे घराण्यातील मुलीशी झालेला असून, इ.स.१६२२ मध्ये आदिलशाहीतील सरदार घाटगे व घोरपडे यांनी आपल्या जामातांना आदिलशाहीमध्ये रुजू केले. तेंव्हापासून मोहिते हे आदिलशाहीमध्ये सेवा चाकरी करु लागले.

त्यावेळी शहाजी राजे भोसले जुलै १६२५ मध्ये निजामशाही सोडून आदिलशाहीमध्ये सरलष्कर झाले. तेंव्हा शहाजी राजांना शिक्षा करण्यासाठी मलिक अंबरने साबाजी अनंत नावाच्या सरदाराला सैन्य देऊन पाठविले. 'शहाजी राजांना निजामशाही सैन्याने सालप्याच्या घाटात इ.स.१६२५ मध्ये अडविले.'[२] अशा प्रसंगी संभाजी व धारोजी मोहिते बंधुनी शहाजी राजांना कठीण प्रसंगी मदत केल्या मुळे शहाजी राजांना साबाजी अनंतचा पराभव करता आला व स्वतःला वाचविता आले. याची जाण ठेवून शहाजी राजांनी आदिलशाहाकडे विनंती करुन मोहिते बंधुना तळबीडच्या देशमुखीचे अधिकार मिळवून दिले. याची जाण ठेवून मोहिते बंधुनी बहीण तुकाबाईचा विवाह एप्रिल १६२७ मध्ये शहाजी राजांशी लावला'[३] यांच्या पोटी व्यंकोजी नावाचा मुलगा 'इ.स.१६३१'[४] झाला.

संभाजी व धारोजी मोहिते यांचे लग्न इ.स.१६२२ च्या पूर्वी झाले असून त्यानंतर ते आदिलशाहीत नोकरीस रुजू झाले. संभाजी मोहिते यांना हरिफराय, हंसाजी व शंकराजी ही मुले होती. पण यांचा जन्म केंव्हा व कोठे झाला याबाबत पुरावा नाही. मात्र संभाजी मोहितेची बहीण तुकाबाई हिला शहाजी राजापासून इ.स.१६३१ मध्ये व्यंकोजी नावाचा मुलगा झाला हे सत्य आहे. म्हणजेच व्यंकोजीच्या अगोदर हरिफराय नावाच्या मुलाचा जन्म झाला असावा व नंतर हंसाजी (हंबीरराव) हे व्यंकोजी राजांचे समकालीन असावेत आणि त्यानंतर शंकराजी, सोयराबाई व अण्णुबाई ही मुले जन्मास आली असावित. संभाजी मोहिते हे तुकाबाईपेक्षा मोठे होते. त्यांचे लग्न तुकाबाईच्या अगोदर झाल्याने काही मुले जन्मास आलेली असावित. यावरुन हंसाजीचा जन्म १६३१ मधील असावा.

संभाजी मोहिते व घाटगे यांची कन्या गंगाबाई यांचा विवाह केंव्हा व कोठे झाला या बाबत निश्चित सांगता येत नाही. पण संभाजी मोहिते यांची बहीण तुकाबाई-शहाजीराजे भोसले यांच्या विवाहाबाबत वेगवेगळ्या साधनातून वेगवेगळे वर्ष आपणास दिसतात.

'इ.स. १६२६ मध्ये शहाजी-तुकाबाई यांचा विवाह झाला'[५] शके १५५० (१६२८) मध्ये शहाजी राजांनी तुकाबाईशी विवाह केला.[६] तर शिवदिग्विजय ग्रंथामध्ये शहाजी-तुकाबाई यांचा विवाह एप्रिल १६२७ मध्ये झाला असे नमूदकरुन यांच्या विवाहाच्या अगोदर संभाजी मोहितेंचा विवाह झालेला होता. शहाजी राजे जून १६२८ - जून १६२९ याकालावधित पुन्हा निजामशाहीत आलेले असताना २५ जुलै १६२९ रोजी त्यांचे सासरे लखुजी जाधवांचा खून झाल्यानंतर निजामशाही सोडून आपल्या पुणे जहांगीरीमध्ये इ.स.१६२९-१६३१ या कालावधित त्यांचा मुक्काम होता. अशा कालावधित मेहुणे संभाजी मोहिते यांच्याकडे सुपे प्रांताचे सरहवालदार हे पद दिलेले होते. तेंव्हापासून १६५२ पर्यंत म्हणजेच छत्रपती शिवरायांच्या ताब्यात येईपर्यंत सरहवालदार म्हणून सुपे प्रांताचा कारभार संभाजी मोहिते यांनी पाहिलेला होता आणि या सुप्याच्या गढीमध्ये हंसाजीचा जन्म झाला असावा.

हंसाजीचे मूळ नाव बऱ्हाजी असे असून 'अमीरराव' या शब्दाचा अपभ्रंश होऊन पुढे 'हंबीरराव' हा शब्द तयार झाला. याचे उपनाव चव्हाण होते. हंसाजीचे बालपण सुप्याच्या गढीत गेले. त्यांचे वडिल पराक्रमी असल्यामुळे तो वारसा त्यांना लाभला. त्या काळामध्ये सरदार घराण्यातील त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून लष्करातील नामांकित सैनिक किंवा पंडित मंडळी ठेवली जात होती. त्यामुळे हंसाजीला अतिशय चांल्या पद्धतीचे लष्करी शिक्षण मिळाले असले पाहिजे. कारण त्यांच्या अंगी प्रामाणिकपणा स्वामीनिष्ठा, सचोटी इत्यादी गुण त्यांच्यात असल्यामुळे पुढील काळात सरसेनापती पदापर्यंत ते जावून पोहचले होते.

हंसाजी मोहिते यांचा विवाह कधी व कोणत्या घराण्यातील मुलीशी झाला या बाबत अजून तरी साधने उपलब्ध झाली नाहीत. पण त्यांचा विवाह तत्कालीन काळातील नामवंत घराण्यातील मुलीशी झालेला असावा. कारण हंसाजीच्या पोटी महाराणी ताराबाईचा जन्म झाला. (राजारामाची पत्नी) हिने जो पराक्रम गाजविला या वरुन हंसाजीची पत्नी ही सुद्धा एका पराक्रमी व्यक्तीची मुलगी असली पाहिजे.

हंसाजीच्या व्यक्तीमत्वावर त्यांच्या वडिलाचा प्रभाव पडलेला होता. वडिल संभाजी मोहितेंनी अनेक युद्ध मोहिमानमध्ये पराक्रम गाजवून आपल्या धण्याला खुष ठेवले होते. ज्यावेळी त्यांचा 'शहाजी राजांशी संबंध आला. तेंव्हापासून शहाजी राजाशीएकनिष्ठेने प्रत्येक प्रसंगात सहकार्य करुन दाखविले आहे. सालप्याच्या लढाईत अनुलनीय पराक्रम करुन शहाजी राजांना साथ दिलेली होती. त्यामुळेच शहाजी राजे आदिलशाहीत आपले वर्चस्व निर्माण करु शकले. त्यांच्या मुलास म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य निर्माण करता आले. जर सालप्याच्या युद्धाप्रसंगी संभाजी मोहिते यांनी सहकार्य केले नसते तर हिंदवी स्वराज्य उदयास आले नसते.

इ.स.१६४६ मध्ये शहाजी राजांचे पुत्र छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या जहागीरीतील पुणे, चाकण इत्यादी प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली घेतल्यानंतर सुपेच्या प्रदेशाची मागणी संभाजी मोहिते यांच्याकडे केली असता त्यांनी तो देण्यास नकार दिलेला होता. कारण शहाजी राजांनवर

त्यांची निष्ठा होती. त्या प्रदेशाचाकारभार करण्यासाठी त्यांची नेमणूक केलेली होती. छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी मोहिते यांच्या बाबत वेगवेगळ्या प्रकारचे लिखाण करुन ठेवले आहे.

शिवचरित्र साहित्य खंड ३ रा पेज क्र.६९८ 'सुपे परगणा शुहूर सन १०४९ (२४ मे १६४८ ते २३ मे १६४९) मध्ये सुपे परगणा शुहूर सन १०५० (२४ मे १६४९ ते २३ मे १६५०) मध्ये तो परगणा शहाजीला मुकासा म्हणून मिळाला. त्यावर्षी काही काळ तो शहाजीकडून पोटमुकासा म्हणून शिवाजीकडे होता. पण त्यानंतर लवकरच शहाजीने तो परगणा शिवाजीकडून काढून घेतला असे दिसते. शहाजीच्या वतीने त्या परगण्याचा सरहवालदार म्हणून संभाजी मोहिते २६ ऑक्टोबर १६५२ च्या पूर्वीपासूनकाम पहात होता. शिवाजीने २४ सप्टेंबर १६५६ रोजी संभाजी मोहि त्यास कैद करुन त्या परगण्याचा ताबा घेतला. त्यानंतर त्या परगण्यावर शिवाजीची सत्ता चालत होती.

'सुपे परगणा व सुप्याची गढी स्वराज्याच्या पूर्वेस होती हा परगणाही शहाजीराजांच्या जहागिरीतीलच होता. पण या वेळी याचा कारभार शहाजी राजांनी संभाजी मोहित्याकडे सोपविला होता. संभाजी मोहिते शहाजीराजांच्या दुसऱ्याणीसाहेबांचे तुकाबाईचे बंधू म्हणजे शिवाजी महाराजांचे सावत्र मामा मोहिते मामाकडे सुपे परगण्याची सरहवालदारी दिली होती.'[७] ही सत्यता असून संभाजी मोहिते यांच्यावर आरोप जे केले जातात. 'मोहिते मामा जुलमी, लाचखावू अमलदार होते. तसेच ते शिवरायांच्या र्पू पणे नियंत्रणाबाहेर होते.'[८] पण याबाबतचा एकही पुरावा नाही. इतिहासकारांनी भोसले व मोहिते घराण्यासंबंधात कपोलकल्पीत स्वरुपाचे लिखाण करुन ठेवले आहे.

वास्तविक शहाजी राजे आणि संभाजी व धारोजी मोहिते हे निजामशाहीत असताना ते एकमेकांना चांगले ओळखत होते. आदिलशाहीमध्ये असताना शहाजीराजे यांना निजामशाहीकडून संपविण्याचे प्रयत्न करण्यात आले. अशा प्रसंगी मोहिते बंधुनी शहाजी राजांना मदत केलेली होती. त्यावेळी आदिलशाहीमध्ये मोहितेंचे चांगलेच वजन होते. त्यांना शहाजीराजांची साथ मिळाली आणि दोघेही एकमेकांना मोठे करण्यासाठी प्रयत्न करीत होते.

शहाजीच्या सहकार्याने तळबीडच्या देशमुखीचे अधिकार मिळाले होते. तसेच सुप्याचे सरहवालदार म्हणून त्यांची नेमणूक केलेली होती. यावेळी नाते संबंध निर्माण झाल्याने सर्वकाही गोष्टी पूर्णतः प्राप्त झालेल्या होत्या. संभाजी मोहिते लाचखावू व जुलमी असते तर शहाजी राजांनी त्यांच्याशी कसलेही संबंध ठेवले नसते.

तसेच संभाजी मोहिते यांच्या बाबत कृष्णाजी अनंत सभासद [९] म्हणतो, 'संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ, मामा होता. तो महाराजानी महालावरी ठेविला होता. त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास म्हणून गेले. मामास कैद करुन ठेविले. त्याचे तीनशे घोडे पागेचे होते व द्रव्यही बहून होते. वस्तभाव, कापड हस्तगत करुन सुपे देश साधिला' यावरुन असे स्पष्ट होते. की, छत्रपती शिवरायांनी संभाजी मोहिते यांच्यावर लष्करी कार्यवाही करुन त्यांचा पराभव केला आणि सुपे हा प्रांत स्वराज्यामध्ये घेतला. संभाजी मोहीतेना छत्रपती शिवरायांनी तात्काळ स्वराज्यात सामील होण्याचे पत्र लिहीले. परंतु मोहिते शहाजी राजाची परवानगी घेतल्याशिवाय सुप्याचा ताग सोडण्यास तयार होईनात आता काही तरी करुन मामांची भेट घेतली पाहिजे असे महाराजांनी ठरवले. शिमग्याच्या दिवसात पोस्त मागल्याच्या बहाव्याने महाराज काही मावळ्यांना बरोबर घेऊन सुप्यास गेले. सुप्याचा प्रांत व पागा हस्तगत केली. मामांना स्वराज्यासाठी मदत करावी अशी विनंती केली. परंतु मामा काही कबूल होईनात तेंव्हा त्यांना शहाजीराजाकडे बंगळूर येथे मोठ्या आदराने पाठवण्यात आले.

जर शिवाजी महाराजांना सुपे घेण्यासाठी संभाजी मोहिते याच्यांशी संघर्ष करावा लागला असता तर 'संभाजी मोहिते यांनी आपल्या कन्येचा म्हणजे सोयराबाईचा विवाह शिवरायांशी इ.स.१६५० मध्ये लावला नसता.'[१०]

एकंदरीत संभाजी मोहिते हे यांच्यावर केलेले आरोप पूर्णतः चुकीचे आहेत. स्वतः प्रत्येक प्रसंगातून मित्रत्व नातेसंबंध योग्य पद्धतीने सांभाळलेले आहेत. तसेच भोसले घराण्यावर त्यांचे प्रेम, माया, आपुलकी होती. त्यांचे संबंध जिव्हाळ्याचे होते. त्यांच्यागी अप्रामाणिकपणा,

स्वामीनिष्ठपणा, कृर्तृव्यपणाची जाण होती या सर्व गुणांचा वारसा त्यांच्या सर्व कुटुंबावर होता. त्याचेच द्योतक म्हणजे सेनापती म्हणून हंसाजी यांनी केलेले कार्य होय म्हणून मराठ्याच्या दोन छत्रपतींना कधीही मागे वळून पहाण्याची त्याच्यावर वेळ आलेली नव्हती. अशा अत्यूच्च गुणांचा वारसा हंसाजीवर पडलेला असून त्यांचे संपूर्ण बालपण संभाजी मोहिते यांच्या देखरेखीत गेले. पण हंसाजीचा जन्म नेमका केंव्हा व कोठे झाला या बाबत अद्याप पुरावा नसल्यामुळे निश्चित सांता येत नसले तरी त्यांचा जन्म बहुतेक सुप्याच्या गढीमध्ये झालेला असावा.

## ३) हंसाजी मोहिते यांचा सैन्यात प्रवेश

इ.स.१७व्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांच्या इतिहासात एखाद्या अढळ ताऱ्याप्रमाणे चमकणारा मराठी सत्तेचा तारणहार हंसाजी (हंबीरराव) मोहिते यांनी स्वकर्तृत्वाने मोहिते घराण्याला माणसन्मान मिळवून दिला. संभाजी मोहिते यांच्या देखरेखीखाली ते लहानाचे मोठे झाले. त्यांच्या युद्धविषयक शिक्षणाकडे स्वत: वडीलांनी लक्ष दिलेले होते. या शिवाय युद्ध विषयक शिक्षण सेनापती नेताजी पालकरांच्या हाताखाली पूर्ण झाले असावे. शिवरायांच्या प्रत्येक मोहिमेत सोबत राहून युद्धनीती व डावपेच हंसाजीने आत्मसात केलेले होते. गनिमी काव्याच्या युद्ध तंत्रातही तरबेज झालेले होते. शिवरायांच्या सानिध्यात वावरतांना त्यांनी चांगल्या गोष्टी अंगिकारल्यामुळे सेनापती प्रतापराव गुजर यांच्या कारकिर्दित एक कुशल योद्धा म्हणून शिवसैन्यात उदयास आले. पुढे इ.स.१६७४ मध्ये मराठा सैन्याचे ते सेनापती झाले.

हंसाजी मोहितेंच्या सेनापती पदापर्यंतच्या जीवन पटाचे संशोधनकरीत असताना ते मराठा सैन्यात सैनिक म्हणून केंव्हा दाखल झाले या विषयी अद्याप पुरावा उपलब्ध झाला नसल्यामुळे निश्चित वर्ष सांगता येत नाही. मात्र सेनापती नेताजी पालकरांच्या कार्यकाळात सैनिक म्हणून होते हे निश्चित आहे. तत्पुर्वी महाराष्ट्रातील मराठ्यांच्या राज्याचे स्वरुप असे होते.

## ४) हिंदवी स्वराज्य

हंसाजी मोहिते यांचे वडिल संभाजी मोहिते यांच्या समकालीन असलेले शहाजी राजे भोसले यांच्याशी तुकाबाई नावाच्या बहीणीचा विवाह एप्रिल १६२७ मध्ये झालेला होता. तेंव्हापासून मोहिते व भोसले यांच्यात पहिल्यांदा नातेसंबंध निर्माण झाले. यांच्या पोटी एंकोजी नावाचा मुलगा जन्मला तोच खरा संभाजी मोहितेंचा भाच्चा होता. तत्पूर्वी शहाजी राजे भोसले यांचा एक विवाह लखुजी जाधवांची कन्या जिजाबाईशी इ.स.१६१० मध्ये झालेला असून १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी ह्या निजामशाहीकिल्ल्यात शिवाजी महाराजांचा जन्म झाला.[११] अल्पकाळात विजापूरच्या आदिलशाही सैन्याने शहाजी राजांच्या पुण्याच्या जाहागिरीवर हल्ला करुन ती पूर्णपणे नष्ट केलो. यावेळी शहाजी राजे साधनसामुग्री गोळा करण्याच्या प्रयत्नात होते. त्यामुळे आपल्या जहागिरीचा नाश थांबवता आलेला नाही. आठ वर्ष पुणे हे ओसाडच होते. जहागिरीच्या संरक्षणासाठी म्हणून नोव्हेंबर १६३० मध्ये मोगलांची चाकरी करण्याचा निर्णय घेतला. [१२] यावेळी निजामशाहीतील बराचशा प्रदेश जिंकून दिलेला होता. मात्र निजामशाही दरबारात फत्तेखान व इतर सरदारानमध्ये अंतर्गत कलह निर्माण झाल्यामुळे निजामशाही नष्ट होतेकी काय अशी भिती निर्माण झाल्यामुळे आणि यापूर्वी आपले आयुष्य निजामशाहीमध्ये गेल्यामुळे आंतरिक ओढ निजामशाहीकडे असल्यामुळे इ.स.१६३३ मध्ये मोगलांची चाकरी सोडून शहाजी पुन्हा निजामशाही मध्ये दाखल झाले. याच सुमारास अनेक मराठा सरदार त्यांना येऊन मिळाले याविषयी परमानंद [१३] म्हणतो, 'शहाजी राजे दिल्लीच्या मोगल बाद शहाविरुद्ध झालेला पाहून घाटगे, काटे, गायकवाड, कंक, ठोमरे, चव्हाण, संभाजी मोहिते, महाडिक, खराटे, पांढरे, वाघ, घोरपडे इत्यादी महाराष्ट्रीय राजे त्यास येऊन मिळाले. आणि शहाजीने त्यास सरदार केले.' सर्वानी मिळून मोगलांचा प्रतिकार केला तेंव्हा 'मोगलांनी इ.स.१६३३ जून महिन्यात निजामशाहीची राजधानी दौलताबाद जिंकून घेतली'[१४] तसेच निजामशाहीचाकाही प्रदेश विजापूरच्या आदिलशाहीला देण्याचे अमिष दाखविल्याने आदिलशाहीने बघ्याची भूमिका घेतली. शेवटी मोगलापुढे शहाजी राजे निजामशाही वाचविण्यात अयशस्वी झाले. इ.स.१६३६ मध्ये निजामशाहीचा शेवट झाला.

शहाजी राजांनी पुन्हा आदिलशाहीशी तह करुन पुन्हा आदिलशहाची चाकरी पत्करली. पुण्याची जहागीरी त्यांना देण्यात आली. इ.स.१६३६ ते १६६४ पर्यंत आदिलशाहीत ते होते. शहाजी राजांच्या आग्रहाखातर पुणे, सुपेची जहागीर मिळाली मात्र जहागिरीत राहून तिची व्यवस्था लावण्यासाठी त्यांना सवड नव्हती. कारण आदिलशहाने शहाजीला कर्नाटकच्या मोहिमेवर पाठविले होते. इ.स.१६३६ च्या शेवटच्याकाळात शहाजी राजांना आदिलशहाने जहागीर म्हणून दिले होते. तेंव्हा जहागिरीची व्यवस्था लावण्याचे कार्य आदिलशाहीतील मुतालिक असलेले दादोजी कोंडदेव यांनी केले. अशा काळात शिवाजी राजे व मातोश्री जिजाबाई यांचे वास्तव्य खेडेबारे या ठिकाणी होते.

बेंगलोर येथे शहाजी राजे व त्यांची दुसरी पत्नी तुकाबाई आणि मुलगा व्यंकोजी राजे रहात होते. सोबत शिवरायांचे मोठे बंधू संभाजी राजेही रहात होते. इ.स.१६४०-४३ च्या काळात शिवाजी राजे मातोश्रीसह वडिलांच्या भेटीसाठी बेंगलोर व विजापूर येथे गेले होते.[१५] त्या ठिकाणी शिवरायांना शहाजी राजांनी उत्तम शिक्षण दिले. शिक्षणाशिवाय युद्ध विषयक धडे दररोज सुरुच होते. घोडेस्वारी, तलवारबाजी, भालाफेक, नेमबाजी, दांडपट्टा चालविणे इत्यादींचे धडे गिरविन्याचे प्रशिक्षण मिळाले सर्व प्रकारचे शिक्षण घेऊन ते परिपक्व झाले होते. इ.स.१६४१-४२ च्या सुमारास शिवाजी राजे पुण्यास आले. त्यावेळी ते १२ वर्षाचे होते. परमानंद[१६] म्हणतो, 'जेंव्हा शिवाजीस बारावे वर्ष लागले तेंव्हा दूरदर्शी शहाजीने शंकराच्या आज्ञेप्रमाणे त्या सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि शुभलक्ष्मी अशा शंभूच्या पाठच्या पुत्रास बोलावून पुणे प्रांताच्या अधिकारावर नेमले.' त्यांच्या सोबत शहाजी राजांनी निवडक व विश्वासू अधिकारी दिले होते. त्यामध्ये जेधे करिनातील माहितीवरुन 'शहाजी राजांनी राजश्री शिवाजी राजे या समागमे राजश्री सामराजपंत पेशवे व मानकोजी दहातोंडे सरनोबत व बालाजी हरी मज्यालसी वकारकून व स्वाराचा जमाव देवून पुण्यास पाठविले.' [१७] तर कृष्णाजी अनंत सभासदाच्या[१८] मते, 'सोबत शामराव निळकंठ म्हणून पेशवे करुन दिले व बाळकृष्णपंत नारोपंत दीक्षिताचे चुलतभाऊ मुजूमदार दिले. सोनोपंत डबीर व रघुनाथ बल्लाळ

सबनीस ऐसे देऊन पुयास रवाना केले.' तसेच त्याच्या सोबत एक अष्टक ोणी राजमुद्रा आणि भगवा ध्वजही दिलेला होता. हे सर्व शिवरायांना स्वराज्याच्या कामी आले होते.

शिवराय व सोबतची मंडळी जहीत आल्यानंतर त्यांचे वास्तव्य पुणे, खेडेबारे (खेडशिवापूर) येथे होते. हा प्रदेशकर्यात मावळला लागून होता. मावळ खोऱ्याचा विस्तार फार मोठा होता. अतिदूर्गम डोंगराळ भाग, डोंगर-दऱ्या आणि गर्द झाडी यांनी व्यापून टकलेला भाग म्हणजे मावळ खोरे या मावळ खोऱ्यामध्ये जुन्नराखालची बारा व पुण्याखालची बारा अशी चोवीस मावळे या भाात येतात. शिवनेर , घोडनेर, पारनेर, मानेर इ. जुन्नखालची आणि रोहीड, खोरे, वेलवंड, मुस्ते, मुठे, जोरक्रानद, शिवशर, मुरुम, पौंड, गुंजण, भोर, पवन ही पुण्याखालची समजतात.[१९] या खोऱ्यात स्वतंत्र पृवृत्तीचे देशमुख रहात असत. त्यांच्यात अंतर्गत मतभेद होते. या सर्वांना एकत्र करुन शिवरायांनी त्यांची मने जिंकून घेतली होती. त्यांच्यात स्वत्वाची जाणीव निर्माण करुन दिल्याने ते सर्व हिंदवी स्वराज्य उदयास आणण्यासाठी 'मावळे' म्हणून शिवरायांच्या पाठीशी उभे राहिले. येसाजीकंक, तानाजी मालुसरे, बाजी पासलकर, कान्होंजी जेधे, गोमाजी नाईक इत्यादी महत्त्वपूर्ण होते.

मावळ खोऱ्यातील मावळ्यांच्या मदतीने स्वराज्य स्थापनेचे प्रयत्न शिवरायांनीकेले. सुरुवातीला जहागिरीमध्ये असलेल्या बळकट व दूर्गम किल्ल्याचे महत्व ओळखून आपल्या अधिकाराचा विस्तार केला. उत्तम व्यवस्था लावण्यासाठी अधिकाराची कडक अमलबजावणी केली. न्यायदान प्रक्रिया व वसुली संदर्भात चोख व्यवस्था केली. जहागिरीतील 'कोंढाणा (सिहंगड) किल्यावर सिद्दी अंबर हा हवालदार हा खेडेबारे येथील बापुजी मुद्गल यांनी त्यासी राजकारण करुन इ.स.१६४७ मध्ये तो किल्ला शिवरायांना मिळवून दिला.'[२०] नंतर पुरंदर किल्लेदार महादजी निळकंठराव यांच्या मुलानमध्ये संघर्ष सुरु झालेला होता. शिवरायांनी त्या मुलामध्ये मध्यस्ती करुन इ.स.१६४७ च्या ऑक्टोबर तो किल्ला ताब्यात घेतला. दरम्यान विजापूरचा आदिलशहा (मुहम्मद) हा सन १६४६ मध्ये आजारी पडला. पुढे दहा वर्षानी सन १६५६ मध्ये त्याचा मृत्यू झाला.'[२१] याचा

फायदा घेऊन शिवरायांनी मुरुबदेव आणि तोरणा किल्ला ताब्यात घेतला. हाच किल्ला पुढे इ.स.१६७० पर्यंत 'रायगड' म्हणून राजधानी होती.

शिवरायांच्या वाढता प्रभाव लक्षात घेऊन विजापूरच्या आदिलशहाने '२५ जुलै १६४८ रोजी शहाजी राजांना अटक केली.' ही वार्ता शिवरायांना समजताच त्यांचे मन अस्वस्थ झाले. त्यापाठोपाठ शिवरायांना जिंकण्यासाठी फत्तेखान नावाच्या सरदारांची नेमणूक केली. सोबत बालाजी हैबतराव, मुसेखान, बाजी निंबाळकर, मताजी घाटगे इत्यादी नामांकित सरदार दिले. फत्तेखानाच्या सैन्याचा तळ बेलसरला होता. तर दुसरी तुकडी बालाजी हैबतरावांची शिरवळला गेली.

यावेळी शिवराय पुरंदर किल्यावर गेले. त्यांनी आपल्या सैन्याची तयारी सुरु केलेली होती. संभाजी कावजी यांच्या नेतृत्वाखाली एक तुकडी शिरवळला पाठवली. सोबत गोदाजी जगताप, भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिवाजी चोर इत्यादी तरुण मंडही होती. यांनी बालाजी हैबतरावाच्या सैन्यावर चढाईकेली. प्रचंड रणधुमाळी सुरु झाली. हातघाईच्या लढाईत बालाजी हैबतराव ठार झाले आणि त्याचे सैन्य सैरावैरा पळू लागले. तेथून मराठा सैन्यांनी बेलसूर येथील फत्तेखानावर हल्ला केला. पण या लढाईत फत्तेखानाने त्यांना पराभूत करुन परतवून लावले आणि पुरंदरच्या किल्ल्याला वेढा दिला. मात्र झालेल्या लढाईत फत्तेखानला पराभूत होऊन विजापूरला परत जावे लागले.

तिकडे कर्नाटकामध्ये संभाजी रांजानी बंगळूरच्या लढाईत फरादखानाचा पराभव केलेला होता. शहाजी राजांच्या दोन्ही पुत्रांनी आदिलशाही सैन्याचा पराभवामुळे संपूर्ण दरबार विचारामध्ये पडलेला होता. अशावेळी शिवरायांनी दक्षिणेतील मोगलांचा वजीर मुरादबक्ष याच्याशी सन्धान बांधले. शेवटी सर्व गोष्टींचा विचार करुन आदिलशहाने १६ मे १६४९ रोजी शहाजी राजांची कैदेतून सुटका केली.

लवकरच शिवरायांनी आपल्या हिंदवी स्वराज्यांच्या रक्षणार्थ प्रयत्न केले. इ.स.१६४९ मध्ये सेनापती पद हे निर्माण केले. स्वतंत्र स्वराज्याचा पहिला सेनापती म्हणून मानकोजी दहातोंडे याची नियुक्ती केली.

## ५) हिंदवी स्वराज्याचे सेनापती

### १) मानकोजी दहातोंडे

शिवरायांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याचे पहिले सरनौबत किंवा सरसेनापती म्हणून मानकोजी दहातोंडे यांची इ.स.१६४९ मध्ये नेमणूक केलेली होती. यांच्या काळामध्ये स्वराज्याचा भक्कम पाया तयार झालेला असून सुपे, चाकण व जावळीचा प्रदेश समाविष्ठ झालेला होता. अशा कर्तृत्वसंपन्न सरसेनापती बद्दलची माहिती समकालीन जेधे करिनामध्ये मिळते. स्वराज्य संकल्पक शहाजी राजांनी इ.स.१६४२ मध्ये शिवरायांना वयाच्या बाराव्या गर्धीरहूबं पुण्याकडे पाठविताना सोबत काही निवडक व विश्वासू अधिकारी पाठविले होते त्यामध्ये सामराजपंत पेशवे व मानकोजी दहातोंडे सरनोबत व बालाजी हरी मज्यालसी व कारकून व स्वांराचा जमाव इत्यादी होते. म्हणजेच शहाजी राजांच्या विश्वासू मंडळीतील मानकोजी दहातोंडे होते. यांच्या बाबत कृष्णाजी अनंत सभासद यांनी शिव छत्रपतींचे चरित्र (सभासद बखर) यामध्ये अल्पशी माहिती उपलब्ध होते. 'मानकोजी दहातोंडे हा शिवाजीचा सेनापती होता. शिवाजी बरोबर बंगळूरहून आलेल्या लोकांपैकी हा एक होता. त्यास इ.स.१६४३ मध्ये सरनोबती मिळाली. नंतर त्यास लोहु विजापूर येथे पाठविले. तेथील किल्लेदार सिद्दी हिलाल हबशी यांजकडून त्याने विजापूरचा ताबा घेतला.' [२२] मानकोजी दहातोंडे यांचे कार्य सभासदांनी सांगितले मात्र त्यांना सरनोबती पदी नेमणूक ही इ.स.१६४३ मध्ये केली नसून शिवरायांनी सरसेनापती पद हे इ.स.१६४९ मध्ये तयार केलेले होते. त्यामुळे ते वर्ष चुकीचे आहे. यावेळी पागा बाराशे व शिलेदार दोन हजार होते. अशी तीन हजार सैन्याचा सेनापती म्हून त्यांची नेमणूक केली. इ.स.१६४९ नंतरच शिवरायांनी स्वराज्य विस्ताराच्या हालचाली वाढविल्या[२३] त्यामुळे जावळीचा प्रदेश (इ.स.१६५६) मध्धे ोकणातील

कुलाबा, कल्याण, भिवंडी, माहुली इत्यादी प्रदेश १६५८ पर्यंत आपल्या स्वराज्यात जोडले. या सर्व कार्यात सेनापती मानकोजी दहातोंडे यांचे मोलाचे सहकार्य होते. शेवटी लढताना विरमरण इ.स.१६५९ मध्ये आले. मराठ्यांच्या इतिहासातील पहिल्या सेनापती विषयांचे समकालीन पुरावे उपलब्ध नसल्यामुळे दुर्देवाने त्यांची पुरेपूर माहिती नाही.

## २) नेताजी पालकर

शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याचे दुसरे सेनापती म्हणून नेताजी पालकर होते. समकालीन शिवभारत व जेधे शकावलीतून माहिती प्राप्त होते. इ.स.१६५९ मध्ये सरनौबत मानकोजी दहातोंडे यांचा मृत्यु झाल्यामुळे शिवरायांनी नेताजी पालकर यांची सरनौबत म्हणून नेमणूक केली. तसेच पायदळाची सरनौबत म्हणून यसाजी कंकला नेमले. कृष्णाजी अनंत सभासदाने नेताजी पालकर यांचा कालखंड इ.स.१६३३ ते इ.स.१६७६ असा दिलेला आहे. 'तो खंडोबाची पाली (जि.सातारा) येथील रहीवाशी असून इ.स.१६५४ मध्ये पुरंदरचा किल्लेदार म्हणून नेमले. इ.स.१६५९ मध्ये शिवरायांनी सेनापतीपदी नेमले.[२४] यावेळी शिवरायांकडे सात हजार पागा, तीन शिलेदार एवढी मराठा फौज होती. १० नोव्हेंबर १६५९ रोजी शिवराय आणि आदिलशाही सरदार अफझलखान यांच्या प्रताप गडावरील भेटी प्रसंगी नेताजी पालकर यांना आदिलशाही सैन्यावर हल्ला करण्याची जबाबदारी टाकलेली होती. त्यामुळे शत्रू सैन्याची दानादान उडाली होती. लष्करी सामग्री मोठ्या प्रमाणात मराठ्यांना मिळाली. मोगली प्रदेशातील बालाघाट व इतर प्रदेशावर हल्ले करुन खंडण्या वसूल केलेल्या होत्या. '५ मार्च १६६६ रोजी शिवाजी महाराज आग्रा येथे मोगल सम्राट औरंगजेब यांची भेट घेण्यासाठी निघाले.'[२५] त्यावेळी राष्ट्रमाता जिजाऊंच्या सल्याने स्वराज्याच्या संरक्षणाची जबाबदारी नेताजी पालकरांवर सोपविली होती. सप्टेंबर १६६० मध्ये आदिलशाही सरदार सिद्दी जोहरने पन्हाळ्यास वेढा दिलेला होता. शिवाजी राजे या वेढ्यामध्ये अडकले असता नेताजी पालकराना सैन्य घेऊन येण्यास विलंब झाल्याने महाराजांनी नाराजी व्यक्त केलेली होती. लवकरच त्यांच्यात मतभेद झाल्याने नेताजी पालकरांनी सेनापती पदाचा त्याग करुन मोगलांची चाकरी

स्वीकारली होती. नेताजीच्या नाराजीबद्दल इतिहासकारात मतभेद असले तरी ते १६६६ मध्ये मोगलाकडे गेले. महंमद कुली हे नाव धारण करुन त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. दहा वर्ष मोगली सेवा केली. शेवटी त्यांना त्यांचा पश्चाताप झाला आणि जून १६७६ मध्ये शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यामध्ये आले. उर्वरित आयुष्य त्यांनी येथेच घातले.

## ३) प्रतापराव गुजर

प्रतापराव गुजर यांचे मूळ गाव मोगरी असून त्यांच्या वडिलांचे नाव अनाजीराव होते. प्रतापरावांचा जन्म केंव्हा झाला याबाबत अद्याप पुरावा उपलब्ध नाही. मात्र हिंदवी स्वराज्याचे दुसरे सेनापती नेताजी पालकर यांच्या कार्यकाळात सैनिक म्हणून ते रुजू झाले असावेत. ज्या सेनापतीच्या काळात स्वराज्याच्या इमारतीचा पाया घातला गेला. अशा स्वराज्याची इमारत बांधण्याचे काम प्रतापरावांनी केले. प्रतापरावांचे मूळ नाव कुडतोजी असे असून त्यांच्या पराक्रमामुळे शिवरायांनी त्यांना 'प्रतापराव' असे नाव दिले. त्यांच्या कार्यकाळासंबंधीची माहिती जेधे शकावली व शिवभारत या समकालीन पुराव्यावरुन मिळते.

शिवरायांच्या स्वराज्याचा विस्तार होत असताना इ.स.१६६०त्र मध्ये आदिलशही सरदार सिद्दी जोहारने पन्हाळा किल्याला वेढा दिलेला असून शिवराय वेढ्यात अडकले होते. वेढा उठावा व शिवरायांची सुटका व्हावी या हेतूने प्रतापराव गुजर यांनी बाहेरुन आदिलशाही सैन्यावर हल्ले सुरु ठेवले होते. यावेळी शिवसैन्याचे सेनापती नेताजी पालकर योगलाशी लढत होते. शिवरायांनी सेनापतीना सैन्य घेऊन येण्यास निरोप पाठविला होता. तोपर्यंत प्रतापरावांनी आपल्या पराक्रमाचा 'प्रताप' करुन दाखविलेला होता.


इ.स.१६६६ मध्ये औरंगजेब सरदार मिर्झाराजे जयसिंग यांनी शिवरायांशी पुरंदर तहानुसार आग्रा भेट झाल्यानंतर 'शके १५९० किलक संवछरे श्रावण शुध आष्टमी बुधवारी प्रतापराऊ व श्रावण होऊन फौजेनिसी औरंगाबादेस गेले'[२६] मात्र पुढे मोगलाशी वितुष्ठ आल्यामुळे ते राजगडावर आले. 'शके १५९१ सौम्य संवछेर पैष मासी मोगलाचा व राजश्री शिवाजी राजे यांचा सला तुटला

प्रतापराव आनंदराऊ फौजे नसी औरंगाबादेस शहाजादी यांच्याजवळ होते ते राजगडा आले.' [२७]
तसेच वणी-दिंडोरी लढ्याच्या प्रसंगी व सालेरी येथील इ.स.१६७२ च्या लढाई प्रसंगी लढले. इ.स.१६७२ च्या लढाई प्रसंगी लढले. इ.स. उमराणीच्या लढाईत प्रतापराव व आनंदराव फोजेनसी जाऊन बहलोल खान धरिला मोगेकमसिंग व दारकोजी भोसले धरिले हती अकरा व घोडी सतराशे पाडाव केली.'[२८] यावेळी बहलोलखानास दया दाखवून सोडल्यामुळे शिवाजी महाराज नाराज झाले होते. लक्करच आदिलशाही प्रदेशातील हुबळी लुटून आर्थिक साह्य केले. आदिलशाही दरबारने पुन्हा बहलोखानास सैन्य देऊन स्वराज्यावर पाठविले. तेंव्हा शिवरायांनी प्रतापरावास 'तुम्ही नह करुन सोडिला असता चालून आला. इतरावर धरिलात तेच समयी बुडविला नाही.'[२९] असे बोलून दुसऱ्यांदा बहलोलखानावर स्वारी करण्यासाठी रवाना केले. २४ फेब्रुवारी १६७४ रोजी नेसरी या ठिकाणी घनघोर लढाई झाली. या लढाईत सेनापती प्रतापराव गुजर ठार झाले.

## ६) हंसाजी मोहिते (हंबीरराव) यांची सरसेनापती पदी नियुक्ती

संभाजी मोहिते इ.स.१६५६ मध्ये शहाजी राजानकडे बंगळूरला गेले. उर्वरित आयुष्य त्यांनी शहाजीराजान सोबत आदिलशाहीमध्ये घालविले. त्यांचे बंधू धारोजी मोहिते हे आदिलशाहीमध्ये पराक्रमी सरदार होते. यांच्या संदर्भात 'ताराबाईकालीन कागदपत्रे' या ग्रंथात डॉ.अप्पासाहेब पवार यांनी अनेक कागदपत्रे प्रसिद्ध केलेली आहेत. यांना नेताजी व दिपाजी मुले होती दोन बंधुच्या मुलामध्ये वाटणीच्या संदर्भातील पत्र उपलब्ध झालेले आहे. त्या पत्रामध्ये सेनापती नेताजी पालकराचाही उल्लेख आहे.

तळबीड दप्तरातील महजर, यामध्ये हंबीरराव मोहिते यांचा उल्लेख आहे.



दि.१३.०१.१६६२

महजर नेताजी आणि दिपाजी मोहिते व हरिफराव, हंबीरराव आणि शंकराजी मोहिते या

मोहिते घराण्याच्या दोन शाखामध्ये झालेल्या वाटणीचा महजर.

माहाजर व तेरीख छ २ माहे जमादिलाखर सु ।। इसने सितैन अलफ. बी हुजूर हाजीर मजालसी यानी बि ।।

**राजमुद्रा**

| | |
|---|---|
| गंगाजीराम पंडित | तिमाजी गिरमाजी पंडित |
| नामजाद देहाये तर्फ | मजमुदार |
| पडळी | रुजू सुद |
| (फारशी अष्टकोनी शिक्का) | रघो केशवपंत निघावने (?) |
| अंतो नरसिंह पत | गोविंद बाबाजी |
| हुदेदार क ।। तलबीड | निसिदे क ।। तलबीड |
| (अष्टकोनी फारशी शिक्का) | |

**गावगना मोकदमानी**

| | |
|---|---|
| विटोजी पटेल | वणजी सदनसीव |
| मौजे कोणेगवाण | मोकदम मौजे घोणसी |
| (निशाणी नांगर) | (निशाणी नांगर) |
| नरसोजी पटेल | रभाजी पटेल |
| मौजे सिरवडे | मौजे तासवडे |
| (निशाणी नांगर) | (निशाणी नांगर) |
| विठोजी पटेल | गोपजी पटेल |
| मौजे नडसी | मौजे वाबगाऊ |
| (निशाणी नांगर) | (निशाणी नांगर) |
| लखमोनी पटेल | नागोजी पटेल व काऊजी चौगल |
| मौजे शापूर | मौजे मुढे |
| (निशाणी नांगर) | (निशाणी नांगर) |

## कसबे तलबीड

| | |
|---|---|
| आबाजी पटेल | अपाजी पटेल |
| मेसजी पटेल | हंसाजी पटेल |
| तिमाजी रुद्र | रेखजी व लखमोजी |
| कुलकर्णी | चौगला |

या हुजूर जाहला माहजर येसाजे आरवादी नेताजी राजे व दिपाजी राजे मोहिते देस ाई व पछमवादी हरिफराऊ व हंबीरराऊ व शंकराजी राजे देसाई क।। तळबीड व क।। वांगी या उभे वर्गामध्ये देसाई याचे वेव्हार सबंध होता. उभे वर्गाची उतरे मनासी आणिली धर्मता मनासी आणिता संबाजी राजे व धारोजी राजे या उभयता दोघे बंधु वर्गानी दोनी स्तलीचे जोड ब्रिती करुन घेतले बाा फर्मान दोघे भाऊ वाटूनखात होते. दोघासीही देवा ज्ञा जाहाली. त्यावरी शंकराजी राजे व नेताजी राजे ब्रितीसमधे भांडे लागले. मग सभानाईक मिलोन मुनसिफी पाहाता जोड ब्रिती दोघासी बराबरी वाटून द्यावे सिके दोघानी करावे. दर कर्यातीस यैसा तह देत असता शंकराजीराजे बोलीले जे आपण वडिल भावाचा लेक आपण हिंगनगादे इनामाचे गाव घेईन व सिका अपण करीन. वरकड तकसीम निमे वाटून देईन. त्यावरी गोत नाईक बोलिले की जोड ब्रिती देणे. पातशाचे दोघासी मन्हामत केली तोफा घेतला तो दोघांनी दिल्हा जेव्हाी इनाम दिल्हा ते वख्ती इनामाचे गाव नव्हता. त्यावरी पादसाई यापासून देसमुखीस ा इनाम हिंणगादे करुन घेतले ते आपण न दिल्यावरी सभा नाईक बोलिले की वडिलाचे ब्रितीवरी पैदा केले ते दोनी ठाई घेवे. त्यावरी संक्राजी राजे कबूल न करीत. मग सभा नाईकाजी तह दिल्हा जे जोड ब्रिती आहे. पडिले पान दोघानी वाटू घेवे. त्यावरी शंकराजी राजे यानी मशाखत करुन ब्रितीवरी गाव इनाम करुन घेतला. अजी सबब मौजे मजकुरीचे तीन तकसीमा करुन गोत नाईकी शकराजी राज यास दोनी तकसीमा देविले. तिसरे तकसीम नेताजी राजे यास व दिपाजी राजे यास देविले वगावीचे राबिता बेगारी व अडीफाली व सेवाधार शंकराजी राज्यास द्यावे. वरकड गाव बी।। तकसीमा दोनी तकसीम शकराजी राज्यांनी घ्यावे. येक तकसीम नेताजी राज यानी व दिपाजी राज्यानी घ्यावे व देशमुखीचे सिके दोघानी करावे. विलायत व कसबा बराबरी दो ठाई वाटून तारेतार खावे. दोनी तर्फा करुन घेवे. अधी सिका व पान व तश्रीफ शंकराजी

राजे यानी घ्यावे. मागुन सिका नेताजी राज यानी करावे व पान व तश्रीफ मागून नेताजी राजानी व दिपाजी राजानी घेवे. मौजे हिंगणगादेचे तपसील सदरहू लिहीलेप्रमाणे खावे व बाजे देशमुखीचे हक लाजीमा इनाम व बाजेबाब पडिले पान निसबत देशमुखी तारेतार दोनी ठाई खाऊन बिलाकुसूर असोन दिवाण नफराई करुन दोघानी सुखे असावे. या खेरीज देसमुखीची गावे गेली आहेत ती दोघांनी साधून घेवे. जो कोणी मदत न करी त्यास व्रितीसी समध नाही. व्रितीवरी जे काही नवी जोडी साधितील ते दोघानी बराबरी वाटून घेवे व वडिलाचे व्रितीखेरीज जेथे व्रिती साधून घेतील ते अपले अपण घेवे. कसबे तलबीडीचे पटेलगीचे नागर हरीपरायाने करावे. नि।। संबाजी राजे नागरास मान बेगारी व सेवाधार व पाने व पडिदर पडि (?) घेवे. वरकड पडिले पान दोनी ठाई वाटून खावे. हा जाहाला माहाजर सही वली १०६ येकसे साहा.[३१]

डॉ.अप्पासाहेब पवार यांच्यामते सदरील पत्र व त्यातील कूमजहा 'इ.स.१६६२ या वर्षातील असून संभाजी व धारोजी मोहिते यांचा यापूर्वी मृत्यु झाला.' मात्र हा मृत्यु केंव्हा व कोठे झाला याबाबत समकालीन पुरावा उपलब्ध नाही. मोहिते बंधु च्या वारसानमध्ये वाटणी संदर्भात माहिती मिळते तसेच डॉ.शिवदे सदाशिव यांच्यामते 'सदरील पत्रांशी सेनापती नेताजी पालकराचा संबंध आहे.'

दोन्ही इतिहास संशोधकाच्या मतांचा विचार करता इ.स.१६६२ च्या काळात हिंदवी स्वराज्याचे सेनापती म्हणून नेताजी पालकर होते. त्यांचे मोहिते घराण्याशी संबंध होते. त्यांच्या समक्ष ही वाटणी झालेली होती. यावेळी शिवसैन्यात हंसाजी मोहिते असावेत. यानंतर शिवरायांच्या प्रत्येक मोहिमेचे साक्षीदार होते. हंसाजी यांना नेताजी पालकरांचा सहवास लाभलेला होता. त्याच्याच तालमीत एक उत्तम सैनिक म्हणून शिवसैन्यात होते. इ.स.१६६६ मध्ये सेनापती नेताजी पालकर व शिवराय यांच्यात वैचारिक व काही निर्णयासंदर्भात मतभेद निर्माण झाल्याने त्यांना 'जानेवारी १६६६ रोजी सेनापतीपद सोडावे लागले.' [३२] आणि ते विजापूरच्या आदिलशाहीकडे व नंतर मोगलाकडे गेल्यानंतर हंसाजी मोहिते यांनी हिंदवी स्वराज्याचे तिसरे सेनापती प्रतापराव गुजर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक मोहिमेत सहभागी होऊन एक उत्तम योद्धा म्हणून कार्य केले.

सेनापती प्रतापरावगुजर या ंच्या काळात हंसाजी मोहिते यांनी केलेल्या सेवेची नोंद समकालीन साधनामध्ये उपलब्ध झालेली नाही मात्र साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या 'अग्निदिव्य' कादंबरीमध्ये हंसाजी (हंबीरराव) मोहिते हे सेनापती प्रतापरावगुजरांच्या सोबत युद्ध मोहिमेत असल्याचे सांगितले आहे. उंबराणीची लढाई (१५.०४१६७३), नेसरीची लढाई (२४.०२.१६७४) मध्ये प्रतापरावान बरोबर हंसाजी यांनी अतुलनीय पराक्रम केल्याच े उल्लेख आहेत.

शिवाजी महाराज आग्राहून १२ सप्टें. १६६६ मध्ये स्वराज्यात आल्याबरोबर पुरंदरच्या तहात मोगलांना दिलेले २३ किल्ले परत जिंकून घेण्यासाठी ज्या युद्ध मोहिमा काढलेल्या होत्या. त्यामध्ये हंसाजी मोहिते यांनी लष्करी कर्तृत्व दाखवून दिल्याने प्रतापरावांच्या नंतर सेनापती पदाचा त्यांना मान मिळाला.

## ७) नेसरीचे युद्ध आणि हंसाजी मोहिते

शिवरायाचे हिंदवी स्वराज्य हे आदिलशाहीच्या जहागिरीतून उदयास आल ेले स्वतंत्र राज्य होते. साहजिकच शिवरायांना शासन करण्यासाठी व आदिलशाहीचे प्रदेश जिंकून घेण्यासाठी आदिलशाही दरबार सतत प्रयत्नकरीत होते. इ.स.१६६३ मध्ये आदिलशाहीचा सरदार व पन्हाळा भागाचा सुभेदार बहलोलखान याच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन पन्हाळा जिंकण्यासाठी स्वराज्यावर पाठविले. ही माहिती मिळताच शिवरायांनी 'सेनापती प्रतापरावगुजर यांच्या नेतृत्वाखाली पंधरा हजार सैन्य व आनंदराव, विठोजी शिंदे, विठ्ठल पीलदेव,कृष्णाजी भास्कर, विसो बल्लाळ, सिद्दी हिलाल इत्यादी नामांकित सरदार दिलेले होते.'[३३] या सैनिकांनी उंबराणी येथे आदिलशाही सैन्यास गाठले. दोन्ही सैन्यात घनघोर लढाई झाली. शेवटी सेनापती प्रतापरावांच्या सैन्याचा विजय झाला. प्रतापरावांनी बहलोलखानाशी तह करुन खंडणी वसूल करुन सोडून दिले.

ही बातमी शिवरायांना समजताच 'तुम्ही लष्कर घेऊन जाऊन बहलोलखान येतो, यांशी गांठ घालून, बुडवून फत्ते करणे नाही तर तोंड न दाखविने'[३४] असा निरोप प्रतापरावांना मिळताच हे शब्द

जिव्हारी लागल्याने सात महिने हुबळी व कोलपूरच्या प्रदेशात मोहिम चालू करुन हुबळीची धनाढ्य पेठ लुटली. या काळात बहलोलखान पुन्हा सैन्याची तयारी करुन कोल्हापूरकडे येत असल्याचे समजताच प्रतापरावांनी गडहिंग्लजजवळ एक मैलावर नेसरीच्या खिंडीत आदिलशाही सैन्यांची गाठ पडली. या वेळी प्रतापरावासोबत केवळ सात स्वार होते. बहलोलखानाकडे मोठे सैन्य असल्यामुळे रणकंदन सुरु झाले. शेवटी झालेल्या लढाईत २४ फेब्रुवारी १६७४ रोजी सेनापती प्रतापरावांचा मृत्यु झाला.

यावेळी हंसाजी मोहिते यांच्या नेतृत्वाखाली धनाजी जाधव, संताजी घोरपडे व काही सैन्याची तुकडी जवळच आसपासच्या प्रदेशात कामगिरीवर होती. सेनापती प्रतापराव गुजर नेसरी युद्धात कामी आल्याचे समजताच झालेले दुःख बाजुला सारुन सेनापती प्रतापरावांच्या मृत्युचा बदला घेण्यासाठी हंसाजी सैन्य घेऊन बहलोलखानावर चालून गेले. त्यावेळच्या संघर्षाचे वर्णन ग्रॅंड डफने 'मराठ्यांची बखर' मध्ये पान क्र.७७ वर 'हंसाजी मोहितेच्या सैन्यांने अतुलनीय पराक्रम गाजविल्याने बहलोलखानाच्या सैन्याला पळ काढावा लागला' विजापूर पर्यंत सैन्यांचा पाठलाग करुन बहलोलखानाच्या जहागिरीची नासधूस केलेली होती. कित्येक आदिलशाही सैन्याला यमसदनी पाठविले. फार मोठी लूट हंसाजी मोहिते यांनी मिळवून दिलेली होती. यावेळी अतुलनीय पराक्रम केल्यामुळे 'शिवरायांनी वस्त्रे भूषणे देवून फारच नावाजीस करुन हंबीरी केली म्हणोज 'हंबीरराव' ऐसा किताब दिल्हा, आणि सरनोबती त्याजलाच करार करुन वस्त्रे दिल्ही.'[३५] तेंव्हापासून हंसाजी हे हंबीरराव या नावाने ओळखू लागले.

सेनापती पद हे हंसाजी मोहिते यांना नेमके केंव्हा, कोठे दिले या संबंधी इतिहासकारानमध्ये एक वाक्यता दिसून येत नाही. जेधे शकावली या समकालीन साधनामध्ये 'माद्य वद्य ५ गुरुवारी राजश्री संभाजी राजे यांची मुंज जाली चैत्र श्रुध १३ चिपळुणास लष्करची पाहाणी केली आणि राजश्री हंबीरराव मोहिते यासी सर नैबती दिल्ही'[३६] वरील नोंदीत हंबीररावास सरनौबत हे पद राज्याभिषेकानंतर दिल्याचे स्पष्ट होते. तर कृष्णाजी अनंत सभासदाने प्रतापराव पडले, ही खबर राजियानी ऐकून बहूत कष्टी जाले आणि बोलिले की, "आज एक बाजू पडली" अशी तजवीज

करुन, आपण स्वस्थ लष्करात येऊन, लष्कर घेऊन कोकणात चिपळून जागा परशुरामाचे क्षेत्र आहे, तेथे येऊन राहीले. मा लष्कराची पाहाणी करुन लहान थोर लष्करात व पायदळ लोकास खजिना फोडून वाटणी केली.[३७] आणि हंसाजी मोहिते यास सरनोबतीस नेमले.

समकालीन साधनांचा संशोधनाअंती शिवाजी महाराजांनी सेनापती प्रतापराव गुजर नेसरी युद्धामध्ये कामी आल्यानंतर (२४ फेब्रुवारी १६७४) दिड महिन्यांनी हंसाजी मोहिते यांची सरसेनापतीपदी नियुक्ती केलेली होती. यावेळी मोहिते चिपळून या ठिकाणी सैन्यात जुमलेदार पदावर कार्यरत होते. पायदळ व घोडदळ एकत्र जमलेले होते. 'बरा शहाना, मर्दाना सबुरीचा, चौकस, शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नाव किताबती देऊन सरनोबती सांगितली कुल लष्कराचा गाहा करुन हंबीरराव यांचे ताबीज दिधले'[३८] संपूर्ण लष्कर हंबीररावांच्या ताब्यात दिले. यावेळी शिवाजी राजे चिपळून या ठिकाणी एक महिना थांबले होते. ८ एप्रिल १६७४ रोजी सेनापती पदी विराजमान झाल्यानंतर काही दिवसांनी हंबीरराव मोहिते यांनी केजळगड जिंकून घेतलेला होता. तेथून हलर्णा या ठिकाणी रवाना झाले आणि शिवाजी राजे राज्याभिषेकाच्या समारंभासाठी रायगडावर गेले. 'शिवरायांनी हंसाजी मोहिते यास सरनौबत केले.'

महाराष्ट्राचे जेष्ठ समाजसुधारक, आद्य क्रांतीकारक, महात्मा जोतीराव फुले यांनी शिवरायांच्या पोवाड्यात हंबीरराव सरनौबत झाल्याचे वर्णन केलेले आहे. 'प्रतापराव पडता मोड फौजेचा झाला। पाठलाग मराठ्याचा केला।। तोफगोळ्यापोटी दडती भिडती पन्हाळ्याला। गेले नाही शरण शत्रुला।। अकस्मात हंसाजी मोहिता प्रसंगी आला। हल्ला शत्रुवर केला।। गुजर दल मागे फिरुन मारी यवनाला। पळीवले विजापुरला।। शिवाजीने हंसाजीला सरनौबत केला। मोन अधिकारी दिला।। हंबीरराव पद जोडले त्याच्या नावाला। शिवाजी मनी सुखी झाला।।'[३९]

हंसाजी मोहिते यांना हंबीरराव हे नाव सेनापतीपदी नियुक्त करताना दिलेले आहे. मात्र हेच नाव का दिलेले असावे याबाबत संशोधन केले असता कवींद्र परमानंदाने शिवभारत ग्रंथात पृष्ठ

क्र.३२ वर हंबीरराव चव्हाण नावाचा कर्तृत्वान व्यक्ती निजामशाहीमध्ये शहाजी राजांचा समकालीन असल्याचे सांगितले आहे.

तसेच 'शिवकालीन पत्र सार संग्रह', खंड तीसरा यामध्ये शंकर नारायण जोशी यांनी पेज क्र.३३ ते ३९ वर शहाजहान व औरंगजेब-भिकुजी मोहिते हंबीरराव नावाची सात पत्रे प्रकाशित केलेली आहेत. त्यामध्ये हंबीरराव नावाचा व्यक्ती मोहिते घराण्यात यापूर्वी होऊन गेलेला होता 'हंबीरराव' हा किताब मोगल सम्राट शहाजहानने मोहित्यास दिल्याचे स्पष्ट होते.

वास्तविक चव्हाण व मोहिते ही घराणे एकच आहेत. या घराण्यात केंव्हातरी हंबीरराव नावाचा पुरूष कर्तृत्ववान झालेला असावा. तेंव्हापासून या घराण्यातील पराक्रमी व कर्तृत्ववान व्यक्तीला हंबीरराव हे नाव देण्यात येत असावे.

तसेच कृष्णाजी अनंत सभासदाने हंसाजी मोहिते यास 'हंबीरराव' हा किताब देऊन सरनौबत केले असा उल्लेख केलेला आहे. जेधे शकावलीमध्ये फक्त 'हंबीरराव' असाच उल्लेख आहे. तळबीडकर मोहिते घराण्याच्या वंशावळीत हंबीरराव हेच नाव आढळते. शिवनिबंधावलीमध्ये मराठ्यांच्या शहाण्णव कुळीच्या यादीमध्ये 'हंबीरराव' असे उपकूळ असा उल्लेख केलेला आहे. यावरुन हंबीरराव हे मोहिते घराण्यात व्यक्तीचे नाव होते हे निश्चित आहे. कर्तृत्वान व्यक्तीला 'हंबीरराव' हा किताब देऊन गौरव केला जात होता. म्हणून हंसाजी मोहिते यांना सेनापतीपदी नियुक्त केल्यानंतर 'हंबीरराव' या नावाने ओळखले जाऊ लागले. आणि या नावाला शोभेल असेच त्यांनी कार्य केले. हंबीरराव हा शब्द अमीरराव या अर्थाने रुढ आहे. अमीर म्हणजे श्रीमंत नव्हे तर (शौर्य) कर्तृत्वसंपन्न या अर्थाने ओळखला जातो.

## ८) शिवराज्याभिषेक आणि सेनापती हंबीरराव मोहिते

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात शिवराज्याभिषेक ही घटना शिवाजी महाराजांच्या इतिहासात नव्हे तर मराठ्यांच्या इतिहासात एक लक्षणीय घटना आहे. तत्कालीन काळातील मोगल साम्राज्य हे संपूर्ण भारतीयांचे साम्राज्य असे समीकरण भारतीय आणि परकिय लोक समजत होते.

कारण भारतामध्ये सर्वात मोठे साम्राज्य म्हणून मोगल साम्राज्य होते. दक्षिण भारतामध्ये आदिलशाही कुतूबशाही या सत्ता लहान असून त्या मोगलांच्या अधिपत्याखाली चालत असत. यांच्या वर्चस्वाखाली अनेक हिंदू राजे स्वतःला 'राजा' म्हणून घेत होते. त्यांनी स्वतः राज्याभिषेक करुन घेतला असला तरी मुस्लिम सत्ताचे ते मांडलिक म्हणून राज्यकारभार पहात होते. मात्र ते सार्वभौम नव्हते. उदयपूरचे रजपूत राजे स्वतःला राज्याभिषेक करुन घेत असत. अमरसिंगाच्या काळापासून उदयपूरने मोगलांचे सार्वभौमत्व स्वीकारले होते.

शिवरायांनी स्वतःला करवून घेतलेला राज्याभिषेक हा तत्कालीन मोगल, आदिलशाही व कुतूबशाही अशा कोणत्याही सत्तेचे मांडलिकत्व न स्वीकारता व मोगलांचे मांडलिकत्व झुगारुन देऊन संपूर्ण भारतात निर्भय स्वातंत्र्य पुकारल्याची इतिहासाची नांदीच ठरली. शिवरायांनी प्रथम हिंदवी स्वराज्य स्थापन केले. स्थापन केलेले राज्य स्वतः चांगले चालवले आणि ते राज्य चिरंतन टिकेल असा दबदबा त्यांनी निर्माण केला. आता खऱ्या अर्थाने महाराजांची किर्ती सगळीकडे पसरली होती. आता गरज होती ती 'राजा' म्हणून मान्यतेची, त्यासाठी राज्याभिषेक हाच एकमेव मार्ग होता. हा राज्याभिषेक का करुन घेतला कारण 'शिवरायांनी आपल्या कर्तबगारीने जे स्थान मिळविले होते त्यालाकायदेशीर स्वरुप देणे आवश्यक होते. राजेशाही स्थापन करण्याची गरज होती. शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला पाहिजे ही इच्छा प्रजेच्या सर्वात्र पसरली होती.'[४०] त्या बरोबरच 'हिंदवी राज्य संस्थेला सांस्कृतिक, राजकिय आणि नैतिक अथवा सामाजिक श्रेष्ठ दर्जा व स्थैर्य प्राप्त व्हावे हे याचे सामान्य उद्दिष्ठ या राज्याभिषेकामागे होते. तसेच 'वर्णाश्रम' धर्माच्या आचारवैशिष्ट्यांमुळे सोसाव्या लागणाऱ्या अडचणी दूर होणार होत्या. हा प्रत्यक्ष व फार मोठा फायदा होता.'[४१] शिवरायांनी राज्याभिषेकाची प्रेरणा कोणीतरी जेष्ठ व्यक्तीने दिलेली असली पाहिजे. एक तर राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ साहेब किंबहुना गागाभट यांनी दिलेली असावी. कारण याबाबतचा ठोस पुरावा उपलब्ध नाही. मात्र राज्याभिषेकासाठी गागाभट्टांना निमंत्रित करण्याचे ठरले.

'गागाभट्ट हे वाराणसीसारख्या अग्रगण्य क्षेत्री अग्रपुजेचा मान लाभलेल्या भट घराण्यातील होते. तसेच ते तत्कालीन भारताचे सर्वश्रेष्ठ पंडित व धर्मशास्त्रमीमांसक होते. त्यांच्या असामान्य योग्यतेमुळेच राज्याभिषेकासारख्या युगप्रवर्तक समारंभासाठी म्हणून त्यांना निमंत्रित करण्यात आले.'[४२] त्यानुसार गागाभट इ.स.१६७४ मध्ये रायगडावर आले. शिवरायांची भेट घेऊन राज्याभिषेकाची ६ जून १६७४ ही तारीख निश्चित करुन पैठणला आपल्या गुरुबंधुकडे गेले.

इ.स.१६७४ मध्ये विजापूरच्या आदिलशहाने हिंदवी स्वराज्यावर बहेलोलखानाची नेमणूक केलेली होती. त्याचा मुकाबला करण्यासाठी शिवरायांनी सेनापती प्रतापराव गुजर यांची रवानगी केली असून सोबत असंख्य मराठा सैन्य देण्यात आले. सेनापती प्रतापरावांनी उमराणी या ठिकाणी बहेलोलखानाचा दारुन पराभव करुन त्यास सोडून दिले होते. ही वार्ता शिवरायांना समजताच सेनापतींना निरोप पाठविला की, 'आपण बहेलोलखनास जिवंत सोडून फार मोठी चूक केली. त्याचा निप्पात केल्याशिवाय तोंड दाखवू नका.' प्रतापरावांना याचे फार दु:ख झाले. महाराज माझ्यावर एवढे नाराज झाले आहेत. 'आता मला बहेलोलखानाला संपविणे' या ध्येयाने व त्वेषाने प्रतापरावानी नेसरीच्या घाटात बहेलोलखानाच्या सैन्याला गाठले. सोबत केवळ सहा साथीदार होते. अल्पशा सैन्याचा बहेलोलखानाने झालेल्या संघर्षात सर्वांना ठार केले. (२४ फेब्रुवारी १६७४)

राजधानी रायगडावर शिवराय राज्याभिषेक समारंभाची तयारीकरत होते आणि नेसरी युद्धात सेनापती प्रतापराव कामी आल्याची बातमी शिवरायांना समजली. शिवरायांना अतिशय दु:ख झाले या मानसिक धक्क्यातून सावरत नाही तोच '२० मार्च १६७४ सुमारास शिवरायांची जेष्ठ पत्नी काशीबाई हिचा मृत्यु झाला.'[४३] या काळात हंसाजी मोहिते यांनी विलक्षण पराक्रम करुन शत्रूवर विजय मिळविला त्यामुळे शिवरायास मोठा संतोष वाटला. '८ एप्रिल १६७४ रोजी महाराज लष्कराची पहाणी करण्यासाठी व नवे सरनौबत नियुक्त करण्यासाठी चिपळूणला गेले.'[४४] यावेळी संपूर्ण मराठा सैन्य चिपळूण या ठिकाणी गोळा झालेले होते. सर्व सैन्याची पहाणी जवळून केली. सैन्यातील जेष्ठ सरकाऱ्याशी चर्चा केली. खजिना फोडून सैनिकांना वाटून टाकले. चालू वर्षाचा पगार ठरवून लष्कराच्या छावण्या, नव्या नेमणूका करुन टाकल्या. याच दिवशी सरनौबतीची वस्त्रे

हंसाजी मोहिते देऊन 'हंबीरराव' असा किताब दिला. 'या प्रसंगी हंसाजीच्या हाताखाली आणखी दोन मराठे सरदारांनी अतिशय शौर्याने लढून मोठा र्प्शनीय पराक्रम केला होता. त्याची नावे संताजी घोरपडे व धनाजी जाधव अशी होती. त्यांची पाठ थोपटून त्यांचा बहुमान [४५] यावेळी शिवरायांचा मुक्काम सुमारे महिनाभर होता. सेनापती हंबीरराव मोहितेंच्या मराठा सैन्याने सुलतानढवा करुन वाईजवळील केंजळगड २४ एप्रिल १६७४ रोजी जिंकून घेऊन पावसाळी छावणीसाठी संपूर्ण मराठी सैन्य चिपळूणहून हलवर्ण येथे गेले. '९ मे १६७४ पूर्वी शिवराय परशुरामाचे दर्शन घेऊन रायगडी परतले.'[४६]

राजधानी रायगडावर राज्यभिषेकाची तयारी जोरात सुरु झालेली होती. शिवाजी महाराज प्रत्येकाकडे सोपविलेल्या कामाचा आढावा घेऊन समारंभामध्ये कोणतीच उणीव शिल्लक रहाणार नाही याची काळजी घेत होते. पण त्यांचे संपूर्ण लक्ष आपल्या लष्कराकडे होते. 'वैशाख शु. १५' म्हणजे दि. ९ मे १६७४ रोजी शिवरायांनी हलवर्ण येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या जुमलेदार, हवालदार कारकुनांना एक पत्र पाठविले होते. यावरुन त्यांच्या प्रशासकीय व्यक्तीमत्वाचा प्रत्यय येतो. अनुशासन, सुक्ष्मदृष्टी, जरब इत्यादी गुणांचा प्रभाव सेनापती व त्यांच्या संपूर्ण सैनिकावर होता या पत्रामध्ये शिवराय लिहितात '...... तुम्ही मनास माने ऐसा दाणा रातीब, गवत मागाल असेल तोवरी धुंदीकरुन चाराल. नाहीसे जाल म्हणजे मग काही पडत्या पावसात मिळणार नाही. उपास पडतील. घोडी मरावयास लागतील. म्हणजे घोडी तुम्हीच मारिली ऐसे होईल व विलातीस तसवीस देऊ लागाल. ऐशास, लोक जातील, कोन्ही कुणब्याचे येथील दाणे आणील, कोन्ही भाकर, कोन्ही गवत, कोणी फाटे, कोणी भाजी, कोन्ही पाले ऐसे करु लागलेत म्हणजे जी कुणबी घर धरुन जीव मात्र घेऊन राहीले आहेत तेही जाऊ लागतील. कित्येक उपासी मरायला लागतील. म्हणजे त्याला ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही। ऐसा तळतळाट घेईल। तेंव्हा रयतेची व घोडियांची सारी बदनामी तुम्हावरी येईल हे तुम्ही बरेणूचा सिपाई हो अगर पावखालक हो, बहूत यादी धरुन वर्तणूक करणे, कोन्हावरी जूलूम अगर ज्याजती अगर कोन्हीसी कलागती करावयासी गरज नाही.

...... हाली उनाळ्याला आहे. तइसेखलक पागेचे आहेत, खण धरुन राहीले असतील व राहातील. कोन्ही आगट्या करितील कोन्ही भलतेच जागा चुली रंधनाळा करितील कोन्ही तंबाकुला आगी घेतील, गवत पडिले आहे ऐसे अगर वारे लागले आहे ऐसे मनात ना आणिता म्हणजे अविस्त्राच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील. गवताच्या लहळ्यास कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारे गवत व लहळ्या आहेत तितक्या एकेक जाळो जातील. तेंव्हा मग काही कुणबियांच्या गर्दना मारल्या आर कारकुनास ताकीद करावी तैसी केली तऱ्ही काही खण कराया एक लाकूड मिळणार नाही, एक खण होणार नाही हे तो अवधियालाकळते. या कारणे बरी ताकीद करोन खासे खासे असाल ते हमेशा फिरत जाऊन रंधने करिता, आगट्या जाळीता, अगर रात्रीस दिवा घरात असेल, अविस्त्राच उंदीर वात नेईल ते गोष्टी न हो ......[४७]

शिवरायांच्या पत्रातील विचार स्वराज्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांना विचार करा यला लावणारे आणि प्रत्येकाला आपल्या कर्तव्याची जाण करायला लावणारे होते. बहुतेक हे पत्र सेनापती हंबीररावांच्या हातामध्ये पडले असावे. त्यांनीच तेथील सर्व जुमलेदार, हवालदार व कारकुनांना एकत्र बोलावून आपल्या छत्रपतीचा संदेश सांगितला असावा आणि ते राज्याभिषेक समारंभासाठी राजधानी रायगड येथे येऊन थांबले.

'१९ मे १६७४ रोजी शिवरायांनी प्रतापगडावर जावून भवानी मातेचे दर्शन घेतले'[४८] नंतर ते 'प्रताप गडावरुन २१ मे १६७४ रोजी परत रायगडला आल्याची बातमी ऑक्सिंडेन[४९] नावाचा इंग्रज व्यक्ती आपल्या पत्रात देतो' यावेळी राजधानी रायगडाचे शुशोभीकरण करण्यात आलेले होते. सर्व महालांना रंगरंगोटी करण्यात आली. राजदरबारच्या समोर एक भव्य मंडप उभारण्यात आला होता. येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागताची तसेच निवासाची सोय करण्यात आली होती. रत्नजडीत, सुवर्णालंकारांनी सुशोभित असे भव्य सिहांसन तयार करण्यात आले होते. सगळीकडे आनंदी वातावरण होते. सर्व लोकांमध्ये उत्साह ओसंडून वाहत होता. देशोदेशीचे राजेरजवाडे आणि सर्व पातशहांना राज्याभिषेकाचे निमंत्रण देण्यात आले होते. स्वराज्यातील सर्व सरदार तसेच आम

जनतेला राज्याभिषेक सोहळ्यासाठी उपस्थित रहावे, असा संदेश सगळीकडे पाठवण्यात आला. स्वराज्यातील सर्व किल्यां वर सजावटकरण्यात आली. सगळीकडे पताका लावण्यात आल्या. संपूर्ण स्वराज्यात एकप्रकारचे चैतन्य पसरले होते. सर्वांच्या मनामध्ये आनंद भरलेला होता. मराठी माणसांचे कित्येक वर्षापासूनचे स्वप्न साकार होणार होते. स्वराज्याच्या कानाकोपऱ्यातून जनसमुदाय रायगडावर लोटला होता.

शिवरायांच्या राज्याभिषेक समारंभासाठी गागाभट रायगडावर आलेले होते. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली वैदिक पद्धतीने समारंभाला सुरुवात झाली. प्रथम शिवरायांचे उपनयन संस्कार करण्यात आले. त्यानंतर महाराजांचे तुलादान झाले. नंतर श्री विष्णूच्या सुवर्णमुर्तीचे दान करण्यात आले. त्यानंतर शिवरायांचा आपल्या पत्नीशी दुसऱ्यांदा विवाह करण्यात आला. लुप्तविधीबद्दल प्रायश्चिते पुव्याहवाचन, होम, शांती वगैरे झाले 'जेस्ट श्रुध १२ शुक्रवार घटी २१ पले ३४ वी ३८/४० सी ४२ तीन घटीका रात्र उरली तेंव्हा राजश्री सिवाजी राजे भोसले सिंव्हासनी बैसले' [५०] ६ जून १६७४ रोजी पहाटे ५.०० वाजता शिवरायांच्या मस्तकी अभिषेकधारा पडल्या. अभिषेक विधीप्रसंगी अभिषेकधारा धरण्यासाठी सर्व अधिकारी उपस्थित होते यावेळी तक्त सुवर्णाचे, बत्तीस मणाचे, सिद्ध करविले. नवरत्ने अमोलिक जितकी कोशात होती. त्यामूध्ये शोध करुन मोठी मोलाची रत्ने तक्तास जडाव केली. ..... सातमहान दियाची उदके व थोर थोर नदियाची उदके व समुद्रांची उदके, तीर्थक्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदके, आणिली सुवर्णाचे कलश केले व सुवर्णांचे तांबे केले. आठ कलश व आठ तांबे यांनी अष्टप्रधानांनी राजियास अभिषेक करावा असा निश्चिय करुन, सुदिन पाहून मुहूर्त पाहिला.....'[५१]

छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनावर बसले. सिहांसनास अष्टखांब जडित केले. त्या पद्धतीप्रमाणे शास्त्रोक्त सर्वाही साहित्य सिद्ध केले. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेचाळीस लक्ष होन जाले. अष्टप्रधानास लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस त्याखेरीज एक हत्ती, घोडा, वस्त्रे, अलंकार असे देणे दिले. अभिषेकाप्रसंगी अष्टप्रधानांची व्यवस्था ही विशिष्ट हेतुने सिद्ध केली

असून अष्टप्रधानांचा जाबत ठरविण्यात आला त्यावरुन त्यांची जुनी व नवी नावे खालील प्रमाणे होती.

| 'सिंहासनाच्या डावीकडे | | सिंहासनाच्या उजवीकडे | |
|---|---|---|---|
| १) | हंबीरराव मोहिते, सरनोबत सेनापती | १) | मोरोपंत पिंगळे-पेशवा - मुख्यप्रधान |
| २) | रामचंद्र त्रिंबक, डबीर सुमंत | २) | रामचंद्र नीळकंठ-मुजूमदार - अमाल |
| ३) | रावजी निराजी, न्यायाधिश - न्यायाधिश | ३) | अण्णाजी दत्तो-सुरनीस - सचिव |
| ४) | रघुनाथ पंडितराव - पंडितराव | ४) | दत्ताजी त्रिंबक-वाकनीस - मंत्री'[५२] |

राज्याभिषेक प्रसंगी शिवरायांची जेष्ठ पत्नी सोयराबाई, पुत्र संभाजी यासह सिंहासनाजवळ बसले होते. 'पूर्वेस मुख्य प्रधान ब्राह्मण ते मोरोपंडित प्रधान पिंगळे हाती सुवर्ण कलश धृतपुरीत घेऊन उभे राहिले. दक्षिणेस क्षत्रिय प्रधान असावे ते सेनापती हंसाजी हंबीरराव मोहिते रौप्यकलश दुग्धपूर्ण घेऊन उभे राहिले. पश्चिमेस नीळोपंत यांचे पुत्र रामचंद्र पंडित अमात्य ताम्रकलश दधिपूर्ण घेऊन उभे राहिले. उत्तरेस छंदोमात्य प्रधान रघुनाथ पंडितराव सुवर्णकलश मधुपूर्ण घेऊन उभे राहिले.'[५३] यावेळी अष्टप्रधानांना कोणत्या वस्तू व वस्त्रे द्यावयाची हे ठरले होते. प्रधान आणि सेनापती यांना युवराजाप्रमाणे सन्मानीत केले. मंदिल, चादर, पटका, किनखा पठाण, महमुदीठाण अशी एकूण पाच भरगच्च वस्त्रे, शिरपेच, मोत्यानी कंठी, चौकडा, मोत्याचा तुरा व जेगा असे पाच दागीने याशिवाय शिक्का-कटयार, चौघडा, हत्ती, सोन्याच्या दांडिची चवरी, ढाल-तलवार, जरीपटका, घोडा व चोपदार ही दिली.'[५४] या प्रसंगी छत्रपतींच्या खालोखाल युवराज संभाजी राजे, अष्टप्रधान मंडळातील पंतप्रधान आणि सेनापती हंबीरराव मोहिते यांचा सन्मान झालेला होता. सेनापती म्हणून लष्करासंबधीचे सर्व अधिकार दिले होते. सैन्यांचे संपूर्ण संरक्षण करावे, युद्धात सैन्याचे नेतृत्व करावे, सैन्यात सैनिकांची भरती करावी, सैनिकांच्या वेतनासंबंधी विचारपूस करावी. त्याच्या अडचणी छत्रपतीच्या कानी घालाव्यात आणि सर्व सैनिक अधिकारी व सरदारांनी सेनापतींच्या आदेशाचे पालन करावे असे ठरवून दिले.

अभिषेकाचा विधी पूर्ण झाल्यानंतर छत्रपतींचा राजदर्शन सोहळा सुरु झाला. त्यानंतर छत्रपतींना नजराणे अर्पण करण्याचा विधी सुरु असतानाच नगारखाण्याबाहेर त्यांच्या भव्य मिरवणुकीची सिद्धता सुरु होती. राज दर्शनानंतर नगरप्रदक्षिणा व देवदर्शनविधी ठरलेला होता. त्यानुसार राजदर्शनसोहळा आटोपताच सिंहासनाजवळ एक श्रृंगारित शुभ्र अश्व आणला गेला. त्यावर आरुढ होऊन महाराज लवाजम्यासह प्रवेशद्वारापर्यंत आले. तेथे सालंकृत हत्ती उभा होताच अश्वावरुन उतरुन महाराज त्या हत्तीवरील आसनात बसले. सेनापती हंबीरराव मोहिते माहुताच्या जागी बसले. महाराजांच्या मागे मोरोपंत पेशवे सुवर्णाचे मोरचेल घेऊन बसले. यानंतर मिरवणूक सुरु झाली. मिरवणुकीचा थाट नेत्राचे पारणे फेडेल एवढा भव्य होता. आघाडीला शिंगे, कर्ण झांजा, दुदंभी वगैरे वाद्ये निनादत होती. त्यामागे भगव्या झेंड्याचा हत्ती ऐटीत चालला होता. त्यांच्यामागे राजचिन्हे धारण करुन भालदार, चोपदार चालत होते. त्यांच्यामागे सुवर्णदंड उंचावून महाराजांची बिरुदावली ललकारत प्रतिहारी चालत होते. त्यांच्यामागे व पुढे सहस्त्रावधी सैनिक व मधोमध महाराजांचा हत्ती येत होता. प्रधानमंडळाचे उर्वरित लोक व अन्य अधिकारी राजांच्या हत्तीला खेटून चालत होते. राजांच्या हत्तीमागे घोडदळ, पायदळ, सांडणी स्वार, हुजुरात, कोतवाल तसेच कर्णे, शिंगे, नौबती इत्यादी वाजंत्रीचे ताफे गर्जत गर्जत चालत होते. महाराजावर लाह्या, फुले, दही, दुर्वा, अक्षता यांचा सतत वर्षाव होत होता. बाजार पेठेकडून जगदीश्वराकडे जाणारा मार्ग कुंकवाचे सडे घालून सुशोभित केलेला होता. पताका आणि तोरणे यांची सर्वत्र दाटी झालेली होती. मार्गातील घरांमधून राजांवर पुष्पवृष्टी होत होती.

छत्रपती झालेल्या शिवरायांच्या मिरवणूकीमध्ये सेनापती हंबीरराव मोहिते यांना माहुताचा मान मिळणे ही त्यांच्या जिवनातील महत्वाचा क्षण होता. छत्रपतीच्या राज्याभिषेकाच्या प्रसंगी एवढा मान देशाच्या इतिहासात पहिल्यांदा एवढ्या सामान्य व्यक्तीला मिळाली ही बाब स्मरणी असून त्यामागे सेनापतींचे स्थान किती महत्वाचे होते हे स्पष्ट होते.

## ९) सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या शिक्का-मुद्रा

छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांची मुद्रा खालील प्रमाणे

'पहिली वाटोळी' व 'श्रीमच्छिवमहानुभाव सेनाधीश हंबीरराव' अशा मजकुराची आहे. ही मुद्रा शके १६०६ मधील आहे तर दुसरी 'श्री शिवचरणी दृढभाव, सरलष्कर मोहिते हंबीरराव' अशी असून ती शके १६२७ मधील आहे.'[५५] या मुद्रा वापरामध्ये होत्या. छत्रपतींनी यासंबंधीचे अधिकार दिलेले होते. स्वराज्याप्रती आणि छत्रपती बाबत निष्ठा व मानमरातब किती होता याची कल्पना येते. अशा सेनापतीच्या सैन्याबाबत माहिती खालील प्रमाणे सांगता येते.

## १०) सेनापतीचे सैन्य व त्याची व्यवस्था

८ एप्रिल १६७४ रोजी शिवरांयानी सरनौबत/सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नेमणूक केली. त्यावेळी १ लाख ५००० हजार घोडदळ होते. त्यामध्ये मानाजी मोरे, येसाजी काटकर, गोदाजी जगन्नाथ, रुपाजी भोसले, संताजी घोरपडे, धनाजी जाधव असे एकूण ३० सरदार होते. नागोजी बल्लाळ, संक्राजी माने, गणेश शिवदेव, नेमाजी शिंदे, चंदो नारायण हे सुभेदारही होते.

तसेच पायदळाचे सेनापती म्हणून येसाजी कंक यांच्याकडे १ लाख पायदळ सैन्य होते. त्यात सुर्याजी मालुसरे, रणोजी दरकर, मुदबानी बेनमणा, पिलाजी सणस, जावजी थेव, कोंडाजी फर्जंद असे ३६ रणयोद्धा होते. सोबत १२ हत्तीची गजसेना होती. सर्वांच्या मदतीने आणि छत्रपती शिवाजी राजांच्या मार्गदर्शनाखाली 'सेनापती' या नात्याने सेनापती हंबीरराव मोहिते यांनी हिंदवी स्वराज्य वृद्धींगत करण्यासाठी आयुष्याच्या अखेर पर्यंत प्रयत्न केले.

## १)     सेनापती हंबीरराव मोहितेंचे सैन्य

सैन्याद्विना नैव राज्यं न धनं न पराक्रम।। (सैन्यावाचून राज्य, धन आणि पराक्रम प्राप्त होत नाहीत)'[५६] जगातील कोणत्याही राष्ट्राचे अस्तित्व व सामर्थ्य हे पूर्णतः सैन्यावर अवलंबून असते. सैन्याशिवाय राज्य उदयास येवू शकत नाही. जगातील राज्य ही एकमेकापासून पूर्णपणे अलग नाहीत तर ती एकमेकांच्या सान्निध्यामुळे विकसीत होत आहेत. प्रत्येकाचे हितसंबंध सदासर्वकाळ सलोख्याचे व शांततेचे राहू शकत नाहीत. स्वार्थी वृत्तीतून त्यांच्यात विरोध उत्पन्न होतात. त्यातून दोन राष्ट्रात युद्ध सुरु होत असतात. याचा सांगोपांग विचार करुन शिवरायांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना सैन्याच्या साह्याने केली. स्वराज्याच्या झेंड्याखाली एकत्र आलेले प्रारंभ काळातले सैनिक मध्यम शेतकरी कुटुंबातून आलेले होते. अशाना कायम सेवेत ठेवण्याचे सामर्थ्य स्वराज्यामध्ये नव्हते. म्हणून या शेतकरी, कष्टकरी तरुणांनी शेतीची कामे नसतील त्या दिवसात घरचे खाऊन लष्करामध्ये भाग घेऊन कर्तव्य पूर्ण करत. प्रत्यक्ष युद्धावर असताना अशा सैनिकांना नाममात्र 'रोजमुरा' मिळत असे. अशी मावळा सैनिकांची फलटण होती. स्वराज्याचे कार्य पूर्णवेळ म्हणून करणाऱ्या शिपायांची भरती नंतरच्या काळात झाली. ज्यावेळी 'इ.स.१६४९ मध्ये माणकोजी चोर म्हणून लष्कराचा सरनौबत नेमला..... तेंव्हा पागा बाराशे व शिलेदार दोन हजार झाली लष्कर तीन हजार झाले.'[५७]

स्वराज्याचे सैन्य उभारताना मुस्लीम सत्तांकडे सेवा करणाऱ्या मराठ्यांना युद्धाचा मिळालेला अनुभव उपयोगी पडला. शिवरायांना तत्कालीन सत्ताशी भविष्यात मोठा संघर्ष करावा लागणार या हेतूने इतर सैन्यांचे जवळून अवलोकन केले होते. त्यातील गुण व दोष अचुकपणे हेरले होते. त्यातील दोष दूर करुन आपले समर्थ लष्कर उभारण्याचा शिवरायांनी प्रयत्न केला होता.

शिवरायांचे सैन्य दोन प्रकारचे होते. एक पायदळ व दुसरे घोडदळ असे असून गजदलही होते. हा सैन्यांचा मोठा महत्वाचा भाग समजला जात होता. शिव रायांच्या सैन्याची घटना कोणत्या

प्रकारची होती. ती 'मावळे लोकात पाहाणी परीक्षा करुन निवडक माणूस पाहून पतके केली त्यांची नावनिशिवार

१) शंभर - लोक म्हणून नाव ठेविले.

२) साठ - लोक म्हणून नाव ठेविले.

३) चाळीस - लोक म्हणून नाव ठेविले.

४) तीस - लोक म्हणून नाव ठेविले.

५) वीस - लोक म्हणून नाव ठेविले.

कलम १

येणेप्रमाणे पतकापतकाची नावे ठेविली मावळ्यामावळ्यांमध्ये लोक उत्तम निवडला. निवडक भरती करुन चार पतके मिळून दोन हजार माणूस ठेविले. त्यातकाही बंदुकी, काही विटेकरी, वरकड आडहत्यारी फिरंग असे माणूस सजले..... अशी परीक्षा करुन हमेशा दोन हजार मावळे लोक पालखी बरोबर जवळ असावे. तसेच त्यास तैनाती सरदार, हजारी हशमांत केले, त्याप्रमाणे जूमलेदार प्रमाण केले आणि दोन अडीच हजार माणूस हशम केला. रहस्ता असावे चालते वेळेस पालखी बरोबर चौतर्फा चालत असावे ये जातीने लोक ठेविले.'[५८]

शिवरायांनी स्वतःच्या रक्षणाकरिता उभारलेल्या या सैन्याशिवाय मावळे लोकांचे त्यांनी दुसरे एक सैन्य तयार केले होते. त्याची घटना सभासदाने दिलेली आहे. 'मावळे लोकात दहा लोकात एक पाईक, पन्नास लोक म्हणजे पंचनायकी यास एक हवालदार, दोन तीन हवाले मिळून एक जुमलेदार, दहा जुमले मिळून एक हजारी, जूमलेदारास शंभर होन तैनात सालीना एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनास, हजारी यास पांचशे होन तैनात, सबनिसास शंभरथेस होजपर्यंत ऐशा हजारियास (नेमणुका के ल्या) सात हजारिया मिळोन एक सरनौबत येसाजी कंक म्हणून केला. याचे आज्ञेत सर्वांनी असावे शिवरायांनी सैन्याचा दुसरा घोडदळाचा[५९] दुसरा भाग करुन त्याची घटना अशी होती.

लष्करात पागा केली पागेंचे बळ तोलदार केले. पागांच्या तोलदारी खाली शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचे चालेना. पागेमध्ये दर घोड्यासी बारगीर एक पंचवीस बारगिरास मराठा धारकरी हवालदार एक केला पाच हवाल्यांचा एक जुमला म्हणून नाव ठेविले. जुमालदारास पांचशे होन तैनात व पालखी त्यास एक व (त्याच्या) मुजूमदारास शें सवाशें होनांची (तैनात) करावी. पंचवीस घोड्यास एक पखालजी व एक नालबंद, असे दहा जुमले म्हणजे एक हजारी यास एक हजार दोन तैनात, एक मुजूमदार व एक मराठा कारभारी व एक जमनीस परभू कायस्थ त्यास पांचशे दोन या प्रमाणे असामीस तैनात (व) पाखी द्यावी. याला जमाखर्च चौघांचे विद्यमाने करावा. अशा पंचहजारीया मिळोन एक पांचहजारी करावा. त्यास दोन हजार दोन तैनात तसेच मुजूमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांच हजारीया सरनोबताच्या हुकुमांत ये जातीचा मामला पागेचा तसे शिलेदाराकडे सुभे वेगळाले, तेही सरनोबताचे आज्ञेत पागा (व) शिलेदार मिळोन सरनोबत याचे आज्ञेंत वर्तावे दर हजारी, पंचहजारी, सरनोबत याजवळून वाकनिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ बहिरजी जाधव नाईक, मोठा शहाणा नासदांचा नाईक केला. तो बहूत हुशार चौकस करुन ठेविला. [६०] पागेतील सैनिकाना पगारी संदर्भाचा उतारा असा 'It will not be out of place to mention that the caveliers of shivaji ordinarily got for their pay two pagodas per month. All the horses belonged to that chief, who employed some grooms to take care of them. There were ordinarkly three horses for two men. this is what contributed to his usual celerity.'[६१] शिवरायांशी लष्करातील सैनिक एकनिष्ठेने वागत असत. त्यांना त्यांच्या पराक्रमाचे चिज म्हणून बक्षिसे दिली जात होती. 'By his people he was exceedingly loved; both in matters of reward and punishment; he was so impartial that while he lived he made no exception for any person, no merit was left unrewarded, no offence went unpunished, and this he did with so much care and attention that he specially charged his governers to inform him

in writing of the conduct of his soldiers intimating in particular those who had distinguished themselves and he would at once order their promotion either in rank of pay according to their merit.'[६२] इ.स.१६७५ च्या एप्रिल महिन्यात इंग्रजांनी राजापुरहून मुंबईस लिहीलेल्या एका पत्रात पंधरा हजार घोडेस्वार, चौदा हजार पायदळ आणि दहा हजार बुणगे[६३] शिवाजी बरोबर असल्याचे उल्लेख आहेत तर २२ एप्रिल १६७५ च्या कारवारहून मुंबईस लिहीलेल्या एका पत्रात शिवाजीपाशी तीस हजार सैन्य असल्याचा बोलवा आहे. इ.स.१६७७ सालात शिवाजीने कर्नाटकावर स्वारी केली त्या वेळी त्याचेबरोबर वीस हजार घोडेस्वार व चाळीस हजार पायदळ असल्याचा उल्लेख आढळतो.[६४] मराठी सैन्याची संख्या सभासदाने दिलेली आहे. घोडे राऊतखांा पागा शिलेदार १,०५,००० एक लक्ष पाच हजार तपशील, पागा ४५००० यांचे सरदार नावे१ हंबीरराव सरनौबत,१ संताजी घोरपडे,१ माताजी मोरे,१ येसाजी काटकर,१ संताजी जगताप,१ निंबाजी पाटोळे,१ नेतोजी काटकर,१ परसोजी भोसले,१ गणोजी शिरके,१ बाळोजी काटकर,१ निळोजी काटे,१ नेतोजी पालकर,१ तुकोजी निंबाळकर,१ गोंदजी जगताप,१ संभाजी हंबीरराव,१ धनाजी जाधव,१ शामराव,१ वाघोजीके,शिरहरजी निंबाळकर,१ भवानराव,१ आनंदराव हशमहजारी,१ तेलंगराव,१ रुपाजी भोसले,१ व्यंकटराऊ खांडकर,१ खंडोजी जगताप,१ उदाजी पवार,१ रामजी काकडे,१ कृष्णाजी घाटगे,१ सावजी मोहिते... एकूण २९'[६५] सरदार होते. त्यांच्याकार्यावरुन सरदारकी दिलेली होती. या व्यतिरिक्त काही शिलेदार व सुभेदारही होते.१ नागोजी बल्लाळ,१ गणेश शिवदेव,१ चंद ो हिरदेव,१ नेमांजी शिंदे,१ रामाजी भास्कर,१ बयाजी गडदरे,१ बाळाजी निळकंठ, हिरोजी शेळके,१ त्रिंबक विठ्ठल,१ महादजी नारायण,१ बाळोजी शिवतरे,१ जानराव वाघमारे,१ संक्रोजी माने,१ अमरोजी पांढरे,१ रामाजी जनार्दन,१ मुधोजी थोरात,१ कृष्णाजी भांदडे,१ बहिरजी वडगरे,१ चंदो नारायण,१ खेमणी,१ खंडोजी आटोळे,१ राघो बल्लाळ,१ बळवंतराव देकाते,१ बहिरजी घोरपडे,१ मालोजी थोरात,१ बाळाजी बहिरव,१ देवाजी उघडे,१गणेश तुकदेव,१ केरोजी पवार,१ उचाले,१ नरसोजी शितोळे, हत्ती व हत्तीणी, छावे सुमारे - पणियातील जहाजे

१२६०                          १ दर्यासागर

आरमारेचे सरदार

+

१इब्राामखान

१माननाईक

हशम मावळे सरदार असामी १०००००० सरदार - येसाजी कंक,१ सरनोबत,१ सुर्याजी मालुसरे,१ गणोजी दरेकर,१ मुग्बाजी बेनमणा,१ माल सावंत,१ विठोजी लाड,१ इंद्रोजी गावडे,१ जावजी महानलाा,१ नागोजी प्रल्हाद,१ पिलाजी गोळे,१ मुधोजी सोनदेव,१ कृष्णाजी भास्कर,१ कलघोडे,१ हिरोनी मराठे,१ रामाजी मोरे,१ हिरोजी भालदार,१ तुकोजी कडू,१ राम दळवी,१ दत्ताजी इडि (तु) लकर,१ पिलाजी सणस,१ जावजी पाये,१ भिकजी दळवी,१ कोंडजी वडखले,१ त्रिंबकजी प्रभू,१ कोंडजी फरजंद,१ तानाजी तुदूसकर,१ तानसावंत मावळे,१ म हादजी फरजंद,१ येसजी दरेकर,१ बाळाजीराव दरेकर,१ सोन दळवे,१ चांगोजी कडू,१ कोंडाळकर,१ ढवळेकर,१ तानसावंत भोसले एकूण ३६'[६६] सरदार होते. 'आमात्यांच्या आज्ञापत्रांत चाळीस हजार पागा व साठसत्तर हजार शिलेदार, दोन लक्ष पदाती, कोठ्यावधी खजीना तसेच उत्तम जवाहीर, सकळ वस्तुजात संपादिले असे त्यांच्या सैन्याचे व त्याच्यजवळ असलेल्या संपत्तीचे वर्णन केले आहे.' [६७] वेगवेगळ्या समकालीन साधनातील माहितीचा विचार करता एवढ्या मोठ्या सेनेच्या सेनापतीपदावर हंबीरराव मोहिते होते. छत्रपती शिवरायाच्या मार्गदर्शनाखाली सर्व सैन्यांचे नेतृत्व करीत होते. घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन कदापिही नाही अशा प्रकारचे वर्तन शेवटपर्यंत होते. या सैन्याच्या साह्याने अनेक युद्ध मोहिमा आखल्या, योग्य प्रशासन केले सैनिकांच्या अडचणी सोडविल्या सैनिकांना प्रसंगी प्रोत्साहित केले. युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या कुटुंबाला भेट देऊन सर्वोतोपरी सहकार्य केले. अशा अनेक जबाबदाऱ्या चोखपणे निभावून दोन्ही छत्रपतीला मागे वळून पहाण्याची गरज कधीही पडली नाही.

## २) सैनिकांची शस्त्रास्त्रे

तत्कालीन काळात इतर सत्ताकडे जी हत्यारे होती, तीच परंतु अत्यंत प्रभावी, कार्यक्षम अशी शस्त्रास्त्रे शिवरायांनी आपल्या लष्कराला दिलेली होती. सेनापती हंबीरराव मोहितेंनी शस्त्रास्त्रासंबंधीची योग्य वेळी माहिती छत्रपतीकडे दिल्याबरोबर त्याची पूर्तता लवकर केली जात होती. यावेळी सैन्याकडे तलवार, कट्यार, जमदाडा, पट्टे, भाले, धनुष्यबाण, बिचवे, बंदुका, दगड फेकणारी यंत्रे, छोट्या-मोठ्या तोफा इत्यादी हत्यारे होती. पाश्चात्य सत्तांच्या तुलनेत मराठ्यांची शस्त्रास्त्रे ही पारंपरिक पद्धतीची असल्याचे लक्षात आल्यावर शिवरायांनी पार्तुगीज व फ्रेंचानकडून शस्त्र खरेदी केल्याचे अनेक उल्लेख कागदपत्रानमधून मिळतात. फ्रेंचाना राजापूरला वखार काढण्याची परवानगी देण्यामागे शिवरायांचा शस्त्रास्त्रे मिळवणे हाच उद्देश होता. '५ सप्टेंबर १६७० रोजीच्या पत्रातून मुंबईकर इंग्रज सुरतकरांना लिहितात, राजापुरकडील शस्त्रे शिवाजीने संपविली आहेत. आपणास त्यांना तूर्त ती पुरविणे शक्य वाटत नाही. परंतु त्यांची मागणी घेऊन ठेवावी'[६८] पितळी तोफांना भारतात शिवरायाशिवाय कोणी ग्राहक नाही असा उल्लेख इंग्रजी वखारीतील कागदपत्रात सापडतो. इंग्रज व्यापारी शिवरायांना चांगली शस्त्रास्त्रे देण्याचे टाळत होते. पुरंदर या ठिकाणी तोफा ओतन्याचा कारखाना काढलेला होता. एकंदरीत शिवरायांनी तत्कालीन काळात वापरली जात असलेली शस्त्रास्त्रे आपल्या सैन्याला दिलेली होती. या शस्त्रांस्त्रांच्या साह्याने सेनापती शत्रू सैन्यावर सहज विजय मिळवत असत.

## ३) लष्कराची वेशभूषा

तत्कालीन काळातील मोगल आदिलशहा, कुतूबशहा व परकिय पोर्तूगीज, इंग्रज या सत्ताच्या सैनिकांपेक्षा मराठा सैनिकांचा पोषाख अगदी वेगळ्या स्वरुपाचा होता. सेनापती हंबीररावांच्या सैन्यातील 'सैनिक डोक्याला बुरणुसाची टोपी, कानापर्यंत ओढलेला टोप, अंगात गोधडीचे कुडते, कधी नुसतीच घोंगडी ओढलेली, खाली विजार, किंवा गुडघ्यापर्यंत लपेटून घेतलेले वस्त्र (धोतर), कखरेला उपरणे त्यात शस्त्रे अडकवीलेली, ढाल पाठीस बाधलेली,

पायाताण समोरुन झाकलेले व मागून मोकळे इत्यादी शत्रुपक्षात बलाबलाचा विचार करुन शिवरायांनी आपले अल्पसैन्य हेकमीतकमी शस्त्रा सह आणि सामानासह युद्धमोहिमेवर राहील हे ठरविताना मुस्लीम सैन्यातील सैन्किावरील शस्त्रांचे ओझे किती त्रासदायक होते ही गोष्ट जाणली होती.'[६९] सैनिकानमध्ये चपळाई येण्यासाठी, वातावरणात सुट व्हावी या उद्देशाने वेशभुषा केलेली होती.

## ४) सैन्याची शिकवण

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात एकमेव हिंदवी स्वराज्य असे होती की, स्वराज्याचे सर्वेसर्वा छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या सैनिकांना नियमीत शिक्षण दिले त्यांच्यानंतर एकाही राज्यकर्त्यानी लष्कराच्या कार्यक्षमतेसाठी शिक्षण दिले नाही. शिवरायांनी सैनिकांची कार्यक्षमता, निपूणता वाढविल्याने प्रत्येक युद्ध मोहिमेत यशस्वी होता आले. सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यावर शिवरायांच्या लष्करी शिकवणीचा प्रभाव निर्माण झालेला होता. त्यांच्या मृत्युनंतरही सेनापतींनी आपल्या सैन्किांना योग्य मार्गदर्शन केल्यामुळे त्यांच्या आदेशाचे प्रचिती आलेली होती. म्हणूनच स्वराज्याचे दुसरे 'छत्रपती' म्हणून संभाजी राजे पुढे शिवरायांचे वारसदार झाले होते.

सैनिकांना घडविण्यासाठी शिवरायांनी केलेल्या प्रयत्नाबाबतची माहिती 'Foreign Biographies of shivaji' याग्रंथात डॉ.सेन [७०] म्हणतात, 'He had amang his troops many young men novices still in the profession whom he had collected from all sides. To accustom them (to their profession) he encamped for nearly three months in beare fields. Teaching them, how to handle horses and fight and trining them carefully in all the exercises of the military art" शिवरायांचे कर्तृत्व पाहून, ऐकून वेगवेगळ्या ठिकाणाहून अनेक नवतरुण सैन्यात दाखल झाले होते. अशा नव्या सैनिकांना घोड्यावर कसे बसावे, तलवार कशी चालवावी, युद्धाचे

डावपेच, लढाई कशी करावी या बाबतचे सर्व शिक्षण अत्यंत काळजीपूर्वक दिले होते. तोच वारसा सेनापती या नात्याने हंबीरराव मोहिते यांनी जोपासला होता. शिवरायांनी आपल्या सैनिकासाठी एक नियमावली तयार केली होती. लष्कर पावसाळीया दिवशी छावणीस आपले देशात यावे. त्यास दाणा रतीब औषधे, घोडियास (व) लोकांस घरे, गवताने शाकारुन ठेवविली असावी. दसरा होताच छावणीहून लष्कर कूच करुन जावे जातेसमयी कुल लष्करचे लहान थोर लोकांचे बिशादीचे जाबते करावे, आणि मुलुखगिरीस जावे आठ महिने बाहेर लष्करानी परमुलुखात पोट भरावे. खंडण्या घ्याव्या. लष्करात बायको व बटकी व कलावंतीण नसावी जो बाळगील त्याची गर्दन मारावी. पर मुलुखात पोर बायका न धरावी मर्दाना सापडला तरी धरावा. ब्राह्मणास उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागा ओळखियासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअदल न करावा आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाखमासी ारतोन छावणीस येताच आपले मुलखाचे सरदेस कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पुवील बिशादीचे जाबते रुजू घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करुन त्याच्या हक्कात धरावी. थोर किंमतीची वस्तु-भाव असलियास दिवाणात द्यावी. कोणी चोरुन ठेविल आणि दाखल सरदारास जाहलियाने शासकरावे. लष्कर छावणीस आलियावर हिशेब करुन सा ेनेरुपे, जडजवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारानी बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावे. तेथे अवघे हिशेब समजावून माल हुजूर द्यावा आणि लष्कराच्या लोकांचे हिशेब देणे, (व) फाजील समजावीस जो ऐवज जो मागणे तो हुजूर मागावा. मग छावणीस यावे. काम कष्ट मशागत केलिया लोकांस सरंजाम करुन द्यावा. बेकैद वर्तणूक कोणी केली असेल आणि नामदी केली असेल त्यांची चौकशी करुन बहुता मते शोध करुन, त्यास दूरकरुन शासन करावे. वरचेवर शोध करावा चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दुसऱ्यास जावे. राजियाच्या आज्ञेने ज्या प्रांती स्वारी जावयाची होईल त्या प्रांती जावे. अशी लष्कराची रीत '[७१] होती. याची प्रत्यक्ष अमलबजावणी काटेकोरपणे केली जात होती.

इ.स.१६७४ मध्ये सेनापतीपदी हंबीरराव मोहिते नियुक्त झाल्यानंतर चिपळूण येथे सर्व मराठा सैन्याचा तळ एक महिना होता. त्यावेळी शिवरायांनी आपल्या सैनिकांना एक पत्र पाठवून

रयतेला कोणताच त्रास होणार नाही या बाबतचे एक पत्र पाठविले आणि त्यांच्या आदर्श प्रशासनाचा नमुना पुढील पत्रावरुन आपणास लक्षात येतो.

श.१५९३ वैशाख शु.१५
सु.१०७४ सफर १२
इ.स. १६७३ मे १९

**श्री भवानीशंकर**

मशरुल अनाम राजश्री जुमलेदारांनी व हवालदारांनी वकारकुनानी दिमत पायगो मुक्काम मौजे हलवर्ण त।। चिपळून मामले दाभोळ प्रती राजश्री शिवाजीराजे सु।। अर्बा सैबन व अलफ कसबे चिपळूनी कटकाचा मुक्काम होता याकरिता दाभोळच्या सुबेरात पावसाळ्याकारणे पागेस सामा व दाणा व वरकड केला होता तो कित्येक खर्च होऊन गेला व चिपळून आसपास विलातीत लष्कराचीत सवीस व गवताची व वरकड हर एक बाब लागली. त्याकरिता हाल काही उरला नाही. ऐसे असता वैशाखाचे वीस दिवस, उन्हाळा, हेही पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरुर जाले त्याकरीता कारकुनाकडून व गडोगडी गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास, तुम्ही मनास ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोवरी धुंदी करुन चाराल, नाहीसे जाले म्हणजे काही पडत्या पावसात मिळणार नाही, उपास पडतील, घोडी मारायास लागतील म्हणजे घोडी तुम्हीच मारिली ऐसे होईल व विलातीस तसवीस देऊ लागाल ऐशास, लोक जातील, कोन्ही कुणब्याचे येथील दाणे आणील, कोन्ही भाकर, कोन्ही गवत, कोन्ही फाटे, कोणही भाजी, कोन्ही पाले ऐसे करु लागलेत म्हणजे जी कुणबी घर करुन जीवमात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील. कितेक उपाशी लागतील म्हणजे त्याला ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहूनही अधिक तुम्ही! ऐसा तळतळाट होईल! तेंव्हा रयतीची व घोडियांची सारी बदनामी तुम्हांवरी येईल हे तुम्ही बरे जाणून, सिपाही हो अगर पावखलक हो, गाव राहिले असाल त्याणी रयतेस काडीचा अजार द्यावया गरज नाही. साहेबी खजानातून वाटणिया पदरी घातलिया आहेती ज्याला जे पाहिजे दाणा हो अगर गुरेंढोरे वागवीत असाल त्यांस गवत हो, अगर फाटे भाजीपाले व वरकड विकावया

येईल ते, रास घ्यावे, बाजारास जावे, रास बिकत आणावे. कोन्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोन्हासी कलागती करावयाची गरज नाही व पागेस सामा केला आहे. तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीने दाणा रातीब कारकून देत जातील तेंणेप्रमाणे घेत जाणे, की उपास न पडता रोजबरोज खायाला सापडे आणि होत होत घोडी तवाना होत ऐसे करणे. नुसतीस कारकुनासी धसपस कराया, अगर अमकेच द्या तमकेच द्या ऐसे म्हणाया, धुंदी करुन खासदार कोठडीत + कोठारात शिरुन लुटाया गरज नाही व हाली उनाळ्याला आहे तैसे खलक पागेचे आहेत, खण धरुन राहिले असतील व राहातीलकोन्ही आगट्या करित ील कोन्ही भलतेच जागा चुली, रंधनाळा करितील कोन्ही तंबाकुला आगी घेतील, गवत पाडीले आहे ऐसे अगर वारे लागले आहे ऐसे मनास ना आणिता म्हणजे अविस्त्राच एखादा दगा होईल एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळोन जातील गवताच्या लहळ्यास कोणीकडून तरी विस्तो जाऊन पडला म्हणजे सारे गवत व लहळ्या आहेत तितक्या एके एक जळो जातील तेव्हा मग काही कुणबीयांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनास ताकीद करावी तैसी केली तऱ्ही काही खण कराया एक लाकूड मिळणार नाही, एक खण होणार नाही हे तो अवघियाला कळते. या करणे, बरि ताकिद करुन, खासे खासे असाल ते हमेशा फिरत जाऊन, रंधने करिता, आगत्या जाळीता, अगर रात्रीस दिवा घरात असेल, अविस्त्राच उंदीर वात नेईल, ते गोष्टी न हो आगीचा दगा न हो खण, गवत वाचेल ते कारणे म्हणजे पावसाळा घोडी वाचली, नाहीतर मग घोडी बांधावी नलगेत, खायास घालावे नलगे, पागाच बुडाली!!! तुम्ही निसुर जालेत!!! ऐसे होईल या कारणे तपशिले तुम्हास लिहिले असे जितके खासे खासे जुलमेवार, हवालदार, कारकून आहा तितके हा रोखा तपशिले ऐकणे आणि हुशार राहाणे, वरचेवरी रोजाचा रोज खबर घेऊन ताकीद करुन, येणे प्रमाणे वर्तणूक करिता ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास मराठीयाची तो इज्जत वाचणार न ाही, मग रोजगार कैसा? खळक समजो ज्यास्ती केल्या वेगळे सोडणार नाही हे बरे म्हणून वर्तणूक करणे छ १२ सफर[७२]

लष्कराला वरील नियमांची सक्त ताकीद पत्राद्वारे दिलेली होती. लष्कराने स्वराज्यातील जनतेशी

कसे वागावे याचेही शिक्षण शिवरायांनी दिलेले होते. या सर्व नियंमाचे पालन स्वतः सेनापती हंबीरराव मोहिते हे कशोसीने करत होते. त्यामुळे संपूर्ण लष्कर प्रत्यक मोहिमेत सरस ठरत होते.

## ५) हेरखाते

हेरखाते हे स्वराज्यातील लष्करी विभागाचा अतिशय महत्वाचा भाग होता. यामध्ये वेगवेगळ्या राज्यात नेमलेल्या राजदूतांचाही समावेश होता. हेरखात्या मार्फत शत्रुराष्ट्रांची इत्यंभूत माहिती मिळविणे व ती राजाला कळविणे यासाठी विश्वासू, कार्यक्षम लोकांचीच गरज होती. या खात्याच्या बळावर शिवरायांनी अनेक शत्रुराज्यातील श्रीमंत शहरे लुटली. गुप्तपणे ठेवलेली प्रचंड संपत्ती शोधून काढली हे सारे या खात्यातील कार्यक्षम व प्रामाणिक सहकार्यामुळे शक्य झाले. बहिर्जी नाईक हा या खात्याचा प्रमुख होता. हेरांची संख्या त्यांचा पगार या विषयीची माहिती मिळत नाही. सभासद म्हणतात 'पुढे जित की शहरे मोलाईत होती ते जागा चार पाच माणसे वेषधारी करुन पाळतीस ठेवली. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे दोघांनी तेथे हुशार रहावे मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरे मारावी ही तजवीज केली.'[७३] हेरांच्या मार्फत संपूर्ण माहिती मिळत होती. त्यामुळे शिवरायांना प्रत्येक लुटीमध्ये यश मिळत होते. सेनापती हंबीरराव मोहिते हेरखात्याच्या सतत संपर्कात रहात होते. हेरामुळे स्वारीचा योग्य मार्ग उपलब्ध होत होता. सैनिकाची योग्य तयारी करता येत होती त्यानुसार प्रत्येक मोहिम राबवली जात होती.

## ६) किल्ले प्रशासन

सेरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी जिंकलेल्या किल्याची व्यवस्था केली होती. किल्यावरील शिबंदीचे प्रशासन सेनापतीकडेच होते. यावरुन त्यांच्या कार्याची प्रचिती येते. बखरकारांनी स्वराज्यात सुमारे २८० किल्ले असल्याचे सांगितले आहे. प्रातांचे व्यवस्थित रक्षण करण्यासाठी किल्ले आपल्या ताब्यात रहाणे आवश्यक आहे हे ओळखून आपला शत्रू कितीही मोठा असला तरी त्यास न जुमानता किल्यांच्या आश्रयाने त्याच्याशी कित्येक महिने लढत रहाण्याचे सामर्थ्य येत असे किल्यावर सैनिकास लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तुचा साठा केला जात होता. शत्रुशी लढण्यासाठी

दारुगोळा ठेवून योग्य वेळी त्याचा उपयोग किल्यावरील अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार केला जात होता. हे अधिकारी सतत सेनापतींच्या संपर्कात रहात असत. प्रत्येक किल्यावर छत्रपतींच्या सल्याने सेनापतीकडून चांगला इतबारी, घरंदाज, कुलीन, मर्द व शहाणा असा मराठा पाहून त्यास हवालदार पदी नेमले जात होते. त्याच्या हाताखाली एक सरनोबत, एक किंवा अनेक तटसरनोबत असे अमलदार चांगले हुशार मराठे पाहून ठेवीत. या शिवाय आणखी एक सुभेदार, एक सबनीस, एक फडणीस व एक कारखाननीस असे हुद्देदार असत' हवालदार हा त्या किल्याचा प्रमुख असे किल्यावर ठेवलेल्या लष्कराचा बंदोबस्त त्यांच्याकडे असे तसेच किल्याच्या परिसरामध्ये वेगवेगळ्या जातीतील चौक्या ठेवल्या जात असत.

किल्यावर तोफखान्याची व्यवस्था सेनापतीच्या सल्याने केली जात होती. वेगवेगळ्या ठिकाणी तोफा लावून ठेवण्यासाठी योग्य कामगार नेमले जात असत. सैन्याबरोबर जाणाऱ्या तोफासाठी मोठमोठे गाडे तयार करुन घेतले जात होते. दारुगोळा वहान्यासाठी छकडे तयार ठेवले जात होते. गाडे व छकडे ओढन्यासाठी बैलांची व्यवस्था केली जात होती. सुतार लोहार, चांभार, रस्सीददार, तलफदार, गोलंदाज इत्यादी कामगारांचा भरणा केला जात होता. लष्कराबरोबर सुमारे दोनशे तोफा ठेवत असत. हे सर्व शिवरायांच्या तालमित तयार झाले होते. मात्र स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते हे शिल्पकार व पाईक होते.

## ७) युद्ध पद्धती

मराठ्यांच्या युद्ध पद्धती संबंधी रुढ झालेल्या समजुती लक्षात घेता मराठ्यांचे वा शिवरायांचे युद्धतंत्र हा एक 'वदतो व्याघ्रात' वाटण्याचा संभव आहे. कारण 'गणिमी कावा' या ढोबळ शब्दात आपण मराठ्यांच्या युद्ध पद्धतीचा उल्लेख करतो. लपून छपून शत्रूवर हल्लेकरणे म्हणजे गणिमा कावा म्हणजेच शिवरायांनी केलेल्या कार्याचा अभिमान आपण बाळगतो मात्र त्यांची अभिनव युद्धाची पद्धती होती का याचा विचार देखिल करीत नाही. शत्रुंनी मराठ्यांच्या युद्धपद्धतीस 'गणिमा कावा' हे नाव दिले आधुनिक युद्धशास्त्राप्रमाणे या पद्धतीला Strategic planning against

the enemys plans असे म्हणतात. शत्रूवर अचानक चालून जाणे, वीज पडल्यासारखा हल्ला करुन शत्रुला संभ्रमात टाकणे, त्याची दिशाभूल करणे या गोष्टी मराठ्यांच्या युद्धतंत्रात अंगवळणी पडल्या होत्या वेगवेगळ्या दिशांनी एकाच मोहिमेसाठी वेगवेगळी पथके पाठवत असत. कर्नाटक मोहिमेच्या वेळी शिवरायांनी सेनापती हंबीरराव मोहित्यांना तोळ प्रांतात तुंगभद्रा नदीच्या काठाकाठाने कुतुबशाही प्रदेशात शिरण्याची आज्ञा दिली हे त्यांचे एक उदाहरण होय.

## ८) 'गणिमी कावा' युद्धतंत्राची रुपरेषा

भारताच्या इतिहासात 'गणिमीकावा' युद्धतंत्र हे अहमदनगरच्या निजामशाहीतील मलीक अंबरने उदयास आले. हेच युद्धतंत्र छत्रपती शिवरायांनी स्वराज्याची उभारणी व संरक्षण करण्यासाठी उपयोगात आणले होते. त्याची माहिती-

१) शत्रुचे सैन्य लढाईसाठी सज्ज आहे या सैन्याचे संख्याबळ आपल्या संख्याबळापेक्षा कितीतरी अधिक आहे. युद्धसामग्रीच्या बाबतीत शत्रु वरचढ आहे. तरीही शत्रुशी झूंज द्यावयाची आहे. अशा परिस्थितीत मर्यादित सैन्य व साधनबळ यांच्या बळावर लढाई यशस्वीरित्या कसी करायची हे साध्य करण्यासाठी 'गणिमा काव्या' चे युद्धतंत्र अवलंबिले.

२) शत्रुच्या सैन्यात अनपेक्षितपणे घोडदळाने मुंसडी मारुन फूट पडताच लगेच माघार घ्यावयाची अशा फुटीमुळे शत्रु सैन्यात गोंधळ निर्माण झाल्यावर हल्ला करायचा.

३) रणांगनातून शत्रूसैन्य माघार घेताच त्याच्यावर हल्ला करुन त्याच्याकडील सर्व साधने हस्तगत करणे.

४) अशा काव्यामुळे शत्रुचे संख्याबळ संख्येने अधिक असूनही शेवटी ते पराभूत होत होते.

शिवरायांनी महाराष्ट्राच्या सह्याद्रीचा अभ्यास करुन स्वराज्य निर्मितीच्या कार्यासाठी 'गणिमा कावा' युद्धतंत्राचा उपयोग करुन मुस्लीम सत्तेच्या अमलाखाली जीवन जगणाऱ्या मराठ्यांना आर्थिक, राजकीय, सामाजिक गुलामगिरीतून मुक्त केले. या कार्यात देशमुख, पाटील, जहागिरदार

ते सर्व समान्य मानसांना एकत्र केले. चारित्र्य संपन्नतेतून समाजासमोर एक नवा आदर्श निर्माण करुन माणसे मिळविली, वाढविली व ववीन निर्माण केली. यामुळे या भूमीवर रहाणारा प्रत्येक व्यक्ती हा शिवरायांचा सैनिक बनला. मोगल, आदिलशाही विरुद्ध लढण्यासाठी गणिमी काव्याचा त्यांनी उपयोग केला होता. त्यांचा वारसा सेनापती हंबीरराव मोहिते यांनी चालवला. त्यांनाही हे युद्धतंत्र अवगत होते. अनेक युद्ध मोहिमामध्ये या युद्धतंत्राच्या उपयोग करुन स्वराज्याचे रक्षण व संवर्धन त्यांनी केले.

शिवरायांची स्वारी निघाली म्हणजे सर्वप्रथम जरीपटका व भगवे निशान यांचे दोन हत्ती चालत. त्यांच्या मागून मुख्य प्रधान व सेनापती यांचे जरीपटक्याचे दोन हत्ती चालत त्यांच्या मागून लष्करातील एकंदर निशाणे चालत आणि त्याच्या बरोबर पागेचे व शिलेदारांचे सरदार आपल्या काही लोकांसह बिनीच्या रक्षणार्थ घोड्यावर बसून चालत. त्यांच्या मागून तोफखाना व दारुगोळ्याचे छकडे व गाड्या चालत. त्यांच्या मागून शुर सरदार घोड्यावर व हत्तीवर बसून चालत. त्यांच्या मागून पायदळ लष्करातील पट्टेकरी, विटेकरी, सांगबर्चीवाले, तीरकमानवाले, खास बारदार व बंदुकावाले रांगारांगानी चालत. त्यांच्या मागून ताशे, मार्फे, हलग्या, शिंगे, करणे इत्यादी रणवाघे चालत. त्यांच्या मागून कोतवाल-हत्ती व बाणांच्या कैच्या उंटावरुन चालत. त्यांच्या मागून खासे घोडे व कोतवाल-घोडे चालत. त्यांच्या मागून शाहाबाजे, काळूसनया वगैरे मंगलवाद्ये व घोड्यांवरील नगारे चालत. त्यांच्या मागून भाट व बंदीजन चालत. त्यांच्या मागून लग्या, निशाणे, जरित्वतोमर, भाल व बोथाट्या घेतलेले लोक, बाणदार, चोपदार, भालदार व वेत्रधारी हे चालत. त्यांच्या मागून जेठी, मल्ल वगैरे पायांनी चालत. इतके लोक पुढे चालत व त्यांच्या मागून महाराज हत्तीवर अंबारीत बसून निघत व त्यांच्या सभोवताली हुजरे व विश्वासू मावळे व त्यांचे सरदार चालत.

## ९)  शिवराज्याभिषेकानंतरच्या सेनापतींच्या स्वाऱ्या

शिवरायांनी स्वतःला राज्याभिषेक करुन घेतला आणि ते स्वतंत्र अशा स्वराज्याचे 'छत्रपती' झाले ही घटना भारताच्या इतिहासात मराठी लोकांसाठी नव संजीवणी देणारी ठरली. भारतात भारतीयांचे 'हिंदवी स्वराज्य' निर्माण झाले. मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनात 'हिंदवी स्वराज्य' हा शब्द अनेक वेळा वापरला गेलेला आहे. या ऐतिहासिक घटनेपूर्वी शिवरायांनी अनेक प्रदेश जिंकून घेतले असले तरी इ.स.१७७४ पर्यंत तांत्रिक दृष्टीने ते मोगलांच्या प्रजाजनापैकी होते. मोगलांच्या दरबारात अनेक मराठा सरदार, विजापूरचा आदिलशहा, शिवरायांना आपल्यापेक्षा कमी लेखत होते. स्वकर्तृत्वाने जे स्थान निर्माण केले त्याला कायदेशीर व राजकीय स्वरुप देणे आवश्यक होते.

शिवराज्याभिषेकानंतर थोडाही वेळ न लावता शिवरायांनी सैन्यांच्या हालचाली करण्यासाठी सेनापती हंबीरराव व इतर अष्टप्रधान मंडळातील सदस्यांची बैठक घेतली असावी. धार्मिक विधी चालू असताना शिवरायांच्या डोक्यात शत्रुं पासून स्वराज्याच्या सरंक्षणाबाबतचे विचार आले असने संभवनीय आहे. मोगल व आदिलशहा या राजकीय सत्तांशी कोणतेही तह केलेले नव्हते. मोगलांचा दक्षिण प्रदेशाचा सुभेदार दिलेरखान हा दिल्लीकडे गेला होता. त्या ठिकाणी आलेला बहादुरखान कोकलताश पेडगाव येथे छावणी करुन होता. 'शिवरायांनी एक जरबेचा निरोप सुरतेच्या मोगल सुभेदाराला याच वेळी म्हणजे जुलै १७७४ सुरुवातीला पाठविला की, गेल्या तीन वर्षाची खंडणी एकून नऊ लाख रुपये ताबडतोब आमच्याकडे भरा ! नाहीतर पावसाळ्यानंतर पाहुन घेऊ !'[७५] असा खरमरीत निरोप 'छत्रपती' या नात्याने भातातील सर्वात बलशाली असलेल्या मोगलांना पाठवून याच महिन्यात सेनापतीच्या नेतृत्वाखाली लष्करी हालचाली सुरु केल्या.

## १)  बहादुरगडाची मोहिम

मोगलांचा सुभेदार बहादुरखान कोकलताश याने पुण्याच्या पूर्वेला २४ कोसावर पेडगाव वसवून त्या ठिकाणी एक मोठा किल्ला बांधून त्यास 'बहादूरगड' असे नाव दिले. तेथे लष्करी कुमक ठेवून मराठे रायगडावर राज्याभिषेक समारंभामध्ये गुंतले आहेत असे समजून बेफिकीर तो

अवस्थेत होता. सेनापती हंबीरराव मोहितेनी 'आपल्या सैन्याचे दोन भा केले. एका भागाने हूल दाखवून बहादूरखानाला छावणीपासून २० कोस दूर नेले. मागे दुसऱ्या सैन्याने येऊन त्यांचे तंबू वगैरे जाळून टाकले व बादशहाकरीता त्याने जमविलेले दोनशे जातीवंत घोडे व एक कोटी खजिना लुटला' इ.स. १६७४ जुलै[७६] या मोहिमेच्या वेळी एकून मराठा सैन्यांची संख्या मोगलांच्या तुलनेत कमीच होती. या विषयी 'सुरतकर इंग्रज मुंबईकरांना ५ ऑगस्ट १६७४ रोजी लिहीतात की, औरंगाबादेहून अशी बातमी आली आहे की, शिवाजीने बहादुरखानाच्या छावनीवर हल्ला करुन लुटमार केली. बादशहा करीता जमविलेले जातीवंत २०० घोडे व सुमारे एक कोटीचा खजिना लुटून त्याचे सर्व तंबू त्याने जाळून टाकले. शिवाजीच्या २००० घोडेस्वारांनी बहादुरखान व त्याचे सैन्य यास हूल दाखवून २०-३० कोस दूर नेल्यावर इकडे मागे ७००० घोडेस्वारांनी हा पराक्रम केला अशी बोलवा आहे.'[७७] बहादूरगडाच्या मोहिमेबाबत वेगवेगळे लिहीले असले तरी सेनापती हंबीररावांनी धनाजी जाधव, संताजी व बर्हिजी घोरपडे, नागोजी जेधे या तरुण योध्यासह ९००० ची कडवी फौज घेतली आणि सरळ बहादुरगडाचा रस्ता धरला. पेडगावच्या जवळच हंबीररावांनी सैन्य थांबवले. त्यातील २००० सैन्य बाजूला ले व त्यांनाडावर स्वारी केल्याचे दाखवून बहादूरखानाला हुलकावन्या देण्याचे आदेश दिले.

मराठा सैन्य चालून येत असल्याची बातमी बहादुरगडावर बहादूरखानाच्या कानी पडताच त्याने आपल्या मोल सैन्याला सतर्कतेचे आदेश दिले. किल्यावर थोडेसे सैन्य ठेवून मराठा सैन्यांचा मुकाबला करण्यासाठी किल्ल्याच्या बाहेर येताच मराठा सैन्य पाठीमागे वळले. त्याचा पाठलाग करण्यासाठी बहादूरखान सैन्यासह निघाला. इकडे हंबीररावांनी ७००० सैन्यांनी गडावर स्वारी केली. मराठा सैन्याने गडावरील सैन्याचा पराभव करुन संपूर्ण लष्करी रसद लुटली आणि सरळ परतीचा रायगडाचा मार्ग त्यांनी धरला. बहादुरखान विजयाच्या उन्मादात परत फिरला. पेडगावला येवून पहातो तर त्याचे सर्वस्व लुटले गेले होते. तेथे काहीही शिल्लक राहीले नव्हते. यावेळी हंबीररावांना एक कोटी रुपयाची लूट मिळाली. तसेच २०० जातीवंत युद्धकुशल घोडे मिळाले.

बहादूर गडाच्या यशस्वी मोहमेमुळे राज्याभिषेकासाठी केलेला खर्च जवळपास भरुन निघाला. हंबीररावांच्या सैन्याला सुंदर २०० घोडे मिळाले. लष्करी साहित्य मिळाले.

## २) मोगलांचे प्रदेश लुटले

यावेळी छत्रपती शिवराय रायगडावरच होते. बहादुरगडाच्या मोहिमेचा सर्व तपशील हंबीररावांनी सांगितला. सेनापती या नात्याने हंबीररावांनी अष्टप्रधान मंडळातील मोरोपंत पेशवे यांना निरोप पाठवून सैन्य सतर्क ठेवण्यास सांगितले. काही सूचनाही केल्या. ऑगस्ट १६७४ पासून मोरोपंत कल्याण-भिवंडी जवळ सैन्य जमवू लागले. त्यांनी वसईच्या पोर्तूगीजांकडे चौथाईची मागणी केली. ऑक्टोबर मध्ये मराठा सैन्याच्या हालचाली सगळीकडे सुरू झाल्या. मोरोपंताच्या नेतृत्वाखाली ८००० ते १०००० सैन्य देऊन कोकणातून थेट रामनगरपर्यंत गेले. पण तिकडील किल्यावर शिबंदी व रसद पोचविण्याचे काम त्यांच्यावर सोपविले असल्याने सुरतेकडे न वळता ते औरंगाबादकडे गेले होते. स्वतः हंबीररावांनी आणखी सैन्य घेऊन बहादूरखानाच्या पेडगावच्या छावणीजवळून निघून गेले मराठा सैन्याला पायबंद घालावा म्हणून बहादूरखानाने त्यांच्याशी प्रतिकार न करता निदान लष्करी साहित्य, धान्य वाचवावे यासाठी मोगल सैनीकांना आदेश दिले. पण हंबीररावांच्या सैन्याने मोगली प्रदेशात लूट मिळविली. मोगल सेनापती कुतूबखानाचा मराठा सैन्यांने पराभवकेला. या फौजा बऱ्हाणपूरपर्यंत गेलेल्या होत्या. या संदर्भात मुंबईकर इंग्रजी सुरतकरांना १४ ऑक्टोबर १६७४ रोजी पत्र लिहीतात, 'शिवाजीचे (हंबीररावांच्या नेतृत्वाखालील) सैन्य कल्याण-भिवंडीला आले ते बहादूखानाच्या सैन्याच्या समोरील टेकडीवर (जुन्नरगड) गेले. शिवाजी खूद्द पालीला असून अविलंबाने सैन्यासमवेत तेथे जाईल असे म्हणतात टिकाव, कुदळ, तोमरे इत्यादी लुटीच्या उपयोगाची हत्यारे त्याने बरोबर घेतली आहेत त्यांचे उद्दीष्ट ठिकाण काही समजत नाही.'[७८]

१ जानेवारी १६७५ रोजी मराठा सैन्याने वाटेतील धरणगाव नावाचे व्यापारी ब्रिटीश ठिकाण लूटले. यावेळी ३० ते ४० कापडाची ठाणे आणि १०००० रुपयांची लूट मिळाली. इंग्रजानी

हंबीररावांना इंग्रज-मराठा तहाची आठवण करुन दिली. पण त्याकडे त्यांनी दूर्लक्ष केले. तेथील ब्रिटीश अधिकारी सूरतला पळून गेले. ही सर्व लूट घेऊन हंबीरराव रायगडावर गेले. याचा सर्व तपशील छत्रपतींना सांतिला. ५ जानेवारी १६७५ रोजी सुरतकर इंग्रज आपल्या कंपनीच्या अधिकाऱ्यांना पत्र लिहीतात, '१२ ऑक्टोबर पासून पुष्कळ दिवस पर्यंत शिवाजीचे भय वाटत होते. परंतु रामनगरच्या अरण्यातील भिल्लांनी त्याला अडविल्यामुळे त्यांचे सैन्य औरंगाबादकडे वळले व तेथे आसपास त्यांने लूट केली. तिकडे मोगलांचा सेनापती कुतूबखान याच्याशी त्यांची गाठ पडली... कुतूबखानाचा त्यांनी पार धुव्वा उडवून ३०० च्या वर शिपाई कापून काढले. आदिलशाही मुलूखात त्यांच्या स्वाऱ्या चालूच असल्यामुळे कारवार व हुबळी या शहरांना फार उपद्रव झाला.'[७९] हंबीररावांच्या मोगलाच्या प्रदेशातील मोहिमे बाबत, 'Senaputtee, who ascended one of the passes near surat, divided his horse into several bodies, plundered the country to burhanpoor and from thence to mahor.'[८०] या मोलाई प्रदेशात शिवरायांच्या बरोबर हंबीररावांनी प्रचंड खंडणी आणि मालमत्ता जमा केलेली होती. या मोहिमेबाबत कृष्णाजी अनंत सभासद[८१] म्हणता, 'नंतर पूढे दिल्लीहून बहादूरखान देखिल हरोल दिलेरखान हे फौजेनिशी अहमदनगरास येऊन राहीले हे वर्तमान राजियास कळलीयावर राजीयानी गड कोट किल्ले यास खबर केली आणि मजबुतीने राहीले, मग जासूद पत्रे नबाब बहादूरखान यांजकडे गुप्तरुपे पाठविली. 'हरद्र सोधावे, पुढे तजवीज करणे ती करावी, असे केले आणि राजियांनी आपले लष्करास हुकूम करुन, हंबीरराव सरनौबत फौज घेऊन मोगलाईत शिरले. खानदेश, बागलान, गुजराथ, अमदाबाद, बुऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर वरकड देश नर्मदा पावेतो, देखील जालनापूर या देशात स्वारी करुन चालीले तो बहादूरखान यांनी कूल जामव घेऊन हंबीररायांचे पाठीवर चालून आले. राजीयाची फौज तोलदारगाठली. मोगल बहूत धास्तीने घाबिरा होवून सात आठगावचे अंतराने चालिला. दिलेरखान उ तावळा होऊन फौजेशीगाठ घातली. हंबीरराव यांनी दिलेरखान नजरेत धरिला नाही. तोलदारीने मत्ता घेऊन आपले देशास आले मालमत्ता राजियास दिली.'

डॉ.शिवदे सदाशिव[८२] यांनी आपल्या 'सेनापती हंबीरराव मोहिते'ग्रंथात अमात्याच्या आज्ञापत्रातील वर्णनाचा आधार घेतात 'अनुपदे औरंगाबाद, बुऱ्हाणपूर म्हणजे या दक्षिण प्रांती यवनेशांचे मुख्य गुल्म त्यावर चालून गेले असता अपरिमीत यवनी सेना समरोन्मुख जाहली. तुंबळ युद्धप्रसंग प्राप्त जाहले. यवनानी जिविताशा सोडून अतिशयित पराक्रम दर्शविला. तथापि त्यांचा नाश व स्वामींचा विजय प्रभाव बालवृद्धीष्व्हावा हे श्री दच्छा बलवंत तदनुसार स्वाम ीच्या प्रतापानुळे अशेष यावनी सेना शलभन्याये गच्छिद्होऊन पराजय पावली. कित्येक सैनीक यमसदनास गेले, कित्येक परांगमूख जाहले, कित्येक हस्तवश केले. अश्वगजाती तद्संबंधी संपूर्ण संपदा हातास लागली. औरंगाबाद, बुऱ्हाणपुरादी संपूर्ण या प्रांताची स्थळे हस्तगत, येऊन स्वामींचे विजयध्वजे सुशोभित जाहाली...'

फेब्रुवारी १६७५ मध्ये मोगलांच्या सैन्यांनी कोकणातील पुन्हा कल्याण शहराचा काही भाग जाळून टकला. स्वराज्याचे नुकसान झाले. हंबीररावानी ससैन्यकल्याणला जावून तो प्रदेश हस्तगत केलेला होता. हे वाईट कृत्य बहादूरखानाने केलेले होते. कारण पेडगावच्या छावणीच्या लुटीचा राग त्याच्या मनामध्ये होता. तो अधुनमधून त्रासण्वोसाठी प्रयत्न करीत होता म्हणून छत्रपती शिवरायांनी बहादूरखाना बरोबर तहाच्या वाटाघाटी सुरू केल्या. स्वराज्यातील १७ किल्ले मोगलांना देण्याचे कबूल केले. युवराज संभाजी राजांना सहा हजाराची मनसब मिळवून द्यावी. अशा अटी बहादूरखानाने मोगल बादशहा औरंगजेबाकडे लिहून कळविल्या बहादूरखानाने स्वराज्याच्या संदर्भात आपले विचार बदलून चल े आणि सम्राट औरंगजेबाने तहास मान्यता दिली.

## ३) विजापूरच्या आदिलशाहीशी संघर्ष

शिवराज्याभिषेक सोहळा संपन्न झाल्याबरोबर 'छत्रपती' या नात्याने शिवरायाची मोगल व आदिलशाही प्रदेश जिंकून घ्यावे, स्वराज्याचा विस्तार व सरंक्षण करावे यासाठी आपल्या सैन्याच्या हालचाली सुरू केल्या. सेनापती हंबीररावांनी अष्टप्रधान मंडळातील इतर सोबत्यांच्या नेतृत्वाखाली

सैन्य देवून वेगवेगळ्या प्रदेशातील सिमेलगतचे प्रदेश जिंकावे व भरपूर पैसा गोळा व्हावा यासाठी छत्रपतीच्या मार्गदर्शनाखाली लष्करी मूत्सद्याशी चर्चाही केल्या. काही सैन्य मोगलांच्या प्रदेशावर धाडी घालण्यासाठी रवाना केले. स्वतः मोगली प्रदेशही लूटले.

यावेळी विजापूरच्या आदिलशाही राज्यातील परिस्थिती त्या दृष्टीने अनुकूल होती. कोल्हापूर, बालाघाट आणि कारवार इत्यादी प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली यावेत, तेथील प्रदेशावर आदिलशहाचे वर्चस्व कमी व्हावे म्हणून गोव्याजवळील फोंडा हे ठिकाण जिंकून घेण्यासाठी सैन्याच्या हलचाली सुरु झाल्या. सेनापतींनीकोल्हापूरच्या प्रदेशात मराठा सैन्य पसरविले. स्वराज्यास सिमेवरील सैन्याला सतर्कतेचे आदे श दिले. फोंड्याच्या मोहिमेत छत्रपती शिवाजी राजेही होते.

फोंड्याच्या सुभेदाराने शिवाजीच्या सरहद्दीतील एका व्यापाऱ्यास धरुन नेले तेव्हा कुडाळच्या सुभेदाराने फोंड्याच्या सुभेदाराचे पारिपत्य करण्याचा प्रयत्न केला. (१६७४ ऑगस्ट) पण त्यात यश आले नव्हते.'[८३] सेनापतींनी या मोहिमेची जबाबदारीकुडाळचा सुभेदार अण्णाजी दत्तोकडे सोपविली होती, परंतु अण्णाजीला या मोहिमेत यश आलेले नव्हते. शेवटी छत्रपतीनी हंबीररावाशी चर्चाकरुन स्वतःवर जबाबदारी घेऊन शिवाजी राजे फेब्रुवारी -मार्च १६७५ मध्ये फोंड्याच्या मोहिमेवर निघाले.

विजापूरकडून फोंड्याला मदत येऊ नये म्हणून अण्णाजी दत्तोच्या नेतृत्वाखाली सैन्य देवून कोल्हापूरच्या परिसरात पाठविले. यावेळी सैन्याने कोल्हापूर, सोनगाव इत्यादी ठिकानाहून खंडण्या वसूल केल्या.

शिवाजी राजे फोंड्याच्या मोहिमेवर असताना राजापूर येथे मार्च १६७५ मध्ये ब्रिटीश वखारीचा अधिकारी 'जॉन चाईल्ड' यांने भेट घेतली भेटी संदर्भातील वर्णन इग्लीग रेकॉर्ड मध्ये केलेले आहे. "त्याच्याबरोबर (शिवाजी) १५ हजार स्वार, १४ हजार पायदळ आणि ३ हजार कामगार वगैरे आहे. कामगाराच्यापाशी कुऱ्हाडी, कुदळी, फावडे, इत्यादी आहेत. त्याने कोल्हापूर

घेतले आहे आणि बातमी अशी की तो लवकरच रायबाग घेणार आहे."[८४] राजापूरहून शिवाजी रोज समुद्रमार्गाने वेंगर्ल्याकडून सैन्य आून फोंडा किल्ल्यास वेढा दिला. फोंड्याचा किल्लेदार मुहमदखान याला गोवेकर पोर्तूगीजांची गुप्तपणे मदत मिळत होती. मात्र राजांच्या भितीमुळे आणि येणारी रसद पकडल्याने ते गप्प बसले आणि शिवाजी राजे फोंडा किल्ला घेण्यासाठी प्रयत्न करु लागले. किल्ल्याला एकूण चार सुरंग लावले होते, पण त्याचा उपयोग झाला नाही. वेढा उठविण्यासाठी बहलोलखान येत होता, पण महाराजांनी त्याला लाच देवून वाटेतच थांबविले. १२-१३ दिवसानंतर १७ एप्रिल १८७५ रोजी फोंडाकिल्ला स्वराज्याला मिळाला. लवकरच मराठा सैन्यांने कारवार, शिवेश्वर व अंकोले ही जिंकूण घेण्यात यश मिळविले.

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी छत्रपती शिवाजी राजांशी सल्लामसलत स्वराज्याच्या समुद्र किनाऱ्यावर सिद्दच्या जिंजीवर मराठा सैन्य डिसेबर १६७५ मध्ये रवाना केलेले होते. या सैन्यानीकिल्ल्याच्या तटावर तोफांचा मारा सुरू केल्यावर सिद्दी संबूलने समूद्रातून आपल्या तोफांनी मारा केल्याने मराठा सैन्यांचे सर्व प्रयत्न वाया गेल्याने जंजिऱ्याचा वेढा उठवावा लागला. नंतर मार्च १६७६ मध्ये मराठा सैन्याने जंजिरा घेण्यासाठी प्रयत्न केलेले होते, पण तेही प्रयत्न वाया गेले. मे १६७६ मध्ये छत्रपतींनी सेनापती हंबीरराव मोहिते, मोरोपंत पेशवे व इतर मुत्सद्यांना पन्हाळगडावर बोलावून कर्नाटकातील बेळगाव स्वराज्यात आनण्यासाठी सल्लामसलत केलेली होती. यावेळी बेळगावचा विजापूरी किल्लेदार अनुखान याच्याशी लाच देवून किल्ला मिळवण्यासाठी गुप्त वाटाघाटी केल्या. ४० हजार होनांच्या मोबदल्यात किल्ला देण्याचे अनुखानने मान्य केले. 'पण आयत्या वेळी खानाने दगा दिला व मराठ्यांचे सैन्य किल्यात शिरत असताना त्याच्यावर जबर माराकेला. पाचशे मराठे ठार झाले. जुन १७७६ मध्ये मराठ्यांना माघार घ्यावी लागली.'[८५]

मध्यंतरीच्या काळामध्ये स्वराज्याच्या शत्रू सत्तानमध्ये अंतर्गत बंडाळी सुरु झाली. विजापूरच्या दरबारात परकिय पठाण व दक्षिण मुस्लीम यांच्यात व ाद निर्माण झालेला होता. त्यामध्ये बहलोलखान पठानाचे वर्चस्व निर्माण झाले. तेथील दुहीचा फायदा घ्यासाठी मोगल

सरदार बहादुरखान २१ मार्च १६७६ रोजी विजापूर राज्यावर चालून गेलेला होता. पण त्याचा तेथे पराभव झाला. तेथील पराभवास बहादुरखानास जबाबदार धरुन मोगल सम्राट औरंगजेबाने त्याला परत बोलावून त्याच्या जागी दिलेरखान याची पुन्हा नेमणूक केली दिलेरखानाबरोबर बादशहा ने नेताजी पालकर ऊर्फ मंहमद कुलीखान यासही दक्षिणेस शिवाजी महाराजांना जिंकण्यासाठी पाठविले. नेताजीने बादशहाची मर्जी संपादन केली होती. दक्षिणेत येताच नेताजीने शिवाजी महाराजावर चाल केली. आणि एक दिवस मोगल छावणीतून निघून त्याने महाराजांची गाठ घेतली. बादशहास वाटले होते, नेताजी हा पक्का मुसलमान झाला आहे. हिंदू त्यालाकधीही परत हिंदू धर्मात घेणार नाहीत, याची त्यला खात्री होती, पण झाले भलतेच महाराजांनी स्वतः त्याचे शुद्धीकरण करुन त्यास, परत हिंदू धर्मात १९ जून १६७६ रोजी घेतले.'[८६] नेजाती स्वराज्यात परत आल्याची वार्ता सर्वत्र पसरली. सेनापती हंबीररावांना फार मोठा आनंद झाला. रायगडावर दोघांची भेट झालेली असावी.कारण स्वराज्याच्या सिमेवरील सत्तानवर मोहिमा काढून बराचसा प्रदेश मिळालेला होता. त्या प्रदेशावरयोग्यव्यक्तींच्या नेमणूका करावयाच्या होत या. मोहिमेतून मिळालेल्या लुटीचा तपशील छत्रपतींना द्यावयाचा होता. परराज्य संबंधावर चर्चा करावयाची होती. पुढील मोहिमांच्या संदर्भात चर्चा करणे महत्वाचे असल्याने सेनापती रायगडावरच असायला पाहिजे. नेताजी पालकरांना भेटण्यासाठी त्यांच्या सोबत सेवेत असलेले असंख्य सेनाधिकारी भेटत होते. मात्र या घटनेचा सर्वात जास्त आनंद हंबीररावांना झाला. हंबीररावांच्या लष्करी कारकिर्दीला खरी सुरुवात सेनापती असलेल्या नेताजी पालकरांच्या काळापासून झालेली होती. त्यांच्या काळात ते सैनिक म्हणून रुजू झालेले होते. नेताजींच्या प्रत्येक गूण कर्तृत्वाचा प्रभाव हंबीररावावर पडलेला होता. तोच वारसा सेनापती या नात्याने हंबीरराव जोपासत होते. सैन्यातील कोणीही भरती करण्यापासून ते सेवेतून निवृत्त होईपर्यंत एक कुटुंब प्रमुख म्हणून त्याची सर्वस्वी जबाबदारी घेत होते. त्यामुळे प्रत्येक मराठा सैनिकाला हंबीरराव 'माझे' सेनापती असेच वाटत होते. हे सर्वगुण नेताजी पालकरानकडून त्यांनी घेतले होते. आता त्यांचा जिवलग, पाठीराखा, सेनानायक, लढवय्या, धुरंधर योद्धा मिळाल्याने त्यांचा आनंद द्विगुणीत झालेला असावा. नेताजी पालकरांनाही

माझा शिष्य स्वराज्याचा सेनापती झाला हा केवढा आनंद झाला असावा याची साक्ष इतिहासच असेल.

## १०) सारांश

सेनापती हंबीररावांचे मूळ नाव हंसाजी असे असून त्यांचा जन्म इ.स.१६३१ मधील असावा. यांचे बालपण हे सुप्याच्या गढीत गेलेले असून त्यांना योग्य असे लष्करी व संस्कारीक शिक्षण मिळाले होते. छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यात सैनीक म्हणून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केलेली होती. नेताजी पालकर यांच्या कार्यकाळात ते सेवेत रुजू झालेले असावेत. छत्रपती शिवरायांचा त्यांना जवळून सहवास लाभल्यामुळे त्यांच्या विचाराचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. सेनापती प्रतापराव गुजर यांच्या मृत्यूनंतर बहेलोलखानाला पराभूत करुन आदिलशाही सैन्याला विजापूरपर्यंत त्यांनी पिटाळून लावले होते. त्यामुळे छत्रपती शिवरायांनी त्यांची 'सेनापती' या पदावर नियुक्ती केलेली होती. आणि स्वतंत्र हिंदवी स्वराज्याचे ते सेनापती बनले होते. राज्याभिषेकाच्या प्रसंगी सेनापतींना वस्त्रे, भूषणे देऊन गौरविण्यात आले होते. रायगडावरील मिरवणूकीमध्ये माहुताची भूमिका त्यांनी पार पाडली होती. त्यांच्या जीवनातील अतिउच्च आनंदाचा हा क्षण होता.

सेनापती पदावर आलेल्या हंबीररावांनी सैन्याची संख्या वाढवून त्यांना योग्य ते शिक्षण दिले होते. युद्धपद्धतीचे धडे देऊन छत्रपतींच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन त्यांनी केलेले होते. शिवराज्याभिषेकाचा झालेला खर्च भरुन काढण्यासाठी त्यांनी मोगल व आदिलशाही प्रदेश लुटले होते. याच्याच बळावर छत्रपतींना कर्नाटक सारखी मोहिम पुढील काळात काढणे शक्य झाले होते. या सर्वकार्यात सेनापती हंबीररावांनी स्वतःला वाहून घेतले होते. छत्रपतींनी हंबीररावांची सेनापतीपदी निवड ज्या गुणांची पारख करुन केलेली होती त्यामध्ये पात्र असल्याचे हंबीररावांनी लवकरच दाखवून दिले होते.

**संदर्भ ग्रंथ :**


१) गर्गे स.मा. (संपा)- मराठी रियासन, खंड २, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८९, पृ.१३६.

२) बेन्द्रे वा.सी. - मालोजीराजे आणि शहाजी महाराज यांची चरित्रे, मुंबई, दादर, १९६९, पृ.२४२.

३) बेंद्रे वा.सी. - पूर्वोक्त, पृ.३७९.

४) बेंद्रे वा.सी. - पूर्वोक्त, पृ.२७१.

५) वाकसकर वि.स.(संपा) - श्री शिवछत्रपतींची ९१कलमी बखर, पुणे व्हीनस प्रकाशन, १९६२, नोव्हेंबर, पृ.१६.

६) हेरवाडकर र.वि.(संपा) - श्री शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, पुणे, व्हीनस प्रकाशन, डिसें.२०००, पृ.२४.

७) देशमुख विजय - शककर्ते शिवराय, खंड १, नागपूर, छत्रपती सेवा प्रतिष्ठाण, १९८२, पृ.२१६.

८) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.२१६.

९) हेरवाडकर र.वि.(संपा) - शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर), पुणे, व्हीनस प्रकाशन, २००२, पृ.५.

१०) Patil V.Shalini - Maharani Taribai of Kolhapur, New Delhi, S.Chand and company LTD, १९८७, P.५.

११) शिखरे चंद्रशेखर - प्रतिइतिहास, पुणे, जिजाई प्रकाशन, नोंव्हे.२००७, पृ.५६.

१२) पगडी सेतुमाधवराव - छत्रपती शिवाजी, नवी दिल्ली, नॅशनल ट्रस्ट, आवृत्ती सातवी, २००७, पृ.३.

१३) दिवेकर सदाशिव महादेव (संपा) - कविंद्र परमानन्दकृत, शिवभारत, पुणे, शब्दवेध प्रकाशन, नोंव्हे.१९९८, पृ.७५.

१४) पगडी सेतु माधवराव - पूर्वोक्त, पृ.४.

१५) सरदेसाई गोविंद सखाराम - मराठी रियासत, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८८, पृ.१३६.

१६) दिवेकर सदाशिव महादेव (संपा) - पूर्वोक्त, पृ.८५.

१७) कुलकर्णी अ.रा.(संपा) - जेधे शकावली-करीना, पुणे, डायमंड प्रकाशन, ऑगस्ट, २००७, पृ.१७५, १७६.

१८) हेरवाडकर र.वि.(संपा) - कृष्णाजी अनंत सभासद, शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर), पुणे व्हीनस प्रकाशन, २००२, पृ.४.

१९) सरदेसाई गोविंद सखाराम - पूर्वोक्त, पृ.१४४.

२०) बेन्द्रे वा.सी. - श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, मुंबई, १९७२, पृ.८३.

२१) पगडी सेतु माधवराव - पूर्वोक्त, पृ.१०.

२२) हेरवाडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.७.

२३) बेंन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त, पृ.१३९.

२४) हेरवाडकर र.वि.(संपा) - पूर्वोक्त, पृ.११.

२५) पगडी सेतु माधवराव - पूर्वोक्त, पृ.६६.

२६) कुलकर्णी अ.रा. (संपा) - पूर्वोक्त, पृ.५५.

२७) कुलकर्णी अ.रा.(संपा) - पूर्वोक्त, पृ.५७.

२८) कुलकर्णी अ.रा. (संपा) - पूर्वोक्त, पृ.६५.

२९) हेरवाडकर र.वि.(संपा) - पूर्वोक्त, पृ.१७२.

३०) पवार अप्पासाहेब (संपा) - ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड १, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला, १९६९, पृ.६५.

३१) पवार अप्पासाहेब (संपा)- पूर्वोक्त, पृ.४४, ४५, ४६, ४७.

३२) पगडी सेतु माधवराव - पूर्वोक्त, पृ.६४.

३३) सरदेसाई गोविंद सखाराम - पूर्वोक्त, पृ.२८५.

३४) हेरवाडकर र.वि. (संपा)- पूर्वोक्त, पृ.९६, ९७.

३५) हेरवाडकर र.वि. (संपा) - श्री शिवछत्रपतीचे सप्तप्रकारणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस), पुणे, व्हीनस प्रकाशन, २००० पृ.१७२.

३६) कुलकर्णी अ.रा. (संपा)- पूर्वोक्त, पृ.७७.

३७) हेरवाडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.९७.

३८) हेरवाडकर र.वि. (संपा)- पूर्वोक्त, पृ.९७.

३९) शिवदे सदाशिव - सेनापती हंबीरराव मोहिते, पुणे, डायमंड प्रकाशन, २००७, पृ.१९.

४०) पगडी सेतुमाधवराव - पुर्वोक्त, पृ.११६.

४१) बेन्द्रे वा.सी. - श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र (उत्तरार्ध), मुंबई, १९७२, पृ.७४०, ७४१.

४२) देशमुख विजय - शककर्ते शिवराय, (उत्तरार्ध), नागपूर, छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, ८०, जयप्रकाश खामला, ऑगस्ट १९८२, पृ.८१३.

४३) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८१६.

४४) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८१६.

४५) केळूसकर कृ.अ. - छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, वरदा, से.बापट मार्ग, मे १९९१, पृ.३८९.

४६) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८१७.

४७) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.११७, ११८.

४८) पगडी सेतुमाधवराव - पूर्वोक्त, पृ.११७.

४९) बेंन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त, पृ.७४४.

५०) कुलकर्णी अ.रा. (संपा) - पूर्वोक्त, पृ.७७, ७९.

५१) हेरवाडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.१०१.

५२) सरदेसाई गो.स. - पूर्वोक्त, पृ.२९८.

५३) बेंन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त, पृ.७३०.

५४) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.२०.

५५) केळकर न.चि. व आपटे द.वि. - शिवाजी निंबधावली, पुणे, शिवचरित्र कार्यालय, १९३०, पृ.९४.

५६) भट भास्कर वामन - शिवाजीची राजनिती, धुळे, राजवाडे संशोधन मंडळ, १२ जाने.१९४१, पृ.२०६.

५७) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. (संपा) - मराठ्यांचा इतिहास,खंड १, पुणे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, २००६, पृ.२७९.

५८) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२१२.

५९) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२१२.

६०) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२१३.

६१) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२१८.

६२) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२२०.

६३) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२३०.

६४) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२३०.

६५) हेरवाडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.११८.

६६) हेरवाडकर र.वि. (संपा)- पूर्वोक्त, पृ.११९, १२०.

६७) भट भास्कर वामन - पूर्वोक्त, पृ.२३१.

६८) शिवदे सदाशिव - पुर्वोक्त, पृ.२६.

६९) Grant Duff. - History of the maharatha, Bombay, Published at the times of India office, London, ३ edition, १८७३, P.१८१.

७०) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने - मराठेकालीन संस्था व विचार, कोल्हापूर, फडके प्रकाशन, १९९०, पृ.३१५.

७१) हेरवाडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.३१, ३३.

७२) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.३२.

७३) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने - पूर्वोक्त, ३१८.

७४) केळूसकर कृ.अ. - पूर्वोक्त, पृ.४२६.

७५) पुरंदरे बाबासाहेब - राजा शिवछत्रपती, पूणे परंदरे प्रकाशन, आवृत्ती १४वी, एप्रिल २००१, पृ.क्र.९१२.

७६) काळे दि.वी. - 'छत्रपती शिवाजी महाराज' णु, पुणे विद्यापीठ, कार्यवाह मार्च १६९०, पृ.क्र.१९७.

७७) बेंद्रे वा.सी. - पुर्वोक्त पृ.क्र.९०९, ९१०.

७८) पूर्वोक्त पृ.९१०.

७९) पूर्वोक्त पृ.९११.

८०) ग्रॅन्ड डफ - पूर्वोक्त, पृ.११९.

८१) हेरवाडकर र.वि. - (संपा) पूर्वोक्त पृ.९९, १००.

८२) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.४१.

८३) कुलकर्णी व खरे ग.ह. (संपा)- पूर्वोक्त पृ.२५३.

८४) पगडी सेतुमाधवराव - पूर्वोक्त पृ.१२१.

८५) पुरंदरे बाबासाहेब - पूर्वोक्त पृ.९९६.

८६) खोबरेकर वि.गो. - महाराष्ट्राचा इतिहास-मराठा कालखंड, भाग पहिला, शिवकाळ-१६३०-१७०७, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृ.१४९.

# प्रकरण तिसरे

# दक्षिण दिग्विजय व सेनापती हंबीररावांचे कार्य

## १) प्रस्तावना :

छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व मोहिमांत यशस्वी व किर्ती वाढविणारी दक्षिण दिग्विजय ही मोहीम होती. राज्याभिषेकाने शिवरायांना 'छत्रपती' पद मिळाले. मात्र या पदाची प्रचिती मोहिमेमुळे संपूर्ण जगाला दाखवून देता आली. हिंदुस्थानातील प्रमुख सत्तामधील गोवळकोंड्याच्या कुत्बशाही दरबारामध्ये हिंदूचे वर्चस्व वाढल्याने कुत्बशहाला शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याला मान्यता द्यावी लागली. मोगल व आदिलशाही सत्तांशी बराच वर्ष संघर्ष करुनही पुरता पायबंद घालता आलेला नव्हता. मोगलांना उत्तरेतील त्यांच्या राज्यातून मोठ्या प्रमाणात रसद पुरवठा होत असल्याने आणि आदिलशाहीला दक्षिणेतील हिंदू राजाकडून मुबलक पैसा व दारुगोळा मिळत राहिल्याने यांच्या विरोधासमोर हिंदवी स्वराज्य टिकविने म्हणजे त्यांच्या सामर्थ्याला तोंड देणे आवश्यक झाले होते. मोगलांचा बादशहा औरंगजेब हा काबूल कंदाहारच्या मोहिमेत गुंतल्याने शिवरायांना त्यांचा बराचसा प्रदेश मिळविता आला. तर विजापूरच्या आदिलशहालाकर्नाटकामध्ये एकही शत्रू विरोध करेल अशी कोणतिही प्रबळ राजकीय सत्ता नव्हती. उलट कर्नाटकातून मूबलक पैसा मिळता होता.गोवळकोंड्याचा कुत्बशहा आदिलशहाने जिंकलेला प्रदेश मिळविण्यासाठी बरीच वर्ष संघर्ष करावा लागला, पण त्यामध्ये यश आलेले नव्हते. त्यासाठी प्रबळ सत्तेशी हातमिळवणी करुन आदिलशाहीचे प्रदेश मिळविण्यासाठी कुत्बशहाने आपल्या राज्याच्या उत्तर सिमेवर असलेल्या हिंदवी स्वराज्याशी संन्धान बांधले. त्यामध्ये त्यांना यशही मिळाले. कुत्बशाहीचे बळकाविलेले आदिलशाहितील प्रदेश या मोहिमेच्या माध्यमातून शिवरायांनी जिंकून घेतल्याने दोन शाह्यात हिंदवी स्वराज्याच्या रुपाने तटभींत बनल्याने त्यांच्यातील कित्येक वर्षांपासूनच्या संघर्षाला पूर्णविराम मिळाला. हे या मोहिमेचे खरे राजकारण होते.

दक्षिण दिग्विजय किंवा कर्नाटक मोहिमेच्या संदर्भात कृष्णाजी अनंत सभासद[१] म्हणतो, 'पुढे राजे तक्ती बसून राज्यकारभार करु लागले. निजामशाही देश काबीज केला व मोगलाईही जप्त केली. भागानगरच्या बादशाहांनी राजेयाशी सल्ला करुन निराजीपंताचे पुत्र प्रल्हादपंत मोठे बुद्धीवंत यास हेजिबीस ठेऊन घेऊन,कारभार राजियास देऊन स्नेहांत मिळाले. वरकड किरकोळी राज्ये होती ती घेतली किती एकांनी कारभार देऊन अंकित होऊन राहीले. तुंगभद्र देशापासून कावेरीपर्यंत कर्नाटक साधावे हा बेत मनात धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावे, तरी दिवसगतीवर पडते म्हणून खुद्द राजियांनी आपण जावे असे केले. त्यास पेडगावी बहादूरखान गणीम पाठीवर येईल म्हणून निराजीपंत न्यायाधिश पाठविले. कित्येक द्रव्य अलंकार रत्नखचित पाठविली. त्यास अंतरंगे सख्य एक वर्षापर्यंत आपणास कर्नाटक साधावयास लागेल. तुम्ही राज्यास उपद्रव न करणे असे सांगून ठायी ठेविले आणि कर्नाटकास जावयास समागमे निवडून पागे पतके पंचवीस हजार स्वार व सरकारकून रघूनाथ नारायण व जनार्दन नारायण हे कर्नाटकचे माहितगार यास बरोबर घेतले वरकड पेशवे व सुरनीश व वाकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविले आणि विचार केला की, कर्नाटक साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिण्यातील द्रव्य वेचू नये. नूतन मिळवावे आणि वेच करुन देश साधावा. असा विचार करीता भागानगरचे पातशाहीत द्रव्य उदंड आहे. तेथे निष्ठुरता करुन द्रव्य मिळवावे आणि वेच करुन देश साधावा असा विचार करीता भागानगरचे पातशाहीत द्रव्य उदंड आहे. तेथे निष्ठुरताकरुन द्रव्य मिळवावे त ारी वर्षास करभार भागानगरकर देतात. तेथे निष्ठुरता करु नये. सरव्य करुन त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वही अनुकूल करुन देतील. असा विचार करुन भागानगरी प्रल्हादपंत हेजीब राजियाचे होते त्यासी हे वर्तमान लिहून भेट घ्यावी हा विचार केला. तानाशहा पातशा हा भागानगरकर यांनी मनात बहूत शंका धरिली की, जैसा अफजलखान बुडविला की शास्ताखान बुडविला, दिल्लीस जाऊन आलमगरी पातशाहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहाला तर काय करावे ? भेट मात्र राजियाची न घ्यावी. ते मागतील ते देऊ असे बोलिला. मग पातशहाशी व अकंण्णापंत व मादंणापंत कारभारी यांशी प्रल्हादपंते आण, शपथ, क्रिया बहुत दिधल्या. अपाय नाही. स्नेहाची भेट घेऊन जातील अशी बळकटी केली.'

या ऐतिहासिक मोहिमेपूर्वी सेनापती हंबीरराव मोहितेच्या मराठा सैन्याने इ.स.१६७५ मध्ये मोगलांचे खानदेश, बागलाण, गुजराथ, अमदाबाद बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहुर, जालनापूर स्वारी करुन लूटले तर आदिलशहाचेकोल्हापूर फोंडा, कारवार, शिवेश्वर, अंकोले, सातारा, वाई इत्यादी प्रदेश हस्तकले केले.

## २) सेनापती हंबीररावांनी लासुर लुटले (जाने.१६७६)

मोगलांचा सुभेदार बहादुरखान यांच्याशी तहाची बोलणी जून १६७५ मध्ये करुन छत्रपतींनी त्याला झुलवत ठेवले. विजापूरचे प्रदेश जिंकून घेण्यासाठी मराठा सैन्य प्रयत्न करत होते. विजापूरच्या दरबारने छत्रपतींच्या कारवायाला आवर घालण्या साठी वजीरपदी असलेल्या खवासखानाने मोगल सुभेदार बहादूरखान यांच्याशी बोलणी केली. 'बहादूरखान आणि खवासखान यांची भेट पंढरपूर येथे २९ ऑक्टोबर १६७५ रोजी झाली. उभयतांनी शिवाजीविरुद्ध मोहिम करावी असे ठरले.'[२] 'या तहात मोगलांनी ८५ लक्ष रुपयाची थकित खंडणी विजापूरकरांना माफ केली. त्या मोबदल्यात स्वराज्यावर चढाईकरावी, पन्हाळा, सातारा काबीज करुन कोकणप्रांत लुटावा असे ठरले.'[३] हा तह म्हणजे स्वराज्यावरील संकटाची घंटाच होती. छत्रपतींनी विजापूरच्या काळातील जिंकून घेतलेले सातारा व पन्हाळा इत्यादींचा योग्य बंदोबस्त करुन मोगलांचे प्रदेश पुन्हा जिंकण्यासाठी मराठ्यांचे सेनापती हंबीररावांना आदेश दिले. 'सरनौबत हंबीरराव मोहिते वाई-पुण्याहून थेट दौलताबादजवळील लासूर या व्यापारी पेठेवर चालूनगेले. लासूर पेठ त्यांनी लूटली. हंबीररावांचा मोडकरण्यासाठी बहादूरखान लासुरकडे धावला. तेथे त्याची व हंबीररावांची गाठ पडून घनघोर लढाई जुंपली. दोन्ही बाजुचे बरेच सैनिक ठार झाले. पण अखेरीस हंबीररावाने बहादूरखानाचा धुव्वा उडविला. खानाचे चार हत्ती मराठ्यांनी पाडाव करुन नेले.'[४] 'लासूर लढाई संदर्भात सेतुमाधवराव पगडी' म्हणतात. [५] मराठ्यांची एक फौज औरंगाबादकडे पसरली होती. बहादूरखान हा बहादूरगडाहून त्यांच्या पाठलागावर निघाला. औरंगाबादेपासून चौदा कोसावर लासूर येथे मराठ्यांशी युद्ध प्रसंग आला (जानेवारी १६७६) मराठ्यांनी दम धरला नाही. त्यांचा पराजय

झाला. बहादूरखानाने जुन्नरपर्यंत मराठ्यांचा पाठलाग केला. या मोहिमेत बहादूरखानाचे सगळे सरदार सडे निघाले होते.' लासूर येथे मिळालेली सर्व लूट सेनापतींनी रायगडावर पोहचती केली.

## ३) विजापूरच्या आदिलशाही दरबारातील राजकारण

आदिलशाहीचा वजीरखवासखान हबशी याने मोगलांचा दक्षिण सुभेदार बहादूरखान याच्याशी ऑक्टोबर १६७६ मध्ये तह करुन उभयतांचे समंध दृढ व्हावे यासाठी सोयरसंबंध जुळवून आणले होते. त्यामुळे दरबारात त्याचे वजन वाढले होते. दरबारात दोन गट दिसू लागले. दक्षिणी विरुद्ध पठाणी यांच्यातील पठाण गटाचा प्रमुख बहेलोलखान याला खवासखानाने मोगलांशी केलेल्या मैत्रीचा हेवा वाटू लागला. खवासखानाचे पारडे जड होण्याअधीच त्याचा निकाल लावण्यासाठी तो प्रयत्न करु लागला. नोव्हेंबर १६७५ सेजी खवासखानाला बहलोलखानाने कैद केले आणि संपूर्ण दरबार पठान गटाच्या ताब्यात गेला. म्हणजेच दक्षिण गटाच्या खवासखानाने मराठ्यांच्या बंदोबस्तासाठी केलेला उपाय त्याच्याच मुळावर आला. दरबारातील दोन गटात संघर्ष सुरू झाला. शेवटी १८ जानेवारी १६७६ रोजी बहलोलखानाने खवासखानाचा खून केला. ही मोठी राज्यक्रांतीच होती. पठाण गटाकडे संपूर्ण आदिलशाहीचा कारभार गेला. खवासखानाच्या वधानंतर मोगल सुभेदार बहादूरखानाने विजापूर विरुद्ध मोहिम काढली. यावेळी दक्षिणी गटाचे सर्व सरदार बहादूरखानाला येऊन मिळाले. १३ जून १६७६ रोजी बहादूरखान-बहलोलखान यांच्यात लढाई होऊन उभयतांमध्ये तडजोड झाली.

छत्रपती शिवाजी राजे मोगल-आदिलशहा यांच्यातील संघर्षाकडे लक्ष ठेऊन होते. कर्नाटक मोहिमेसाठी हीच योग्य वेळ होती हे राजकारण निपून असलेल्या महाराजांच्या त्वरीत लक्षात आले. कसलाही वेळ न घालवता त्यांनी लगेच हालचाली सुरू केल्या.

## ४) दक्षिण भारतातील राजकारण

द. दिग्विजय किंवा कर्नाटक मोहिमेपूर्वी दक्षिण भारतातील राजकीय परीस्थिती अस्थिर होती. तत्कालीन काळामध्ये दक्षिण भारताम ध्ये विजापूरची आदिलशाही,गोवळकोंड्याची

कुतूबशाही, तामीळनाडुच्या प्रांतात शेरखान लोदीचे राज्य, नासीर मुहमद यांचे राज्य, मदुरेचे राज्य, तंजावर या ठिकाणी छत्रपतींचे सावत्र बंधू व्यंकोजी राजे हे सेनापती हंबीररावांचे आत्येभाऊ राज्यकारभार पहात होते. समुद्रकिनारी फ्रेंचाच्या वखारी होत्या.

विजापूरच्या आदिलशाही दरबारामध्ये दक्षिणी आणि पठाणी संघर्ष होऊ न पठाणी गटाचे वर्चस्व निर्माण झाले होते. यांचा मोगल सुभेदार बहादूरखान यांच्याशी संघर्ष चालू झालेला होात. गोवळकोंड्याच्या कुतूबशाही दरबारामध्ये बेबंदशाही संपूष्टात येऊन मादण्णा आणि आक्कण्णा या दोन बंधूचे वर्चस्व वाढलेले होते. तामिळनाडू प्रांतातील खोस लोदी आणि नासीर मोहम्मद यांच्यात संघर्ष सुरु झालेला होता. शेरखान लोदी हा पठाणी होता. त्याने पॉन्डेचेरीच्या फ्रेंचाची मदत मिळवून नासीर मोहम्मदाचे अस्तित्व संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करीत होता. तर नासीर मोहम्मद हा दक्षिणी असून मदुरा व तंजावरची मदत घेऊन विरोध करीत होता.

इकडे स्वराज्यात महाराज डिसेंबर १६७५ मध्ये सातारा येथे आजारी पडले अलीकडच्या मोहीमांमुळे दगदग झालेली असावी. दोन-तीन महीने ते आजारी होते. ते आजारी असताना व्यंकोजींचा मुख्य कारभारी रघुनाथपंत साताऱ्यास आले हा रघुनाथपंत शहाजीराजांचा पहिला मुख्य कारभारी होता. सेनापती हंबीररावांच्या वडीलांबरोबर त्यांनी काम केले होते. शहाजीराजांच्या मृत्युनंतर व्यंकोजी राजे हे कर्नाटकातील जहागिरीचे मालक झाले होते. मुख्य कारभारी म्हणून रघुनाथपंतच काम करीत होते.


एकंदरीत मोहिमेच्या वेळी कर्नाटकात आदिलशहा व कुतूबशहा यांचेच राज्य होते. आदिलशहाचे राज्य पश्चिम किनाऱ्यावर मीरजान बंदरापासून तंगभद्रेकाठी मासूरपर्यंत व पुढे तूंगभद्रा काठाने रायचूर दुआबापर्यंत होते. येथे रुस्तुमजमा व बहलोलखान हे जहागिरदार होते. तुंगभद्रेच्या दक्षिणेस हंणी, कांपिली, शिरगुप्पा, अडोनी हा राज्यात भाग होता. हा भाग विजापूर या राजधानिच्याजवळ असल्यामुळे यावर विशेष लक्ष होते. बंकापूर येथे बहलोलखान असून तो केळदिचे राज्य बुडविण्यासाठी प्रयत्न करीत होता. त्याच्या जहागिरीच्या दक्षिणेस कानरामध्ये बेदनूर

(केळदी) म्हैसूर ही राज्य होती. म्हैसूर व केळदी राज्याचे आदिलशाहीचे स्नेव्हाचे संबध होते. म्हैसूरच्या पूर्वेस बांलोर येथे शिवरायांचे सावत्र बंधू व्यंकोजी राजाची जहागीर होती. जहागीर अंतर्गत अनेक पाळेगार असून ते आदिलशाहीच्या वर्चस्वाखाली होते. म्हणजे पूर्वेला समुद्रकिनारपट्टीवर वेल्लोरला अब्दुल्ला, जिंजीला नासीर महमंद वालीगोंडपूरमला शेरखान आणि तंजावरला व्यंकोजी राजे हे सर्व आदिलशाहीचे जहागिरदार होते. दक्षिणेस मारवा व केरळ ही स्वतंत्र राज्य होती.

दक्षिण भारतामध्ये कृष्णानदी ते पालारनदी हा प्रदेश कुतूबशहाच्या ताब्यात होता. त्यातच मीरजुम्ल्याची जहागीर असून त्यावर मोगल आपला अधिकार सांगत होते. त्या ठिकाणी मीरजुम्ल्याचा तोपची (तुपाक्की) कृष्णराव हा अधिकारी होता. तेथे मोगलाची डाक चौकी होती. आदिलशाही व कुतूबशाहीच्या सरहद्दीवरील कर्नूल ते बंगलोरपर्यंत पुढे चित्तूर पर्यंत त्यांच्यात वाद होता. नंद्याल,कर्नूल, अनंतपूर, पुनुकोंडा व गुडियत्तम हे भाग पूर्वीच्या विजयनगरचे होते. वास्तविक या भागावर कुतूबशहाचे वर्चस्व असावयास पाहिजे होते. आदिलशाहीच्या दरबारामध्ये असलेले दक्षिण मुस्लीम व पठाण परकीय मुस्लीम हे दोनाट तसेच कुतूबशाही दरबारातील इब्राहिमखान गट हे शिवरायांच्या विरुद्ध होते. मोगल शिवरायांच्या विरुद्ध होते. त्यांना आदिलशाही कुतूबशाही संपवायची होती. मोगलाचा दक्षिण सुभेदार म्हणून बहादूरखान हा असून त्याने आदिलशाहीचा वजीर खवासखान याच्याशी नातेसंबंध निर्माण केलेले होते. त्यांच्यात विशिष्ट करार होऊन ते शिवरायांच्या विरोधात चालून जाण्याचे ठरविले होते. तहातील अटीवरुन आदिलशाहीचे राज्य हे मोगलांचे मांडलिक राज्य बनले होते. ही गोष्ट दरबारातील पठाणी गटास मान्य नसल्याने त्यांनी खवासखानाला वजीर पदावरुन काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तो प्रयत्न यशस्वी झाला. लवकरच बहलोलखानाचा माध्यमातून खवासखानाचा खून झाला. वजीर पदावर बहलोलखान आला.

कुतूबशाहीतील वजीर व सेनापती मीरजुम्ला मोगलाकडे गेल्याने त्याच्या जागी सय्यद मुजफ्फर आलेला होता. पण तोही जास्त काळ टिकला नाही. कुतूबशहाने वजीर म्हणून मादण्णा

याची नेमणूक केलेली होती. त्याला 'सर्यप्रकाशराव' हा किताब दिलेला होता. याला आकण्णा नावाचा भाऊ होता. हा हुशारच होता. एकंद रीत दोन बंधुचे वर्चस्व कुतूबशाही दरबारामध्ये निर्माण झालेले होते.




पूर्व किनाऱ्यावर परकीय डच हे सर्वात प्रबळ होते. यांचा एक व्यक्ती कुतूबशाहीची राजधानी भागानगरला रहात होता. व्यापारी सवलती मिळवण्यासाठी तो प्रयत्नशील होता. त्यानेच शिवरायांना मोहिमेप्रसंगी नजराणा दिलेला होता. पाश्चात्य राष्ट्रातील इंग्रजांची मुख्य वखार सेंट जॉर्जही मद्रास येथे होती. यांना आदिलशाही राज्यात व्यापार करता येत होता. ते राजकारणात भाग घेत नव्हते. पण सर्वत्र लक्ष ठेऊन होते. फ्रेंचाचाही व्याप ार चालू होता. त्यांचा प्रमुख मार्टीनने वालदौरचा किल्ला घेण्यासाठी शेरखानास मदत केलेली होती. तसेच त्याला कर्जही दिले होते. तर

मदुरा राज्यात पोर्तुगीज व्यापार करत होते. त्याच बरोबर आपल्या ख्रिश्चन धर्माचा प्रसार व प्रचार करीत होते.

## ५) शहाजी राजांची जहागीर

शिवरायांचे वडिल शहाजीराजे भासले पूर्वी निजामशाहीचे वजीर म्हणून कार्य करत असताना इ.स.१६३६ मध्ये मोगल व आदिलशाहीच्या फौजांनी संयूक्तपणे निजामशाही नष्ट करण्यासाठी प्रयत्न करत असताना शहाजी राजांनी आटोकाट प्रयत्न केले. पण त्यांना निजामशाहीचे राज्य जिवंत ठेवण्यात अपयश आले. निजामशाही विरुद्ध मोगल व आदिलशाही संघर्षाचा शेवट होऊन उभयतहानमध्ये ठरल्याप्रमाणे शहाजी राजांना निझामशाहीतील जहागिरीबरोबर आदिलशाही प्रदेशातील तेवढीच जहागीर मिळाली. प्रथम कांपिली-अनागोंदी येथे जहागीर मिळाली. विजयनगरच्या पूर्वेला १५ कि.मी.वर तुंगभद्रेच्या दक्षिण किनाऱ्यावर ती आहे. या जहागिरीमध्ये हंपी, कोप्पल किल्ला, होस्पेट, बेल्लारी किल्ला व कनकदुर्ग किल्ला इत्यादी मध्ये स्वकर्तृत्वाने वाढ झाली. नंतर हे प्रदेश दुसऱ्यांना देण्यात आले. मात्र बंगलोर, चेत्रपट्टण, बेवूर, रामनगर, शिवगंगा, निलमगळ, बाळापूर, सिदलगट्टा, होस्कोट, कोलार ही ठिकाणे बंगलोरची जहागीर म्हणून ओळखत असत. हाच भाग शेवटपर्यंत जहागीर म्हणून होता. तो नंतर व्यंकोजी राजांकडे जहागीर म्हणून आला. व्यंकोजी राजांनी तंजावर जिंकून घेतले. आणि बंगलोर ही म्हैसुरला विकण्याचे ठरविले होते. पण बहलोलखानाने हा भाग आपल्या ताब्यात ठेवला होता. युद्धशास्त्राच्या दृष्टीने हा भाग अतिशय महत्त्वाचा होता. शहाजी राजांनी सुरक्षितपणे नियोजन केलेले होते वेगवेगळ्या ठिकाणी सैनिकी तुकड्या ठेऊन तेथे शांतता व सुव्यवस्था ठेवलेली होती. शहाजीराजे हे इतर जहागिरदाराप्रमाणे नसत तर ते एखाद्या राजाप्रमाणे राहात होते. त्यांच्या दरबारचे वर्णन 'पर्णाल पर्वतग्रहणाख्यान' या ऐतिहासिक साधन ग्रंथामध्ये आले आहे. त्यांच्या निधनानंतर तेथील सर्व जहागीर ही त्यांचा मुलगा व्यंकोजी राजांना मिळाली होती. तेही स्वतः राज्याभिषेक करुन घेऊन एखाद्या राजाप्रमाणे राज्यकारभार करत होते.

शहाजी राजांच्या काळामध्ये त्यांनी मदुरेवर स्वारी करुन दरवर्षाला खंडणी वसूल करीत होते. मात्र त्यांच्या नंतर तेथील खंडणी थकीत झालेली होती. म्हणून व्यंकोजी राजांनी इ.स.१६७२ मध्ये मदुरेवर स्वारीकेलेली होती. मदुरा व तंजावर यांच्यात सतत संघर्ष होत असत. शेवटी तंजावरचा पराभव झाला. तंजावरच्या विजय राघवाने आत्महत्याकेली. 'त्यावेळी बहलोलखानाने व्यंकोजी राजांना तंजावरला मदत करण्यास पाठविले. ही चालून आलेली संधी पाहून व्यंकोजी राजांनी मदुरेचा पराभव करुन १२ जानेवारी १६७४ रोजी तंजावर जिंकून घेतले. आणि ५ मार्च १६७६ रोजी स्वतः सच राजाणून घोषीतले व राज्याभिषेक करवून घेतला.' [७] तेंव्हापासून व्यंकोजीराज तंजावर ही राजधानी स्थापून राज्यकारभार करीत होते. मुख्य कारभारी म्हणून कारभार पहाणारे रघुनाथपंत हणमंते व व्यंकोजी राजे यांच्यात दुरावा निर्माण झाल्याने रघुनाथपंत शिवरायांकडे आले. यावेळी छत्रपती शिवाजी राजे दैनंदीन युद्ध मोहिमांमुळे सातारा या ठिकाणी आजारी होते. रघुनाथपंतानमुळे दक्षिण भारतातील संपूर्ण राजकीय हालचालिची माहिती मिळाली. जानेवारी १६७६ मध्ये व्यंकोजी राजांना त्यांनी पत्र लिहिले. या पत्रावरुन दक्षिण भारतातील राजकीय माहिती समजते.

'...... मथुरेचा (मदुरेचा) राजा आपले चंदावर (तंजावर) राऊन सुखी असोन आपला सेरीख (=मित्र) व्हावा आणि आपण तरतूद तलाश करुन येळूरचा (वेल्लोर) कोट व रासेलाचे (=पूर्वीचे विजयनगरचे) तख्त हाताखाली घालावे. पुढे ऐसेच घाटावरी चढोन श्रीरंगपटनकरांसी आपले यामध्ये सरीख करुन आपणही काही श्वार संगीनाथ मेळवून बेंगलुरचा दोवदार थोरला कोट बहलोलखानाचा लोकापासोन रगडून घ्यावा.'

'...... व्यंकोजीबाबा तुम्ही महाराजा म्हणवितोस हिंमत बांध आम्ही तरी येक वेडे बहलोलखानासी वर जादर झगडा लाविला आहे. सारी जमेती याची आम्हावर गुतली आहे. चंदीकडे पडलील तीन लक्षाचा मुलूक बहलोलखनासी आहे. ऐसियास जरी आम्ही तुम्हाला ऐसी अक्कल ल्याहावी की चंदीमध्ये खवासखानाचा भाऊ महमद नासीरखान आहे तो तुम्ही मिलोन पठाणाची विलायेत घ्यावी तरी महमद नासीरखान वेडे आहेत त्याच्याने पुढे राजकारणाची बुनयाद

चालवत नाही याकारणे तुम्हाला लिहीले असेल की सेरखान तुम्ही मिलोन खिबा (किला ?) कबज सेरखानाची हवाला करणे तरी एकोंजीबाबा तुम्ही पैकीयावर न पाहाणे जरी बहलोलखानाचा तिकडे सेरखान आहे तो लस्कारीयास दोन होन देई तरी आपण तीन होन द्यावे आणि लस्कर हशम जमेती करावी लोक कोणाकडे चाकरी न करीत येकोजी महाराजा पैके फार देतो त्याचेकडे जाऊन चाकरी राहून म्हणे ऐसे करुन आपणाकडे जमेत करुन बलकट होणे बहलोलखानचा कागद तरी चंदी घ्यावी महमद नासीरखान मारुन गर्देस मेलवावा आणि सेरखान सहजेच आपण होऊन तेथे कमजोर असेल तो भेटीस म्हणोन बोलावून आणून तेथेच जबे करावा. त्यची जमेत काही असली यावरही हल्ला करावा म्हणजे चंदी आपणास आली. वालगुडपुराभवता मुलूक आहे तो ही आपणास चालोन आला तरी सदरहूप्रमाणे वर्तणूक केली तरी येहेणेप्रमाणे फते होतच आहे. म्हणजे येकोजीबाबा तुम्हा ऐसा कर्नाटकामध्ये जोरावर कोन्ही नाही.....'[८]

वरील पत्रासंबंधी इतिहासकारांमध्ये मतमतांतरे आहे हे पत्र विश्वसनीय आहे की नाही हेच सिद्ध झाले नाही. शेजवलकरांनी या पत्राचा काळ आतील मजकुरावरुन ठरविला आहे. खवासखानाच्या कैदेनंतर पण वधाच्या आधी (डिसेंबर १६७५) शिवाजी महाराज साताऱ्यात असून आजारी होते. त्यावेळी हे पत्र लिहिले असावे असे शेजवलकर म्हणतात'[९] या पत्रावरुन शिवरायांनी एंकोजीराजांना सल्ला दिलेला होता की, कर्नाटक प्रांतामध्ये असलेल्या विजापूरच्या दरबारामध्ये पठाण सरदारांचे वाढलेले वर्चस्व नष्ट करुन तेथे आपले वर्चस्व निर्माण करावे. आपल्या वडीलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपली किर्ती वाढवावी. तसेच कुतूबशाही दरबारातील हिंदू सरदारांचा पाठींबा घेऊन दक्षिण भारतातील इतरत्र प्रदेशावर वर्चस्व निर्माण करावे मात्र या पत्राची व्यंकोजीराजांनी फारशी दखल घेतल्याचे दिसत नाही. दक्षिणेतील राजकारण फारच अस्थिर बनत चालले होते. रघुनाथपंत हणमंते यांच्याकडून सर्व राजकीय व इतर माहिती मिळालेली होती. विजापूरचा आदिलशहा व मोगल राज्यात मैत्री होऊ नये यासाठी शिवरायांनी आदिलशाहीचा वजीर बहलोलखान याच्याशी बोलणी करुन जूलै १६७६ मध्ये तह घडवून आणला. तहानुसार 'कृष्णानदी ही शिवाजी महाराज आणि विजापूरकर यांच्या राज्यांमधील सरहद्द ठरविण्यात आली आणि या

विभागणिमुळे जून्या आदिलशाहीतील जो कृष्णेच्या उत्तरेकडील बालाघाटी मुलूख महाराजांना मिळाला. त्याच्या मोबदल्यात महाराजांनी तीन लक्षांचा नजराणा व दरसाल एक लक्ष होणांची खंडणी आदिलशाहाला द्यावी असे ठरले.'[१०] यावेळी अचानक बहादुरखानाने नळदुर्ग किल्याला वेढा घातलेला होता. बहलोलखानास कुतूबशहाने मदत केलेली होती त्यामुळे बहादूरखानाचा पराभव झाला. पठाण ऐनवेळी बहेलोलखानाला मदत केली. बहादुरखानाने पण शेवटी महाराजांशी तह केला. बहलोलखान हा दिलेरखानच्या जवळचा होता. त्याने कुतूबशहाच्या मदतीने केलेला तह फेटाळला. पण नंतर तो तह झाला. निराजीपंताना पाच हजार सैन्यासह महाराजांनी त्याच्याकडे पाठविले.'[११] सातारा येथील मुक्कामात दक्षिणेकडच्या मोहिमेची तयारी चालली होती. वर्ष दोन वर्ष मोहिम चालेल एवढी तयारी चालली होती. दक्षिणेकडे निघण्यापूर्वी स्वराज्यातील प्रत्येक किल्याचा बंदोबस्त करण्यात आलेला होता. किल्लेदारांना व सैनिकांना खबरदारीच्या सुचना दिलेल्या होत्या. एकंदरीत दक्षिण मोहिमेच्या संपूर्ण काळात वक्रदृष्टीने पाहण्याची हिमंत शत्रंना झाली नाही. यावरुन आपणास स्वराज्याच्या व्यवस्थेची किती काळजी घेतली हे लक्षात येते.

## ६) दक्षिण मोहिम व सेनापती हंबीरराव मोहिते

छत्रपती शिवरायांनी दक्षिण मोहिमेची तयारी केली. या मोहिमेत सेनापती हंबीरराव मोहितेचा सहभाग व महत्वाची भूमिका असल्यामुळे मराठ्यांच्या इतिहासात या मोहिमेला महत्व प्राप्त झाले आहे. मोहिमेसाठी शिवरायांनी सोबत भरपूरखजिना, प्रचंड घोडदळ व पायदळ तसेच कर्नाटक प्रदेशाची भौगोलिक व राजकीय माहिती असलेले बरेच मावळे घेतले होते. '२५००० घोडदळ असल्याचे सभासदाने नमूद केले आहे. तर मुंबईकर इंग्रजांच्या एका पत्रात महाराजासमवेत २०००० घोडदळ, ४०००० पायदळ असल्याची माहिती नमूद केलेली आहे. तर मद्रासकर इंग्रजांनी १६ ते २० हजार घोडदळ व चाळीस हजार पायदळाचा उल्लेख एका पत्रात केलेला आहे.'[१२] एकंदरीत या मोहिमेत ४० ते ५० हजार सैन्य असावेत. शिवरायांनी 'छत्रपती' या नात्याने काढलेली ही सर्वात मोठी मोहिम असल्यामुळे सेनापतीनाही आपले शौर्य कर्तृत्व करण्याची मोठी संधीच

चालून आलेली होती. स्वतंत्र राज्याचा सेनापती असल्याने अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या शिवरायांनी त्यांच्यावर सोपविल्या होत्या. मराठा सैन्याचे दोन भाग करुन एक भाग सेनापतींच्या नेतृत्वाखाली दिलेला होता. छत्रपतींच्या सोबत पायदळाचे सेनापती येसाजीकंक, बाजी सर्जेराव जेधे, सोनानी नाईक दौलतबंकी, बाबाजी ढमढेरे, आनंदराव मोरे, मानानी मोरे, सुर्याजी मालुसरे, सेखोजी गायकवाड, धनाजी जाधव असे शुर लढवय्ये सरदार मोहिमेत होते. शिवाय बाळाजी आवजी चिटणीस, मुन्सी नीलप्रभू, मुद्राधिकारी शामजी नाईक पुंडे हे अधिकारी सोबत होते. सेनापती हंबीरराव मोहितेही दुसऱ्या मार्गाने गोवळकोंड्याला दाखल होणार हा ेते. मोहिमेतील प्रत्येकाला आपआपल्या पदानुसार सुंदर पोषाख, अलंकार, निशाणे देण्यात आले होते. सोबत सेनापती व सैनिकांना आवश्यक शस्त्रे, दारुगोळ, चिलखते, शिरस्त्राणे ही अप्रतिम होती. घोडदळातील दोन घोडेस्वारांना मिळून तीन घोडे देण्यात आले होते. कारण दुरचा प्रवास असल्याने घोडे थकू नयेत आणि जलद गतीने हालचाल करता यावी यासाठी ही व्यवस्था होती. सैनिकांना सक्त ताकीद देण्यात आलेली होती. 'त्या प्रांतातील रयतेस तिलप्राय उपसर्ग करु नये. जेथे जेथे मुक्काम होईल तेथे दाणावैरण, लाकुडफाटे वगैरे लागणारा सगळी माल खूषखरेदीने विकत घ्यावा. रयतेच्या एका काडीसही स्पर्श करु नये ही कैद मोडून कोणी लुटफाट केल्यास त्याला कडक शिक्षा होईल.'[१३] मोहिमेची व्यवस्था अत्यंत नियोजनपूर्व करण्यात आलेली होती. चैनीच्या मौल्यवान वस्तू व स्त्रिया सोबत घेऊ नये असे आदेश होते. अवजड तोफखानाही नव्हता. छत्रपती व सेनापती इतर अधिकाऱ्याचे तंबुही हलके होते. शत्रुना आपल्या मोहिमेची माहिती कळू नये याची गुप्तता नेहमीप्रमाणे घेण्यात आली होती. तरीही याबाबत मुंबईकर इंग्रज पत्रातून लिहीतात. 'Shivaji Raja, carried on by ambitious desire to bee fam da mighty conquerous, left Rairi, his strongest hold in the kingdom of concon, at the latter end of the last fair Montzoone and Marched with his Army consisting of २०००० horse and ४०००० foote into carnateck where the Telingas have two of the strongest holds in those parts called chindi (Gingy), Chindawer

(Tanjore) where many merchants are considerable inhabitants, and with a success as happy as caesars in spaine, he came, saw and over came, and reported soe vast a treasure in gold, diamonds, emeralds, rubies and wrought corall that have strangthned his armes with very able sinewes to prosectute his further victorious designs. Hee is at present before Banca Pore, two other very strong ghurrs or rocks, which soe soone as he hath takas in (Being noe lesse) destrous thereat than Alexander the Great was for by the agility of his wigned men (himself terming them birds) he took in lesse than ८ monthes time from the Mogull, jessing २३ (inaccessible ones) resolves against vizapore, the Metropolis of the kingdome of deccan propinque to them; and being become master there of, was vowed to his pagod never to sheath his sword till he has reached dilly and shut up orangsha in it. Moro punt, one of his Generalls, hath alsoe of late plundered trumbeck nasses (Trimbak Nasik) and other considerable places within the Mogulls territoryes which hath added much to his treasure.'[१४]

इंग्रजी पत्राचे मराठी भाषांतर इतिहासकार बेन्द्रे यांनीकेलेले आहे. "आपली जगज्जेता म्हणून प्रसिद्धी व्हावी अशा महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन शिवजी कोकणातील अत्यंत दुर्गम किल्ला जो रायरी तेथून निघूनोल्यावर पावसाळ्यानंतर २० हजार स्वार व ४० हजार पदाती घेऊन कर्नाटकावर गेला. त्या बाजुला, तेलंगणातील जिंजी व तंजावर हे दोन मोठे किल्ले आहेत तेथील व्यापारी बहूत सधन आहेत. स्पेनमध्ये रुशर ज्याप्रमणो आला त्याने पाहिले आणि जिंकले, तद्वत तेथे शिवाजीचा पस्क्रम होऊन तेथून त्याला अमर्याद संपत्ती मिळाली, आणि त्यामुळे पुढील युद्धाचा यशस्वी कार्यक्रम पुरा करण्यास त्याला साधने प्राप्त झाली. तो हल्ली बंकापूर या दुसऱ्या

दुर्गम किल्ल्यावर हल्ले करीत आहे. अलेक्झांडर दि ग्रेट इतकाच त्याचा या बाबतीत हातखंडा आहे. कारण पूर्वी जयसिंगाला दिलेले २३ दुर्गम किल्ले त्याने आपल्या पक्ष्याप्रमाणे चपळ स्वारांच्या साह्याने (त्यांन तो आपले पक्षी, पाखरे असेच म्हणतो.) म ोगलांपासून आठ महिन्याचे आंत परत घेतले. बंकापूर घेतल्यावर त्यांच्या नजीकच असलेली दख्खनच्या राजाची राजधानी विजापूर ह्या किल्यावर तो स्वारी करणार आहे. तो घेतल्यावर मग थेट दिल्लीवर चाल करुन जाऊन औरंगजेबाला तेथेच कोंडून टाकीपर्यंत तलवार म्यानात न घालन्याची त्याने देविजवळ प्रतिज्ञा केली आहे असे म्हणतात. मोरोपंताने नुकतीच त्रिबंक, नाशिक व मोगलाईतील इतर शहरे लूटली त्यामुळे त्याच्या खजिन्यात पुष्कळ भर पडली.'[१५] सारांश शिवरायांनी मोहिमेच्या वेळी २० हजार घोडदळ आणि चाळीस हजार पायदळ सोबत घेऊन त्यांची तुलना जगज्जेता अलेक्झांडर दि ग्रेट ज्युलियस सिझर यांच्याबरोबर करुन कर्नाटकातील आदिलशाहीची राजधानी विजापूर जिंकून घेतल्यावर ते दिल्लीवर स्वारीकरुन औरंगजेबाच्या निकाल लावल्याशिवाय आपली तलवार म्यान करनार नाहीत अशी प्रतिज्ञा त्यांनी देवीजवळ केली आहे असे मुंबईकर इंग्रज म्हणतात. ही बातमी इंग्रजांना स्वराज्याचे पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांच्याकडून समजली असावी. पंतप्रधानांनी सुद्धा दक्षिण मोहिमेची खरी माहिती कळू दिली नाही. स्वराज्यासाठी कार्य करणारे सर्वच मराठे आपल्या स्वारी बाबात गुप्तता राखीत होते. दक्षिण दिग्विजयाबाबत आपल्या शिवचरित्रात 'कृष्णाजी अनंत' सभासद[१६] म्हणतो, 'तुंगभद्र देशापासून कावेरीपर्यंत कर्नाटक साधावे, हा बेत धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावे, तरी दिवसातीवर पडते. म्हणून खुद्द राजियांनी आपण जावे असे केले. त्यास पेडगावी बहादुरखान गनीम पाठीवर येईल म्हणून निराजीपंत न्यायाधिश पाठविले. कित्येक द्रव्य अलंकार (भूषणे) रत्नखचित पाठविली. त्यास अंतरंगे सख्य (करुन) एक वर्षापर्यंत आपणास कर्नाटक साधावयास लागेल. तुम्ही राज्यास उपद्रव न करणे, असे सांगूनठायी ठेविले. आणि कर्नाटकास जावयास समागमे निवडून पागे, पतके पंचवीस हजार स्वार व सरकारकून रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे कर्नाटकचे माहितगार यास बरोबर घेतले. वरकड पेशवे व सुरनीश व वाकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविले आणि विचार केला की, कर्नाटक साधावयास

द्रव्य लागेल त्यास खजिन्यातील द्रव्य वेचू नये. नूतन मिळवावे आणि वेच करुन देश साधावा. असा विचार करीता भाग ानगरचे पातशाहीत द्रव्य उदंड आहे. तेथे निष्ठूरता करुन द्रव्य मेळवावे तरी वर्षास करभार भागानगरकर देतात. तेथे निष्ठुरता करु नये. सख्य करुन त्यांची भेट घ्यावी. भेटीनंतर सर्वही अनुकूल करुन देतील. असा विचार करुन भागानगरी प्रल्हादपंत हेजिब राजियाचे होते त्यासी हे वर्तमान लिहून भेट घ्यावी हा विचारकेला. तानाशाहा पातशाहा भागानगरकर यांनी मनात बहूत शंका धरिली की, "जैसा अफझलखान बुडविला, की शास्त्राखान बुडविला, दिल्लीस जावून अलमगीर पातशहास पराक्रम दाखविला, ऐसा एखादा अनर्थ जाहाला तर काय करावे ? भेट मात्र राजीयाची न घ्यावी जे मागतील ते देऊ. असे बोलीला मग पात ाशाहाशी व अक्कंण्णापंत व मादण्णापंत कारभारी याशी प्रल्हादपंत आण,

शपथ, क्रिया बहूत दिधल्या अपाय नाही स्नेहाची भेट घेऊन जातील, अशी बळकटी केली."[१६] या माहिती संदर्भात अनेक साधन ग्रंथातून माहिती मिळते.

## ७) इतर राज्याच्या सैन्याची स्थिती

दक्षिण दिग्विजय मोहीम निघण्यापूर्वी तत्कालीन इतर राज्यांचे सैन्य हे वेगवेगळ्या मोहिमेत गूंतले होते.

### १) मोगल

मोगलांचा दक्षिण सुभेदार दिलेरखान सोलापूर भागात होता. (यावेळी मोगलांचे मोठे सैन्य अफगाणिस्थानात गुंतलेले होते.)

### २) आदिलशाहा

आदिलशाहाचा वजीर बहलोलखानाने मोगलाचे नळ दुर्ग व अक्कलकोट वेढलेले होते, इंडिला त्याचा तळ होता व विजापुरला बरेच सैन्य होते. हुसेनखान मियाणा कोप्पळ भागात होता.

## ३) कुतुबशही

कुतुबशहाचे सैन्य मोल व आदिलशाही सरहद्दीवर माल खेड जीवांगी येथे होते. जरुर पडल्यास आदिलशहास मदत करण्याच्या स्थितीत होते.

## ४) जंजिरा सिद्दी

फक्त जंजिऱ्यापुरताच मर्यादित होता.[१७]

## ५) छत्रपती शिवराय

मोहिमेच्या पूर्वी शिवरायांचे सैन्य ही स्वराज्याच्या वेगवेगळ्या भागामध्ये होते. स्वराज्याच्या उत्तर भागामध्ये पंतप्रधान मोरोपंत पेशवेंच्या नेतृत्वाखाली, कोकणात आणि पश्चिम भागात अण्णाजी दत्तोच्या नेतृत्वाखाली, सातारा व कोल्हापूर भागात दत्ताजीपंत वाकनीस यांच्या नेतृत्वाखाली, राजधानी रायगडला राहुजी सोमनाथ यांच्या नेतृत्वाखाली सैन्य होते. तर स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते हे घोडदळ गदग कोप्पळ भागात होते. त्याचे पायदळ हे बेळगावला होते. छत्रपती शिवरायांनी सेनापतींशी चर्चा करुनच राज्याच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक किल्यात पायदळ व काही घोडदळ विभागून ठेवले होते. राज्यांचे संपूर्ण सैन्य व त्याची व्यवस्थेची जबाबदारी 'सेनापती' या नात्याने हंबीररावांवरच होती. एकीकडे स्वराज्याचे शत्रूपासून रक्षण करणे आणि दुसरीकडे दक्षिण दिग्विजय मोहिम यशस्वी करुन दाखविने हे अतिशय जिकरीचे काम यांच्यावर होते. आपण स्वराज्याच्या बाहेर किती दिवस, वर्ष रहाणार याची त्यांना कल्पना असली पाहिजे. अशा वेळी शत्रुंनी आक्रमण केले तर त्यांच्याशी दोन हात कसे करता येईल याची त्यांनी काळजी घेतली होते. सर्व सैनिकांना सतर्कतेचे आदेश दिले होते. तसे पहाता छत्रपतींनी शत्रू राज्यांना वेगळा करार करुन गप्प बसविले होते. तर काही राज्यांच्या दरबारात दुफळी निर्माण झालेली होती. एकंदरीत सर्व परिस्थितीचा सर्वा सुंदर विचार करुन मोहिमेचा निर्गण घेतलेला होता.

## ८) दक्षिण मोहिमेची कारणे

छत्रपती शिवाजी महाराजांच्या क्षिण दिग्विजय मोहिमेची कारणे वेगवेगळी होती. या संदर्भात इतिहासकारांमध्ये एकमत आढळत नाही. तरिहीकाही कारणांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

१) राज्याभिषेकासाठी झालेला खर्च भरुन काढणे.

२) वडिलांच्या जहागिरीचा वाटा मिळविणे.

३) दोन मुलांसाठी स्वतंत्र दोन राज्य मिळविणे.

४) विजयनगरच्या हिंदू साम्राज्याची पुनर्स्थापना करणे.

५) मोगलांविरुद्ध एकजूट घडवून आणणे.

६) स्वराज्याचा सर्वांगिन विकास करणे.

७) रघुनाथपंत हणमंतेच्या विचाराप्रमाणे राज्याचा विस्तार करणे.

८) छत्रपती झाल्याची प्रचिती जगाला दाखविणे.

ही कारणे कारणिभूत असली तरी सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे


९) मराठा सैनिकांची शक्ती जगाला अजमावून दाखविने हेच असावे. यासाठी काही बाबी कारणीभूत आहेत. (१) मराठा सैनिकांचा सेनापती हंबीरराव मोहितेचे नेतृत्व, त्यांचे कर्तृत्व आणि स्वामीनिष्ठा या आहेत. नुकतेच प्रतापराव गुजरच्या अकाली मृत्युमुळे सेनापती पदावर हंबीरराव यांची नेमणूक स्वत: शिवरायांनी केली होती. यावेळी त्यांच्याकडे असलेले सर्व गुण पाहूनच निवड झालेली होती. त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरावे यासाठी हंबीररावांनी अल्पकाळात स्वराज्यासाठी प्रत्येक मोहिमेत यश मिळविले. पेडगावच्या बहादूरखानावरील हल्ला, विजापूरच्या बहेलोलखानाचा पराभव मोगली प्रदेश लुटून आर्थिक साहाय्य केले. संपूर्ण मराठा सैनिकांना शिस्त, शिकवन, व्यवस्था अत्यंत महत्वपूर्ण लावली होती. शिवरायांना या बाबींची प्रचिती आल्यानेच स्वराज्याच्या

सैनिकांची ओळख तत्कालीन सत्ताधिशांना करुन द्यावी. भविष्यात स्वराज्यावर स्वारीकरण्याची हिमंत कोणीही करणार नाहीत. भागानगरमध्ये कुतूबशहा व शिवराय यांच्या भेटीप्रसंगी कुतूबशहाने मराठा सैन्कि आहेत तरी कसे ? त्यांच्या बळावर तुम्ही हिंदवी स्वराज्य निर्माा केले. तेंव्हा शिवरायांनी यसाजीकंकला बोलावून घेऊन त्याची युक्ती व शक्तीचे प्रदर्शन दाखवून दिले. कुतूबशहाने त्याचे कौतूक करुन त्याचा यथोचित गौरव केलेला होता. त्याच बरोबर कुतूबशाही राज्यामध्ये मराठा सैन्किांच्या शिस्त व वर्तुनुकीबाबत सर्वत्र चर्चाही झालेली होती. अशा मराठा सैनिकांच्या बळावर शिवरायांनी ही मोहिम काढल्याचे ठरविले होते. यासाठी स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहितेच कारणीभूत होते.

## ९) दक्षिण दिग्विजय मोहिमेचा मार्ग

छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजय मोहिमेला सुरुवात केंव्हा केली याबाबत निश्चित तारीख अद्यापही उपलब्ध झालेली नाही. इतिहासकार केळूस्करांच्या मते [१८] 'महाराज कर्नाटकात जावयास सन १६७६ सालच्या अखेरीस निघाले' तर बाबासाहेब पुरंदरे यांनी 'राजा शिवछत्रपती' ग्रंथात 'विजयादशमी उजाडली (दि.६ ऑक्टोबर १६७६) आणि महाराज दक्षिण दिग्विजयांर्थ रायगडाहून निघाले.'[१९] असे म्हणतातया मतास दि.वी.काळे यांनीही सहमती दर्शविली आहे. मात्र विजय देशमुख यांच्यामते वरील मत चुकिचे असल्याचे स्पष्ट करतात. महाराज डिसे.१९७६ मध्ये रायगडावरुन निघाले असा वेत. नोव्हेंबर १९७६ मध्ये संभाजीराजे शृंगारपुरास गेले. त्याच सुमारास सरनौबत हंबीरराव मोहितेही निघाले. त्यानंतरच महाराज निघाले. इंग्रजांच्या एका पत्रात महाराजांनी रायगड at the latter end of Montzoone म्हणजे मान्सून संपल्यानंतर कांही दिवसांनी सोडला असे म्हटले आहे. [२०] या वेवेगळ्या मताचा विचार करता शिवाजी महाराज इ.स.१६७६ अखेरीस कर्नाटक मोहिमेवर निघाले. आणि कुतूबशहाची राजधानी भागानगर येथे मार्च १६७७ पोहचले. या कालावधीत ते कोणत्या मार्गाने पोहचले याबाबत इतिहासकारांमध्ये एकवाक्यता दिसत नाही.

'सन जदुनाथ सरकार यांच्या म्हणण्याप्रमाणे[२१] शिवाजी रायगडावरुन सरळ पूर्वेस नियमीत टप्प्यांनी भाागनगरला गेला.' जवळपास सर्वच इतिहासकार हाच मार्ग सांगतात. याबाबत शिवरायांचा भागानगरकडे जाणारा मार्ग दाखविला आहे.




सेनापती हंबीरराव मोहिते व छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्यातून वरील मार्गाने भागानगरकडे गेले होते.

सेतू माधवराव पगडी यांच्या मतानुसार[२२] 'शिवाजी महाराज हे कृष्णा नदीच्या दक्षिणेकडून गेले असतील किंवा बहादुरखानाशी मैत्री झाल्यामुळे भीमेच्या उत्तरेला सोलापूर, नळदुर्ग, उमरगा, हुमनाबाद, जहीराबाद, मेदक या मार्गाने ते हैद्राबादेस गेले असतील' यांचा ही तर्क आहे. श्री विजय

देशमुख यांच्या 'शककर्ते शिवराय' या ग्रंथात 'नागोजी जेधे गदगकडे ठार झाल्याची व पाठोपाठ गोदुबाई सती गेल्याची हकीकत कळली. त्यामुळे महाराज सांत्वनार्थ रोहिडखोऱ्यात कारीला आले. नागोजीची आई तुळजाबाई हिचे त्यांनी सांत्वन केले. प्रतिवर्षी एक शेर सोने द्यायची मोईनकेली. बाजी जेधे महाराजासोबत पुढे निघाले'[२३] म्हणजेच वरील उल्लेखामुळे कारी - गोदातीर - कंदमुर्ती - भागानगर हा मार्ग मानतात सनदा पत्रामध्ये 'महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी भागानगरप्रांते स्वारीस आले होते ते समयी मौजे कंदकुडती परगणे बोधन सरकार नांदेड हा गाव समग्र ब्राहमणास अग्रहार करुन दिला.'[२४] अशी नोंद आढळते. यावरुन शिवाजी महाराजगा ेदावरी नदी काठाने मराठवाड्यातून नांदेड, बोधन मार्ग सिंकदराबादहून भागानगरला पोहचले असावेत. मेजर जोशींच्या मते, 'दसऱ्यास शिवाजी रायडावरुन निघाला, चिपळून वरुन दक्षिण कोकणात गेला. बेळगावला शिवाजीचे पायदळ होते. त्याने सोंधे शिरसी बाजूला मोहीम काढणार अशी अफवा पसरवली होती. त्यांचा झंजी पत्रात उल्लेख आहे. तेथून शिवाजी पाटगावला गेला. मौनी बाबांचे दर्शन घेतले. मठाच्या दरवाज्यातून एक सरळ रस्ता पूर्वेच्या बाजूस जातो त्या रस्त्याने महाराजांनी कूच करुन दक्षिण दिग्विजयास सुरुवात केली. असे सांगितले जाते. आजही तो मार्ग दाखविला जातो. स्थानिक लोककथा पण त्याला दुजोरा देतात. वर सांगितलेल्या इनामपत्रात (३ मे १६७८) कडे जाणाऱ्या मार्गासंदर्भात निश्चित असे आपणास सांगता येत नाही. मात्र इ.स.१६७६ च्या दसऱ्यानंतर मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांना तोरगळ प्रांतातून कुतूबशाही प्रदेशात येण्याची आज्ञा केली. त्यांच्या सोबत कान्होजी जेधेचे पुत्र बाजी सर्जेराव आणि त्यांचा नातू नागोजीराव तसेच धनाजी जाधवान सारखी शुर व स्वामिनिष्ठ लढवय्ये सैनिक दिले.

## १०) सेनापतींच्या विजयाने मोहिमेला सुरुवात

शिवरायांच्या आदेशानुसार सेनापती हंबीरराव मोहिते यांनी सैन्यांची जमवाजमव करुन मोहिमेची तयारी झाली. त्यांच्या कानावर कृष्णा व तुंगभद्रा नदी दरम्यानच्या प्रदेशातील लोकांच्या अडचणी ऐकावयास मिळताच ससैन्य ते रवाना झाले सेनापती नुकतेच नाशिक येथून आलेले होते.

आदिलशाही प्रदेशातील किल्ले कोप्पल येथे हुसेनखान मियाणा हा आदिलशाही पठाणी सरदार तेथे जुलमाने व क्रूमशहा प्रमाणे राज्यकारभार करत होता. तेथील हिंदू भरडले जात होते. हुसेनखानाच्या जाचातून मुक्त करण्याचे काम विचारपूर्वक महाराजांनी सेनापतीवर सोपविले दक्षिण मोहिमेसाठी स्वराज्याच्या व्यवस्थेसाठीकाही सैनिक तैनात केलेले होते. छत्रपतींच्या सोबतही मोहिमेत कोणतीच उणीव भासणार नाही याची काळजी सेनापतींना होती. अल्पसे सैन्य घेऊन मोहिमेला निघाले कर्नाटकातील येलबूर्गाजवळ असताच आदिलशाहिचा वजीर बहलोलाखानाचा कडवा पठाणी सदरार हुसेनखान मियाणा याने अडवले. दोन्ही सैन्य समोरासमोर येऊन युद्धाला सुरुवात झाली. यावेळी हंबीररावांसोबत अतिशय अल्प सैन्य आहे. आपमराठ्यांचा सहज पराभव करु असे मियाणा बंधूना वाटले पण सेनापतीचे सैन्य पठाणी सैन्यावर तुटून पडले. एखाद्या तप्त तेजोगोल पृथ्वीवर यावा आणि एकाएकी अंधार दूर व्हावा. अशी अवस्था तेथील युद्धाची झाली. हंबीररावांच्या समोर हुसेनखान टिकू शकला नाही. मराठ्यांमुळे त्याला पराभव स्विकारावा लागला. यावेळी मराठ्यांच्या हाती २००० घोडे व काही हत्ती लागले. आपल्या सैन्याचा पराभव होत असल्याचे पाहून हुसेनखान रणमैदानातून निसटून जाऊ लागला. त्यावेळी नागोजी जेधे यांनी त्याला पाहिले. त्याने आपला घोडा हुसेखानाच्या हत्तीसमोर नेऊन तलवा रीच्या साह्याने हत्तीची सोंड कापली आणि हत्ती रणांगणाकडे वळला. त्यावेळी चिडलेल्या हुसेनखानाने सप्पदिशी एक तीर नागोनी जेधेच्या मस्तकावर मारला मस्तकामध्ये शिरलेला हा तीर नागोजीची हनवटी फोडून बाहेर आला. सोबतच्या मराठा सैनिकांनी हुसेनखानाला पकडले व रुतलेला तीर बाहेर काढताच नागोजीने आपला प्राण सोडला वडील बाजी सर्जेराव जेधे जवळच होते. त्यांच्या डोळ्यासमोर आपल्या मुलाला विरमरन आल्याने अतिशय दुःखी झाले. आणि हुसेन खानाचा पाडाव झाला. सेनापतींना अतिशय वाईट वाटले. पण दु:ख करण्याचा प्रसंग नव्हता. सोबतच्या सर्जेरावांना धिर देणे महत्त्वाचे होते. युद्धामध्ये विजय मिळाला पण माझा सैनिक मृत्यू पावला. माझ्या सहकाऱ्यावर दु:खाचा डोंगर कोसळला. हंबीररावांच्या वडिलांपासून जेधे घराण्याशी स्नेहाचे संबंध होते. एक सखा गमावल्याचे दु:ख हंबीररावानाही झाले. तेथील युद्धाबाबत व हंबीररावांनी दाखविलेले शौर्य

आणि पराक्रमाचे वर्णन उपलब्ध आहे. 'मियाणा शरीरेकडून जबर, कजाखही विशेष हंबीररावाजवळ संरजांम थोडा मायग्याची जमियत मोठी असे असता हंबीररावाने वीज चकाकता अंधकार दूर होऊन शुद्ध उद्कधारा नजरेस येते. तद्वत सैन्यात हलकल्लोळ होऊन खानाचे लोकांनी रस्ता देवून जसे स्त्रीचे केस दुंभाग करुन रती वेनी घालते. तशा रितीने हंबीररावाने हत्यार चालविताच, फळी फुटोन दुभांग केले. शेकडा मनुष्य जाता येता मारिले खान नामोहरम होऊन पळू लागले. त्यास धरुन आणिले सरंजामसुद्धा सर्व लष्कर पाडाव करुन आणिले. हंबीररावाकडील फक्त पाच पन्नास लोक जखमी झाले. हे वर्तमान विजापूरीस गेल्यावर तिकडून मियाणास सोडविण्यास आणखी फौज चालून आली. हे वर्तमान ऐकून धनाजी जाधव मदतीस धाऊन आला मग चहूकडून लांडगेतोड करुन बेजार करुन दिले..... आईस लेकरु लेकरास आई ओळखीना आपला जीव वाचला तरी सर्व काही मिळेल, परंतु पळावे असेच मनास वाटोव पुनः मराठ्यांचे लढाईची गाठ ईश्वरा घालू नकोस असे अंतःकरणात म्हणावे असे पराक्रम करुन विजापुरी फौजास घालवून देवून व मियाणा बंधूस कैद करुन धनाजी व हंबीरराव गोवळकोंडा येथे शिवाजीस सामील झाले.'[२६]

सभासदाने आपल्या शैलीत येथील प्रसंगाचे चित्रण केले आहे. तो म्हणतो [२७], 'विजापूरचा सरदार हुसेनखान मायाणा पठाण मोठा तोलदार, पाच हजार पठाण, निरंदाज, बरचीवाले, आडहत्यारी असे पंच रुस तसे बहिले बंकुकी तोफखाना असा होता. हुसेनखान म्हणजे जैसा नबाब बेलोलखान याच्या जोडिचा सरदार तो हंबीरराव याजवर चालून आला, मराठे म्हणजे मोठे हरिफ, त्यांनी शर्त करुन भांडण दिधले नीट गचडते घोडी घालून मारामारी केली. हुसेन खानाचे कित्येक लोक मारीले व घोडी मारीली व हत्ती रणास आणिले. मोठे युद्ध बळकट दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्र पर्यंत जाले साहा प्रहरांत कुल फौज बुडविली. हुसेनखान खासा धरिला चार साडेचार हजार घोडी पाडावकेली. बार ा हत्ती पाडावकेले. तसे उठ व बाजे जिन्नस, बिछाईत, खजिना व कापड बेमुहिन सापडले. मोठे झुंज करुन फत्ते केली. रण दुतर्फी अपार पडले.' येथील युद्धाची वार्ता शिवरायांना कळाली. सेनापतीने अल्पशा सै न्य बळावर हुसेनखानाचा पराभव केला. दक्षिण

दिग्विजयाची सुरुवात हंबीररावानी एका विजयानी केली. २००० घोडे मिळाले. काही हत्तीही मिळाले. शस्त्रास्त्रे मिळाली. भरपूर लुटही मिळाली. संपूर्ण मराठा सैन्य ात नवचैनत्य निर्माण झाले. कोणत्याही बलाढ्य शत्रु सैन्याचा सहज पराभव करु शकतो. असा आत्मविश्वास निर्माण झाला. मात्र नागोजी जेधे ठार झाल्याचे दु:ख शिवरायांना झाले. जेध्यांचे गाव कारी या ठिकाणी येवून सर्व कुंटुबाचे सांत्वन त्यांनी केले. आणि ते भागानगराकडे निघाले. आपल्या स्वराज्याची सरहद्द संपत्ताच त्यांनी सर्व सैनिकांना आदेश दिले. 'एक काडी रयतेची तसतस न व्हावी. आवश्यक त्या वस्तू किंमत ा घ्याव्यात, लूट मुळिहीकरु नये ही आ ज्ञा काटेकोरपणे पाळण्यात आली क्वचित उल्लंघन झाले तिथे शिरच्छेदकरुन जरब बसविली गेली.' [२८] आणि महाराज भागानगरामध्ये पोहचले. सेनापती हंबीररावही आपल्या सैन्यासह येऊन मिळाले. मराठा सैनिकानी वाटेत कसल्याही प्रकारची लूट केलेली नव्हती किंवा कोणत्या प्रजेला त्रास दिलेला नव्हता.

## ११) कुतूबशहाची भेट

कोप्पल येथील हुसेनखान मियाणा या पठाणी आदिलशाही सरदाराचा सेनापती हंबीररावांनी पराभव केल्यामुळे भागानगरकडे शिवरायांना जाण्यासाठीचा मार्ग मोकळा झालेला होता. यावरुन शिवाजी महाराज गदग मार्गाने भागानगरकडे गेलेले असावेत. त्यांच्या मार्गातील पहिला अडथळा सेनापतींनी दूर केलेला होता. यावरुन मोहिमेत छत्रपतीच्या सुरक्षिततेसाठी स्वत:ला कवचकुंडलच बनविले होते. शत्रसैन्य हल्ला करणार नाहीत. याची केवळ त्यांनाच काळजी होती. कारण ते हिंदवी स्वराज्याचे सरसेनानी होते. छत्रपती कारीला जाऊन कृष्णाकाठी रायचुरच्या पुढे कुतूबशाही राज्यात पोहचताच सेनापती व त्याचे घोडदळ एकत्र येणे शक्य आहे. मराठ्यांचे सैन्य फारसा गाजावाजा न करता कुतूबशाही राज्यात गेले. कारण स्वराज्यातून निघतानाच छत्रपतींनी आपण साल्हेर रामनगर बाजूस जात आहोत अशी अफवा पसरवली होती. मार्च १६७७ मध्ये शिवराय रामनगला आहे. असा इंग्रजी पत्रात उल्लेख आहे. म्हणजेच भागानगरकडे जाण्याचा मार्ग पाटगाव -बेळगाव-गदग-रायचूर-महेबुबनगर-भागानगर असा असावा. या प्रवासासाठी तीन आठवडे लागले असतील.

कुतूबशाही राज्यात सेनापतींचे व छत्रपतींचे मिळून सैन्यसंख्या २०००० घोडदळ व ४०००० पायदळ होते. पण हे सर्व सैन्य कुतूबशाहाची राजधानी भागानगरला होऊन गेले नसावे केवळ ५००० घोडदळ व अंगरक्षक दल मिळून १०००० लोक कुतूबशहा च्या भेटिसाठी नेले असावे इतर सैन्य वेगवेगळ्या ठिकाणी ठेवले असावे, कारण शिवरायांना लगेच दक्षिणेकडे जावयाचे होते. सर्वच सैन्यांची भागानगरला घेऊन जावे अशी आवश्यकता पण नव्हती. छत्रपती शिवराय व त्यांचे सैन्य कुठल्याही प्रकारची लूट न करता किंवा राज्यातील प्रजेला त्रास न देता येत असल्याचे ऐकून कुतूबशहावर निश्चितच प्रभाव पडला होता. त्यांच्या स्वागतासाठी स्वतः कुतूबशहा काही गाव सामोरे येण्याची तयारी करु लागला. पण शिवरायांनी कुतूबशहाकडे निरोप पाठविला की, 'तुम्ही न येणे आपण वडील भाऊ मी धकटा भाऊ आपण पुढे न यावे'[२९] कुतूबशहाअतिशय आनंदी झाला. त्याने आपला वजीर आक्कण्णा व त्याचा भाऊ मादण्णा यांना स्वागतासाठी पुढे पाठविले. आणि त्यांना छत्रपती शिवराय व त्यांच्या सैनिकांना सन्मानपूर्वक ४ मार्च १६७७ रोजी शहरात नेले. यावेळेच्या प्रसंगाचे वर्णन कृष्णाजी अनंत सभासदानी केलेले आहे. 'रजियांनी आपले लष्करास कूल जरी सामानकेलाच होता सुमूहूर्त पाहून पातशहाचे भेटीस नगरामध्ये चालिले. पातशाहांनी कुल नगर श्रृंगारिले. चौफेरी बिदीस कुंकूमकेशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढीया, तोरणे, पताका, निशाणे नगरात लाविली. नगर-नागरिक लोक, कोट्यानकोटी राजा पाहावयास उभे राहिले. नारीनी मंगलआर्त्या अगणित उजळून रजियास वंदिले. सोने रुपियाची फुले रजियावरी उधळली. रजियांनी लोकास खैरात द्रव्य वस्त्रे अगणित दिली. आणि सर्व सैन्यासहीत दाद महालास पावले'[३०] छत्रपती शिवराय व कुतूबशहा यांची भेट दादमहालात झाल्याचे वर्णन श्री पुरंदरे बाबासाहेब करतात. तर 'शककर्ते शिवराय' या ग्रंथात विजय देशमुख ही भेट दादमहालात झाली नसून गोवळकोंडा किल्यात बाला हिसार हा जो बालेकिल्याप्रमाणे भाग आहे त्या ठिकाणी कुतूबशहाचे दरबार-ए-खास, दरबार-ए-आम इत्यादी महाल होते. दादमहालात जाताना पायत्या चढून जावे लागत नाही. बालहिसारवरील दरबारात जाण्यासाठी मात्र सुमारे ३६० पायऱ्यांची शिडी चढावी लागते. 'खालते उतरु नका आपण खासा येत्ते'[३१] याचा अर्थकुतूबशहा बालाहिसार वरील द रबारात बसलेला होता. शिवरायांच्या

विनंतीनुसार कुतूबशहा शाही महालात बसून होता. सोबतचे सैन्य दादमहालापुढील मैदानात थांबविले. 'महाराजा बरोबर हंबीरराव सरनोबत, रघुनाथ्पंत, निराजीपंत, दत्तोजी वाकनीस व बालाजी आवजी चिटणीस' [३२] होते. हे सर्व जन पायऱ्या चढून शाही महालात गेले. महाराज येत असतानाचे पाहून कुतूबशहा सामोरे आला. गळ्याला गळा लाऊन त्याने महाराजांना क्षेमालिंगन दिले व त्यांचा हातात हात घालून सन्मानपूर्वक आपआपल्या आसनावर दोघेही बसले. जवळच मादण्णा व आकण्णा बसले होते. सोबतच्या सर्व मंडळींना स्थानस्थ होण्यास सांगितले. कुतूबशहाने महाराजासोबत आलेल्या सर्वांच्या भेटी घेतल्या. त्यांचाही यशोचित सन्मान केला. सेनापती हंबीररावांकडे पाहून त्यांच्या सैन्याची शिस्त व वस्त्रालंकार पाहून कुतूबशहा फारच खूष झाला. कुतूबशहाने सेनापतीसह सर्वांना बहुमोल जवाहीर, शिरपाव, हत्ती व घोडे देऊन स्वागत केले. महाराज व कुतूबशहा एक प्रहर म्हणजे तीन तास चर्चा करीत होते. यावेळी महाराजांनीही कुतूबशहाचे स्वागत केले. ज्यावेळी महाराज व त्याचे साथीदार जावयास निघाले तेंव्हा त्यांना पोहचवीत कुतूबशहा महालाखाली आला. परत आपल्या मुक्कामासाठी तयार केलेल्या वाड्यात महाराज गेले. त्यांनी रस्त्यातील अनेकांना द्रव्यदान केले.

भागानगरमध्ये जवळपास एक महिना महाराजांचा मुक्काम होता. भेटीच्या 'दुसऱ्या दिवशी मादळापंताने महाराजांना व महत्वाच्या मुत्सद्यांना आपल्या घरी मेहमानीस आंमत्रित केले. यात हंबीरराव मोहितेचा समावेश होता.' [३३] महाराज सोबत घरी आलेल्या सर्वांना मादण्णा बंधुनी वस्त्रे दिली. महाराजांना वस्त्रालंकार व हत्तीघोडे नजर केले. याही वेळी महाराजांनी व हंबीररावांनी मादण्णा व आकण्णा बंधुना मेजवानी देऊन वस्त्रे व जवाहीर देऊन संतूष्ट केले. एक महिन्याच्या काळात दोन्ही राज्कर्त्यांनी आपआपल्या मुत्सद्यामार्फत चर्चा केली त्यातून तह होऊन एकमेकांनी एकमेकांना सर्वोतोपरी सहकार्य करावे असे ठरले. तहानुसार कुतूबशाही दरबारात महाराजांचा वकील रहाण्याची परवानगी व एक लाख दोन खंडनी शिवरायांना मिळाली. एके दिवशी कुतूबशहाने रघुनाथपंताजवळ शिवरायांच्या सैनिकाच्या कतृबगारी बाबत ऐकले होते. रघुनाथपंतानी शिवरायांचा एक सैनिक हत्तीच्या बरोबरीचा आहे असे सांगितले होते. तेंव्हा ही गोष्ट

शिवरायांबरोबर सेनापती हंबीरराव मोहितेंच्याकानावर घातली असावी. कारण शिवरायांच्या सैन्यांचे सेनापती हंबीरराव होते. त्यांचा रुबाब, शिस्त त्यांचे बाकस्रालांपाहूनच कुतूबशहा आश्चर्यचकीत झालेला असावा राज्याभिषेकानंतर व त्या अगोदर मराठा सैनिकांच्या पराक्रमाबाबतची माहिती कुतूबशहाला मिळाली असावी विजापूरच्या बहेलोलखानाचा पराभव, मोगलांच्या बहादुर खानासोबतच पेडगावचा संघर्ष, हुसेनखानाचा धुव्वा यामुळे सेनापतीच्या भेटी प्रसंगी कुतूबशहा चकीत झालेला होता. तेंव्हा रघुनाथपंत व हंबीरराव यांची चर्चा होऊन पायदळाचे प्रमुख येसाजी कंक यांना बोलाऊन घेण्यात आले. यसाजी कंकचा पराक्रम शिवराय यांच्याबरोबर सेनापतींना असणे स्वभावीक आहे. त्यावेळी येसाजी कंकने हत्तीशी झुंझ देऊन त्याची सोंड धडावेगळी करुन दाखविली. तेंव्हा कुतूबशहा अधिकच आश्चर्यचकीत झाला एक सिपाई एवढा पराक्रमी तर त्यांचा सेनापती कसा असेल याचे नवल वाटने साहजीकच होते. त्यामुळे कुतूबशहा व सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यात चर्चा झालेली असावी. हंबीररावांचेही पराक्रम ऐकल्यामुळे तो खूश झालेला असावा.

## कुतूबशहा व शिवराय यांच्यात जो करार झाला त्यातील अटी

१) स्वारी खर्चासाठी कुत्बशाहाने दरमहा ३ हजार दोन किंवा ४ लाख ५० हजार रुपये महाराजांना द्यावेत.

२) कर्नाटक स्वारीत मदत म्हणून सरलष्कर मिर्झा मुहम्मद अमीन याने १००० स्वार व ४००० पायदळासह महाराजाना मदत करावी.

३) पाश्चात्य गोलंदाजांच्या अमलाखालील कुंतूबशहाचा नामांकीत तोफखाना सामानासह महाराजांच्या सहाय्यार्थ मिळावा व मोबदल्यात.


४) विजापूरकरांनी बळकावलेले कुतूबशहीचा भाग व शहाजीराजांची जहांगीर सोडून जिंकलेल्या भागाचा एक हिस्सा कुतूबशहाला मिळावा अशी कलमे ठरली. मोगलाविरुद्ध कुतूबशाही व हिंदवी स्वराज्य यांनी एकजुटीने उभे रहावे, कुतूबशाही दरबारात महाराजांचा वकील

सतत रहावा व त्यांच्यामार्फतकुत्बशाहाने दरवर्षा एक लाख होन खंडणी महाराजांना द्यावी हेही तहात ठरले.'[३४] तहाची बोलणी झाल्यावर महाराजांना निरोप देण्याचा दिवस ठरवून कुतूबशहाने राजांना भेटीस बोलावले. त्यावेळी शिवरायांना 'जडजवाहीर रत्नाचे अलंकार, हत्ती, घोडे अपरिमीत दिधले. कूल सरकारकून व हंबीरराव व वरकर सरदार यांचे मुजरे महालावरी उभयता छत्रपती बैसून, मुजरे घेऊन, सरदारांचे पराक्रम नांव पाहून, सर्वास अलंकार, वस्त्रे, हत्ती, घोडे, मनूष्य पाहून दिधले.'[३५] छत्रपती बरोबर सेनापती हंबीरराव मोहिते आणि इतर सरदाराना वस्त्रभूषणे देऊन कुतूबशहाने संतूष्ट केले. तहातील अटीनुसार मुबलक द्रव्य व तोफखान्यासह छत्रपती शिवराय आपल्या सैन्यासह कर्नाटकाकडे जाण्यासाठी निघाले.

## १२) दक्षिणेत सेनापती हंबीरराव मोहिते

कुतूबशहाच्या भागानगर भेटीनंतर छत्रपती शिवाजी राजे आपल्या ससैन्यासह **दक्षिणे**कडे निघाले. दक्षिण दिग्विजय म्हणजे शिवरायाच्या पराक्रमाचा कळसच होता केवळ सहा महिण्यात त्यांनी दक्षिण भारतातील शेरखान, नसीरखान या आदिलशाही सरदारांची तामिळनाडू प्रदेशातील सत्ता संपूष्टात अणली. जिंजासारखा प्रबळ किल्ला जिंकून त्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. वेल्लोरला वेढा देऊन शिवराय स्वराज्यात परत आल्यावर सेनापती हंबीररावानी मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. दहा हजार चौरस मैलाचा प्रदेश मिळाला. व्यंकोजी राजाशी सख्य प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न शिवरायांनी केलेला होता. पण त्यात त्याना अपयश आले शेवटी सेनापती हंबीररावांमुळे शहाजीराजांच्या जहांगिरीतील काही प्रदेश मिळविता आला. या मोहिमेच्यावेळी मिळविलेल्या प्रदेशाचा उपयोग शिवरायांचे द्वितीय चिरंजीव व सेनापती हंबीरराव मोहित्यांचे जावाई छत्रपती राजारामांना किती कामी आला हे मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धातून आपणास लक्षात येते.

सेनापती हंबीररावांचा आारनगर ते जिंजीपर्यंतच्या प्रवासाचा मार्ग सांगणारा नकाशा खाली दिलेला आहे.




भागानगरहून छत्रपती शिवराय आपले सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या सैन्यासह एप्रिल १६७७ मध्ये पहिल्या आठवड्यात निघाले. सोबत कुतूबशाही सैन्यांचा सेनापती मोहम्मद अमिन हा एक हजार घोडदळ, चार हजार पायदळ आणि अवाढव्य तोफखाण्यासह कृष्णा नदी ओलांडून कर्नुलच्या ईशान्येस असलेल्या कृष्णा तुंगभद्रेच्या निवृत्ती संगम या तीर्थस्थानी पोहचले. त्या ठिकाणी स्नान करुन शैलम येथील मल्लिकार्जुनाच्या दर्शनासाठी गेले. त्यांच्या सोबत काही निवडक सरदार होते. म्हणजे सेनापती हंबीरराव मोहिते सोबत असावेत येथे ९ दिवस मुक्काम होता. यावेळी त्यांचे सैन्य अनंतपूरला राहिले. हे ठिकाण आत्माकूर असावे असे शेजवलकरांनी म्हटले आहे. आत्माकुराहून शिवराय कडप्या या ठिकाणी पोहचले असता त्यांनी आपल्या सैन्यांचे दोन भाग केले असावे. एका तूकडीचे नेतृत्व स्वतः शिवरायांनी केले त्यांचा मार्ग आत्माकूरकंबंम -

उदयगिरी - पेन्नार काठी सिद्धौट - कडप्पा दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व सेनापती हंबीरराव यांच्याकडे दिले असून ते आत्माकूर - नंदयाल - पेन्नार नदीच्या दक्षिणेस गंडीकोट - कडप्पा अशा दोन मार्गांनी मराठ्यांचे सैन्य कडप्पा येथे पोह चले. कारण कडप्पा व त्याच्याकडे येनाऱ्या दोन मार्गातील सर्व प्रदेशावर मीर जुम्ल्याच्या वर्चस्वाखाली होता. हा कुतूबशहाला न जुमानता मोगलांना दरवर्षी खंडणी देत होता. त्यामुळे त्याच्या दोन्ही बाजुनी सैन्याचा वेढा घातल्याने त्याचेकाहिही चालले नसल्यामुळे त्याने कुतूबशहाचे वर्चस्व मान्य केले असावे. पुढे शिवरायांनी गुत्ती व बेल्लारीला आपले सैन्य पाठवून तेथील अधिकाऱ्याकडून महसूल व बाकी व सूल केली आणि ती सर्व कुतूबशहाकडे पाठविली.

कडप्पा येथून शिवराय पुढे तिरुपती या तिर्थक्षेत्री पोहचले. तेथे व्यंकटेश्वराचे दर्शन घेतले. सोबत सेनापती हंबीरराव मोहिते असावेत. कारण हे तिर्थक्षेत्र प्रसिद्ध असे असून मराठी माणसांना याबाबत प्रचंड श्रद्धा व भक्ती असल्याने शिवराया सोबतच्या सर्वच अधिकाऱ्यांनी दर्शन घेतलेच पाहिजे. तेथे काही दिवस मूक्काम करून ते कलहस्ती या भागात गेले. 'येथे चित्तूरचा नायक पलायपटू बोमराज, पालयमचा नायक, कलहस्तीचा नायक बंगारू याचप्पा व त्याच बरोबर या भागातील वांदिवाशचा नायक'[३७] या सर्वांना शिवरायांची भेट घेऊन आम्ही कुतूबशाहाचे वर्चस्व मोन्य करण्यास त यार आहोत असे त्यांनी गतले कारण ही मंडळी कूतूबशहाच्या वर्चस्वाखालील होती. तेथून ते मद्रासच्या जवळील पेड्डापोलम येथे पोहचले एकदंरीत कडप्याच्या दक्षिणेकडील पालार नदी पर्यतंच्या प्रदेशावर वर्चस्व निर्मान केले. यासाठी शिवरायांना व त्यांच्या सर्व सैनीकांना जवळपास दीड ते दोन महिने लागले असावे. कारण हे सर्व सैन्य चालतच नसून त्या प्रदेशावर आपले प्रशासकीय वर्चस्व बसवित होते.

## १) जिंजीवर मराठ्यांचे वर्चस्व

पेडापोलम हे मद्रासच्या पश्चिम दिशेला असून त्यातील अडीच कोस अंतर आहे. त्या ठिकाणी शिवारायांनी मूक्काम केला. पेडापोल महून लवकरच त्यांनी पाच हजार स्वार जिंजीच्या,

किल्याकडे कांचीवरमच्या रस्त्याने रवाना केले.[३८] याचे नेतृत्व सेनापती हंबीरराव मोहिते यांनी केले असावे. यावेळी जिजीचा विजापूरी किल्लेदार नसीर महमदखान हा होता यांच्याशी गूप्त चर्चा करून दरवर्षी ५० हजाराची जहागीर देण्याचे अमिष दाखवून हंबीररावानी हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. नंतर शिवराय तेथे पोहचले त्यांनी रायानी मेल्यास किल्लेदार नेमले असे सरदेसाई म्हणतात.

इंग्रजी रेकार्ड प्रमाणे ९मेला शिवाजीच्या घोडदळाची एक तूकडी कांचीवरमला होती. कांजीवरमहून शिवाजीने जिंजी गाठले. १५ मे ला त्याचे घोडदळ जिंजीला पोहोचले व १७ मेच्या आधीच किल्ला स्वाधीन झाला जिंजी घेतल्यावर तिथे न थांबता शिवानी उत्तरेस अर्णी - वेल्लोरला गेला. असे मेजर जोशी म्हणतात.

शिवराय जिंजीला पोहचया अगोदरच सेनापती हंबीररावांनी जिजींचा किला आपल्या ताब्यात घेतलेला होता. शिवरायांच्या आदेशावरून सेनापती हंबीरराव व रघूनाथ पंतानी तेथे स्वराज्याप्रमाणे जमीनदाऱ्याची व्यवस्था लागू केली. किल्ल्याची डागडूजीही केलेली होती कारण जिंजीचा किल्ला हा निसर्गत. दुर्गम असून बळकट होता. जिंजीलाच चंदी म्हणत. हा आदिलशहाचा किल्ला एवढा बळकट होता की, जर मराठ्याच्या ताब्यात असता आणि इतर शत्रूंनी त्याला वेढा दिला असता तरकमीत कमी सहा वर्ष हा किल्ला शत्रुच्या ताब्‍यात आला नसता. भविष्यात हा किल्ला स्वराज्याला उपयोगी पडेल म्हणून त्याची विशेष डागडूनी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरूज बाध्याचे आदेश दिले. हे सर्व काम सेनापतींनी करून घेतले. कारण शि वराय कर्नाटकामध्ये जास्त दिवस थांबले नव्हते. तर सेनापतीच पाठिमागे राहिले होते. त्यांना या किल्ल्याचे लष्करी महत्व पटले होते. येथे केलेले सर्व कष्ट कामी आले. कारण त्यांच्या पश्चात ताराराणी या मुलीचा विवाह शिवरायांचे व्दितीय पूत्र राजारामाशी झालेला होता. स्वातंत्र्य यूध्दाच्या वेळी ताराराणीनेच आपल्या पतीला जिववाचवण्यासाठी जिंजीला पाठविले होते. कारण जिंजी येथे केलेल्या कार्याची आठवण आपल्या मूलीला लाहानपनी करून दिलेली होती. तेथे गेलेले छत्रपती


राजारामाला आपल्या वडिलांच्या दूरदृष्टी बरोबर सासऱ्यांनी जी बांधणी केलेली होती. याची निश्चितच आठवण त्यावेळी झालेली असावी. या वेळी त्यानी साथ रघूनाथपंताची होती कारण रघूनाथपंताना कर्नाटकातील सर्व भौगोलिक व राजकीय परिस्थितीचा अभ्यास होता. शहाजी राजांच्या कार्याचा प्रभाव त्यांच्यावरही होता. कर्नाटकामध्ये शहाजीराजानी आपले स्वत:चे आस्तित्व निर्माण केले होते. याची त्यांना जाण होती. त्यांच्या अनूभवाचा कायदा हेबीररावांना करून घेता आला.

## २) शेरखानाचा पराभव

कर्नाटकच्या प्रदेशातील एक-एक प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली येत असताना शेरखानाचे सैन्य वेगवेगळ्या किल्यात होते. ते बाहेर येऊन मराठ्यांशी लढत नव्हते. किल्याच्या सभोवतालच्या प्रदेशावर मराठ्यांचे सैन्य असल्यामुळे किल्यातील सैनिकांना बाहेरुन विजापूरकरांची रसद मिळत नव्हती. बहेलोलखान सैन्य घेऊन येईल या आशेची सैन्य वाट पहात होते. त्याला फ्रेंचाची मदत असल्याने त्यांच्या विचाराने तो शांत होता. यावेळी त्याचे सैन्य वलिदावूरला होते आणि तो गुडेलूरला होता. शिवराय जिंजी या ठिकाणी होते. सेनापती हंबीरराव सभोतालचे प्रदे श जिंकून घेत होते. फ्रेंचाच्या बातमीप्रमाणे १२ जूनला वलिदावूर जवळून सैन्य मागे घेतले होते. पण तिरुवडीच्या जवळची तिरुवत्तैनेल्लूर व पानेमूल ही ठिकाणे मराठ्यांनी जिंकून घेतली होती. पोत्रैयार नदी ओलांडून शेरखानाच्या जवळ मराठे आले होते. दुसऱ्या दिवशी शेरखानाचे काही सैन्य वलिदावूर भागात रसद मिळविण्यासाठी गेलेली होती. पण त्यांना काहिही मिळाले नव्हते. तेंव्हा ते पाँडेचरीला फ्रेंचाकडे गेले. पण तेथेही त्यांना काही मिळाले नाही. या अगोदरच शिवरायांनी शेरखानाला कोणाकडूनही रसद पुरवठा मिळू नये याची दक्षता घेतलेली होती. तिरुवाडिला मराठ्यांचे पायदळ होते. पण ते तोफखानाच्या टप्याचे बाहेर उभे होते. ते तेथेच थांबल्याचे पाहून ते आपणास भितात असे समजून आपल्या घोडदळाला त्यावर हल्ला करण्याचे आदेश दिले. तरी पण मराठे काही जागाच सोडेनात हे ओळखून आपल्या सैन्याला परत बोलावले असता मराठ्यांचे घोडदळ

बाजूलाच होते. त्यांनी शेरखानाच्या सैन्याचा पाठलाग केला असता यावेळी मराठ्यांचे घोडदळ किल्यातील तोफांच्या टप्प्यात आले तरी तोफखाना चालू झालेला नव्हता. कारण स्वतः शेरखान तोफांच्या माऱ्यात सापडला होता. त्यामुळे तोकिल्यात जाऊ शकला नाही. लगेच शिवरायांनी किल्याला वेढा दिला. यावेळी त्याचा मुलगा व सासरा सैन्यासह किल्यात अडकले. शेरखान आपला जीव वाचवन्यासाठी भूवनगिरीला पळून जावे लागले. त्याच्या पाठलागावर मराठे होते. आणि तो किल्यात वेढला गेला. या पाठलागात ५०० घोडे, २ हत्ती, २० उंट, बैल, नगारे, तंबू व इतर सामान मराठ्यांना मिळाले. आता शेरखानाला शरन आल्याशिवाय पर्यायच नव्ह ता. सर्व गोष्टींचा विचार करुन शिवरायांशी बोलणी चालू करुन तहानुसार त्याने आपल्या मुलाला ओलीस ठेवले. आणि त्याचे सर्व किल्ले व प्रदश मराठ्यांच्य ावर्चस्वाखाली आले.

सेनापती हंबीररावांच्या घोडदळाने शेरखानाला पराभूत केल्याची ठिकाणे



शेरखानाचा पराभव करण्यात छत्रपती शिवरायांचा सिंहाचा वाटा होता. त्यांच्याच डावपेचामुळे तो एकाकी पडला व फारसा संघर्ष न होता तो शरणही आला पण य ाबरोबरच्या चकमकीत सेनापती हंबीरराव व त्यांचे घोडदळ निश्चितच कामी आले असावे.

## ३) सेनापती हंबीरराव मोहिते व व्यंकोजी राजे यांच्यातील युद्ध

छत्रपती शिवराय आपल्या सैन्यासहकर्नाटकाकडे नि ाघाले. वाटेत ठिक -ठिकाणी खंडण्या वसूल करीत कर्नुल, श्रीशल्य, कडप्पा येथून मद्रासच्या किनारपट्टीवर गेले. तेथे त्यांनी जिंजीचा प्रसिद्ध किल्ला विजापूरचा सरदार नासीर महंमदखान याच्याकडून जिंकून घेण यात आला. वलिगंडपूरचा विजापुरी सरदार शेरखान लोदी याचा पराभव करुन त्यांनी आपले राज्य मद्रास व कर्नाटकाच्य प्रदेशात निर्माण करत असताना कर्नाटकातील शहाजीराजांच्य जहागिरीचा अर्धा वाटा आपणास मिळावा म्हणून महाराजांनी व्यंकोजी राजाला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. त्यानुसार बोलणी चालू केली. कोणत्याही प्रकारचा गृहकलह न होता उभय बंधुतील वाद मिटावा म्हणून व्यंकोजी राजांना भेटीला बोलावले.

व्यंकोजी राजे आपल्या राज्याचे कारभारी काकाजीपंत, जगनाथपंत, कान्हेरपंत यासह सोबत 'प्रतापजी राजे, भिवजी राजे वगैरे सापत्न बंधुनाही त्यांनी घेतले शहाजी राजांची ही अनोर स मुले शिवाय दोन हजार स्वार बरोबर घेतले व राजे निघाले. चिरंजीवसाहेब भेटीस येत आहेत हे समजताच महाराज 'छत्रपती' नात्याने सामोरे निघाले. लवाजमा घेऊन महाराजांनीस्तीन तिरुपतोरा गाव ापर्यंत सामोरेगेले. शिवाजी महाराज व यंकोजी महाराज यांची भेट एका शिवमंदिरात झाली. प्रतापजी राजे, भिवाजी राजे, संताजी राजे वगैरे आपल्य इतर बंधुनाही महाराज प्रेमाने भेटले. तेथून सर्वजन तिरुमलवाडीच्या छावणीत आले. थोरले महाराज यांनी उभयतांचा बहूत आदर-सत्कार केला मेजवाण्या, वस्त्रेभूषने वगैरे पाहूणचार यथायोग्य झाला. आठ दिवस (दि.२० ते २७ जूलै १६७७)व्यंकोजीराजांचा मुक्क ाम महाराजापाशी होता.[३९] एके दिवशी शिवरायांनी त्यांना एकांती बोलावले. 'तुम्ही आम्ही प्रत्यक्ष बंधू थोरले महाराज निवर्तल्यास आज

तेरा वर्ष झाली. त्यांच्या मागो सर्व दौलति चा उपभोग तुम्हीच एकट्यांनी घेतला. वडिलोपार्जित दौलतिचे आम्ही उभयता विभागी तुम्ही आम्हास काही एक न कळविता आपल्या मनास येईल तशी दौलतिची वहिवाटकेली. आम्ही विभाग मागतो आहो तो तुम्ही स्व पराक्रमाने संपादिलेल्या दौलतिचा नव्हे. तुम्हांस ईश्वराने नवीन दौलत संपादावयाचे सामर्थ्य व बुद्धी द्यावी आणि आम्ही ती पाहावी, अशी आमची फार इच्छा आहे. परंतु वडिलांच्या जोडिची व्यवस्था आमच्या विचाराशिवाय करणे तुम्हांस विहित नाही. काय काय दौलत आहे तिचे कागदपत्र वगैरे असतील ते आम्हांस दाखवा. तुम्ही आम्ही समजून चालू तुम्हांस जड पडेल तेथे आम्ही तुम्हास अवश्य मदत करु. तुम्ही मनात कोणत्याही प्रकारचा किंतू ठेवू नये![४०] असे महाराजांनी समजावून सांगितले. पण व्यंकोजी राजांनी कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही. 'व्यंकोजी राजांना ही गोष्ट मान्य नसावी आम्ही जिवाशा न धरिता राज्य मिळविले. त्यात तुमचा संबंधकाय ? वडिलांनी मिळविले, त्याप्रमाणे आम्हाकडे असल्यास वाटावे म्हणतील तेंव्हा दौलताबादकडील व विजापूरकराकडील सरंजाम व दिल्लीचे तहातील आला विषय आम्हास नसावा .'[४१] यावेळी व्यंकोजी राजांना विजापूरच्या आदिलशाहीशी असलेले संबंध तोडायचे नव्हते तर शिवरायांना कर्नाटकच्या प्रदेशात शत्रू असावयास नको वाटत होते. 'व्यंकोजी राजे आपल्या म्हणन्याप्रमाणे वागण्यास कबूल नाहीत असे पाहून त्यांनी त्यास आपल्यागोटातून जाण्यास निरोप दिला व त्यास तंजावरपर्यंत पोहोचविण्यास हंबीरराव मोहिते, रुपाजी भोसले, मानसिंग मोरे व अप्पाजी रंगनाथ केळकर यास बरोबर दिले.'[४२] उभयतानमध्ये चर्चा झाली. व्यंकोजी राजांना शिवरायांची भिती वाटू लागली. एके दिवशी न सांगता व्यंकोजी राजे पळून गेले. याबाबत 'चैत्र मासी वद्य १२ रा जेश्री त्रिंबकपंत दबीर यांनी सिवपुरी श्रावणमासी राजश्री सिवाजी राजे याची व राजश्री येकोजी राजे याची भेटी जाली परस्परे कित पडोन येकोजी राजे न पुसता पळोन तंजावरास गेले.'[४३] त्याच बरोबर 'एकोजी राजे यांच्या कारकूनांनी व कारभारी यांनी त्यांचे पोटात भय घातलेकी, राजे तुम्हांशी खटखट करुन बिरदे जोरावारीने घेतील। असे सांगून, त्यास धास्त उत्पन्न करुन रात्रीचे वेळेस व्यंकोजी राजे पळून चंदावरास बिरदे घेऊन गेले.'[४४]

यावरुन व्यंकोजी राजे शिवरायांची भेट घेण्यासाठी आले असता शहाजीराजांच्या जहागिरीतील अर्धा हिस्सा मागितल्याने शिवरायांना न सांगता व्यंकोजी राजे तंजावरकडे रात्रीच्या वेळी पळून गेले. तसेच आठ दिवसाच्या सहवासामध्ये सेनापती हंबीरराव मोहिते म्हणजेच व्यंकोजी राजांच्या मामांचे चिरंजीव आते / मामे यांच्यात भेट झाली असावी. त्यांनी ही जहागीरीच्या वाटणी संदर्भात चर्चा केली असावी. पण व्यंकोजी राजे कोणाचेही न जुमानता परत गेले. दुसऱ्या दिवशी शिवरायांना ही वार्ता कळाली तेंव्हा आश्चर्य वाटले की, 'काय निमित्त पळाले ? आम्ही त्यास धरीत होतो की काय ? आम्हास बिरदे काय करावयाची ? ..... द्यावयाची नव्हती तरी न देणे उगेच उठून पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धीही धाकटेपणा योग्य केली' [४५] शिवरायांनी आपल्या अधिकाऱ्यामार्फत व्यंकोजी राजांना सांगून पाहिले. 'ग्रह कलह बरा नव्हे' असे सेनापती हंबीररावानिही सांगितले असावे. कर्नाटकामध्ये सर्वात विश्वासू व जवळचे नातेवाईक सेनापतीच होते. सेनापतींच्य ाआत्याचा मुलगा म्हणून व्यंकोजी राजे होते तर शिवराय हे सख्या बहिणीचे पती म्हणजे नात्याने मेहुने होते. या नातेसंबंधाचा विचार केला तर दोन भावामध्ये वाद होऊ नये असे प्रामाणीक मत हंबीररावांचेच होते. उर्वरीत अधिकारी हे आपआपल्या धन्याच्या हिताचा विचार करत होते. पण निःस्वार्थी व निः पक्षपातीपणे गृहकलह वाढू नये हे केवळ हंबीररावांना वाटणे साहजिक आहे. या गृहकलहामध्ये फायद्या ऐवजी नुकसान जास्त वाटत होते. शिवरायांना जहागिरीचा अर्धा हिस्सा मिळेल. मात्र सावत्र बंधू हे बंधू न रहाता शत्रू बनतील याची भिती त्यांना वाटत होती. पण दोघापैकी एकाची बाजू घेणे यावेळी आवश्यकच होते. सेनापतींनी सर्व प्रकारचे प्रयत्न करुन पाहिले. पण शेवटी शिवरायांनी सेनापतीला जहागिरीचे प्रदेश जिंकून घेण्याचे आदेश दिले. महाराज वेलुरास आले तेथील वेढ चालू ठेवून आसपासचे प्रदेश जिंकण्याचे आदेश सैनिकांना दिले. महाराज गड, जगदेव गड, कर्नाटक गड वगैरे किल्ले त्यांनी काबीज केले. जहागिरीतील कोल्हार, बालापूर, बेंगरुळ, शिरटे, वासकोट ही ठाणी जिंकून घेतली. 'कर्नाटकात जिंकलेल्या प्रदेशाची जबाबदारी रघुनाथ नारायण हणमंते आणि सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यावर सोपविली. जिंजी प्रदेशाचा व किल्ल्याचा बंदोबस्त केल्यानंतर आश्विन मासी (१७ सप्टेंबर ते १६

ऑक्टोबर दरम्यान) रघुनाथ हणमंते यांना चंदीचा साहेबसुभा सांभाळ ण्यास दिला. त्याना मजमू देऊन एक लाख दोन बक्षिस दिले. त्यांच्याजवळ तूर्त फौज असावी म्हणून सरनौबत हंबीरराव मोहिते व संताजी भोसले यांनाही जिजीस ठेऊन महाराज निर्धास्त झाले.'[४६] आणि कर्नाटकातील आदिलशाही प्रदेशात धुमाकूळ घालून खंडव्या वसूल करत असताना त्यांच्या हेराकडून दिल्ली दरबाराची पत्रे आली. मोगल सम्राट औरंगजेब मोठ्या फौजेसह दक्षिणेकडे स्वारी करण्याच्या विचारात आहे तशी तो तयारी करीत आहे. ही वार्ता समजताच शिवराय कर्नाटकातून स्वराज्याकडे निघाले आपण जिंकलेला प्रदेश सुरक्षित रहावा यासाठी योग्य बंदोबस्त करण्यासाठी संताजी भोसले (शहाजी राजांचे रक्षापुत्र), रघुनाथपंत हणमंते व सेनापती हंबीरराव मोहिते आपल्या सैन्यासह मागे ठेवले संताजी भोसले व रघुनाथ पंतानी कर्नाटकातील सर्व प्रदेशाची माहिती असल्यामुळे सेनापती हंबीररावांच्या सोबत ठेवले होते. वास्तवीक तेथील कारभाराची जबाबदारी ही हंबीररावावर होती. पण तेथील सर्व प्रदेश नवीन असल्याने हंबीररावांना त्यांचे साह्य होईल यासाठीच सोबतीला दिलेले होते. तेथील सर्व जबाबदारी सोपवून शिवाजी राजे 'आक्टोबर १६७६ च्या शेवटी आनंदराव व मानाजी मोरे यांच्या चार हजार घोडेस्वारासह महाराष्ट्राकडे निघाले.' [४७] ही बातमी व्यंकोजी राजांना कळताच त्यांनी दक्षिणेतील मदुरा व म्हैसुरच्या राजाला मदत करण्याची विनंती केली. परंतु त्यांच्याकडून कोणतिही मदत मिळू शकली नव्हती. आपल्या सोबत असलेल्या सैन्यांच्या बळावर शिवरायांनी जिंकलेले जहागिरीचे किल्ले व प्रदेश जिंकून घेण्यासाठी प्रयत्न सुरु केले. 'मराठी फौजेवर वालगंडपूरम येथे हल्ला चढविला. व्यंकोजीराजाकडे ४००० स्वार व १०००० पायदळ होते. मराठी सैन्यात ६००० स्वार व ६००० पायदळ होते. आणि त्याचे नेतृत्व सेनाप ती हंबीरराव मोहिते व संताजी भोसले यांच्याकडे होते. सकाळपासून सायंकाळपर्यंत उभयपक्षी जोरदार लढाई होऊन शेवटी मराठी फौजेचा पराभव झाला.'[४८] सेनापती हंबीरराव मोहितेंना अतिशय वाईट वाटले. व्यंकोजी राजे आपल्या सैन्यावर हल्ला करतील असे स्वप्नातही वाटले नव्हते. आपण त्यांना समजावून सांगितले होते. आपला त्याबाबत हक्क होता कारण आपल्या वडिलांच्या बहिणीचे पूत्र व्यंकोजी राजे (आतेभाऊ) तर त्यांच्या मामाचे पूत्र आम्ही. आता आपल्यातील नाते आपण

सांभाळण्याचा प्रयत्न केला. पण व्यंकोजी राजांनी तसा काही एक विचार केला नाही असे समजून सैन्यांची जमवाजमव करुन व्यंकोजीचा पराभव करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. व्यंकोजीचे सैन्य आपणाला विजय मिळाला. मराठे पळून गेले असे समजून बेसावधपणे विश्रांती करत होते. 'घोड्यावर खोगिरे चढविली. हाती तलवार घेऊन मराठे व्यंकोजीराजांच्या तळावर मध्यरात्रीच हल्ल्यासाठी गेले. व्यंकोजी राजांचे सैनिक बेसावध होते. मराठ्यांचा हल्ला होताच सर्वत्र हाहाःकार माजला. व्यंकोजी राजांच्या फौजेची दानादान उडाली. हत्ती, घोडी व प्रचंड सामानसुमान मराठ्यांच्या हाती पडले. मुख्य सेनानी कैद झाले. व्यंकोजी राजे काही लोकासह आपला जीव वाचवून कावेरीपार झाले.'[४९] अशा रितीने झालेल्या युद्धात सेनापती हंबीररावांनी विजय मिळविला.

येथील युद्धाचा वृतांत सुरतकर इंग्रज दिनांक २० व २९ नोव्हेंबर १६७७ च्या पत्रातून देतात.

'कैं.रे.सुरत भा.१०७ (१९९५) श.१५९९ मार्ग शु.६ व शु.१५

कु. २३-२४ इ. फोर्ट जॉर्ज - सुरत इ.स.१६७७ नोव्हेंबर २० व २९

४००० घोडे स्वार घेऊन शिवाजी विजापुरच्या किंवा कदाचित स्वतःच्य राज्याच्या रोखाने गेला आहे असे ऐकितो. त्याचे बाकीचे सैन्य त्याने नवजीत प्रांतातच ठेविले. लवकरच परत येतो, असे सांगून तो गेला आहे. आपले गेलेले राज्य परत मिळवावे म्हणून, तसा तो न आल्यास, एकोजी आणि त्याचे साथीदार तयारी करीत आहेत. गोवळकोंड्याच्या सैन्याची मोगल-बहलोलशी लढाई झाली. तीत गोवळचा पराजय झाला. त्यामुळे थोडे भय वाटते.

जिंजीकडील मुलूखात ठेविलेला शिवाजीचा भाऊ आणि दुय्यम संतोजी ह्यांचे ६००० स्वार व ६००० पदाती एवढे सैन्य गेले काही दिवस तंजावरच्या एकोजीशी (४००० स्वार व १०००० पायदळ) लढण्यात गूंतले होते. सकाळपासून संध्याकाळपर्यंत युद्ध झाले. त्यात संतोजीचा पराजय झाला व पाककोसपर्यंत त्याचा शत्रुने पाठलाग केल्यामुळे पाऊणकोस पर्यंत तो मागे हटला. छावणीत पोचल्यावर ह्या पराजयाचे दुरवरचे परिणाम आणि आपली होणारी बदनामी याचा

आपल्या बरोबरच्या सरदारांशी विचारकरुन त्यांनी लगेच पोशाख व खोगिरे चढविली. निराळ्या वाटांणी जाऊन शत्रुचे लोक त्या दिवशिच्या परिश्रमामुळे विश्रांती घेत बेसावधपणे पडले असता भर मध्यरात्री जाऊन त्यांनी त्यांची भयंकर कत्तल केली. त्या छाप्यात त्यांनी हजार घोडे मुख्य, सेनापती व सर्व तंबू वौरे सामान मिळविले. पेंढ्याऱ्यांनी त्याशिवाय आणखी १०० घोडे व किरकोळ लूट नेली. बाकिचे एकोजीचे लोक कावेरिपलीकडे तंजावरकडे पळाले या जयामुळे शिवाजीचा ताबा यापुढे शांततेने होईल असे वाटते. मदुरेचा नबाब तटस्थ राहिलेला आहे.'[५०]

सभासदानेही या लढाईचा वृत्तांत दिलेला आहे.कर्नाटकात हंबीरराव फौजेनिशी व रघुनाथ नारायण ठेविले होते हे वर्तमान व्यंकोजी राजे यास कळोन राजियांनी आपली फौज व पाळेगारांची फौज मिळविली, आणि हंबीरराव यावरी चालून आले ते समयी हंबीरराव याचे चौगुणी घोडा राऊत हशम अगणित व्यंकोजी राजे यांचे होते. मग यास त्यास युद्ध झाले. मग राजियाचा पुण्यप्रभाव अधिक आणि भाग्योदय, हंबीरराव यांनी व्यंकोजी राजियाची फौज मोडली मोठे युद्ध जाहाले अगणित रण पडले. आणि व्यंकोजी राजियाचे चार हजार घोडे पाडाव केले व हत्ती जड-जवाहीर बाजे सरदार भिवजीराजे व प्रतापजी राजे वरकडही नांमाकित लोक पाडाव केले. अशी फत्ते केली. यश आले आणि पाडाव केले. सरदारास वस्त्रे देऊन सोडिले. यावरी रघुनाथपंत व हंबीरराव चालोन चंदावराकडे गेले. मग व्यंकोजी राजे यांनी सभ्य मनुष्य मध्यस्त घालून सख्य करावे असे जाले. त्याजवर रघुनाथपंती व हंबीररावांनी राजियाकडे जासूद पत्रे देऊन पाठविले. मग राजियास वर्तमान कळोन या उभयतांस उत्तर पाठविले की, 'व्यंकोजी राजे आपले धाकटे बंधु आहेत. मुलबुद्धी केली. त्यास तोही आपला भाऊ, त्यास रक्षणे, त्यांचे राज्य बुडवू नका' अशी उत्तरे आलियावरी उभयतांनी व्यंकोजी राजे याशी सला केला आणि द्रव्यही उदंड घेतले.' [५१] दरम्यान व्यंकोजी आपल्या सैन्याशी लढतात आणि आपण त्यांच्याशी समझोता करतो. या विषयी शिवरायांना अतिशय दुःख झाले. आपल्या कुंटुबामध्ये भाडणे होऊ नयेत म्हणून त्यांना कुतूबशहाकडून तीन लाखाची जहागीर तसेच महाराष्ट्रातील तुंगभद्रेच्या जवळील पन्हाळ प्रांतातील तीन लाख उत्पन्नाचा प्रदेश देऊ असे कळविले होते. परंतु हा प्रस्ताव व्यंकोजी राजांनी धुडकावून

लावला होता. त्यामुळे सेनापती हंबीरराव मोहितेंनी व्यंकोजीच्या राज्यातील अरणी, बंगरुळ, कोल्हार, होसकोट, शिराळकोट ही महत्वाची ठाणे जिंकून घेतली डिसेंबर १६७७ पर्यंत सेनापतींचे सैन्य व्यंकोजी राजाच्या सैन्याशी लढत होते. जवळपासच्या सर्व प्रदेशावर हंबीररावांनी वर्चस्व निर्माण केले होते. केवळ त्यांची राजधानी तंजावर जिंकून घेने शिल्लक होते. त्याची तयारी चालू असताना छत्रपती शिवरायांचा निरोप आला 'राज्य बूडवू नका.' हंबीरराव अस्वस्थळीत झाले. सोबतच्या रघुनाथपंताशी चर्चाकेली. आणि व्यंकोजी राजाशी तह करण्यात आला. याबाबतची माहिती शकावलीमध्ये आहे. 'कार्ति (क) मासी येकोजी राजे फौऊजेनिसी हंबीराव सरनोबत यासी करनाटकात अहिरी पासी झगडा जाला येकोजी राजे यानी तीन हजार घोडी व हत्ती पाडाव केले सरदार पाडाव केले आणि जाऊन त्रिपदीस बैसले मग कोल्हार कोट येकोजी राजे यानी देऊन सला केला.'[५२] महाराजांनी बंगरुळ होसकोट व शिरे असे पाच लक्ष उत्पन्नाचे तीन महाल व्यंकोजी राजांच्या पत्नी चिरंजीव सौभाग्यवती दिपाबाईसाहेब यांना चोळीबांगडीसाठी दिले व तजांवरसहित जिंजीलगतचा सात लक्ष होनांचा मुलुख चिरंजीव राजेश्री व्यंकोजी राजे यांना दुधभातासाठी इनाम परंपरेने दिला.'[५३] परंतू आपला पराभव व नाम्मुष्की या विषयी सतत विचार करु लागले. काय करावे आणि काय करु नये अशी मनस्थिती बनली. उदास व हताशपणे जीवन जगू लागले. कुठेतरी तीर्थक्षेत्री जाऊन आपला कार्यभाग संपवावा असे गुणगुनू लागले. त्यांची पत्नी दिपाबाईनी आपल्या पतीला सावरन्यासाठी दूतामार्फत आतेभाऊ सेनापती हंबीरराव मोहिते व केस्काळचे राज्याचे कारभारी असलेले रघुनाथपंताकडे जासुदामार्फत सर्व वृत्तांत कळविला. हंबीररावांनाही यावेळी वाईट वाटले असावे. आपण व्यंकोजीला अनेकदा समजावलो आणि सल्लेही दिले. पण त्यांनी ते ऐकले नसल्यामुळे केवढा अनर्थ घडला. आम्हाला त्यांच्या विरुद्ध म्यातील तलवार बाहेर काढावी लागली. 'जे झाले ते झाले' यातून मार्ग काढण्यासाठी रघुनाथपंताच्या माध्यमात ून स्वराज्याकडे निरोप पाठविण्यात आला. छत्रपती शिवरायांनाही वाईट वाटले आणि आपल्या लहान बंधुला पुन्हा एक पत्र पाठविले. ते त्या पत्रात म्हणतात. 'तुम्हांला ऐसा कोणता प्रसंग पडला जे इतक्याच्याच मध्ये आपल्य ासंसाराचीकृतकृत्याता मानून, नसते वैराग्य मनावरी आणून, कार्य

प्रयोजनाचा उद्योग सोडोन, लोकांहाती रिकामेपणी द्रव्य खावून नाश करवणे व आपल्या शरीराची उपेक्षा करणे हे कोण शहाणपण व कोणती निती ? आम्ही तुम्हास वडिल मस्तकी असता चिंता कोणे गोष्टीची आहे ? या उपरी सहसा वैरा न धरिता मनातून विपष्णता काढून कालक्रमणा करीत जाणे. सणवार, उत्साह पूर्ववत करीत जाऊन तुम्ही आपले शरीरसंरक्षण बरे करीत जाणे.... तुम्ही त्या प्रांते पुरुषार्थ करुन संतोषरुप असलिया आम्हास समाधान व श्लाघ्य आह्मेकी कनिष्ठ बंधू ऐसे पुरुषार्थी आहेती... पुरुषार्थ व कीर्ती अर्जेणे... वैराग्य उत्तर वयी कराल तेवढे थोडे आज उद्योग करुन आम्हासही तमासे दाखविणे.'[५४] या पत्राचा बहूतेक व्यंकोजीवर परिणाम झाला असावा या पत्रव्यवहाराशी निश्चितच सेनापती हंबीरराव मोहितेचा संबंध असावा. कारण सेनापती हंबीरराव व व्यंकोजी हे एका नात्यातील होते. कार्यापेक्षा काहीवेळा नाती ही श्रेष्ठ असतात हेकर्नाटकातील माहिमेवरुन आपणास समजते. शेवटी शिवरायांनी आपल्या मनाचा मोठेपणा म्हणून वडिलकीच्या नात्याने व्यंकोजीला क्षमा करुन त्यांचे राज्य वाचविले आणि संपतीपेक्षा नाती श्रेष्ठ असतात हे त्यांनी दाखवून दिले. यामध्ये सेनापती हंबीररावांचे योगदान असणे काही वावगे नाही आपल्या छत्रपतींच्या विचाराचा वारसा सेनापती हंबीररावावर होता. त्यामुळे ऐमांराना तून व्यंकोजीला यांनी सोडून दिले. त्यांची समजूनाढण्याची प्रयत्न करण्यात आला. क र्नाटकामध्ये नवीन मिळविलेल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माकेली. अनेक किल्ल्याची डागडुजी करुन घेतली. अनेक अधिकारी नव्याने नियुक्त केले. भविष्यात द.भारतातील राज्यात अराजकता निर्माण होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली. या सर्व कार्यात रघुनाथपंताची व संतानी भोसलेंची साथ मिळाली हे कार्य हंबीररावांच्या विश्वासाचे प्रतिकच होते. एक विश्वासू, कर्तव्यदक्ष, लढवय्या, शुर सेनानींच्या खांद्यावर जबाबदारी देवून शिवराय महाराष्ट्राकडे गेलेले होते. त्यांच्या विश्वासाला सेनापती हंबीरराव हे सार्थ ठरले.

## ४) वेल्लोरच्या किल्ल्यास वेढा


छत्रपती शिवाजी राजे व सेनापती हंबीरराव मोहिते यांनी जिंजीच्या किल्ल्यावर वर्चस्व निर्माण केल्यानंतर उत्तरेला असलेल्या वेल्लोरकडे आपला मोर्चा वळविला. सभोतालचे प्रदेश जिंकून घेण्यासाठी छत्रपतींनी हंबीररावांना आदेश दिले आणि स्वतः छत्रपतींनी वेल्लोरच्या किल्ल्यास इ.स.१६७७ च्या मे महिन्यात वेढा घातला. हा किल्ला आदिलशहाच्या वर्चस्वाखाली होता. अब्दुल्लाखान नावांचा हबशी किल्लेदार होता. आदिलशाहिचे अतिशय महत्त्वाचे हे ठाणे होते. हा किल्ला प्रचंड मोठा असून भुईकोट किल्ला म्हणून प्रसिद्ध होता. याचे वर्णन सभासदाने केलेले आहे. तो म्हणतो,[५५] 'तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाही. कोटांत जीत पाणियाचा खंदक पाणियास अंत नाही. उदकात दहा हजार सुसरी कोटाचे फांजियावरुन दोन गाडिया जोडून जावे ऐशी मजबुती पडकोट तरी चार चार फेरिया वरी फेरे. ये जातिचा कोट' असून इ.स.१६६६ च्या काळात विजयनगर साम्राज्याचा सुभेदार चिन्नबोमी नायक याने हा भुईकोट किल्ला बांधला होता. विजयनगरच्या अस्तानंतर आदिलशहाने हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला होता. या किल्ल्यास दुहेरी तटबंदी असून पहिला तटभिंत ही उंच असून दुसरी त्याहून लहान होती. दोन्ही तटबंदीच्या मधोमध १६ ते २० मिटर रुंद खंदक होते. या किल्ल्यात जलकंठेश्वराचे मंदीर आहे. असा किल्ला जिंकून घेने अवघडच होते. छत्रपतींनी जिंजीच्या नासिर महंमदाच्या मध्यस्थीने अब्दुल्लाखानाशी बोलणी केली. परंतु अब्दुल्लाखानाने मराठ्यांशी तह न करता त्यांच्याशी लढण्याचा आपला बेत कळविला. तेंव्हा किल्ल्याच्याजवळ असलेल्या दोन डोंगरावर दोन किल्ले बांधण्याचे आदेश दिले. लवकरच मराठी कलेचे दोन किल्ल्याचे बांधकाम पूर्ण झाले. त्यांना शिवरायांनी 'साजरा गोजरा' अशी मराठी नावे दिली. या किल्ल्यावरुन तोफा चढविल्या. वेल्लोरच्या किल्ल्यावर तोफांचा भडिमार सुरु झाला. तरीही किल्लेदार अब्दुल्लाखान सर्व ताकदीनिशी मराठ्यांशी लढू लागला. वेल्लोरवर फार काळ जाणार असे दिसू लागताच महाराजानी नरहरी रुद्राला दोन हजार स्वार व पाच हजार मावळी पायदळी देवून वेल्लोरच्या वेढ्यावर ठेवले. व महाराज तिरुवाडीवर चालकरुन निघाले. यांना रोखण्यासाठी शेरखान लोदी वलीगंडपुरम येथून

तिरुवाडीकडे निघाला. सेनापती हंबीररावाच्या घोडदळाने त्याला अडविले तेथून तो निसटला व बानागिरीपट्टमच्य किल्ल्यात वेढला गेला. शेवटी मराठ्याशी तो शरन आला. पुढे शिवराय व्यंकोजीचा समाचार घेण्यासाठी तंजावरकडे निघाले तेथून ते लवकर स्वराज्याकडे परत निघाले. त्यांच्या परतीचा प्रवास पुढील नकाशावरुन आपणास समझतो.

छत्रपती स्वराज्याकडे येताना वेल्लोरच्या किल्ल्याच्या वेढ्याची जबाबदारी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यावर सोपविली होती.एक वर्ष होऊन गेले तरी वेल्लोरचा किल्लेदार अब्दुल्लाखान हाबशी किल्ला सोडत नव्हता. सेनापतींनी किल्ल्याच्या वेढ्याचे काम जोमाने सुरु ठेवले. किल्ल्यातील शिबंदिला बाहेरुन रसद मिळनार नाही याची त्यांनीकाळजी घेतली व बाहेरुन किल्ल्यामध्ये विजापूरहून मदत येईल या आशाने किल्लेदार किल्ला लढवीत होता. परंतु विजापूरच्या दरबारातील राजकारणाने वेग ळाच मोड घेतलेला होता. आदिलशहाचा वजीर बहलोलखानाचा मृत्यु झालेला होता. अंतर्गत सरदारांमध्ये यादवी सुरु झालेली होती. त्यातच पावसाळ्याच्या शेवटी साथीच्या रोगाने किल्ल्यात थैमान घातले होते. किल्ल्यातील लोक रोगाचे बळी पडत होते. शस्त्रलाठा व अन्नधान्येही संपत आलेले होते. पर्याय ए अब्दुल्लाखानाकडे शिल्लक राहीलेला होता. तो म्हणजे मराठ्यांचे सेनापती हंबीरराव व त्यांच्या सैन्यापुढे शरन जाणे पण विनाअट किल्ला कसा सोडावा. शेवटी सेनापती हंबीररावांनी रघुनाथ पंताच्या मध्यस्थीने अब्दुल्लाखानास पन्नास हजार ह ोन दिले. आणि वेल्लोरच्या किल्ल्यावर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. 'तो दिवस होता शके १६०० कालयुक्त संवत्सर श्रावण शुद्ध चतुर्दशी (२२ जुलै १६७८)'[५६] यावेळी शिवराय महाराष्ट्रातील स्वराज्यात होते.कर्नाटकातील ही वार्ता समजताच त्यांना अतिशय आनंद झाला. पाठीमागे सोडून आलेल्या सेनापती हंबीररावांनी नुतन मराठी राज्याची सिमा दक्षिण समुद्रापर्यंत जावू न पोहचविली एकंदरीत या कर्नाटक मोहिमेत सालीना २० लाख होनांचा प्रदेश व त्यातील १०० किल्ले मिळाले होते. त्यातील जिंजी व वेल्लोर किल्ले अतिशय महत्त्वाचे होते. 'संताजी भोसले, हंबीरराव मोहिते, जनार्दनपंत वगैरे मोठमोठ्या सरदारांनी पराक्रम करुन प्रदेश जिंकले. पुढील कारकिर्दीत प्रसिद्धीस आलेले बहूतेक सरदार प्रथम

या कर्नाटकच्या मोहिमेत उदयास आले.' सेनापती हंबीररावांनी रघुनाथ पंताच्या साह्याने वेल्लोरच्या किल्याची डागडूजी केली. वेढा चालू असतांना तटबंदिची झालेली नासधुस दुरुस्त करुन घेतली. सभोवतालच्या प्रदेशात सालीना ठरवून घेयात आला. छत्रपतीच्या आदेशानुसार नवीन मिळविलेल्या प्रदेशाचे अधिकार रघुनाथपंताकडे दिले. संताजी भोसले यांनी प्रत्येक युद्ध प्रसंगी योग्य कामगिरी केल्याने त्यांच्याकडे घोडदळचे प्रमुख म्हणून नेमले. म्हैसूर प्रांतात रंगो नारायण यास सुभेदार म्हणून नेमले. योग्य त्या ठिकाणी नवीन अधिकारी नियुक्त केले. दक्षिण दिग्विजयाची खरी सांगता सेनापती हंबीरराव मोहितेंनी केल्यामुळे शिवरायांनी 'पत्रे, वस्त्रे, अलंकार वगैरे पाठवून सर्वांचा परामर्ष घेतला. या प्रकारे चाकरी मनुष्यांची जाणून न मागता बक्षिस देणे, दिले ते परंपरेस चालावयाजोगे, यामुळे सर्व लोक संतुष्ट आपणही असेच काम करु, केले असता लेकरांलेकरी चालावयाजोगे बक्षिस मिळवू, मिळाले म्हणजे आमचे कोण खाईल ? अशी हुशारी ठेवून सर्व लोक आपलाले सेवेचे ठायी तत्पर रहात झाले.'[५७] आणि शिवराय तोरगल येथून स्वराज्याकडे जात असताना सेनापती हंबीरराव मोहिते यांना आपल्या सैन्यासह स्वराज्याकडे येण्यासाठी निरोप पाठविला हा निरोप मिळताच सेनापती स्वराज्याकडे येण्यासाठी निघाले ते प्रथम बंगलोर-चिक बाळापूर - टुमकूर - रत्नागिरी - शिरे - चित्रदुर्ग - कल्याणदुर्ग - रायदूर्ग - सोंडूर - नरसिंहपूर - होस्कोट - हंपी अशा मार्गाने कोप्पल पर्यत आले असावे कारण शिवरांयानी स्वराज्याकडे जात असताना आदिलशाही प्रदेशातील कोप्पल प्रांत जिंकून घेऊन जनार्दनपंताना तेथे ठेवले होते. यांच्या सोबत काही सैंन्य ठेवले होते. हे पाहून आदिलशाही सैंन्य हा प्रदेश परत मिळविण्यासाठी प्रयत्नशील होते. त्यासाठी सैन्य हालचाल करु लागले. पण जनार्दन पंताकडे अल्पसे सैन्य होते. छत्रपती पन्हाळ्याकडे निघून गेले होते. अशा वेळी जर्नादनपतांनी कर्नाटकातून येत असलेल्या हंबीररावांची ते वाट पहात होते.तो जवळ आला असे ऐकून जनार्दनपंताने त्याच्या मदतीने विजापूरकरांच्या सैन्यावर हल्ला करण्याचा बेत केला व हंबीरराव त्या गोष्टीस मान्य झाल्यावर त्यांनी आपल्या फौजेनिशी तूंगभद्रा व कृष्णा ह्या नद्यांच्या मध्यल्या प्रदेशात शत्रुच्या सैन्यास गाठले व त्याचा पराभव करुन त्यास अष्टदिशांस उधळवून लावले. तसेच बेलवाडी या प्रांतातील देशमुखांना वठणीवर

आनुन त्या प्रदेशावर मराठ्यांचे वर्चस्व जनार्दनपंतानी सेनापतीच्या साह्याने निर्माण केले. तेथून ते स्वराज्यात आले.




सेनापती हंबीरराव मोहिते कर्नाटकातून स्वराज्याकडे नेमके कोणत्या मार्गाने आले या बाबत ग्राह्य पुरावा उपलब्ध झाला नसल्याने ते शिवरायांच्या परतीच्याच मार्गाने आले असावेत यासाठी काही कारणे संभवनीय आहेत.

१) रघुनाथ नारायण हणमंते यांनी छत्रपतींना परतीचा मार्ग सांगितला असावा.

२) छत्रपतींनी मिळविले प्रदेश सुरक्षित आहेत की नाही याची खात्री हंबीररावांच्या माध्यमातून समजावे.

३) इतिहासकार केळूसकरांनी कोप्पल व बेलवाडी प्रदेशातील संघर्षाचा संबंध सेनापती हंबीररावांशी लावलेला आहे.

4) रघुनाथ पंतानीच परतीच्या मार्गाबाबत सल्ला दिलेला असावा.





सेनापती हंबीररावांनी दक्षिण मोहिमेच्या माध्यमातून वेल्लोरचा किल्ला जिंकून त्या किल्ल्याची पुर्णःबांधनी केलेली होती.

## १३) सारांश

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जिवनातील 'छत्रपती' या नात्याने काढन्यात आलेली 'दक्षिण दिग्विजय' मोहिम ही अतिशय महत्त्वाची समजली जाते. आतापर्यंतच्या सर्व मोहिमात (१७ ते १८ महिने) दीर्घकाळ चाललेली ही मोहिम होती. या मोहिमेमुळे 'हिंदवी स्वराज्याचा' विस्तार दक्षिण भारतातील समुद्र किनारपट्टीपर्यंत झाला. वेल्लोर व जिंजी हे दोन महत्त्वपूर्ण किल्ले मिळाले. सालीना २० लाख होनांचा प्रदेश आणि जवळ पास लहान -मोठे १०० किल्ले मिळाले. दक्षिणेत गोवळकोंड्याच्या कुतूबशाहाशी मैत्रीपूर्ण संबंध निर्माण झाले. विजापूरच्या आदिलशाहिची शक्ती क्षीण करण्यात यश मिळाले. नवीन अधिकारी व नाती जुळविता आली यासर्व कार्यात छत्रपतींचे योगदान महत्त्वपूर्ण होते. परंतु यासाठी शर्थीचे प्रयत्न करणाऱ्या मावळ्यात सेनापती हंबीरराव मोहितेचे योगदान अतिशय महत्त्वाचे होते. द.दिग्विजय मोहिम ही नवीन प्रदेशावर काढलेली होती. छत्रपतींच्या संरक्षणाची जबाबदारी 'सेनापती' या नात्याने हंबीरराव मोहितेवर होती. अगदी छत्रपतीच्या संपूर्ण मोहिमेत आपल्या सैन्याने कवचकुंड निर्माण केलेले होते. कदाचित छत्रपतीवर शत्रूकडून हल्ला होणार नाही याची पुरेपूर काळजी घेतली होती. त्यांच्या सावली प्रमाणे हंबीररावानी आपले सैन्य तैनात केलेले होते कुठेही छत्रपतींना अडचण येणार नाही. याची दक्षता घेतली होती. व्यंकोजी राजांनी केलेल्या चुका सुधारण्यास भाग पाडले. आपले कार्यही पूर्णत्वास नेले व नातीही सांभाळली. वेल्लोरच्या किल्ल्याकडे लक्ष देऊन त्यावर वर्चस्व निर्माण केले. छत्रपतींनी हंबीररावाना पाठीमागे ठेवून मिळविलेल्या प्रदेशात योग्य प्रशासन करण्याचे अधिकार दिले होते. छत्रपतींच्या नंतर सेनापती हंबीररावांनीच दक्षिण दिग्विजयाची सांगता केली. हंबीरराव चुकीचे कार्य करणार नाहीत याची खात्री असल्यानेच त्यांना पाठीमागे ठेवले होते.

सेनापती हंबीरराव मोहिते हे नात्याने छत्रपतींचे सख्ये मेहुणे तर होतेच पण एक निष्ठावान, कर्तृत्वसंपन्न, योद्धा, विश्वासू सेनापती या नात्यांनी या मोहिमेत अतूलनीय कार्य केल्याचे लक्षात येते. सेनापती व कर्नाटक मोहिम हे एकच समीकरण होते. त्यांच्या तेथील कर्तृत्वाला इतिहासात जोड होती. स्वामीनिष्ठा व अतुलनीय पराक्रम हे गूण या मोहिमेच्या माध्यमातून पुढे आले.

## संदर्भ ग्रंथ :

१) हेरवाडकर र.वि.(संपा) - कृष्णाजी अनंत सभासद विरचित, शिवछत्रपतीर्च चरित्र (सभासद बखर), पुणे, व्हीनस प्रकाशन, पृ.१०४, १०५.

२) पगडी सेतुमधवराव सम्म्र - खंड २, शिवचरित्र एक अभ्यास, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, प्रथम प्रकाशन, १९७१ पृ.३९४.

३) देशमुख विजय - शककर्ते शिवराय (उत्तरार्ध) नागपूर, छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, ऑगस्ट १९८२, पृ.८८३.

४) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८८३.

५) पगडी सेतुमाधवराव - पूर्वोक्त, पृ.३९५.

६) जोशी मुकूंदना - दक्षिण दिग्विजय, पुणे, मनोदय प्रकाशन, मार्च २००७, पृ.१६.

७) जोशी मुकूंदना - पूर्वोक्त, पृ.१८.

८) शिवदे सदाशिव - सेनापती हंबीरराव मोहिते, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, ऑक्टोबर २००७, पृ.४३, ४४.

९) पगडी सेतुमाधवराव - पूर्वोक्त, पृ.३९६.

१०) काळे दिनकर विनायक - छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, कार्यवाह पुणे विद्यापीठ पुणे-७, मार्च १९६०, पृ.२०३, २०४.

११) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.४५.

१२) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८९५.

१३) केळूसकर कृ.अ. - छत्रपती शिवाजी महाराज पुणे, वरदा, से बापट मार्ग, चौथी आवृत्ती, मे.१९९१, पृ.४७३.

१४) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.४६, ४७.

१५) बेंद्रे वा.सी. - छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र, उत्तरार्ध पृ.७९१.

१६) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.१०४, १०५.

१७) जोशी मुकूंदना - पूर्वोक्त, पृ.३२.

१८) केळूसकर कृ.अ. - पूर्वोक्त, पृ.४७२.

१९) पुरंदरे ब.मो. - राजा शिवछत्रपती, पुणे पुरंदरे प्रक ाशन १२२८, सदाशिव पेठ, आवृत्ती चौदावी, २००१, पृ.९४६.

२०) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८९७.

२१) जोशी मुकुंदना - पूर्वोक्त, पृ.३२.

२२) पगडी सेतूमाधवराव समग्र - पूर्वोक्त, पृ.३९९.

२३) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८९७.

२४) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८९७.

२५) जोशी मुकूंदना - पूर्वोक्त, पृ.३४.

२६) गर्गे स.मा. (संपा) - मराठी रियासत, गो.स.सरदेसाई कृत, पुणे पॉप्युलर प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९३५, पृ.३१५.

२७) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.९८, ९९.

२८) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८९८.

२९) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.८९८.

३०) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.१०६.

३१) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.१०६.

३२) केळूसकर कृ.अ. - पूर्वोक्त, पृ.४७५.

३३) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.५३.

३४) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.९००.

३५) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.१०८.

३६) जोशी मुकूंदना - पूर्वोक्त, पृ.१४.

३७) जोशी मुकूंदना - पूर्वोक्त, पृ.४३.

३८) पुरंदरे ब.मो. - पुर्वोक्त, पृ.९६२.

३९) पुरंदरे ब.मो. - पुर्वोक्त, पृ.९६७.

४०) केळूसकर कृ.अ. - पूर्वोक्त, पृ.४८८.

४१) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.५५.

४२) केळूसकर कृ.अ. - पूर्वोक्त, पृ.४८९.

४३) कुलकर्णी अ.रा.- जेधे शकावली-करीना पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७, पृ.८७.

४४) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.११०.

४५) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.११०.

४६) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.५५, ५६.

४७) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.५७.

४८) देशमुख विजय (संपा) - शिवविजय रौप्य मोहत्सवीकार्य गौरव समिति नागपूर, प्रथम आवृत्ती १९९२, पृ.क्र.

४९) देशमुख विजय (संपा) पूर्वोक्त, पृ.२३.

५०) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.५७, ५९.

५१) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.११२.

५२) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त, पृ.९१.

५३) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.६१.

५४) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.९२२, ९२३.

५५) हेरवांडकर र.वि. (संपा) - पूर्वोक्त, पृ.११०, १११.

५६) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.६२.

५७) गर्गे स.मा. (संपा) - पूर्वोक्त, पृ.३३४.

५८) केळूसकर कृ.अ. - पूर्वोक्त, पृ.५०९.

# प्रकरण चौथे

# छत्रपती शिवरायांचे निधन व सेनापती हंबीररावांची भूमिका

## १) प्रस्तावना :

छत्रपती शिवराय व सेनापती हंबीरराव मोहिते यांनी कर्नाटक स्वारीहून स्वराज्यात आल्यानंतर मोगलीन प्रदेशावर हल्ले करुन ते प्रदेश लुटले होते. यातून बराचसा महसून मिळालेला होता. जालनापूर सारखे संपन्न शहर लुटतेवेळी विश्रामगडावर शिवरायांना युवराज संभाजी राजे स्वराज्यात परत आल्याचे बातमी मिळाली. सेनापती हंबीररावांनी शिवरायांना स्वराज्याकडे पाठवून बागलांचा प्रदेश लुटण्यासाठी ससैन्य गेले होते. छत्रपती शिवराय पन्हाळगडावर युवराज संभाजी राजांची भेट घेतली होती. संभाजी राजांना कोल्हापूर प्रांताचा कारभार सोपवून शिवराय रायगडावर परतले होते. यावेळी सेनापती मोगली प्रदेशातून लूट घेऊन रायगडावर गेले होते. दोघात स्वराज्याचा वाटचाली संदर्भात चर्चा झालेली असावी. तेथून सेनापती हंबीरराव आपल्या मूळ गावी तळबीड या ठिकाणी येऊन थांबले होते.

छत्रपती शिवाजी राजांना दैनंदिन युद्ध मोहिमामुळे थकवा आलेला होता. अशा प्रकारचा थकवा यापूर्वी दोन आलेला होता. मात्र त्यातून ते बरे झाले होते. यावळचा थकवा मात्र त्यांच्यावर मोठे संकट निर्माण करणारा होता. अशातच त्यांना ज्वर चढला. आणि शेवटी त्यातच त्यांचा ३ एप्रिल १६८० रोजी मृत्यू झाला. ही बातमी रायगडावर मुत्सद्यांनी बाहेर येऊच दिलेली नव्हती. सेनापती हंबीररावांना आपल्याकडे ओढण्यासाठी रायगडावरील बंडखोर प्रधानांनी पत्र पाठविले हाते. युवराज संभाजी राजांनाही पन्हाळगडावर पत्र पाठवून तेथेच त्यांना स्थानबद्ध करण्याची तयारी सुरू

झालेली होती. कारण आण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंळे, प्रल्हाद निराजी या अष्टप्रधान बंडखोरानी छत्रपतीपदी राजाराम यांना गादीवर बसवून स्वराज्याचा आपण कारभार पहावा या हेतुने त्यांनी प्रयत्न सुरुकेले होते. शेवटी त्यांच्या हे प्रयत्न सेनापती हंबीरराव मोहिते यांनी धुळीस मिळवून शिवरायांच्या निष्ठावान पाईक असल्याचे स्वराज्याला दाखवून दिले. आणि सेनापतींच्या प्रयत्नामुळे छत्रपती पदावर संभाजी राजे विराजमान झाले.

## २) दक्षिण मोहीमेची सांगता

मराठ्यांच्या इतिहासात 'छत्रपती' या नात्याने शिवरायांनी काढलेली दक्षिण दिग्विजय किंवा कर्नाटक ही मोहिम ज्या उद्देशाने काढलेली आणि बहुतांश उद्देश सफल झालेली महत्वपूर्ण मोहिम होती. शिवरायांना या मोहिमेच्या माध्यमातून २० लाख होनांचा प्रदेश, १०० किल्ले, त्यातील वेल्लोर व जिंजीसारखे महत्वपूर्ण किल्ले मिळाले. स्वराज्याची सिमा दक्षिण समुद्राला जाऊन मिळाली. जवळपास पावणे दोन वर्ष ही मोहीम चालली. या काळात मराठ्याचे सेनापती हंबीरराव मोहिते, सहकारी रघूनाथपंत, संताजी भोसले, धनाजी जाधव आणि इतर मावळ्यांनी कसोसिने प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत असतानाकडे महाराष्ट्रात स्वराज्यावर मोगल व आदिलशाही सत्तांचा दबाब वाटत चाललेला होता. अशा बातम्या शिवरायांना समजल्याने त्यांनी कर्नाटकातून स्वराज्याकडे येत असताना तेथील संपूर्ण जबाबदारी सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यावर सोपवून जून १६७८ मध्ये महाराज रायगडावर परतले. याच काळात म्हणजे २२ जुलै १६७८ रोजी वेल्लोरचा बलदंड किल्ला हंबीररावानी व त्यांच्या सर्व माव ळ्यांनी जिंकूण घेतल्याची बातमी मिळाली. महाराजांना अतिशय आनंद झाला. त्यांनी लागलीच पत्ते, वस्त्रे, अलंकार वगैरे पाठवून त्यांचा गौरव केला.

## ३) महाराष्ट्रातील घटना

'दक्षिण दिग्विजय' मोहिमेच्या पावणे दोन वर्षाच्या कार्यकाळात महाराष्ट्रात व मोगल, विजापूरची आदिलशाही, जंजिऱ्याचा सिद्दी, परकिय इंग्रज, पोर्तूगीज यांच्या संबंधात फार मोठे बदल झालेले होते. स्वराज्याच्या अष्टप्रधान मंडळातील एक 'प्रधान त्र्यंबक सोनदेव डबीर' यांचा दिनांक १८ एप्रिल १६७७ रोजी शिवापूर येथे मृत्यू झाला. महाराजांचा एक निष्ठावान जिवलग मित्र काळाच्या पडद्याआड गेला ते लहानपणापासून त्यांच्या सहवासात होते. स्वराज्य घडविण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. शिवरायांनी स्वतःला राज्याभिषेक करवून घेऊन अष्टप्रधान मंडळाची घोषणा केलेली होती. त्यातील 'सुमंत' हे पद डबीर यांच्याकडे सोपविले होते. तर सेनापती म्हणून हंबीररावांकडे जबाबदारी सोपविली होती. त्यावेळी सेनापती युद्ध मोहिमा काढत त्यावेळी परकिय सत्तानबाबत माहिती त्यांना डबीर कडून मिळत होती. त्यांच्या सहकार्यामुळे सेनापती अनेक मोहिमेत यशस्वी झालेले होते. एकंदरीत अष्टप्रधान मंडळाच्या सल्यानेच छत्रपती शिवाजी महाराज राज्यकारभार करत होते. प्रसंगी त्यांच्यावर युद्धांचे नेतृत्वही सोपविले जात असत. अशा एका प्रधानांचा त्यांच्या अनुपस्थितील मृत्यू झाला. त्यांनीकेलेल्या कार्याची जाणीव महाराजांना व सेनापतींना सारखी जाणवत होती.

स्वराज्याच्या पश्चिम किनाऱ्यावर समुद्रामध्ये 'जंजिरा' नावाचा किल्ला असून, त्या किल्ल्यावर आणि सभोवतालच्या समुद्रावर 'सिद्दी' नावाचा मोलाचा मांडलिक सरदार वर्चस्व गाणवित होता. मराठे व सिद्दी यंच्यात बऱ्याचदा संघर्ष झालेला होता. छत्रपती शिवाजी महाराज कर्नाटक स्वारीमध्ये गुंतले असता सिद्दी संबूळ व सिद्दी कासिम यांच्यात भांडणे सुरु झाली. सिद्दी संबूळ आपल्या आरमारानिशी बाहेर पडला. त्यावेळी सिद्दी कासीमने सिद्दी संबूलची बायकामुले किल्ल्यात अडवून ठेवली. ऑक्टोबर १६७७ मध्ये मुंबई लगतच्या माजगाव बंदरात दोघांची पुन्हा चांगलीच मारामारी झाली.[१] शेवटी मोगलांचा सम्राट औरंगजेब व इंग्रज-सिद्दी कासीमच्या पाठीशी असल्याने सिद्दी संबूलचा नाईलाज झाला. आणि तो मुंबईच्या इंग्रजांकडे राहिला. जून १६७८ मध्ये

म्हणजेच पावसाळा लागताच सिद्दीचे आरमार समुद्रात जाऊ शकणार नाही, असे समजून रायगडी आलेल्या छत्रपती शिवरायांनी माजगावांत साकारलेले सिद्दिचे आरमार नष्ठ करण्यासाठी मराठ्यांचा आरमारचा प्रमुख 'दौलतखान' याला बोलावून आदेश दिले. 'शिवाजी राजाचे सरदार दौलतखान, दर्यासारंग व त्याचा मुलगा यास नावाजून व बक्षिसे देवून आरमारासह पाठविले. ते ४०० लोकांसह जुलैच्या तिसऱ्या आठवड्यात पनवेलला आले. तेथून ते सालसेतच्या हद्दीत [illegible] प्रयत्न करणार होते. परंतु पोर्तूगीजांनी त्यास अडविले. शिवाजी राजांनी वैर पुकारुन लढाई करण्याची धमकी देताच इंग्रजांनी मुंबई बंदरात शाकारलेले सर्व आरमार बाहेर काढण्यास लावले.'[२] सिद्दी कासीम सुरतला निघून गेला. पोर्तूगीज व इंग्रजांना महाराजांचा आपल्यावर सेष राहू नये यासाठी अंत:स्थरितीने सिद्दी कासीमला सहकार्य केल्याने तो बचावला आणि जंजिरा मिळविन्यात अपयश झाल्याने दौलतखानावर महाराज नाराज झाले. ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात जंजिऱ्यास लागून असलेल्या टेकडीवर तोफा डागन्याचे राजांनी आदेश दिले. यावेळी जंजिरा ताब्यात यावा म्हणून अगदी नियोजन योग्य पद्धतीने केलेले होते.

कर्नाटकच्या मोहिमेवर निघत असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी मोगलांचा सरदार बहादूरखान याला लाच देवून शांत राहील अशी व्यवस्था केलेली होती. तेव्हा त्याने विजापूरच्या आदिलशाहीकडून नळदूर्ग व गुलबर्गा किल्ले जिंकूण घेतले होते. बहादूरखानाचा दुय्यम सेनापती दिलेरखान याने विजापूरच्या बहेलोलखानाशी संधान बांधून सम्राट औरंजेबाकडे बहादूरखान बडतर्फ कसा होईल यासाठी प्रयत्न केले. त्यानुसार सम्राट औरंगजेबाने बहादूरखानाला उत्तरेकडे बोलावून घेतले. मोगलांचा सरदार दिलेरखान व विजापूरचा वजीर बहेलोलखान यांनी एकत्र येऊन गोवळकोंडा राज्यावर आक्रमण केले. सप्टेंबर १६७७ मध्ये दोघांचे सैन्य मळखेड या ठिकाणी पोहचले. मळखेड हे गाव गुलबर्ग्याच्या पूर्वेस ३५ कि.मी. अंतरावर आहे. दोन महिने संघर्ष चालला. गोवळकोंड्याच्या सैन्याने प्रखर प्रतिकार केला. शेवटी मोगलांना यातून माघार घ्यावी लागली. विजापूरचा वजीर बहेलोलखान, गुलबर्गा या ठिकाणी आजारी पडला व २५ डिसेंबर १६७७ रोजी त्याचा मृत्यू झाला. त्याच्या जागी वजीर म्हणून सिद्दी मसूद नावाचा सरदार आला.

दिलेरखानाने सिद्दी मसूदकडे तह घडवून आणला. 'विजापूरने मोगल सम्राटाची संपूर्ण ताबेदारी पत्करावी, 'शिवाजीचा नाश करण्यामध्ये मोगल हे विजापूरला मदत करतील, विजापूरचा बादशहा सिकंदर आदिलशहा याची बहीण औरंगजेबाचा मुलगा आज्जम याला देण्यात यावी'[३] एकंदरीत मोगलांचा सरदार दिलेरखान व आदिलशाहीचा वजीर सिद्दी मसूद या दोघांनी शिवरायांच्या विरुद्ध आघाडी करण्याचे प्रयत्न चालू केलेले होते. आणि यांच्यावर कर्नाटकात गेलेल्या शिवरायांचे अगदी बारीक लक्ष होते. सर्वत्र आपले गुप्तहेर पसरवले होते. स्वराज्या बाबतच्या व इतर घडामोडीच्या बातम्या त्यांच्या कानावर येत होत्या. आता आपण इकडे जास्त काळ थांबने योग्य नाही याचा सारासार विचार करुन छत्रपती शिवाजी महाराज पाठीमागे सेनापती हंबीररावांना सोडून आलेले होते.

सिद्दी मसूदला छत्रपती शिवाजी राजांच्या ताकदीची जाणीव होती. त्याने दिलेरखानाशी केलेला करार जास्त काळ टिकविला नाही. याबाबतची अनेक कारणे होती. त्यातील महत्वाचे म्हणजे 'विजापूरच्या दरबारातील अनेक सरदार दिलेरखानाकडे व स्वराज्यात आलेल्या शिवरायाकडे जाऊन मिळत होते. 'सन १६७८ चा पावसाळा दिलेरखानाने बहादूरगड येथे काढला. (बहादूरगड हा अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यात दौंड जवळ भिमा नदीच्या काठावर आहे.) विजापूर विरुद्ध तो मोहिमेची तयारी करीत होता'[४] मोगल सम्राट औरंगजेबाने त्यास आदेश दिले होते की, 'विजापूर दरबारातील येणाऱ्या सरदाराना, मराठ्यांना योग्य तो मानसन्मान द्या.' यावेळी दरबारातील २० हजार घोडेस्वार दिलेरखानाला येऊन मिळाले होते. याविषयी छत्रपती शिवराय बारीक लक्ष ठेऊन होते. मोगलांचा सरदार दिलेरखान स्वराज्याच्या सिमेवर सैन्य घेऊन तयार होता. सिद्दी मसूद हा विजापूरचा वजीर मराठे व मोगल यांच्याशी आपले संबंध निर्माण व्हावेत असा विचार करुन दोघांनाही झूलवत होता. पश्चिम समुद्रकिनाऱ्यावर जंजिरा आपल्या ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरु झालेले होते. परकीय इंग्रज व पोर्तूगीज जंजिऱ्याच्या सिद्दिच्या पाठीशी झालेले होते. अशा परिस्थितीत स्वराज्याचा सेनापती जवळ असणे शिवरायांना आवश्यक वाटू लागल्याने त्यांनी सप्टेंबर १६७८ मध्ये सेनापती हंबीरराव मोहिते यांना बोलावून घेतले.

## ४) सेनापती स्वराज्यात परतले

मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते स्वराज्यात पन्हाळा यकाणि छत्रपती शिवाजी महाराजांना येऊन भेटले. यापूर्वी शिवरायांनी आपल्या फौजांना पन्हाळ्याला येयाचे आदेश दिले होते. इतरत्र असलेल्या तोफा पन्हाळा किल्ल्यावर चढवल्या, फ्रेंचाकडून काही तोफा विकत घेतल्या. विजापूर व मोगल यांच्याशी कधी युद्धाला सुरुवात होईल हे सांगता येत नव्हते. सेनापती हंबीररावांनी कर्नाटकच्या प्रदेशातील जिंकून घेतलेले किल्ले व प्रदेश या बाबतची सर्व माहिती छत्रपतींना सांगितली. शिवरायांना हंबीररावांनी केलेल्या कामगिरीचा अतिशय आनंद झाला, पण ही वेळ आनंद मानन्याची नव्हती. स्वराज्याचे शत्रूकधी आक्रमण करतील याची निश्चिती नव्हती, विजापूर व मराठे यांच्यातील संघर्ष चालू होता. सर्जेखानाने 'अथनी' व 'रायबाग' ही स्वराज्यातील ठाणी जिंकली होती. तर मराठ्यांनी 'मुलगुद', 'लक्ष्मीश्वर', 'गदग' अशा आदिलशाहीच्या पेठा लुटल्या. त्यामुळे विजापूरचे सरदार जमशीखान, सलीमखाँ, सर्जेखान व सिद्दी मसउदचा मुलगा स्वराज्यावर चालून येयाच्या प्रयत्नात होते. यांच्याशी लढा देण्याची तयारी सेनापती हंबीरराव मोहितेही करीत होते. आपल्या सैन्यांच्या तुकड्या स्वराज्याच्या सिमेवर असलेल्या शत्रू सैन्याशी लढण्यासाठी रवाना करीत होते. प्रसंगी सर्व लष्करी व्यवस्थेकडे बारीक लक्ष ठेऊन होते.

## ५) युवराज संभाजी राजे दिलेरखानाकडे

याच काळात छत्रपतींनी युवराज संभाजी राजांना शृंगारपुराहून सज्जनगडावर जाण्यास सांगितले. 'महाराजांच्या आज्ञेनुसार संभाजीराजे दिनांक ३ नोव्हेंबर १६७८ च्या सुमारास सज्जनगडला गेले'[५] तेथील परिसरातील लोकांच्या तक्रारी संभाजीराजाकडे आलेल्या होत्या. या काळात संभाजी महाराजाविषयीच्या तक्रारी छत्रपतींच्या कानावर आलेल्या होत्या. ज्यावेळी छत्रपती कर्नाटकच्या मोहिमेवर गेले होते. तेव्हा श्रृगांरपुरचा कारभार संभाजीराजांवर सोपविला होता. तो त्यांनी योग्य पद्धतीने चालविलेला दिसतो. संभाजी राजांना कर्नाटक मोहिमेच्या प्रसंगी संभाजी राजांचे वय जवळपास २१ वर्षाचे होते. वयाच्या १४व्या वर्षापासून कारभार करण्याविषयीचे

शिक्षण शिवरायांनी दिलेले होते. आता त्यांना इंग्रज वखार वाऱ्याची समजूत काढण्याचे काम सोपविले होते. २१ ऑक्टोबर १६७७ रोजी आपल्या कुटुंबासह ते शृगांरपूरला रहायला गेले. या काळातील संभाजी राजांच्या बाबतच्या तक्रारी छत्रपतींच्या कानावर आल्याने त्यांनी आपल्यापासून दूर ठेवले असा आरोपकाही साधनांच्या माध्यमातून पहाव यास मिळतो. पण त्यामध्ये आपणास तथ्य वाटत नाही. अशाचकाळात औरंगजेबाचा मुलगा मुअज्जम औरंगाबाद या ठिकाणी येऊन थांबला होता.कर्नाटक मोहिमेहून आलेल्या छत्रपतींनी संभाजी राजांची भेट घेत ली असावी. त्यानांही स्वराज्यातील पावणे दोन वर्षातील काही लोकांची गऱ्हाणी कानावर घातली पाहिजेत. शेवटी महाराजांनी संभाजी राजांना रायगडावर न ठेवता शृगांरपुरला जाण्याचे आदेश दिले होते. त्यामुळे संभाजी राजे नाराज झालेले असावेत आणि ते महाराजास न मानून १३ डिसेंबर १६७८ रोजी पारखे होऊन मोगल सरदार दिलेरखानाकडे गेले. दिलेरखानाचा हा सर्वात मोठा विजय होता. मराठ्यांचा युवराज आपल्या ताब्यात आला असून छत्रपतीला सहज पराजीतकरु या उमेदीने तो कामाला लागलेला होता. संभाजी राजांच्या बातमीने छत्रपती शिवरायाना जबरदस्त धक्काच बसला. स्वराज्याचा भावी छत्रपती, शत्रू मोगलाकडे गेला याचे अत्यंत दु:ख झाले ही वार्ता संपूर्ण स्वराज्यात वाऱ्यासारखी पसरली. सेनापती हंबीरराव मोहिते यानाही अतिशय वाईट वाटले. कारण छत्रपतींशी त्यांचे कौटुंबिक नाते होते. संभाजी राजे हे त्यांचे सावत्र भाच्चे होते.पण त्यांच्यावर सख्या भाच्च्याप्रमाणे त्यांनी प्रेम केले होते.लहानपनी त्यांची आई वारल्याने त्यांच्यावर सर्वांचेच प्रेम होते. नंतर स्वत:च्या बहिनीचा सोयराबाईचा विवाह झालेला होता. परंतु पुत्र प्राप्ती लवकर झालेली नव्हती. म्हणून ते संभाजी राजांवर जिवावाड प्रेम करायचे राजाराम हा नंतर जन्मास आला तरिही त्यांच्यावरती असलेले प्रेम कमी झालेले नव्हते. छत्रपतींचे सर्वच्या सर्व गुण त्यांच्यात दिसत होते. राज्यकारभारचा अनुभव आलेला होता. मामा म्हणून आदराने लष्करी प्रशासनाच्या बाबतची माहिती देत होते. त्यामुळे तर युद्ध मोहिमेत तरबेज झालेले होते. आता ते संपूर्ण राज्यकारभार करण्यास लायक बनले होते. परंतू संभाजी राजे मोगलांना जाऊन मिळाले. आता संभाजीची भेट कोठे होईल ? आणि त्यांना कधी समजावून सांगावे या अंतस्थ विचाराने बेचैन झाले. सेनापती

असल्याने स्वराज्याच्या सिमा सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. विजापूर कधी स्वराज्यावर आक्रमण करील निश्चित नव्हते. आपल्या मुलाने परत यावे यासाठी त्याचे मन वळविण्याचे महाराजांनी प्रयत्न चालू केले. विजापूर व मोगल यांच्यात वितुष्ठ घडून आले असता विजापूरला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन शिवरायांनी दिले.

## ६) भुपाळगडावर मोगलांचे वर्चस्व

मोगल सरदार दिलेरखानाने संभाजी राजांना सोबत घेऊन स्वराज्यातील प्रदेश जिंकावयास सुरुवात केली. छत्रपतींनी मांजऱ्याजवळच्या पर्वतावर एक मोठा किल्ला बांधून त्याचे नाव 'भूपाळगड' असे ठेवले होते. किल्ल्याची मजबुती पाहून किल्ल्यामध्ये प्रचंड संपत्ती ठेवलेली होती. किल्ल्यावर शिबंदी ठेऊन 'फिरंगोजी नरसाळा' नावाचा विश्वासु किल्लेदार म्हणून ठेवण्यात आलेला होता. हा किल्ला साताऱ्याच्या पूर्वेला आहे. दिलेरखानाने किल्ला ताब्यात घेण्यासाठी लक्ष केंद्रित केले. मोगल येत आहेत अशा बातम्या येताच सभोवतालच्या परिसरातील भयभीत झालेले लोक आपल्या सामानासह किल्ल्यान आले. मोगली सैन्य गडाच्या पायथ्याशी आले. गडाच्या जवळ असलेल्या उंच डोंगरावर खानाने तोफा चढविल्या. दुसऱ्या दिवशी म्हणजे २ एप्रिल १६७९ रोजी सकाळी वाजता त्या तोफांना बत्ती देण्यात आली. मराठ्यांनाही गडावरुन प्रतिकार सुरु केला. शेवटी दिलेरखानाने ०३/०४/१६७९ रोजी किल्ला घेऊन गडावरील माणसांचे सर्वस्व हरण केले. ७०० माणसे कैद झाली'[६] शेवटी दिलेरखानाच्या ताब्यात स्वराज्यातील भूपाळगड केवळ संभाजीराजामुळे गेला. ही भूपाळगडाची वार्ता छत्रपती शिवराय व सेनापती हंबीरराव यांच्या कानावर आली. त्यांनी आपले सैन्य भूपाळगडाकडे रवाना केले होते. पण त्या पूर्वीच हा गड मोगलांच्या ताब्यात गेलेला होता. गडाचा किल्लेदार फिरंगोजी नरसाळा याने राजांची भेट घेतली, सर्व हकीकत सांगितली महाराज फिरंगोजीवर संतप्त झाले. आणि त्याला त्याची शिक्षा दिली. कारण संभाजी राजे समोर आल्याने हा गड सोडून द्यावा लागलेला होता. तेव्हा यापुढे स्वराज्यातील किल्ले मोगलांना मिळू नयेत म्हणून सर्व किल्लेदारांना सक्त आदेश दिले. शत्रुशी लढत रहा मात्र

किल्ला शत्रुच्या ताब्यात देवू नका. सेनापती हंबीरराव मोहिते यांना संभाजी राजानी केलेल्या कृत्याबद्दल वाईटही वाटले आणि त्यांना रागही आला. छत्रपतीही विचाराधीन झालेले होते. संभाजीला आपल्याकडे वळविण्यासाठी सेनापतींचे प्रयत्न चालले होते. संभाजीच्या रुपाने स्वराज्यावर फार मोठे संकट निर्माण झालेले होते.

भूपाळगड घेतल्यावर दिलेरखान घोलघाटाच्या बाजुला गेला. दि.१८/०८/१६७९ रोजी त्याने घोलगडजवळ भिमा नदी ओलांडली आणि आदिलशाही सरदार मसूदखानावर चालून जाण्याचे ठरविले.[७] दिलेरखानाबरोबर संभाजी राजेही होते. मोगलांच्या स्वारीची माहिती कळताच आदिलशहाचा वजीर मसुदखानाने छत्रपती शिवाजी महाराजाबरोबर तह घडवून आणला. त्यानुसार महाराजांनी विजापूर शहरात संरक्षणासाठी १० हजार घोडेस्वारांचे सैन्य पाठविले. या शिवाय गोणीनी भरलेले १० हजार बैल विजापूरकडे रवाना करण्यात आले. शिवाजीचा सेनापती आनंद रास २ ते ३ हजार घोडे स्वार घेऊन विजापुरास आला.'[८] सेतू माधवराव पगडीनी शिवाजी राजांनी विजापूरच्या करारासंबंधी सेनापती म्हणून आनंद यांचा उल्लेख केलेला आहे. मात्र माझ्या मते, 'सेनापती हंबीरराव मोहिते असावेत कारण नेसरी युद्धानंतर आदिलशाही सैन्याचा पाठलाग हंबीररावांनीच विजापूर पर्यंतकेलेला होता.' मात्र तेथेही आनंदराव नावाच्या सेनापतीचा उल्लेख केलेला होता. हे योग्य नसून सेनापती हंबीरराव हे विजापूरला आपले घोडदळ घेऊनगेलेले होते. तसेच विजापूरवर स्वारी करण्यासाठी दिलेरखानासोबत संभाजी राजे होते. यावेळी संभाजी राजांची गुप्त भेट घेता येईल हा हेतू समोर ठेऊन हंबीरराव विजापूरला गेले होते. स्वतः शिवाजी महाराजही होते. विजापूरचा वजीर सिद्दी मसुदखानाबरोबर चर्चाही झालेली होती. दोघात असे ठरले की, मसुदने विजापूर शहराचे संरक्षण करावे आणि शिवरायांनी मोगलांच्या दक्षिण प्रदेशात धुमाकूळ घालावा. दिलेरखान ७ ऑक्टोबर १६७९ रोजी विजापूरच्या केवळ १० कि.मी. अंतरावर होता.

## ७) सेनापती हंबीररावांची जालनापूरवर स्वारी

विजापूर व मराठे यांच्यातील तहानुसार छत्रपतींनी सैन्यांची जय्यत तयारी केली. दिलेरखानाने विजापूरवर स्वारी करताच मसुदखानाने ही तितकाच प्रतिकार चालू केला. इकडे शिवाजी महाराजांच्या सैन्यांने मोगली प्रदेशावर धाडी टाकल्या. यावेळी शिवरायांनसोबतहंबीरराव होते. त्यांनी मोगली प्रदेश लुटण्यास सुरुवात केली. दिलेरखानाचे लक्ष विचलीत झाले. तरीही तो विजापूरला लढतच होता शिवाजी महाराज व सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोगलांच्या दक्षिण सुभ्यात विजेच्या गतीने हल्ले सुरु केलेले होते. खानदेश व वऱ्हाड पर्यंत चाल करुन गेले. यावेळी शिवाजी महाराजासोबत १८००० सैन्य होते. या सैन्याने संपूर्ण मोगली प्रदेश व्यापून गेला. मोगलाचा दक्षिण सुभेदार राजपुत्र मुअज्जम हा दिलेरखानावर अतिशय संतापला. त्याने बादशहाला कळविले, विजापूर जिंकून घेणे हे कठीण काम आहे. आणि दिलेरखान हा विनाकारण सार्वजनीक खजिना या कामावर उधळीत चालला आहे.'[९] तरीही दिलेरखान विजापूरचा वेढा उठविण्यास तयार नव्हता. विजापूरच्या सभोवतालचा प्रदेश तो उद्धवस्तकरु लागला. मराठ्यांचे सैन्य इकडे मोगलांचे प्रदेश लुटू लागले सभासदाने याबाबतचे वर्णन केलेले आहे.[१०] 'हंबीरराव याची व राजियाची भेट जाहाली. कित्येक नांवाजिले बक्षिसे दिली. आणि पुढे खासा राजियांनी अवघे लष्कर घेऊन जालनापूर मोगलाईत त्यास वेढा घातला. पेढा पण मारिल्या शहर लुटून फन्ना केले. अगणित द्रव्य, सोने, रुपे, जडजवाहीर कापड, घोडे, हत्ती, उंटे फस्त केली. मोगलांची फौज घेऊन रणमस्त खान चालोन आला युद्ध जाले. सिदोजी निंबाळकर राजे याजकडील पाच हजार फौज तीन दिवस युद्ध केले. रणमस्तखान यासी कैद करुन आणिला. त्यासी बुडवावे तो त्याचे कूमकेस केसरसिंग व सरदारखान व बाजे उमराव असे वीस हजार फौज तीन कोसावर राहिली. मा केसरसींग याने अंतरगे सांगून पाठविले की, उभय पक्षी भाऊपणा आहे. आमची गाठ पडली तोवर तुम्ही नाही कूच करुन जाणे हे वर्तमान कळताच राजे तेथून निघाले. लष्कर जडगिरी मार्गाने जावे अशी तजवीज केली. ते समयी बहिरजी जासूद याने कबूल केले की, मोगलांची गाठ न पडता लष्कर घेऊन ठिकाणास जातो साहेबी फिकीर न करणे. तीन रात्री खपोन रात्रंदिवस अवकाश न करीता पाव गड

येथे लष्कर घेऊन आला. राजे बहिरजा नायकावर खुशाल झाले. त्याजकडे फाजील होते ते माफ करुन आणखीही बक्षिस दिले. तेथून सावकास लष्कर घेऊन राजे पुरंदरास आले.' या काळात मोगलीप्रदेशावर वर्चस्व निर्माण केल्याचे श्रेय हंबीरराव ऐवजी आनंदराव असा उल्लेख रियासतकारांनी केलेला आहे. मात्र ते चुकीचे आहे. कारण छत्रपतींच्या सोबत हंबीरराव होते यावेळी त्यांनी आपल्या सैन्याच्या दोन तुकड्या केल ेल्या होत्या. एक तुकडी छत्रपती सोबत होती. तर दुसरी तुकडी सेनापती हंबीररावां सोबत होती. दोन्ही तुकड्याच्या माध्यमातून दक्षिण मोगली प्रदेश लुटत होते. आणि या प्रदेशातील सर्वात श्रीमंत शहर म्हणून जालना होते. या ठिकाणी दोन्ही तुकड्या एकत्र आलेल्या होत्या. जालना हे शहर औरंगाबादच्य उत्तरेस असून ६४ कि.मी.अंतर आहे. त्या ठिकाणी एक भूईकोट किल्ला होता. त्याचे नाव 'मस्तगड' असे असून मोगलाईचे ते एक भूषनच होते. १६ नोव्हेंबर १६७९ रोजी जालना शहरावर छत्रपती व सेनापती यांच्या सैन्यांनी झडप घातली. आणि मनसोक्त ४ दिवस शहराची लूट केली. अगणित सोने, चांदी, जडजवाहीर, कापड, घोडी, हत्ती आणि उंट यांनी युक्त असलेली लूट मिळविली. याची बातमी समजताच मोगल सरदार रणमस्तखान मराठ्यांवर चालून आला याचा सामना पाच हजार मराठा सैन्याने दिला याचे नेतृत्व 'सिधोजी निंबाळकर' करीत होते. तीन दिवस युद्ध चालले परंतु दू:र्देवाने तो जखमी होऊन धारातीर्थी पडला. तेथील मराठा सैन्याचा पराभव करण्यासाठी सुभेदार मुअज्जम याने औरंगाबादहून केसरीसिंग व सरदारखान यांना सैन्य देवून पाठविले होते. ते केवळ सहा मैलावर आलेले होते. यावेळी छत्रपतीना व त्यांच्या सैन्यांचा पराभवकरण्यासाठी त्यानी आपल्या सैन्याने पूर्णतः वेढले होते. शिवाजी राजे संकटात आलेले होते. शिवरायांचा जिवलग गुप्तहेर बहिर्नीजी नायकाने महाराजांना यातून बाहेर पडण्याचा गुप्त मार्ग सांगितला मोगली सैन्याची गाठ पडू न देता अज्ञात वाटेने नेल्यामुळे तीन दिवस आणि तीन रात्र अनेक संकटाशी सामना करत मराठा सैन्य निसटले. मिळविलेली संपूर्ण लूट यावेळी गमवावी लागली शिवरायांना ४ हजार घोडे गमवावे लागले आणि महाराजांच्या सैन्याचे सेनापती हंबीरराव मोहिते जखमी झाले. अशा अवस्थेत आपल्या छत्रपतींना यातून बाहेर काढण्यासाठी जिवाचे रान त्यांना करावे लागले. एक तर मोगलांच्या प्रदेशात मराठ्यांचे

सैन्य कमी होते. त्यात सोबत मिळविले की, प्रचंड लुटही होती. २२ नोव्हेंबर १६७९ रोजी पट्टा किल्ल्यावर मराठा सैन्य महाराजासह पोहचले सर्व थकलेल्या सैन्यांने या किल्ल्यावर विश्रांती घेतली, म्हणून महाराजांनी या किल्ल्याचे नाव 'विश्रामगड' असे ठेवले. हा गड अकोल्याच्या आठ कोसावर आहे. याच किल्ल्यावर असताना महाराजांना युवराज संभाजी राजे मोगलाकडून स्वराज्यात आल्याची बातमी समजली. सेनापती हंबीररावानांही अतिशय आनंद झाला. महाराजांच्या आनंदाला तर सीमाच राहिली नसेल त्यांनी आनंद साजरा केलाच असेल. या अगोदर संभाजी राजे आग्ऱ्याहून रायगडावर सुखरुप पोहचले. तेव्हा महाराजांनी मोठा आनंदाचा सोहळा साजरा केलेला होता. आणि आता आनंद साजरा करण्यासाठी व पुत्राची भेट घेण्यासाठी स्वतः छत्रपती शिवाजी राजे स्वराज्यातील पन्हाळा किल्ल्याकडे निघाले. यावेळी ज्याच्यासाठी मोगलांच्या प्रदेशावर धाडी टाकाव्या लागल्या ते सर्व सफल झाले. पाठीमागे सेनापती हंबीररावांना सोडून आल्यानंतर हंबीररावांनी खानदेशातील धरणगाव चोपडे तसेच सभोवतालची गावे जिंकूण घेतली.

सेनापतींनी कर्नाटकातून स्वराज्यात आल्यावर विजापूरच्या आदिलशाहीला केलेली मदत आणि मोगली प्रदेशावर केलेले हल्ले या बाबतचे वर्णन महाराष्ट्राचे समाजसुधारक 'महात्मा जोतीराव फुले' यांनी छत्रपतीवर जो पोवाडा लिहीला त्या पोवाड्यात खालील वर्णन केलेल आहे.[११]

'हंबीरराव मदत पाठवी विजापूरला ! बरोबर देई फौजेला !! नऊ हजार मोंगलांचा पराभवे केला ! त्यांनी मार्ग अडविला !! विजापूरी जाऊन जेर केले मोगलाला !!

## ८) युवराज संभाजी राजांना स्वराज्यात परत आणण्याचे हंबीररावाचे प्रयत्न

कर्नाटकातून स्वराज्यात आलेल्या सेनापती हंबीररावांनी थोडीही विश्रांती घेतलेली नव्हती. स्वराज्याच्या चोहो बाजुंनी शत्रुंनी हल्ले सुरु केलेले होते. यापेक्षा मोठे संकट स्वराज्याचे युवराज दिलेरखानाला जाऊन मिळाल्याने हंबीरराव अतिशय दुःखी झालेले होते. छत्रपती शिवाजी महाराजही चिंतेत होते पण स्वतःला त्यांनी सांभाळून आलेल्या संकटाचा सामना कसा करता येईल यासाठी प्रयत्नात होते. त्याच्या चेहऱ्यावरील दुखाची छाया केवळ सेनापतीच ओळखत होते.

कौटुंबिक संबंध असल्यामुळे छत्रपतींच्या कौटुंबिक घडामोडी सेनापतींना जास्त माहिती होत्या. स्वतःची बहीण सोयराबाई ही छत्रपतींची पत्नी असल्याने नातेसंबंधाने सर्व माहितीकळत होती. सेनापती सर्व घडामोडीकडे बारीक लक्ष ठेऊन होते. अशा अवस्थेत त्यांनी केलेल्या कार्याची दखल साधना अभावीकोणत्याही इतिहासकाराने घेतलेली दिसत नाह ी. 'अष्टप्रधान मंडळामध्ये छत्रपतीच्या नात्याचेकेवळ सेनापती हंबीरराव होते.' त्यानीच सर्व युद्ध मोहिमाची जबाबदारी घेतलेली होती. यावेळी विजापूरला मदतकरुन दिलेरखानाला अद्दल घडविण्याचे त्यांनी ठरविले होते. त्यांच्या सोबत 'संभाजी राजे' होते. विजापूरच्या लढ्याप्रसंगीदिलेरखानाला कोणत्याही परिस्थितीत पराभूतकरणे व संभाजी राजांची सुटका करणे ही महत्वाचे कार्य जवळपास सेनापतींनीच केलेली आहेत. बऱ्याच इतिहासकारांनी विशेष रियासतकार सरदेसाई यांनी 'सेनापतींच्या नावाच्या प्रसंगी आनंदरावाचे नाव घूसडले आहे.' आनंदराव एवढे पराक्रमी असते तर शिवरायांनी त्यांनाच सेनापती म्हणून नेमले असते. विजापूरच्या मदतीचा प्रसंग, सभोवतालच्या प्रदेशावर हल्ले हे आनंदरावानीकेलेले नाहीत ते मराठा सैन्यात होते. 'जर ते असते तर सेनापत ी म्हणून हंबीरराव कोठे होते ? केवळ सेनापती हंबीररावांचेकर्तृत्व कमी लेखण्यासाठी आनंदराव सारख्यांना मोठे करणे म्हणजे तळपत्या सुर्याला काळोख आणण्यासाठी पांघरुन घालने असा प्रकार आहे.' जालण्याची लूट, छत्रपतींवर मोगलांचे आलेले संकट दूर करण्यासाठी बहिजी नाईकाने गुप्त मार्ग सांगितला मात्र मराठ्यावर चालून आलेल्या मोगलांना सडेतोड उत्तर सेनापतींनी दिले. त्यामुळे ते जखमी झालेले होते. जर सेनापतींनी प्रयत्नके ले नसते तर छत्रपती मोगलांच्या तावडीत सापडलेच असते हे वास्तव आहे.

पाठीमागे राहिलेल्या सेनापती हंबीररावांनी बुऱ्हाणपूरकडे सैन्य पाठविले आणि स्वतः औरंगाबादला जाऊन लुटालूट करीत होते. वेगवेगळ्या मोगलांच्या प्रदेशात सेनापतींनी आपल्या सैन्याला रवाना केल्याने त्यांचेही वर्चस्व कमी होऊ लागले. आता दिलेरखानाकडे विजापूरचा वेढा उठवणे शिल्लक राहिले. स्वराज्यातील पन्हाळा किल्ल्यावर पोहचल्यानंतर शिवाजी राजांनी आणखी मराठा सैन्य विजापूरला पाठविले. दिलेरखानाला बाहेरुन येणारी रसद मराठ्यांनी बंद

केली. औरंगाबादकडून मोगल सरदार 'रणमस्तखान' सैन्य घेऊन येत होत ा. तेव्हा त्याला सेनापतीच्या सैन्याने हल्लाकरुन मागेच पाठविले. आता दिलेरखानाला विजापूरचा वेढा उठविणे भाग पडले. दिलेरखान पराभूत होऊन कोप्पळ येथील मराठ्यांवर हल्ला करण्यासाठी निघाला, पण यापूर्वी सेनापती हंबीररावांनी कोप्पळ किल्ला जिंकूण त्याची व्यवस्था लावून जनार्धनपंताकडे काही सैन्य ठेवले होते. तेव्हा जनार्धनपंताने दिलेरखानाला तेथेही पराभूतच केले. शेवटी रिकाम्या हा ताने दिलेरखान आपले सैन्य घेऊन पेडगाव या मोगली प्रदेशात आला.

दिलेरखानाच्या माध्यमातून विजापूरवर मोठे संकट कोसळले होते. पण छत्रपती शिवरायांच्या मदतीमुळे व त्यांच्या सेनापती व सैन्यामुळे दिलेखनाला पराभूत करण्यात यश मिळाले. शेवटी मोगलांना याही वेळी नामुस्कीच पत्करावी लागली. मोगल सम्राट औरंगजेबाने पत्र पाठवून दिलेखान व दक्षिणेचा सुभेदार राजपूत्र मुअज्जम यांना उत्तरेकडे बोलावून घेतले आणि त्यांच्या जागी पुन्हा बहादुरखानाची दक्षिणेचा सुभेदार म्हणून पाठविले.

छत्रपती शिवाजी महाराज व युवराज संभाजी राजे यांची भेट पन्हाळा या ठिकाणी ५ डिसेंबर १६७९ रोजी झाली. दोघांमध्ये बरीच चर्चा झालेली असावी बऱ्याच दिवसानंतर पिता-पुत्रांची भेट झालेली होती.काही महत्वाच्या बाबीवर शिवराय बोलले असावे या बाबतची माहिती देताना सभासदाने 'बहूत रहस्य जाहाले' असा उल्लेख केलेला आहे.

स्वराज्यावर निर्माण झालेले शत्रुचे संकट दूर झाले. संभाजी राजे स्वराज्यात परत आल्याने सर्वांना आनंद झाला. संभाजी राजांना राज्यकारभारात सामावून घ्यावे असाही विचार झालेला असावा. संभाजी राजांना तेथेच थांबवून पन्हाळ्याहून शिवाजी राजे रायगडावर आले. यावेळी त्यांचे शरीरही दैनंदीन युद्ध मोहिमांमुळे थकले होते. लहान मुलगा राजाराम याची मूंज आणि लग्न करावे यासाठी प्रयत्न सुरू केले असावेत कोणतेही कार्य करताना महाराज सर्व गोष्टींचा विचार करत होते. राजारामांचा विवाह त्यांनी गुजर घराण्यातील मुलीशी ठरविला. कारण सेनापती हंबीरराव मोहितेच्या अगोदर मराठ्यांचे सेनापती म्हणून 'प्रतापराव गुजर' हे होते. पण त्यांचा नेसरीच्या युद्धात मृत्यू

झालेला होता. त्यांनी स्वराज्यासाठी आपले प्रा दिलेले आहेत याची जाणीव ठेऊन महाराजांनी त्यांच्याच मुलीशी 'जानकीबाईशी राजारामाचा' विवाह ठरविला. या विवाहास ाठी शिवरायांनी राजारामाचे मामा असलेले सेनापती हंबीरराव मोहितेंना बोलविले असणार.

मोगलांचे स्वराज्यावरील संकट दूर होताच सेनापती हंबीरराव मोहिते यांनी सावत्र भाच्चे व छत्रपतीचे युवराज यांची भेट पन्हाळा यकाठी घेतली असावी. त्यांनीही संभाजी राजांना समजावण्याचे प्रयत्न केले असले पाहिजे ७ मार्च १६७९ रोजी राजारामाच्या मुंजीचा कार्यक्रम झाला. आणि १५ मार्च ही लग्नाची तारीख ठरली. सेनापतींना याचे आमंत्रण मिळाले असावे. त्यानुसार लग्नादिवशी सेनापती हंबीरराव मोहिते रायगडावर राजारामाच्या लग्नाला उपस्थित असले पाहिजेत. आपल्या मुळगावी कऱ्हाडजवळ तेथून ते असलेल्या तळबीडला गेले होते.

## ९) छत्रपती शिवरायांचे रायगडावर निधन आणि बंडखोरांचे कारस्थान

यानंतर छत्रपती शिवाजी महाराज लवकरच आजारी पडले. सभासद आणि बखरकारांनी लिहीलेल्या माहितीनुसार शिवरायांना नवज्वर होता. दिवसेंदिवस त्यांचा आजार वाढतच चालला. त्यांचे वैद्य हकीम उपचार करीतच होते. त्यांनी केलेले औषधोपचार लागू पडत नव्हते. चार वर्षापूर्वी म्हणजे १६७६ च्या शेवटी महाराज साताऱ्याला आजारी पडले होते. त्या अगोदर आग्रा भेटीहून आल्यावर देखिल आजार आलेला होता. पण त्या आजारातून सावरले होते. स ारख्या युद्ध मोहिमानमुळे व मानसिक दगदगीमुळे महाराज आजारी पडत असल्याचे दिसून आले. याही वेळी महाराज आजारातून बाहेर येतील असे रायगडावरील सर्वांना वाटत होते. सेनापती हंबीररावांनाह ी वाटले असावे. म्हणून तर रायगडाहून तळबीडला गेले होते. पेशवे मोरोपंत, अनाजी सुरनीश, जनार्धनपंत, निराजीपंत ही सर्व विश्वासू मंडळी रायगडाच्या बाहेत आपआपल्या कामावर होती. रायगडावर यावेळी सेनापती हंबीररावांची बहिण सोयराबाई, शिवरायांची दुसरी पत्नी पुतळाबाई, दुसरे पुत्र राजाराम, मोरोपंताचे चिरंजीव निळोपंत, प्रल्हाद निराजी, गंगाधरपंत, रामचंद्रपंत अमात्य, रावजी सोमनास, आवाजी महादेव, ज्योतीराव, हिरोजी फर्जद, बाबाजीगेघाबाजी कदम,

मुधोजी, सुर्याजी मालुसरे, महादजी नाईक पानसंबळ हे मुत्सद्दी उपस्थित होते. [१२] महाराजांचा आजार वाढत चालला. शेवटी 'चैत्र श्रुध १५ पोर्णिमा शनवारी दोप्रहारा दिवसा रायगडी सिवाजी राजे यांनी देह ठेविला'[१३] म्हणजेच ३ एप्रिल १६८० रोजी शनिवार या दिवशी दुपारी महाराजांचा मृत्यू झाला. केवळ १२ दिवसामध्ये आजार आला आणि महाराज काळाच्या पडद्याआड गेले. या वेळी महाराजांचे वय ५० वर्ष पूर्ण होऊन एकाण्णव वर्षात होते. त्यांचे निधन म्हणजे स्वराज्यावर सर्वात मोठे संकट होते. यावेळी स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते हे कऱ्हाड जवळील त्याच्या मुळगावी तळबीडला होते. निधनाची वार्ता त्यांना काही दिवसांनी समजली. संपूर्ण त्यांच्या गावावर दु:खाचे सावट पसरले. सेनापतींनाही अतिशय दु:ख झाले. त्यांना जबरदस्त धक्काच बसला. काही दिवसापूर्वी त्यांची भेट झालेली होती. महाराज आपास सोडून जातील असे स्वप्नातही त्यांना वाटले नव्हते. तशीकल्पना असती तर ते रायगडावर थांबले असते. त्यांचा आजार कमी व्हावा म्हणून वाटेल ते प्रयत्न केले असते. पण हे सर्व अचानक घडले. गावातील व गावाभोवतालची मंडळी प्रत्येक जन असे कसे घडले याचीच विचारणा करु लागले. पण त्यांना उत्तर देण्यास शब्दच नव्हते.

इकडे रायगडावर शिवरायांच्या 'कलेवर चंदनकोष्टे, बेलकाष्टे आणून दग्ध केले स्त्रिया व राजपत्न्या, कारकून व हुजरे सर्व लोकांनी सांगितले की, धाकटा पुत्र राजाराम यांनी क्रिया करावी. सर्वानी खेद केला, राजाराम यासी अत्यंत शोक झाला. त्यानंतर उत्तरकार्य कनिष्ठानी करावे असे सिद्ध केले. वडिलपुत्र संभाजीराजे वेळेस नाहीत. याजकरीता धाकट्यांनी क्रिया केली.'[१४] पन्हाळ गडावर संभाजी राजे जेष्ठ वारसदार असताना राजाराम दहन संस्कार करु शकत नाही. याला धर्मशास्त्राचा आधार होता कारण छत्रपती शिवाजी महाराज सिंहासनाधिष्ठीत राजे होते. धर्मशास्त्रानुसार वारस म्हणून कोणत्याही एका मुलाची घोषणा क रावी लागात असते. वारस निश्चित केल्याशिवाय अंत्यविधी करता येत नाही. हा वारसा बाबतचा प्रश्न बाजुला ठेऊन महाराज निघून गेले होते. पुढील वारसा संबंधाची घोषणा यापूर्वी कधीही केलेली नव्हती. रायगडावरील मंडळींनी महाराजांच्या निधनाची वार्ता बाहेर जाऊ नये म्हणून गडाचा दरवाजा बंद करण्यात आला.

'जबाबदार मंत्री उपस्थीत असल्याशिवाय रामराजांनी तूर्त विधीयुक्त, राजा म्हणून मंचकारोह न करु नये असे ठरले'[१५] महाराजाच्या निधनाची वार्ता पंतप्रधान मोरोपंत पेशवे व सचिवअनाजीपंतांकडे त्याच दिवशीगुप्तपणे रवाना करण्यात आलेली होती. तसेच सेनापती हंबीरराव मोहिते हे राजारामाचे मामा असल्याने त्यांच्याबाबतगडावरील सर्व निश्चिंत असावेत, तरीही त्यांच्याकडे पत्रव्यवहार झालेला असावा मात्र निरोप मिळाल्यावरकेवळ मोरोपंत पेशवे व अनाजीपंत लवकर रायगडावर पोहचले होते. मात्र यांच्या बाबतची माहिती व या मंत्र्याचे डावपेचलक्षात आल्याने हंबीरराव मोहिते हे रायगडावर गेलेले नव्हते. या घटनेबाबत मल्हार रामराव चिटणीस लिहीतात की, 'ते[१६] समयी मातोश्री सेयराबाई साहेब यांनी मुत्सद्दी हाती घेऊन मोरोपंत प्रधान व निळोपंत अमात्य व अंणोजी दत्तो सचिव हे प्रमुख व हंबीरराव मो हिते सेनापती व रुपाली भोसले आनंदराव निंबाळकर, काटकर व महाडीक, गुजर व पालकर, शिर्के वगैरे सरदार असे सर्वांनी विचार केला की, महाराज यांनी आज्ञा केली आहे की, संभाजी महाराज यांची उग्र प्रकृती यास राज्य आवरणार नाही सर्वाचा नाश करुन आपणही नाश पावतील औरंगजेब महाशत्रू भागानगर प्रांतासमीप येऊन पावला, त्याचा पराभव यांचे वस्तू होणार नाही. राजाराम सुबूद्ध व याचे हाते राज यरक्षण होऊन सर्वांचे कल्याण घडेल.' यावरुन लक्षात येते अष्टप्रधान मंडळाच्या कटात हंबीरराव होते. तेही रायगडावर येऊन संभाजी राजांच्या बंदोबस्ताबाबत विचार करीत होते. जर हंबीरराव यांच्या कटात सहभागी झाले असते तर पुढील काळात संभाजी महाराज छत्रपती बनलेच नसते. मल्हाररावांनी सेनापती हंबीररावांना रायगडावरील घटनेत विनाकारण ओढल्याचे दिसून येते. पण वास्तवीक रायगडावरील घडामोडींपासून त्यांनाही प्रधानांनी बाजुला ठेवलेच होते. त्यांचा गोड समज बनलेला होता की, सोयराबाईचे ते सख्खे भाऊ आहेत, आम्ही सोयराबाईच्या पाठीशी आहोत, म्हणजेच त्यांचे भाऊही त्यांच्याच पाठीशी राहतील. त्यांच्या भाच्यास छत्रपतीपदावर बसवून संपूर्ण राज्याचा कारभार आपण करावा असा अणाजी दत्तो सारख्या मत्र्यांचा विचार होता. संभाजी राजे वयाने मोठे आहेत ते आपणास जुमाननार नाहीत. उलट त्यांच्या विचारापुढे आपण टिकणार नाहीत असा त्यांनी विचार केलेला होता.

## १०) सेनापती हंबीरराव मोहिते यांचीर्णिायक भूमिका आणि इतिहासाला कलाटणी

छत्रपती शिवाजी महाराजांचे निधन ३ एप्रिल १६८० रोजी झाले. त्यावेळी रायगडावर शिवरायांची पत्नी सोयराबाई, पुत्र राजाराम, राहुजी सोमनाथ, प्रल्हाद निराजी, रामचंद्र नीळकंठ ही मोजकीच मंडळी होती. यांनी महाराजांच्या मृत्युची वार्ता बाहेर जाणार नाही याची काळजी घेतली होती. गडाच्या रखवालदारांना सक्त आदेश देवून कडेकोट बंदोबस्त करण्यात आला. अष्टप्रधान मंडळातील प्रधान मोरोपंत पेशवे, सचिव अण्णाजी दत्तो, सुमंत जनार्धनपंत, सेनापती हंबीररावांना रायगडावर येण्यासाठी जासुदामार्फत पत्रे पाठवण्यात आली. गडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाडला अष्टप्रधानांची कुटुंबे रहात असल्याने मालसावंत या सेनानीच्या हाताखाली १० हजार सैन्य ठेवले. गडावर व गडाखाली बंदोबस्त इतका कडेकोट करण्यात आलेला होता की, मुंगी सुद्धा जाणार नाही याची काळजी घेण्यात आलेली होती. अष्टप्रधानापैकी अण्णाजी दत्तो हे सर्वात लवकर रायगडावर आले. त्यांची व सोयराबाई यांचीुप्त चर्चा झालेली अवावी. कारण सोयराबाई व अण्णाजी दत्तो हे संभाजी राजांचा जास्तच हेवा करीत होते. संभाजीला राजपद देऊ नये तो पन्हाळ्यावर आहे. तेथे कडेकोट बंदोबस्त ठेऊन राजारामाला छत्रपती म्हणून नेमावे सहा दिवसांनी पेशवे मोरोपंत रायगडावर आले. त्यांना ही हकीकत अण्णाजी दत्तो व सोयराबाईंनी सांगितली कोल्हापूरला जनार्धन पंताना आपले सैन्य तयार ठेवावे असे आदेश दिलेलेच होते. अण्णाजी दत्तोने आपल्या मनातील हेतू वास्तवात आणण्यासाठी हा सर्व खटाटोप सुरू केलेला होता. संभाजी राजाची त्यालाही भिती वाटत होती. ण पदाच्या लालस ेने तो आंधळा झालेला होता. राजाराम लहान असल्याने राज्याच्याकारभार आपणच करावा हा त्याचा हेतू होता. पदासाठी त्याने औरंगजेबाचा मुलगा अकबर ज्यावेळी दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला होता. तेव्हा त्याकडेही गुप्त पत्रव्यवहार करुन मराठ्यांच्या राज्याचा कारभारी बनण्याची इच्छा व्यक्त केलेली होती. या सर्व कार्यासाठी राजकीय युक्ती चांगली केलेली होती. पण त्या युक्तीला अष्टप्रधान मंडळाचा पाठींबा असते आवश्यक होते जसे अण्णाजी दत्तो सचिव होते. तसेच स्वराज्याचे पेशवा म्हणून मोरोपंत

पिंगळे ही वजनदार व्यक्ती होते. त्याच्या शब्दाला स्वराज्यात मान होता. परंतु हंबीररावाचा राजकारणी सदिग्ध संदेश आल्यानंतर त्याचा मनसुबा सोयराबाईकडेच आहे असे समजून त्यानी राजारामाची बाजू घेतली. आणि या कटात सहभाग झालेले प्रल्हाद निराजी व रामचंद्र निळकंठ हे मात्र दोन विचारावर डळमळीत होते. चिटणीस असलेल्या बाळाजी आवजींची भूमिका ही महत्वाची होती. अण्णाजी दत्तोनी त्याला बोलावून घेतले आपण राज्याचे चिटणीस आहात राज्यातील सर्व सरदार व अधिकाऱ्यांना पत्रे पाठवा व पन्हाळयाचा बंदोबस्त करा. तेंव्हा त्यांनी उत्तर दिले की, आम्ही दरखदार राजांचे, खावंद वडिल संभाजी महाराज असता अशी पत्रे आम्ही लिहीणार नाही... मुल आवजिबाबा आहे त्यास स्वाधीन करतो पाहिजे तसे करावा' [१७] तेंव्हा बाळाजीचा मुलगा आवजी बल्लाळ याच्याकडून पत्रे लिहून पन्हाळ गडाचे हवालदार बहिर्जी नाईक इंगळे, सोमाजी नाईक बंकी, कृष्णाजी नाईक बंकी, हिरोजी फर्जद यांना आणि कोल्हापूरला असलेल्या जनार्दनपंत यांना पत्रे पाठविली या पत्रात 'येथील प्रसंग एक प्रकारचा आहे. संभाजी महाराज यास कैद करुन बहूत सावधपणे असावे महाराजांचे वर्तमान फुटू देऊ नये'[१८] अशा मजकुराची पत्रे पाठविण्यात आली. संभाजी राजाचा बंदोबस्त झाल्यावर त्यांना एक पत्र द्यावे ही सर्व पत्रे जासुदाचा नाईक खंडोजी नाईक व गणोजी कावळा यांच्यामार्फत पाठविली होती. तत्पूर्वी अष्टप्रधान मंडळातील सेनापती पदावर असलेले हंबीरराव मोहितेचा आपणास पाठींबा मिळावा म्हणून इतर मंत्र्यासोबतच कऱ्हाडच्या सैन्याच्या छावणीत म्हणजेच तळबीड येथे असलेल्या सेनापतीकडे जासूदा मार्फत पत्रे पाठविली. महाराजाच्या मृत्यूनंतर १८व्या दिवशी म्हणजेच २१ एप्रिल १६८० रोजी रायगडावरील मुत्सद्यांनी विचार की, 'जे, संभाजी मर्जी यथास्थित मागावरी येण्याचे उपाय करुन होय तोपर्यंत, संभाजी महाराज यास आहेत तसे बंदोमस्ताने राखून, सर्व राज्याचा बांदोबस्त राजाराम साहेब येथे आहेत. यास मंचकारोहन करुन कार्य चालवावी नंतर सर्वांनी महाराजाकडे जाऊन, त्याची मर्जी प्रसन्न करुन राज्याभिषेकादी करणे तसे त्यास करावे. ऐसा संकल्प करुन क्रिया समाप्ती जालीयावरी राजाराम साहेब यास सुमूहूर्त मंचकारोहन करविले'[१९] आणि सोयराबाईचे स्वप्न मंत्र्यानी सफल करुन दाखविले आता आपण संभाजी राजांना पन्हाळयावर कैदेत ठेवू अण्णाजी दत्तोला

अतिशय आनंद झाला. पण तितकीच संभाजी राजे व सेनापती हंबीरराव मोहितेची भिती वाटू लागली. पण सेनापती हंबीरराव आपल्या सोबत असल्यावर पुढील प्रयत्नही सफल होणार. कारण त्यांच्या भाच्याला म्हणजेच सोयराबाईच्या मुलाला आपण छत्रपती पदावर बसविलेले आहे. बहिण सोयराबाईचे ते ऐकणारच कित्येक वर्षापासून ते सेनापती पदावर आहेत. त्यांनी अनेक पराक्रम गाजविलेले आहेत. त्यांचे स्वराज्याच्या सर्व सैन्यावर धाक आहे. सैन्य त्यांच्या पाठीशी असल्याने या सैन्याच्या बळावर पन्हाळा काबीज करु असा अष्टप्रधानांचा पक्का विचार होता. जासूदा मार्फत सेनापतीना पत्र पाठविले. 'आम्हास मिळावे राजारामाचा कार्यभाग साधावा' [२०] पण ते रायगडावर आले नसल्याने मंत्र्याच्या मनामध्ये नाही ते विचार येऊ लागले. सेनापती हंबीरराव मोहितेंना पत्र मिळताच आश्चर्याचा धक्काच बसला.

## १) सेनापती हंबीररावांचे बंडखोर मंत्र्यांना पत्र

शांत डोक्याने विचार करुन आलेल्या जासुदा मार्फत रायगडावर पत्र पाठविले. हंबीररावांचे हे पत्रच इतिहासालाकलाटणी देणारे होते. त्यांनी या पत्रात एका मुरब्बी राजकारण करण्याऱ्या राजकर्त्यासारखे त्या पत्रात लिहीले होते.

"जेथे जेथे तुम्ही जाल तेथे तेथे मी येईन तुमच्या प्रवासात मिही एक सोबती होईन. तुम्हांला सोडून जायला मला दुसरा रस्ता आहे कोणता ?"[२१]

सेनापती हंबीरराव मोहितेंनी या पत्रामध्ये स्वतःचे विचार संदिग्ध स्वरुपाचे लिहीले होते. त्याचा दुहेरी अर्थ होतो एक तर अष्टप्रधानांना, 'मी तुमच्या विचाराशी सहमत आहे. तुम्ही जे कराल ते मला मान्यच आहे. तुम्हाला सोडून जाणार कुणाकडे.' तर याच पत्राचा दुसरा अर्थ असा होतो की, 'अष्टप्रधान मंडळाला ताकीद दिलेली दिसून येते. तुम्ही जेकरण्यासाठी जाल तिथ पर्यंत मी येईन तुमचा पाठलाग सोडणार नाही. आणि सधःस्थितीत स्वराज्यासमोर सर्वात मोठे संकट तुम्हीच निर्माण केलात. ते संकट दूर केल्याशिवाय कुठे जाणार नाही.'

यावेळी सेनापती हंबीररावांच्या स्वामिनिष्ठेची परीक्षाच होती. संपूर्ण हिंदवी स्वराज्याचे अस्तित्व हे केवळ त्यांच्या निर्णयावर अवलंबून होते. मोगल सम्राट औरंगजेब दक्षिणेवर चालून येणार अशा स्वरुपाच्या बातम्या येत होत्या. स्वराज्याचे रक्षण बाळ राजारामाच्या हातून होणार नाही. संपूर्ण सैन्यात व रयतेला संभाजीराजे छत्रपती असणे आवश्यक वाटत होते. लहानपनापासून संभाजीचा स्वभाव हंबीररावांना माहिती होता. शिवरायांचा जेष्ठ पुत्र तोच आहे त्यालाच राजपद मिळाले पाहिजे. आपणही छत्रपती शिवरायांच्या मार्गदर्शनाखाली वाढलेला आहोत. त्यांचे उपकार संबंध मराठी रयतेवर आहेत. मराठ्याना स्वाभीमानाने जगता यावे यासाठी हिंदवी स्वराज्य निर्माण करुन महाराष्ट्रातील मराठ्यांची इतिहासाला दखल घेण्यास लागले. एवढे महत्वपूर्ण कार्य छत्रपती शिवरायानी केले. त्यांच्या पश्चात राजपदासाठी संघर्ष निर्माण होणे हे मराठी माणसांना शोभेची गोष्टच नव्हती. आत आपण स्वस्थ बसून चालणार नाही. स्वार्थी प्रधानांनी छत्रपतींच्या पश्चात उपकार विसरले. त्यांना वठणीवर आणने ही काळाची गरज आहे. असे समजून त्यांनी संभाजी राजांच्या पाठीशी उभे राहील्याने एका नव्या इतिहासाला कलाटणी मिळाली.

हिंदवी स्वराज्याची राजधानी रायगडावरुन सेनापती हंबीरराव मोहिते यांना जसे पत्र पाठविण्यात आले. तसेच युवराज संभाजी राजांना पन्हाळ गडावर जासूद खंडोजी नाईक व गणोजी कावळा यांच्यामार्फत पत्र पाठविण्यात आले. यावेळी युवराज संभाजी राजे पन्हाळ्यावर नजरकैदेत होते. मात्र त्यांना संपूर्ण संचार स्वातंत्र्य होते. छत्रपती शिवरायांनी त्यांच्या खर्चासाठी तीन लाखाचा तालुका तोडून दिलेला होता. दक्षिण स्वराज्याचा कारभार त्यांच्यावर सोपविला होता. युवराज संभाजी राजांना पन्हाळ्याच्या पायथ्याशी जासुदे आल्याचे दिल्याने ते लवकरच त्यांच्या जवळ गेले. ही पत्रे कसली ? असे विचारले असता त्यांनी घाबरुन जाऊन संभाजीच्याच नावाचे पत्र त्यांना दिले. त्या पत्रामध्ये असा मजकूर होता की, 'वाखा आहे आरोग्य होईल" [२२] तर दुसरे पत्र गडावरच्या हवालदार व सुभेदाराच्या नावाचे होते. संभाजी राजांनी ते ही पत्र फोडून वाचले. त्यामध्ये लिहीले होते की, 'फार घाबरे आहेत पुढे बंदोबस्त ठरेल तसे लिहू. परवानगी शिवाय संभाजी महाराजास उतरु जाऊ-येऊ देऊ नये.'[२३] संभाजी राजांचे डोळे लाल झाले. चेहेऱ्यावर संताप दिसत होता ते

रागाने जासुदाला म्हणाले, 'आबासाहेब कसे आहेत ते खरे सांगा, नाही तर पारिपत्य करीन'[२४] जासुदाचा धीर सुटला पश्चात्यांनी रागडावरील सर्व प्रकार सांगितला. या जासुदांना २७/०४/१६८० च्या सुमारास कैद केले असावेत. या दिवशी राजापुरकर इंग्रज सुरतेच्या इंग्रजाना कळवितात, 'कित्येकांना त्याने कैद केले व कित्येकांना कामावरुन दूर केले.'[२४] संभाजी राजांनी रायगडावरील कटात जे सहभागी झालेले पन्हाळ्यावरील अधिकारी होते त्यातील काहींना कैद केले. तर काहींना नौकरीतून काढून टाकेले आणि आपणाला कैद करण्याचा अण्णाजी दत्तोचा प्रयत्न संभाजी राजांनी हानून पाडला. छत्रपती शिवरायांच्या निधनाच्या वातीने संभाजी राजे अतिशय दुःखी झाले. लहान वयात असताना त्यांची आई सईबाई निधून ेल्या होत्या. आजी राष्ट्रमाता जिजाऊनी संपूर्ण सांभाळ केलेला होता. त्याही इ.स.१६७४ मध्ये मृत्यू पावल्या. आता आपला विचार करणारे व समजून घेणारे एकमेव छत्र होते. पण तेही आपल्या पश्चात काळच्या पडद्याआड गेले. असा विचार करुन शोक व्यक्त करु लागले. पण ही वेळ शोक व्यक्त करण्याची नव्हती. कारण छत्रपती शिवरायांच्या तालमीत वाढलेल्या अष्टप्रधान मंडळातील केवळ सेनापती हंबीरराव मोहिते मामा वा ळता सर्व प्रधानांनी व सावत्रआई सोयराबाईंनी राजपदाचा राजारामाला देवून संभाजी राजांना कैद करण्याचे प्रयत्न सुरू केलेले होते.

## २) संभाजी राजांचे सेनापती हंबीररावांना पत्र

पन्हाळ गडावरुन यु वराज संभाजी राजांनी अष्टप्रधान मंडळातीलकेवळ मामा सेनापती हंबीरराव मोहिते यांच्याकडे धाव घेतली. गुप्तहेरांच्या माध्यमातून तळबीडला असलेल्या मामांना पत्र पाठविले कारण संभाजी राजे लहानपनापासून सेनापती हंबीरराव मोहिते यांना आदी जवळून ओळखत अनेक कौटुंबिक प्रसंगामध्ये हंबीररावांनी आपण सख्ये मामा असल्यचेच दाखवून दिलेले होते. ज्यावेळी छत्रपती शिवराय आणि सोयराबाई यांचा विवाह झालेला होता आणि सोयराबाईना लवकर मुल होत नव्हते. तेव्हा संभाजी राजेच माझे भाच्चे आहेत असे समजून त्यांच्यावर प्रेम करत असत. प्रत्येक प्रसंगामध्ये संभाजी राजांच्याच पाठीशी असत. ज्यावेळी संभाजी राजे मोलांकडे

निघून गेले होते. तेव्हा स्वराज्यात परत आणण्यासाठी सर्वात जास्तीचे प्रयत्न सेनापती हंबीरराव मोहिते यांनी केलेले होते. संभाजी राजे स्वराज्यात परत आल्याची बातमी छत्रपती शिवाजी राजे व सेनापती हंबीरराव मोहिते यांना जालन्याच्या स्वारीच्या वेळी म्हणजे विश्रामगडावर असताना समजली. तेंव्हा सेनापतींना खूप आनंद झालेला होता. त्यांनी छत्रपतींना पन्हाळ्याकडे जाण्यास व संभाजी राजांना भेटण्यास बोलले असणार.

अष्टप्रधान मंडळातील स्वामीनिष्ठा, स्वराज्यनिष्ठा स्वराज्याची इमान इतबारे सेवा करणारे एकमेव प्रधान होते. सत्याच्या पाठीशी राहणारे, परोपकारी, त्यागी, लढवय्या, सेना धुरंधर, राजकारणी, भूतकाळाचा अभ्यास करुन भविष्याचा वेध घेणारे, विजयश्री असे अलौकिक व्यक्तीमत्व म्हणून सेनापती हंबीरराव होते. आपणास खरा न्याय केवळ सेनापती देतील आणि हिंदवी स्वराज्य वाचवतील अशा अपेक्षेने युवराज संभाजी राजांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांना पत्र पाठविले. त्या पत्रात लिहीले होते की, 'महाराजांनी निधनापूर्वी राज्य माझ्या स्वाधीन केले आणि दिल्लीश्वराला तोंड देण्याची जबाबदारिही माझ्यावर टाकली. पण दुष्ट मंत्री माझ्यावर कुरघोडी करीत आहेत. धाकट्या भावाचा मी द्वेष करितो असे त्यांनी त्याच्या आईच्या मनात भरवून दिले आहे. मोगल जर टपलेले नसते, तर मला दिलेल्या या राज्यावर त्या पोराला केव्हाच या दुष्ट मत्र्यांनी बसवून टाकले असते. माझ्या द्वेषाने अंध होऊन हे यवनांना येथे येण्याचे आमंत्रण देण्यास सुद्धा कमी करणार नाहीत. पण राज्य राजा मिळवत नाही, राजा राज्य मिळवितो. या मंत्र्याना मी घाबरत नाही. सध्याच या दुष्टांना मी जेरबंद केले आहे. तुम्हिही मला मिळून त्यांचे पारिपत्य करावे आणि असाच सल्ला तुम्ही मकाजी आनंदराव व मानाजी मोरे यांना द्यावा.'[२६] या पत्रावरुन युवराज संभाजी राजांनी सेनापती हंबीररावांकडे मोठी अपेक्षा ठेवली असल्याचे दिसून येते. स्वराज्याच्या वस्तू:स्थितीचा विचार केला असून राज्यातील अधिकारी व सेनानींना सहकार्य करण्यास सांगावे असा केवळ तुमच्यावर माझा हक्क आहे. यावरुन दोघांचा एकमेकांवर किती विश्वास होता हे स्पष्ट होते. या पत्राच्या पूर्वीच सेनापती हंबीररावांनी गुप्त हेरांच्या माध्यमातून कवी परमानंदाने सांगितल्या प्रमाणे 'हंबीरराव आपल्या बहिणीच्या बाजुला नसून संभाजीचाच पुरस्कार करीत

आहे.'[२७] बहीण सोयराबाई व भाच्चा राजाराम यांच्या बद्दलकितीही प्रेम असले तरी तो सत्याच्य बाजुने चालणारा होता. हिंदवी स्वराज्याचा कायदेशीर वारस हा युवराज 'संभाजी राजे' असल्याने हंबीरराव संभाजी राजांची बाजू घेतात. हे संपूर्ण स्वराज्यातील जाणत्या लोकांना माहित होते. मात्र त्यांनी आपला हेतू स्पष्टपणे रायगडावर कळू दिलेला नव्हाता आणि हेच खरे राजकारण होते.

सेनापती हंबीरराव मोहिते यांना रायगडावरील बंडखोरांचे सर्वात अगोदर पत्र मिळाले हाते. त्यावेळी त्यांनी 'तुम्ही जेथे जेथे जाल, तेथे तेथे मी येईन' असे संदिग्ध स्वरुपाचे पत्र पाठविण्याने रायगडावरील सर्व मंत्र्याना सेनापती हंबीरराव आपल्या बाजुने उभे राहणार असा अनुकूल अर्थ काढलेला होता. जेधे शकावली प्रमाणे २१ एप्रिल १६८० रोजी म्हणजे 'साडेतीन मुहूर्तातील अक्षय तृतीयेस राजारामास आनाजी पंत सुरणीस यांनी मंचकी बसविले.'[२८] आणि अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे, प्रल्हाद निराजी अल्पसे सैन्य घेऊन रागडावरुन प्रतापगडावर आले. प्रल्हाद निराजीला सेनापती हंबीरराव मोहितेंच्या पत्रातीलखरा अर्थ लक्षात आलेला होता. सेनापती व त्यांचे सैन्य संभाजीच्या पाठीशी आहे. आपा तर संभाजी राजांना कैद करण्यासाठी जात आहा ेत. परिणाम वाईट भोावे लागतील. शेवटी या मंत्र्यानी प्रल्हाद निराजीला पन्हाळ्यावर संभाजी राजाकडे वाटाघाटी करण्यास पाठविले. आणि ते तिकडेच अडकले सेनापती हंबीरराव मोहिते आपल्याला पांठिबा देतात. त्यांच्या बाबतचा आत्मविश्वास आम्हा सर्वांना आहे. आम्ही त्यांच्या भाच्चास रायगडावर मंचकारो न केलेले आहोत. असे समजून ते सर्व प्रतापगडावरुन कऱ्हाडजवळ येताच सेनापती हंबीरराव मोहिते यांनी आपला एक दूत त्यांच्याकडे पाठविला. मोरोपंत पेशवे व अण्णाजी दत्तो आपास हंबीरराव एकांतात भेटू इच्छीतात असा निरोप पाठविला असे कवी परमानंद म्हणतात. पण वस्तूस्थिती अशी आहे की, प्रतापगडावरुन निघालेल्या मंत्र्यांनीकऱ्हाड जवळ असलेल्या सेनापतीला आपल्या सोबत सैन्यासह घेऊन जाऊन युवराज संभाजीसकैद करु असा विचार करुन ही मंडळी सेनापती हंबीररावांकडे आलेली होती. येथील वृत्त ांत कवी परमानंदाने दिलेला आहे. 'राज्यविभा णची कल्पना शिवाजी राजांची नसल्याने हंबीररावाला त्यांच्या या कपटमर्कट वृत्तीचा राग आला व क्षणात हंबीररावाच्या सामर्थ्याला भिऊन या राष्ट्रद्रोही मंत्र्याना

आपल्याच पाोट्याच्या पदरात हात जोडून लाच ारीने सेनापतीचीक्षमा मागावी लागली. क्षत्रियवृत्तीच्या त्या हंबीररावाने त्यांची अधिक विटंबना न करिता त्यांच्याबरोबर आलेल्या मंडळींना शस्त्रहीन व कैद करुन आपल्या दक्ष व शूर सेनाविभागाच्या बंदोबस्ताखााली सर्वांना कैदी म्हणून पन्हाळ्यास रवाना केले.'[२९] येथील प्रसंगामध्ये सेनापती हंबीररावाचे वर्णन डॉ.शिवदे सदाशिव यांनी केलेले आहे, ते म्हणतात की, 'शत्रुला पालथा घालणाऱ्या त्या सेनापती केसरीने आपली दृष्टी रागाने लालबुंद केली, त्याच्या मिशा विस्फारल्या, त्याने आपले कवच घट्ट केले, हातात ढालतलवार घेतली, बैलाप्रमाणे कणखर खांदे असलेला धनुष्यबाण घेतलेला आपल्या सेनेसह समोर उभा टाकलेला त्या दोघांना दिसला'[३०] तेथेच पेशवे मोरोपंत पिंगळे व सचिव अण्णाजी दत्तो आणि सोबतच्या सैन्याला स्थानबद्ध करुन त्यांच्या पायात बेड्या घालून पन्हाळ्यावर युवराज संभाजीसमोर उभे केले.

तत्पूर्वी सेनापती हंबीरराव मोहिते यांनी स्वराज्यातील संपूर्ण अधिकारी व सेनानींना पत्र पाठवून सक्त आदेश दिले, काही सेनानींना पन्हाळ्यावर येण्यास सांगितले. सेनापती पन्हाळ्यावर पोहचण्यापूर्वीच अनेक लोक व सैनिक पन्हाळ्यावर जात होते. जवळपास पाच हजार सैन्य पोहचले होते. आतापर्यंत हंबीररावांनी तलवारीच्या बळावरा्बोळे रणांगण गाजविले. यावेळचे रणांगन त्यांनीच गाजविले मात्र तलवार चालविण्याची गरजच पडली नव्हती. बुद्धीच्या बळावर राजकारणाचा सारि पाठच बदलून टाकला. सेनापती हंबीररावांनी आनंदराव मकाजी, निंबाळकर यांच्यासह पन्हाळ्यावर संभाजी राजांची भेट घेतली. 'आणि शंभुराजास पाहून शिवाजी महाराजांच्या मागे राज्य संरक्षण करील असा हाच आपला राजा आहे हे पाहून सर्वांना आनंद झाला.[३१] सेनापती हंबीररावांनी १९ एप्रिल १६८० च्या पूर्वीच युवराज संभाजी राजाशी संपर्क केल्यचे एका पत्रातून लक्षात येते. या दिवशी राजापूरकर इंग्रज लिहीतात, 'संभाजी राजाने पन्हाळ्याला ठाणे केले असून त्यांच्याकडे असंख्य सैन्य जावून मिळत आहे. त्याने राजापुरास माणसे पाठवून तेथे असलेले सर्व धान्य अडकवून किल्ल्यावर पाठविण्याचे हुकूम दिले आहेत ा. इतक्यात संभाजी

राजांच्या पक्षाकडून हे शहर ताब्यात घेतले जाईल असा रंग दिसत आहे. अशा परिस्थितीत आम्ही काय करावे हे तुम्ही ठरवावे.[३२]

युवराज संभाजी राजांनी सेनापती हंबीररावांच्या सल्ल्याने सर्वत्र सुभेदार व अधिकारी नेमले. पन्हाळ्याचा कारभार म्हाळोजी घोरपडे यांच्याकडे सोपविला. पिलाजी शिर्के संभाजी राजांचे सासरे यांच्या सोबत पंधरा हजार सैन्य देऊन पुढे रायगडाकडे पाठविले हे केवळ सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यामुळे शक्य झाले. काही मंत्री वगळता संपूर्ण स्वराज्य संभाजी राजांच्या पाठीशी उभे करण्याचे काम एकट्या हंबीररावांनी केले. जर हंबीररावांनी योग्य भूमिका घेतली नसती तर स्वराज्यात यादवी होऊन मोगलांचे वर्चस्व निर्माण झाले असते. पण इतिहासाला ते कधीच मान्य नव्हते.

## ११) सेनापती हंबीरराव मोहितेच्या सहकार्याने युवराज संभाजी राजे 'छत्रपती' पदावर

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी पन्हाळ्यावर असलेल्या युवराज संभाजी राजांची दोघात सल्ला मसलत होऊन भेट घेतली. काही गुन्हेगारांना कैदेत डांबले तर काहींना कामावरुन कमी केले. अनेक ठिकाणी नवीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. जवळपास दोन महिने युवराज पन्हाळ्यावर होते. याकालावधीत सेनापती हंबीररावांनी त्यांना सर्वोतोपरी सहकार्य केले. त्यांच्या परवानगिने लवकरच ते ससैन्य घेऊन राजधानी रायगडावर आलेले असावेत. कारण पन्हाळ्याचा बंदोबस्ताबरोबर राजधानी रायगडाचा बंदोबस्त करणे महत्वाचे होते. पिलाजी शिर्के यांच्या बरोबर १५००० सैन्य देऊन पुढे पाठविले होते. तेथे परिस्थिती पुर्वपदावर आनने महत्वाचे हाते. रायगडावर जाणे हंबीररावांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे होते. बहीण सोयराबाई व भाच्चा राजाराम आणि छत्रपतींचा परिवार या वेळी गडावर असल्याने आपल्या अनुपस्थितीत बंडखोर मंत्र्यानी सोयराबाईला हाताशी धरुन राजपदाच्या संदर्भात यादवी निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला होता. सोयराबाईला हंबीररावांचा सल्ला घेण्याची संधी मिळू दिलेली नव्हती. अष्टप्रधानातील काही

प्रधानांना सेनापती हंबीररावांचा स्वभाव माहिती झालेला होता. हंबीरराव म्हणजे सत्याने चालणारे शिवरायांचे खरे पाईक होते म्हणून सोयराबाईना हंबीररावांपासून दूर केलेले होते. गुप्तहेरांच्या माध्यमातून पन्हाळगडावरील प्रसंग बातम्या रायगडावर पोहचल्या होत्या. जे कटात सहभागी झाले अशांना शिक्षा दिलेल्या होत्या. आपण आता यातून सुटणार नाही या भितीने बंडखोर मंत्र्याच्या कटातील अधिकारी पळून जाण्याच्या मार्गावर होते. पण लवकरच हंबीररावांनी सैन्य रायगडावर पाठविल्याने व चौक्या आणि पहारे बसविण्याचे आदेश दिल्याने रायगडावरील सोयराबाई या सुद्धा घाबरल्या होत्या. रायगडावर शिजविलेले संपूर्ण कट कारस्थान जेष्ठ बंधू आणि स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यामुळे केवळ अयशस्वी झाले. आणि आता वडिल बंधू या नात्याने कोणती शिक्षा हंबीरराव करतील या विषयीची भिती सोयराबाई ना वाटत होती.

तळबीडचे 'मोहिते घराणे' व वेरुळ 'भोसले घराणे' यांच्यात अनेक पिढ्यांपासून स्नेहाचे व नात्याचे संबंध निर्माण झालेले होते. ही घराणे एकमेकांना सुख दु:खामध्ये सहकार्य करीत असत. इ.स.१६२६ मध्ये शहाजी राजे भोसले यांना निजामाच्या सैन्याने सालप्याच्या घाटात अडविले होते. सोयराबाईचे वडिल संभाजी व चुलते धारोजी मोहिते यांनी शहाजी राजांना सहकार्य करुन त्यांचा जीवच त्यांनी वावचिला होता. त्यांच्या उपकारापोटी शहाजीराजांनी संभाजी मोहिते यांची बहीण व सोयराबाईची आत्या तुकाबाईशी विवाह लाऊन घेतला होता. पुढील काळात शिवरायांनी हंबीररावांना सैन्यात नोकरी दिली. सोयराबाईशी विवाह लाऊन घेतला. एवढेच नसून कर्नाटकामध्ये व्यंकोजी राजांचा विवाह अण्णूबाई नावाच्या बहीणीशी केलेला होता. एवढी नातेसंबंधाची व स्नेहाची परंपरा दोन घराण्यात असताना शिवरायांच्या निधनानंतर अष्टप्रधान मंडळातील अण्णाजी दत्तोच्या सांगण्यावरुन सोयराबाई कटात सहभागी झाल्या याचे दु:ख सेनापती हंबीरराव मोहिते यांना खूप झाले होते. मोहिते घराण्याची परंपरा ही त्यागाची, स्नेहाची, निष्ठेची आहे असे समजून रायगडावर सोयराबाईची भेट घेण्यासाठी गेले असावेत मोरोपंत व अण्णाजी आपल्या लोकांनिशी रायगडाहून पन्हाळ्याकडे निघाल्यानंतर लवकरच रायगडावर सरनौबत न नायक वाडी यानी १६ मे रोजी किल्ला ताब्यात घेऊन फितुरीतील लोकांना कैद केले व आपले चौकी पहारे बसविले'[३३] असा

संदर्भ खोबरकर वि.गो. देतात. यावरुन सरनौबत म्हणून यावेळी हंबीररावाच होते. युवराज संभाजीच्या अगोदर हंबीरराव रायगडावर आलेले होते. नंतर १० जून १६८० रोजी संभाजी राजे रायगडावर आले तेंव्हा 'सोयराबाईचे व दुसऱ्या तीन मातांचे त्याने येताच सात्वंन केले.'[३४] असे कविंद्र परमानंद लिहीतो डॉ.शिवदे सदाशिव सर जेधे शकावलीचा उल्लेख करुन युवराज संभाजी राजे पन्हाळा ते रायगड प्रवासातील प्रसंग देतात. '३ जून १६८० म्हणजे राजशक ७, रौद्र, तेथून संभाजी महाराज प्रतापगडावर गेले. भवानीचे दर्शन घेऊन पुजा केली आणि आषाढ शुद्ध २ शुक्रवारी संभाजी राजे रायगडास आले. राज्य करु लागले.'[३५] रायगडावर युवराज संभाजी राजांनबरोबर सेनापती हंबीरराव मोहिते असावेत. त्यानी पहिल्यांदा शिवरायांच्या अस्थिंचे दर्शन घेतले. १२ जुलै १६८० च्या पत्रातून सुरतकर इंग्रज लिहीतात, 'संभाजी रायरीला आहे धाकट्या भावाला त्याने दयेने वागविले. अण्णाजीचे डोके कापले नसून त्याचे फक्त साखळ्या घालून हाल चालविले आहेत. अशी चौलच्या सुभेदाराकडील एका लायक माणसाकडून माहिती कळली. देशात स्थिरता येऊन संभाजी राजा झाल्याचे जाहीर झाले आहे. त्याच्याजवळ आता २० हजार सैन्य तयार आहे. तो फार मेहनती व सावध आहे असे लोक बोलतात.' [३६] तर मल्हार रामराव चिटणीस [३७] म्हणतो 'राजारामसाहेब यास नजरबंद केले. वाड्यात आले. सोयराबाई साहेब यांजपाशी जाऊन बाईसाहेब कोठे आहेत म्हणून बहूत क्रोधे करुन विचारिले ते समयी जवळील बायका सर्व भये करुन निघाल्या 'तुम्ही राज्य-लोभास्तव महाराजास विषप्रयोग करुन मारिले" असा आरोप शब्द बोलून कोनाडा भिंतींस करुन त्यांत सोयराबाई साहेबांस चिनोण, दुध मात्र घालीत जावे' गडावरील मल्हार रामराव चिटणिसांचा वरील प्रसंग पूर्णपणे चुकीचा आहे. कारण परकीय इंग्रज व्यापाऱ्यांच्या पत्रातील मजकूर पहाता बऱ्याच दिवसांनी सोयराबाईचा मृत्यू होने यामध्ये काहीही तथ्य नाही. संभाजी राजांच्या वर्तणुकीबद्दल सुरतकर इंग्रज १८/१०/१६८० रोजीच्या पत्रात लिहीतात, 'Whose present proceeding seems to speake him to be of a contrary spirit and temper to his father by a much more moderate and humane Government'[३८] म्हणजेच संभाजीच्या कार्यावरुन छत्रपती शिवाजी राजांपेक्षा स्वभावाने

अतिशय मवाळ व दयाळू असल्याचे दिसते. रायगडावर संभाजी राजांनी दरबार भरवून राज्यकारभाराला सुरुवात करुन २० जूलै १६८० रोजी (शके १६०२ रौद्र संवत्स श्रावण शुद्ध पंचमी नागपंचमी) या दिवशी संभाजीराजांचे मंचकारोहण झाले.'[३९] अधिष्ठीत राजाच्या मृत्यूपूर्वी किंवा मृत्यू झाल्यावर राज्याचे सिंहासन मोकळे राहाता कामा नये म्हणून युवराज संभाजीला मंचकारोहण समारंभ (अभिषेक) करुन घ्यावा लागलेला होता. या बाबत सेनापती हंबीरराव मोहिते यांच्याशी चर्चा त्यांनीकेलेली असावी. कारण केवळ अष्टप्रधानापैकी सेनापती वगळता सर्व प्रधानांचा कार्यभार स्वतः युवराज संभाजी राजांनी केल्याचे दिसून येते. एक अनुभवी व पाठीराखा म्हणून सेनापती हंबीरराव हे युवराज संभाजी राजांना सहकार्य करीत होते. ऑगस्ट मध्ये संभाजी राजांनी रायगडावरील संपूर्ण संपत्तिची मोजणी केली. जमादारखाने तपासले पावसाळा संपताच मोगलांच्या प्रदेशात मराठी सैन्य रवानाकेले. मंचकारोहणाच्या निमित्ताने त्यांनी अनेक सत्पुरुषांना व धार्मिक स्थळांना दाने व इनामे करुन दिली. तुकाराम महाराजांचे देहुला वास्तव्य करणारे चिरंजिव महादोबा यास वर्षासनाची मोईन पातशाही होन एक आणि लुगडी याबद्दल गला जोरी बारुले महाल भाषे खंडी एक मोईन करुन दिली. पाटगाव, कुडाळ येथील ईश्वर स्वरुप मौनी गोसावी यास पालखीस भोई आणि वाजंत्री यासाठी वांजत्री यास वर्षास पंचवीस आणि भोई यास शंभर होन अशी वर्षाची नेमणूक मौनीबुवाचे शिष्य तुरुतगिरी याजवळ दिली. तुळजापुरच्या देवीसमर्पण केलेला हत्ती, सालंकार पाच घोडे आणि वीस हजार होनांचे वार्षिक दान देण्यात आले. तुळजापुरच्या महालक्ष्मी प्रमाणेच प्रतापगडच्या भवानिमातेच्या कृपाप्रसादाने आपणास राज्यश्रिचा लाभ झाला असे संभाजीला वाटले आणि तिला दर वर्षी दहा हजार होन देणगी दिल्याचे शिक्कामोर्तबाचे पत्र त्याने मंचकारोहणानंतर महिनाभरात म्हणजे २३ ऑगस्ट १६८० रोजी करुन दिले.'[४०] संभाजी राजे मंचकारोहन करुन राज्यकारभारास सुरुवात केलेली होती. पण सेनापती हंबीरराव व त्यांच्या सहकार्यांना फारसे समाधान वाटत नसल्याने राज्याभिषेकाची तयारी करु लागले. सेनापती हंबीररावांनी बंडखोर मंत्र्याना कैद केले असले तरी मोरोपंतासारख्या मंत्र्याला कैदेत ठेवले नव्हते. त्यांनी केवळ अणाजी पंतांसोबत असल्यामुळे आपल्या हातून फार मोठी चूक झाली. अशा

पश्चात्तापामध्ये जिवन जात होते. पूर्वीची संपूर्ण त्यांची प्रतिष्ठा क्षणामध्ये धुळीस गेलेली होती. तरीही त्यांच्या पदाचे प्रशासन त्यांच्या शिक्यानेच चालू होते. त्यांनी ऑक्टोबर १६८० पर्यंत कारभार केल्याचे दिसून येतो. सेनापतींच्या कृपाशिर्वादाने व सहकाराने युवराज संभाजी राजांनी पेशवे पदावर त्यांच्या मुलास कारभार दिलेला होता. अण्णाजी पंतांची कैदेतून सुटका करुन त्यांच्याकडे अमात्य हे पद दिले होते. न्यायाधिश हे पद प्रल्हाद निराजी यांच्याकडेच ठेवले होते. पंडितराव हे पद मोरेश्वर रघुनाथ यांच्याकडे दिले असून इतर पदांवर सुद्धा काही ठिकाणी बदल केलेले होते. हे बदल करताना सेनापती हंबीररावांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्याने व युवराज संभाजी राजांनी पुन्हा त्यांना प्रशासनात रुजु करुन घेतले होते.

अशा कालखंडामध्ये हिंदवी स्वराज्यावर विजापुरच्या सरदारांचे, मोगलांचे, सिद्दी या प्रमुख शत्रुंचे हल्ले चालूच होते. सिद्दिशी दोन हातकरण्यासाठी युवराज संभाजी राजांनी खांदेरी -उंदेरीच्या लढ्याकडे लक्ष दिले तर सेनापती हंबीररावांनी खानदेव व बागलान प्रदेशातील मोगलांचे हल्ले परतावण्यासाठी प्रयत्न केल होते. कारण या प्रदेशात पेशवे मोरोपंत पिंगळे मोगलांशी लढत होते. परंतु शिवरायांचे निधन होताच ते सोडून रायगडावर आल्याने त्याची व्यवस्था सेनापती हंबीररावांना करावी लागलेली होती. स्वतः युवराज संभाजी राजे सैन्य घेऊन जावून आदिलशाही सैन्याशी कोल्हापुरच्या परिसरात लढत होते. सोलापूरला मोगलांचा सेनापती रणदुरुलाखानाने किल्ला ताब्यात घेण्यासठी वेढा दिला असता मराठा सैन्यांनी त्यांच्यावर हल्ले करुन त्याला जेरीस आनले होते. एकंदरीत शिवरायांच्या निधनानंतर स्वराज्याच्या सर्व बाजुनी शत्रु सैन्यांनी हल्ले सुरू केले होते. त्यांचा बंदोबस्त लावण्याचे काम चालू केले होते. रायगडावर संभाजी राजांचा मंचकारोहन सोहळा पार पडलेला होता. पण त्यांनी स्वतःला राज्याभिषेक करुन घेतलेला नव्हता. याबाबतच्या चर्चा सुरु झालेल्या होत्या. कारण राजारामाचा ही मंचकारोहन सोहळा बंडखोर मंत्र्यानी रायगडावर केलेला होताच पुन्हा रायगडावर जावून संभाजी राजांनिही मंचकारोहन केल्याने शिवरायांचे खरे वारसदार कोण ? अशी चर्चा स्वराज्यात कानी येत असलेल्या सेनापती हंबीररावांनी वकाही अधिकाऱ्यांनी संभाजी राजांना राज्यभिषेक समारंभ करुन घ्यावा असे सांगितले होते.

इ.स.१६८१ हे वर्ष सुरु झाले राज्याभिषेकाची तयारी सुरु झाली. यावेळी हंबीरराव त्यांच्या कामामध्ये व्यस्त होते. स्वराज्याअंतर्गत निर्माण झालेला प्रश्न सोडविण्यासाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांना यश आले होते. दुसरीकडे मराठा सैन्य स्वराज्याच्या सिमेवर शत्रुशी लढत होते. कोणत्या भागात लष्कर पाठवायचे ? कोठे ? किती ? लष्कर आहे याचा विचार करुन सैन्याला प्रोत्साहीत करीत होते. त्यातच छत्रपवती हे पद रिकामे दिसत होते. युवराज संभाजी राजांना लवकरात लवकर 'छत्रपती' पदावर बसवावे यासाठी हालचालींना वेग आलेला होता. या सर्व धावपळीमध्ये १६ जानेवारी १६८१ ही तारीख पक्की करण्यात आली. त्यानुसार सेनापती हंबीरराव रायगडावर येऊन पोहचले. राज्याभिषेकाची तयारी झालेली होती. युवराज संभाजी राजांनी सर्व देवदेवतांचे दर्शन घेतले. यावेळी रायगडावर मोठ्या महाराजांची सर्वांना आठवण आलेली असेल. ज्यावेळी इ.स.१६७४ मध्ये शिवराज्याभिषेक सोहळा चालू होता त्यावेळी सुद्धा सेनापती म्हणून हंबीरराव उपस्थीत होते. राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ होत्या. मात्र यावेळी वेगळी परिस्थिती दिसत होती. युवराज संभाजी राजे 'छत्रपती' पदावर आरुढ होणार याचा आनंद केवळ हंबीरराव यांनाच जास्त होता. उर्वरीत मंत्री फारसे उत्साही नव्हते.

'माघ शुद्ध ७ शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे जानेवारी १४, १५, १६ इ.स. १६८१ रोजी संभाजीराजांना विधियुक्त राज्याभिषेक झाला.'[४१] रायगडावरील हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून राज्याभिषेक सोहळा पार पडला. हा सोहळा तीन दिवस चालला. या सोहळ्याचे वर्णन मल्हार रामराव चिटणीस यांनी आपल्या बखरी मध्ये केलेले आहे. 'माघ शुद्ध १० गुरुवार शके मजकुरी यास राज्याभिषेक यथाविधी विनायकशांती व पुरंदरशांती, होम करुन नंतर अभिषेक होऊन सिंहासनारुढ जाले. तोफा करविल्या. तो सुर्यदर्शन व्हावे ते अस्तमानपर्यंत अभ्र येऊन न जाले. सिंहासनावरुन उठोन रथावर बसले. तेथून काळपुरुष मारावा म्हणून निघाले तो मार्गी रथ मोडला. तसेच जाऊन काळपुरुष मारून, बाजाराचे बाहेर जाऊन, हत्तीवर स्वार होऊन, मिरवत समारंभे करुन महालांत आले. तेथून यज्ञशाला केली. तेथे कबजीचे सांगन्यावरुन सोने, रुपे, तांबे, पितळ, लोखंड, कापूस, तेल, मीठ, सुपारी, नारळ, गुळ, साखर, आठारा धान्य तुळा केल्या.

अष्टप्रधान यांचे सन्मान वस्त्रे अलंकार देऊन ब्र ाह्मण तीस चाळीस हजार जाले. त्यास दक्षणा (देऊन) ब्राह्मण भोजन करविले. तेव्हा दक्षणेचे दाहीत काही ब्राह्मणही मेले. गुणी, गायक यांसही द्रव्य बहूत देऊन संतोषीत केले ते समयी अष्टप्रधान जाहले ते पूर्वी होते तेच पेशवे मोरोपंत करुन त्यांचे गूमास्त्रे उद्धव योगदेव व बहिरोपंत यांचे हाती कारभार घेतला. वरकडाचे गुमास्ते यांचे हाती कारभार घेतले. बहुमान ज्यांचे त्यांस दिले व पाठविले.'[४२] युवराज संभाजी राज्याच्या राज्याभिषेक प्रसंगी मोरोपंत पेशवे ह्यात नव्हते. यापूर्वी त्यांचे पद निळो मोरेश्वर त्यांना दिलेले होते. सेनापती व न्यायाधीश पदावरील व्यक्ती कायम होते. उर्वरित पदावर आलेल्या मंच्यांमध्ये बदल केलेला होता. यावरुन मल्हाररावांचे वर्णन हे बहुधा काल्पनीक असल्याचे दिसून येते.

या प्रसंगी परकिय शत्रुशी लढा चालू असल्यामुळे त्यांचे वं मराठ्यांचे संबंध दुरावलेले असल्यामुळे इतर पत्रांमधून माहिती मिळत नाही. तरीकालीन काळात कविंद्र परमानंदाने संभाजी राज्याच्या राज्याभिषेकावर एक प्रकरणच लिहीले आहे. 'संभाजी राजांचा राज्याभिषेक समारंभ पंचमी, षष्ठी व सप्तमी (१४ ते १६ जानेवारी १६८१) या तीन दिवसात संपला. या विधीशिवाय तुळादानविधी व प्रथम प्रतापगड येथील कुलस्वामिनीचे पुजन व शेवटी भोजन समारंभ झाले. यातील तुळादानविधी ३० डिसेंबर १६८० रोजी झाला. कारण हा प्रायश्चित्तविधी राज्याभिषेकाच्या मंगलोत्सव विधीपूर्वीच व्हावा लागतो. नंतर १३ जानेवारीस राजाभिषेकविधी सुरु झाल्याचे वृत गोपाळ दादाजीच्या पत्रावरुन इंग्रजाने मार्चच्या सुरुवातीस लिहीलेल्या आपल्या पत्रात नमुद केलेले आहे.'[४३] या राज्याभिषेकापूर्वी संभाजी राजांनी सर्व कैद्यानी सुटका केली व हिंदवी स्वराज्याचे नव्याने अष्टप्रधान मंडळाची घोषणा करण्यात आली.

## १२) छत्रपती संभाजी राजांचे प्रधान मंडळ

| | पद | | व्यक्तींची नावे |
|---|---|---|---|
| १) | पेशवे | - | निळो मोरेश्वर पिंगळे |
| २) | मुजुमदार | - | अण्णाजी दत्तो |

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | डबीर | - | जनार्दनपंत हणमंते |
| ४) | चिटणीस | - | बाळाजी आवजी |
| ५) | सुरनीस | - | आबाजी सोनदेव |
| ६) | सरनौबत | - | हंबीरराव मोहिते |
| ७) | दानाध्यक्ष | - | मोरेश्वर पंडितराव |
| ८) | वाकेनवीस | - | दत्ताजीपंत |
| ९) | मुख्य न्यायाधीश | - | प्रल्हाद निराजी |
| १०) | छंदोगामात्य | - | कवी कलश |

राज्याभिषेकाप्रसंगी स्वराज्याचा कारभार करण्यासाठी छत्रपती संभाजी राजांनी १० मंत्र्याचे मंडळ घोषितकेले असून पूर्वीच्या अष्टप्रधान मंडळातील केवळ सेनापती हंबीरराव मोहिते व न्यायाधीश प्रल्हाद निराजी हेकायम त्या पदावर ठेवण्यात आले. इतर मंत्र्यापैकी काही मंत्री मरण पावल्याने नवीन व्यक्तींची नेमूक करण्यात आली. तसेच यावेळी दोन मंत्रीपदे वाढवण्यात आली. बरेचजन नवखे होते. यापैकी कर्तव्यदक्ष व स्वराज्यानिष्ठे कार्य करणारे एकमेव अनुभवी मंत्री म्हणून केवळ सेनापती हंबीरराव मोहिते होते. यांच्याबद्दलकविंद्र परमानंदाने 'अनुपुराण' या ग्रंथात उल्लेख केला आहे.

मतं सेनापतेनैव स्वमतेर्विषयीकृतम ।

न चाद्रिदुर्गपालांना स्वतंत्राणामिथुन ।।

मव्य हम्बीरराजायाः पृतनापतयोऽधुना ।

बलिना शम्भुना स्वस्य विहिताः पक्षपातिनः ।।

याचा अर्थ डॉ.शिवदे[४४] सदाशिव यांनी दिलेला आहे सिंहासनाचा जो स्वामी तोच आपला स्वामी असे किल्लेदारानी मनावर ठसविले. हंबीररावांची आपल्या बहिणीवर ममता (प्रेम) असली तरी परक्रमाविषयी (शंभूराजांच्या) अतिशय अनुकूलता आहे. या सर्वांच्या समक्ष राज्याभिषेक सोहळा पार पडत होता. यावेळी संभाजी राजांचे वर्णन कविंद्र परमानंदाने केलेले असून त्याचा सार इतिहास संशोधक 'कमल गोखले'[४५] यांनी केलेले आहे. 'संभाजी राजे रेशमी वस्त्रे धारण केलेले, अत्यंत तेजस्वी, केशरी गंध लावलेला, चंदनाची उटी व फुलांच्या माळा धारण केलेला, जहीपटका बांधलेला, चिलखत, ढाल, तलवार, धनुष्य ही आयुधे धारण केलेला, सोन्याच्या कंबरपट्याने ज्याने कंबर बांधली आहे, शेला पांघरलेला, वर छत्र धरलेला, बाजुला चवऱ्या ढाळल्या जात असलेला असा शंभुमहाराज अधिकारानुसार आपापल्या स्थानावर बसलेल्या आणि हात जोडलेल्या सरदाराकडून स्तूती केला गेला, पाहिला गेला.' अशा रितीने राज्याभिषेक सोहळा १६ जानेवारी १६८१ रोजी रायगडावर झाला. सेनापती हंबीरराव मोहिते यांना आपल्या डोळ्यासमोर हिंदवी स्वराज्याचा दुसरा छत्रपती झाल्याचा आनंद हा द्विगुणीत स्वरुपाचा होता. पूर्वी इ.स.१६७४ एप्रिल मध्ये मेहुने शिवाजी राजे छत्रपती झाल्याचे पाहावयास मिळाले. आता जानेवारी १६८१ मध्ये भाच्चा संभाजी राजे छत्रपती पाहण्याचे भाग्य लाभले. हा त्यांच्या जिवनाती ऐतिहासिक योग म्हणावे लागेल.

## १३) सारांश :

छत्रपती शिवाजी महाराजांचे आकस्मीत निधन ३ एप्रिल १६८० रोजी झाले. हिंदवी स्वराज्य दुःखाच्या सागरामध्ये न्हाहून निघाले. त्याचे परिणाम परकीय शत्रुच्या धोरणावर झाले त्यापेक्षा हिंदवी स्वराज्यावर दुरगामी स्वरुपाचे झाले होते. निधनाची वार्ता काही दिव स बहुंताश लोकांना समजलीच नव्हती. या काळातच स्वराज्याच्या राजकारनाने वेगळेच वळन घेतले होते. हिंदवी स्वराज्यात यादवी सुरु होऊन मोगलांचे वर्चस्व निर्माण होईल अशी परिस्थिती दिसत असताना छत्रपती शिवाजी राजांच्या तालमीत वाढलेल्या हिंदवी स्वराज्याच्या सेनापती पदावर असलेल्या

हंबीरराव मोहिते यांनी आपली स्वामिनिष्ठा व सिंहासनानिष्ठा ठेवल्याने मराठ्यांच्या इतिहासाला वेगळे वळन मिळाले आणि शिवरायांचे जेष्ठ पुत्र संभाजी राजे 'छत्रपती' बनले. हा बदल केवळ सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यामुळे झाला, की जेव्हा स्वतःचा भाच्चा राजाराम हा छत्रपती बनन्याची अनुकूलता असताना हिंदवी स्वराज्याचा कायदेशी वारसदार की आपला भाच्चा अशी निवड हंबीररावांसमोर होती. जिकडे हंबीरराव तिकडे छत्रपती पद असे समीकरण तयार झालेले असताना सेनापती हंबीररावांनी कौटुंबिक स्वार्थाहून हिंदवी स्वराज्याचे भवितव्य महत्वाचे मानले. आणि आपला कौल संभाजीराजाकडे दिल्यावर स्वराज्यात निर्माण केलेल्या यादवीतील बंडखोराचे मतलबी राजकारण धुळीस मिळविले. अशी घटना मराठ्यांच्या इतिहासात पहिल्यांदाच घडली हे केवळ सेनापती हंबीरराव करु शकले.

छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचा कारभार व्यवस्थीत चालावा यासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. आठ मंत्र्यापैकी केवळ सेनापती पदावरील व्यक्ती हा त्यांच्या नातेसंबंधातील होता. उर्वरित त्यांचे जिवलग, विश्वासू कर्तव्यदक्ष असे प्रधान होते. छत्रपतींच्या ह्याती मध्ये सर्वांना स्वराज्य घडविण्यासाठी कसोसीने प्रयत्न केले. परंतु त्यांच्या कर्तत्वाची खरी परिक्षा महाराजांच्या पश्चातच असताना केवळ स्वार्थापोटी सेनापती वगळता सर्व प्रधांनानी स्वार्थी राजकारण करण्यास प्राधान्य दिले. शिवरायांच्या ह्यातीमध्ये त्यांच्याकडून असे प्रयत्न झाले असते तर त्यांचे इतिहासात नाव सुद्धा शिल्लक राहीले नसते. पण प्रधान मंत्र्यानी शिवरायांच्या नंतर स्वराज्याचा कारभार आपण करु या स्वार्थी हेतुने लहान असलेल्या राजारामाला सिंहासनावर बसवून संभाजीचाकाटा काढावा या हेतूने प्रयत्न झाले. पण शिवरायांच्या विचाराने घडलेल्या स्वराज्यनिष्ठेसाठी स्वतःच्या भाच्च्याला बाजुला सारुन युवराज संभाजी राजांना छत्रपतीपदी बसवून स्वराज्यनिष्ठेचे व निःस्वार्थी वृत्तीचे सच्चा शिवभक्त असल्याचे उत्तम उदाहरण सेनापती हंबीरराव मोहिते यांनी इतिहासाला घालून दिले. छत्रपती संभाजी राजांच्या प्रधान मंडळात स्वराज्याचा सेवक म्हणूनच त्यांनी कार्य केले.

## संदर्भ ग्रंथ :


१) देशमुख विजय - शककर्ते शिवराय (उत्तरार्ध) नागपूर, छत्रपती सेवा प्रतिष्ठाण, प्रकाशन, ऑगस्ट १९८२, पृ.९३०.

२) बेंद्रे वा.सी. - श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र, उत्तरार्ध, पृ.१०४५.

३) पगडी सेतुमाधवराव - खंड २, शिवचरित्र एक अभ्यास, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, प्रथम प्रकाशन, १९७१, पृ.५३१.

४) पगडी सेतुमाधवराव - छत्रपती शिवाजी, नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, सातवी आवृत्ती, २००९, पृ.१४०.

५) खोबरेकर वि.गो. - महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड (भाग-१), मुबंई, १७२ मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, पृ.२१२.

६) गोखले कमल - शिवपुत्र संभाजी, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती चौथी, २००१, पृ.६६.

७) गोखले कमल - पूर्वोक्त, पृ.६७.

८) पगडी सेतुमाधवराव - पूर्वोक्त, पृ.१४५.

९) पगडी सुतुमाधवराव - पूर्वोक्त, पृ.१४५.

१०) हेरवाडकर र.वि. (संपा) - कृष्णाजी अनंत सभासद विरचित, शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर) पुणे, व्हिनस प्रकाशन, पृ.११३, ११४.

११) शिवदे सदाशिव - सेनापती हंबीरराव मोहिते, पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७, पृ.६४.

१२) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.९६५.

१३) कुलकर्णी अ.रा. - जेधे शकावली-करीना, पुणे डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७, पृ.९९.

१४) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.६५.

१५) देशमुख विजय - पूर्वोक्त, पृ.९६८.

१६) हेरवाडकर र.वि. - मल्हार रामराव चिटणीस -विरचित श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे, पुणे, व्हिनस प्रकाशन, ऑगस्ट १९७२, पृ.२.

१७) हेरवाडकर र.वि. - पूर्वोक्त, पृ.२,३.

१८) हेरवाडकर र.वि. - पूर्वोक्त, पृ.३.

१९) गोखले कमल - पूर्वोक्त, पृ.७४.

२०) देशमुख विजय (संपा) - शिवविजय रौप्य मोहत्सवी कार्य गौरव समिती नागपूर, आवृत्ती प्रथम, १९९२, पृ.२६.

२१) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त, पृ.२६.

२२) पुराणिक श.श्री. - मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर (पूर्वार्ध), पुणे, काळ प्रकाशन, आवृत्ती प्रथम, जुन १९८१, पृ.३३.

२३) पुराणिक श.श्री. - पूर्वोक्त, पृ.३३.

२४) पुराणिक श.श्री. - पूर्वोक्त, पृ.३३.

२५) गोखले कमल - पूर्वोक्त, पृ.८०.

२६) पुराणिक रा.श्री. - पूर्वोक्त, पृ.३४,३५.

२७) पवार जयसिंगराव (संपा) - छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, रिया पब्लिकेशन, आवृत्ती दुसरी, जाने.२००९, पृ.२६.

२८) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त, पृ.९९.

२९) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त, पृ.२९.

३०) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.६७.

३१) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त, पृ.२९.

३२) शिवदे सदाशिव - ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००८, पृ.७७.

३३) खोबरेकर वि.गो. - पूर्वोक्त, पृ.२१८.

३४) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त, पृ.२९.

३५) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.७८.

३६) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.७८.

३७) हेरवाडकर र.वि. - पूर्वोक्त, पृ.६.

३८) गोखले कमल - पूर्वोक्त, पृ.८६.

३९) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.६८.

४०) पुराणिक रा.श्री. - पूर्वोक्त, पृ.४१.

४१) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.१०७.

४२) हेरवाडकर र.वि. - पूर्वोक्त, पृ.९,१०.

४३) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त, पृ.३५.

४४) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त, पृ.६९.

४५) गोखले कमल - पूर्वोक्त, पृ.८८.

# प्रकरण पाचवे

# सेनापती हंबीररावांच्या युद्ध मोहिमा

## १) प्रास्तावना :


मध्ययुगीन भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन करुन तत्कालीन दक्षीण भारतातील मोगल, आदिलशाही, कुतूबशाही सत्तांचे प्रदेश जिंकूण घेतले. स्वराज्याचे सुराज्यात रुपांतर करीत असताना ३ एप्रिल १६८० रोजी त्यांचे निधन झाले. ही घटना मराठ्यांच्या इतिहासात अतिशय दुर्दैव समजली जाते. या घटनेचे परिणाम स्वराज्यावर दुरगामी स्वरुपाचे झाले. स्वराज्यावर संकटाची मालिका निर्माण होऊ लागली. स्वराज्याच्या शत्रू राज्यांचा पुरता निकाल लागलेला नव्हता. पाश्चात्य इंग्रजांचे, पोर्तूगिजांचे वर्चस्व वाढत होते. पश्चिम किनाऱ्यावरील जंजिऱ्याच्या सिद्दीच्या वर्चस्वाला पायबंद बसलेला नव्हता. स्वराज्याच्या वारसा बाबतचा प्रश्न निकाली निघालेला नव्हता. यातून स्वराज्याचे अस्तित्व नष्ट होते की काय ? अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. छत्रपती शिवरायाच्या तालमीमध्ये वाढलेल्या अष्टप्रधान मंडळातील बहुतांश प्रधानांनी स्वराज्याचा कारभार आपल्या विचाराने चालावा या उद्देशाने रायगडावर असलेल्या केवळ १० वर्षाच्या राजाराम महाराजास 'छत्रपती' पदावर बसवून आणि पन्हाळा किल्ल्यामध्ये असलेल्या युवराज संभाजी राजांना कैदेत ठेवण्या विषयीचे कट कारस्थान अण्णाजी दत्तो, मोरोपंत पिंगळे, बाळाजी आवजी, सोयराबाई या मंडळीनी रचले होते. मात्र शिवरायांच्याच तालमीत वाढलेल्या हिंदवी स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांनी आपली स्वामिनिष्ठा, सिंहासनानिष्ठा, एकनिष्ठा अभंग ठेऊन रायगडावरील बंडखोर प्रधानांचे मनसुभे उधळवून लावले. स्वतः च्या नात्याचा विचार नकरता हिंदवी स्वराज्याचा कायदेशी वारस हा युवराज संभाजी राजे आहेत असे, जाहीर करुन स्वराज्याचे भवितव्य महत्वाचे माणले. सेनापती हंबीररावांच्या निर्णायक भूमिकेमुळे युवराज संभाजी राजे १६ जानेवारी १६८१ रोजी हिंदवी स्वराज्याचे दुसरे 'छत्रपती' झाले. छत्रपती शिवरायांच्या निधनानंतर विश्वासू व अनुभवी सेनापती

हंबीरराव मोहितेंच्या मार्गदर्शनाखाली संभाजी राजांनी स्वराज्याचा क ारभाराला सुरुवातकेली. बंडखोर प्रधानांना माफ करुन पुन्हा अष्टप्रधान मंडळाच्या पदावर रुजु करुन घेतले. सेनापती हंबीररावांनी सहकारी प्रधानांची कानउघडनी करुन छत्रपती शिवरायांच्या विचाराची 'त्यांना आठवण करुन दिली. त्यांच्या पश्चात स्वराज्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्यांचे उपकार फेडण्याची योग्य वेळ आताच आहे.' असे सांगून वेगवेगळ्या पदांचा कारभार त्यांच्यावर सोपविण्यात आला. हिंदवी स्वराज्य अंतर्गत नाजूक अशा परिस्थितीतून जात असता सिमेवर शत्रुच्या हालचाली चालूच होत्या. नव्या राजवटीने, नव्या जोमाने सेनापती हंबीरराव मोहिते सिमेवरील आघाडी सांभाळत होते. शिवरायांच्या निधनाच्या वेळी नाशिक -त्र्यंबकेकडे मोरोपंत पिंगळे हे आघाडीवर होते. पण ती आघाडी सोडून रायगडावरील कटात सहभागी झाल्याने असा ते कैदेत असल्याने त्या आघाडीवर संभाजीराजांनी सेनापती हंबीरराव मोहिते यांना २० हजार सैन्यानिशी पाठविले'[१] यावेळी मोगल सम्राट औरंगजेबाने दक्षिण सुभेदार शहाजादा मुअज्जम याला उत्तरेत बोलावून त्याच्या जागी बहादुरखान याची पुन्हा नेमनूक करुन मराठ्यांनी जिंकून घेतलेले किल्ले परत घ्यावेत असे आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार तो ९ जुन १६८० रोजी औरंगाबाद येथे येऊन स्वराज्यातील किल्ले जिंकण्यासाठी प्रयत्न करीत होता. सेनापती हंबीररावांनी खानजहान बहादूरखानाचे प्रयत्न वाया घालविले. अहिवंतचा किल्ला त्याला जिंकला आलेला नव्हता. सेनापतींच्या कार्य कर्तृत्वाची खरी गरज स्वराज्याला आताच होती. छत्रपती शिवरायांच्या तालमीत मोगली प्रदेशात अनेक मोहिमा काढल्यामुळे मोगलाचे प्रदेश, शक्तीस्थळे पुढील युद्ध मोहिमा, उत्तरेतील सम्राट औरंगजेबाच्या हालचालीचा अभ्यास हंबीररावांना होता. म्हणूनच थोडा वेळही न घालता पेशवे मोरोपंत ा पिंगळे यांची नाशिक त्र्यंबक प्रदेशातील आघाडी सांभाळून स्वराज्याच्या उत्तर प्रदेशातील मोगली प्रदेश लुटण्याचा सपाटा त्यांनी लावला. स्वराज्याच्या खजिण्यात भर पडावी या उद्देशांनी त्यांनी धरणगाव ही इंग्रजांची वसाहत लुटली. मोगलांचे दक्षिण सुभ्याची राजधानी बुऱ्हाणपूर लूटले, औरंगाबाद परिसरात धुमाकूळ घालून चौथाईची वसुली केली. भविष्यात मोगल सम्राट औरंगजेब स्वराज्यावर चालून येईल. या दुरदृष्टीच्या विचारांनी आपलेकलष्तैनात करुन ठेवले. खानजहान

बहादूरखानाला एकाच ठिकाणी लक्ष केंद्रित करता येऊ नये यासाठी लहान-लहान सैन्याच्या तुकड्या इतरत्र प्रदेशावर हल्ले करण्यासाठी पाठविल्या शेवटी त्याला पेडााव येथे छावणी करुन थांबावे लागले. ज्यावेळी सम्राट औरंगजेब दक्षिण सुभ्यात बुऱ्हाणपूर येथे येऊन थांबला तेंव्हा त्याला रामशेज किल्ला जिंकूण घेण्यासाठी पाठविले. पण सेनापती हंबीररावांच्या सैन्याने मोगलांचा वेढा उठऊन लावण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. जवळपास सहा महिने हा किल्ला लढवता ठेवलेला होता. नळदूर्ग किल्ल्यावर हल्ला त्यांनी चढविला. या वेळी विजेच्या गतिने सेनापती हंबीररावांनी स्वराज्याच्या चहूबाजुंनी हल्लेकरुन मोगलांचा सैन्यात दहशतिचे वातावरण तयार केले होते. एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ले करुन शत्रुच्या मनात दहशत बसविण्याचे युद्धतंत्र छत्रपती शिवरायांनी शिकविले होते. पुढे याच तंत्राच्या माध्यमातून मराठा सैन्यातील रुपाजी भोसले, मानाजी मोरे, धनाजी जाधव सारखे लढवय्ये त्यांनी तयार केले. यांच्या बळावर मोगल सम्राट औरंगजेबाला पराभूत करण्याचे प्रयत्न सेनापती हंबीरराव मोहिते यांनी केले.

## २) हिंदवी स्वराज्याचा राज्यविस्तार

छत्रपती संभाजी राजांच्या हाती स्वराज्याचाकारभार आला असता त्यावेळचे हिंदवी स्वराज्यच नाशिक जिल्ह्यातील बागलाण म्हणजे साल्हेर, कन्हेरगड, दिंडोरी ते नाशिकपर्यंत होते. पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील जंजिऱ्याचा प्रदेश सोडून आणि मुंबई हे इंग्रजांचे ठाणे सोडून कुलाबा, पुणे, सातारा, कोल्हापूर, सांगली, रत्नागिरी, ठाणे इत्यादी सध्याचे जिल्हे स्वराज्यात होते. तर दक्षिण भारतामध्ये कारवार, अंकोला, बदामी, लक्ष्मेश्वर, कोप्पळ, बालापूर, कोलार, बेंगलूर आणि तामिळनाडू मधील जिंजीलगतचा प्रदेश'[२] असा एकूण सुमारे ५० हजार चौरस मैलांचा प्रदेश हिंदवी स्वराज्यात होता.




छत्रपती शिवराय हयात असेपर्यंत हिंदवी स्वराज्य असल्याचा नकाशा आणि याचे स्वरक्षण सेनापती हंबीररावांनी केली.

जेथे शक्कावलीतील नोंदीप्रमाणे 'श्रावण श्रुध ५ पंचमी संभाजी राजे मंचकाराहोन जाले'[३] म्हणजेच २० जुलै १६८० रोजी मंचकारोहन कार्यक्रम रायगडावर सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या उपस्थितीत झाला. छत्रपती संभाजी राजांना व सेनापती हंबीरराव मोहिते यांना स्वराज्याच्या अंतर्गत

व परराष्ट्र राजकारणासंबंधी विचार करण्यास अवसर मिळाला. यानंतर सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कार्याविषयीचा मजकूर पतप्रतिनिधीच्या बखरितील इतिहास संशोधक वा.सी.बेंद्रे [४] यांनी दिलेला आहे. तो असा की, 'संभाजीचा सेनापती हंबीरराव कोकणात लष्करासहीत होता. त्यास वर्तमान कळले की, खानदेशात कोणी रक्षक नाही. त्यावरुन त्याने लष्कराच्या लहान-मोठ्या टोळ्या करुन उत्तरेकडे जाऊन ते सर्व लोक बुऱ्हाणपुरावर एका जागी मिळविले आणि ते शहर लूटले. द्रव्य मिळाले. परत येताना त्याने बुऱ्हाणपुरापासून नाशिकपर्यंत मुलूख लुटून जाळून टाकला.' [४] यावरुन सेनापती हंबीररावांनी उत्तरेत जाऊन सैन्यांच्या लहान तुकड्या करुन मोगली प्रदेश लूटले तसेच बुऱ्हाणपूर शहर लूटले, येथून नाशिकपर्यंतचा प्रदेश लूटून जाळून टाकला. जेधे शकावलीप्रमाणे 'नोव्हेंबर-डिसेंबर १६८० त बऱ्हणपूर हंबीरराय याणी मारिला.'[५] यावेळी खानजहान बहादुरखान स्वराज्यातील किल्ले जिंकण्यासाठी प्रयत्नशील होता. संभाव्य मोगलांच्या आक्रमणाशी तोंड देण्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मराठी सैन्याच्या तीन फौजा तयारकेलेल्या होत्या. या विषयीचा मजकूर चोपड्याचे इंग्रज १० नोव्हेंबर १६८० ला देतात की, '२ तारखेपासून शिवाजीचे सैन्य बाहेर पडल्याच्या (मराठ्यांचे सेनापतीचे) बातम्या येऊन इकडे घबराटिचे वातावरन निर्माण झाले आहे. येथे बोलतात की, स्वार व पायदळाची एक तुकडी सुरतेवर जाणार, दुसरी बऱ्हाणपुरावर व तिसरी बहादुरखानास हुलकावणी देत गुंतवून ठेवणार बहादूरखान सध्या मोगली हद्द ओलांडून दक्षिणेकडे गेला आहे.' [६] सेनापती हंबीररावांची ही योजना बहादुरखानाला रोखण्यासाठी आणि बुचकळ्यात टाकण्यासाठी तयार केलेली होती. धरणगावच्या इंग्रजांनी '२५ नोव्हेंबर १६८० ला बहादुरखानामुळे सर्वत्र अलबेल' [७] असल्याचे सांगितले. परंतु हेच इंग्रज ११ फेब्रुवारी १६८१ रोजी नमूदकरतात की, 'संभाजीच्या सैन्याने धरणगाव लुटले व वखारीची बरीच नुकसानी झाली.' यावरुन सेनापती हंबीररावांनी शिवरायांच्या निधनानंतर संभाजी राजांना 'छत्रपती' पदावर विराजमान होईपर्यंत स्वराज्याच्या उत्तर सिमेपलीकडील मोगली प्रदेशावर हल्ले करुन बराच प्रदेश लुटलेला होता. यांच्या युद्ध मोहिमां संदर्भात निश्चित पुरावा उपलब्ध होऊ न शकल्यामुळे कधी, कोणत्या प्रदेशावर हल्ले केले. हे निश्चित सांगता येत नसले तरी १६ जानेवारी १६८१ रोजी

रायगडावर संभाजी राजांचा राज्याभिषेक सोहळा झाल्यानंतर सेनापती हंबीररावांनी मोगलांचे बुऱ्हाणूर हे हे नामांकीत शहर लुटले. तसेच प्रसिद्ध बाजारपेठ धरणगाव ही लुटले होते.

## ३) मोगलांचे उत्तरेतील राजकारण

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मोगलांचे साम्राज्य हे सर्वात मोठे व बलशाली साम्राज्य होते. याचा विचार करुन छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा विस्तार करीता असताना मोगलांशी संघर्ष करावा लागणार या हेतुने त्यांनी स्वराज्याची पाया भरणी केलेली होती. अनेकदा मोगल-मराठा संघर्ष झाला. पण छत्रपती शिवरायांनी बुद्धिच्या व कौशल्याच्या बळावर विजय मिळविले. गनिमा कावा युद्धतंत्राचा वापर करुन स्वराज्यावर चालून आलेल्या मोगल सरदारांना पराभूत केले होते. मोगलांचे प्रदेश मिळविले होते. त्यांच्या प्रदेशातील सुरत नावाचे श्रीमंत शहर दोनदा लूटले. शाहिस्तेखानावर छापा घालून दक्षिणेतून पळवून लावले. महाराजा जयसिंगाने शिवरायांना नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न केलेला होता. पण आग्राहून निसटून सुखरूप स्वराज्यात येऊन पुन्हा 'छत्रपती' म्हणून राज्याभिषेक करुन घेतलेला होता. त्यामुळे सम्राट औरंगजेबाला शिवरायांबद्दल द्वेष उत्पन्न झालेला होता. दक्षिण भारतातील 'हिंदवी स्वराज्य' नष्ट करण्यासाठी तो प्रयत्न करु लागला. पण छत्रपती शिवाजी महाराज असे पर्यंत त्याला काहिही करता आलेले नव्हते. ३ एप्रिल १६८० रोजी शिवरायांचे निधन झाले त्यावेळी सम्राट औरंगजेब राजपुतान्यातील जोधपूर, उदयपूर, मारवाडच्या रजपूत राजांशी संघर्ष करण्यात गुंतलेला होता. दक्षिणेतील सुभेदार असलेल्या शहाआलमला उत्तरेत बोलावून त्याच्या जागी खानजहान बहादुरखान याची पुन्हा नेमणूक केलेली होती.

अशा काळात हिंदवी स्वराज्याच्या वारसा बाबतचा वाद निर्माण होऊन संभाजी राजांनी संपूर्ण कारभार आपल्या हातामध्ये घेतलेला होता. सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न चालू होते. केवळ सेनापतींच्या सहकार्यामुळे संभाजी राजे राजपदावर आलेले होते. स्वराज्याच्या अष्टप्रधान मंडळातील बहुतेक

प्रधान संभाजी राजे छत्रपतिपदी येऊ नये यासाठी प्रयत्न करीत होते. स्वराज्याच्या सिमे वरील सिद्दी, इंग्रज, मोगलांचे हल्ले सुरुच होते. या काळात औरंगजेबाला ससैन्य आक्रमण करण्याची संधी चालून आलेली होती. पण त्याचे दु:र्देव की, औरंगजेबाचा मुलगा शहाजादा अकबर याने जाने. १६८१ मध्ये आपल्या बापाविरुद्ध बंड केले होते. औरंगजेबाला आपले लक्ष अकबराचे बंड मोडून काढण्यासाठीच केंद्रित करावे लागले होते. कारण शहानादा अकबर हा उदेपूरचा महाराणा राजसिंह व जोधपूरचा राजा जसवंत सिंहाचा निष्ठावान सेवक दुर्गादार राठोड याला मिळालेला होता. यांनी अकबराशी अशी मसलत केली की, 'औरंगजेबाचे राजपुतांचा समूळ उच्छेद करण्याचे जे धोरण आहे, त्याने मोगल साम्राज्याच धाक्यात येईल. म्हणून अकबराने त्याला पदच्यूत करुन स्वत: राजपद धारण करावे व पूर्वीच्या बादशहाचे शहानपणाचे धोरण पुढे चालवावे'[८] अकबराला हा सल्ला पटलेला होता. त्याने स्वत: राज्याभिषेक करुन घेऊन बापाला पदच्यूत केल्याचे त्याने जाहीर केले. ही बातमी सम्राट औरंगजेबाला समजताच पूर्वी त्याने आपल्या बापाविरुद्ध केलेल्या कृत्याची आठवण झाली. ज्या पद्धतीने सम्राट शहाजहानला कैदेत ठेऊन औरंग जेबाने सम्राटपद मिळविले होते. असाच प्रयत्न अकबराने केलेला होता. जर अकबराचे बंड यशस्वी झाले तर औरंगजेबाला सम्राट पद सोडावे लागणार या उद्देशाने सम्राट औरंगजेबाने साम्राज्यातील सर्व सुभेदारांना अकबराला जिवंत अथवा मृत पकडण्याचे आदेश दिले. त्यावेळी दुर्गादास राठोड आपल्या पाचशे सैन्यांच्या साह्याने अकबराला सुरक्षीत ठिकाणी पोहचविण्यासाठी प्रयत्न करु लागला. अकबराला पकडण्यासाठी मुअज्जम आपल्या सैन्यासह पाठिमागे लागला. शेवटी दुर्गादास राठोडने सम्राट औरंगजेबापासून बचाव करण्यासाठी दक्षिण भारतातील हिंदवी स्वराज्याचा मार्ग स्विकारला. मोगली सैन्याला चुकवत शहाजादा अकबर व दुर्गादास राठोड ९ मे १६८१ रोजी दक्षिण भारतामध्ये आले. "११ मे १६८१ रोजी संभाजी राजाला अकबराने पत्र लिहिले व औरंगजेबाविरुद्ध लढण्यास त्याच्या मदतिची याचना केली.'[९] मोगलांचा दक्षिण सुभेदार खानजहान बहादूर व बागलानचा फौजदार देविसींग बुंदेला अकबराला पकडण्यासाठी लक्ष ठेऊन बसले होते. यांना चुकवत १८ मे १६८१ रोजी हिंदवी स्वराज्यातील नाशिक जिल्ह्यात त्रिंबक येथे पोहचले.

## ४) छत्रपती संभाजीराजांच्याकार्यकाळातील सेनापती हंबीरराव मोहि ते यांच्या युद्ध मोहिमा

मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्याकार्यकर्तृत्वामुळे हिंदवी स्वराज्याचे दुसरे 'छत्रपती' म्हणून १६ जानेवारी १६८१ रोजी रायगडावर राज्याभिषेक सोहळा झाला. स्वराज्याचा कारभार चालवण्यासाठी छत्रपती संभाजी राजांनी अष्टप्रधान मंडळाची घोषणा केली. सेनापती म्हणून पुन्हा हंबीरराव मोहिते राज्याचे रक्षण करण्यासाठी तयार झाले. नव्या छत्रपतीच्याखास विश्वासातील मार्गदर्शक म्हणून त्यांनी आयुष्यभर कार्य केले. राजकारणाचा प्रचंड अनुभव होता. छत्रपती शिवरायांच्या नंतर संभाजी राजांचेखरे पाठिराखे हंबीरराव होते. सेनापती पदावर अनेक वर्षापासून काम केल्यामुळे भविष्यात स्वराज्यावर मोगलांच्या आक्रमणाची जाणीव त्यांना होती. यासाठी स्वराज्यातील किल्ल्यावर शिबंदिची योग्य व्यवस्था त्यांनी केली. सैनिकांना चार वर्ष पुरेल अशा स्वरुपाची व्यवस्थाकरण्यासंबंधी सल्ला छत्रपतींना दिलेला असावा. स्वराज्याचा खजिना वाढविण्यासाठी एखादे श्रीमंत शहर लुटावे या विषयिची चर्चा करुन मोगलांच्या दक्षिणेतील खानदेशची राजधानी बऱ्हाणपूर शहरावर हल्ला करुन लुटण्याची मसलत केली. कारण यावेळी मोगल सम्राट औरंगजेब व त्याचे सैन्य उत्तरेत अकबराचे बंड मोडून काढण्यासाठी गुंतले होते. या संधीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांनी रायगडाहुन ससैन्य बऱ्हाणपूरकडे निघाले.

### १) बऱ्हाणपूर लूटले : (बुऱ्हाणपूर)

बऱ्हाणपूर हे शहर तत्कालीन काळातील मागलांच्या साम्राज्यातील खानदेशची राजधानी म्हणून होते. या शहराला ऐतिहासिक महत्व असून सध्या मध्यप्रदेशातील निमार जिल्ह्यात तालुक्याचे व उपविभागाचे मुख्यालय आहे. हे शहर तापी नदिच्या किनाऱ्यावर वसलेले असून मुंबई-दिल्ली मध्य रेल्वेच्या मार्गावर आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईपासून ५०४ किलोमिटर अंतरावर, खांडव्यापासून ६८.८ किलामिटर अंतरावर आणि असिरगडापासून २२.४ किलोमिटर

अंतरावर आहे. कापसाच्या व्यापाराचे केंद्र आणि कापडाच्या उद्योगाचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. या शहराचे प्राचीन नाव बसनाखेडे असे असून खानदेशच्या फारुकी नबाबाचे राहन्याचे ठिकाण होते. नासीरखान फारुकी याने आपली राजधानी म्हणून इ.स.१४०० मध्ये उदयास आनलेले होते. मोगलांचे साम्राज्य बाबराच्या कार्य कर्तृत्वाने इ.स.१५२६ पासून भारतामध्ये सुरु झाले. मोगल सम्राट बाबराचा नातू सम्राट अकबराने इ.स.१५५६ ते १६०६ या कार्यकाळात सत्ता गा जविताना खानदेश जिंकूण आपल्या सुभ्याचे ठिकाण केले होते.

फारुकी नबाबांनी हे शहर कसे वसविले या विषयी इतिहास संशोधक शिवदे सदाशिव[१०] आपल्या सरांनी आपल्या 'ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा' या ग्रंथात दिलेला आहे. 'नासीर फारुकीचा बाप मलीक फारुकी याचा मित्र असिरगडचा अतिशय श्रीमंत आणि दिलदार वृत्तीचा राजा 'आशा' हा होता. अहिर जातीचे हे घरो फारुकी घराण्याशी अतिशय मित्रत्वाने वागत ह ोते. 'बागलाण आणि अंतूर येथील सैन्य माझ्याजवळ येऊन ठेवले आहे तेव्हा तु मला तुझ्या किल्ल्यात आश्रय दे' असा निरोप नासीर फारुकीने 'आशा' राजास दिला आणि पडद्याच्या पालख्यातून सशस्त्र सैन्य किल्ल्यात पाठविले आणि 'आशा' राजा व त्याच्या कुटुबियांची निर्घन कत्तल केली. नासीर फारुकिचा धर्मगुरु झैनुद्दीन याने त्याचे अभिनंदकेले. दौलताबादचा संत बुऱ्हाणुद्दीन याची यादगारी म्हणून 'बुऱ्हाणपूर आणि धर्मगुरु झैनुद्दीन याची यादगारी म्हणून झैनाबाद' ही दोन शहरे तापी नदीच्या तीरावर आमने-सामने वसवून फारुकिने धन्यता मानली. (इ.स.१५९९)'

नासीर फारुकी राजा हा स्वतःला ग झणीचे वशंज समजत होता. भारताच्या इतिहासात इ.स.९९८ मध्ये महंमदा झनी नावाच्या आक्रमकाने भारतावर १७ स्वाऱ्या केलेल्या होत्या. भारतातून प्रचंड संपत्ती आपल्या मायदेशी नेलेली होती. आणि याचा वंशज हा फारुकी समजत होता. त्याने तापी नदीच्या उजव्या बाजूवर एक मोठा वाडा बांधून काढलेला होता. हा वाडा जनू किल्लाच वाटत होता. या किल्ल्यात मधेमध पीरबो नावाची ८० फुट उंचिची उत्तुंग मनोरे असलेली एक मशीद बांधली याचे बांधकाम विटाचे असून अतिशय सुंदर अशी ती वास्तू आहे.

## १) जामा मशीद

इ.स.१६०० मध्ये सम्राट अकबराने आसिरगड, बऱ्हाणपूर जिंकूण घेतले होते आणि एक सुंदर व मनमोहक स्वरुपाची मोठी मशीद बांधली. तिला 'जामा मशीद' असे नाव दिले. मशिदीच्या समोरचा भाग १५७ फूट रुंद तर ५४ फुट खोल असून त्याला १५ कमानी आहेत. या बांधकामाची तारीख संस्कृत व अरबी भाषेत कोरली आहे. फारुकी राजा अलिखान याने आपण गझणिचे वंशज असल्याचे मशिदीच्या पाठिमागील कोपऱ्यात कोरले आहे. अकबरानेही खानदेश जिंकूण घेतल्याचे कोरले आहे. नियोजनपूर्वक बांधलेल्या या इमारतिचा दर्शनी भाग अतीशय देखणा व आकर्षक स्वरुपाचा आहे.

## २) पीरबेन्ना मशीद

बऱ्हाणपूर शहराचे वर्णन 'ऐन-ए-अकबरी' नावाच्या ग्रंथात केलेले असून मोगल साम्राज्यातील दुसऱ्याक्रमाकाचे शहर होते. येथे बागबगीचे व उद्यान होते. हे शहर म्हणजे कलाकुसर, चांदीच्या तारा व सुवर्णतारा गुंफण्याचे सुबक काम करणाऱ्या कारागिरांच्या कौशल्याची उत्कृष्ट नमुना दाखविणारे होते. या शहरात दुसरी पीरबेन्ना नावाची मशीद असून तिचे बांधकाम मजबूत पद्धतिचे होते. मशिदीचे मनोरे हे उत्तुंग असे आकाशाला भिडतात. फारुकी राजा नसीर आदिलशहा यांची कबर असून ती अतीशय साध्या पद्धतिची तसेच ती चौथऱ्यावर आहे तिचे रंगकाम पर्शीयन पद्धतिचे आकर्षक आहे.

मोगल सम्राट जहाँगीरच्या काळात (इ.स.१६०६-१६२७) इंग्लडचा राजदूत 'थॉमस-रो' हा पहिल्यांदा भारतामध्ये व्यापारकरण्याचा परवाना मिळविण्यासाठी आलेला होता. तेंव्हा सम्राट जहाँगिरने त्याला व्यापारी परवाना दिल्यापासून इंग्रजाचे प्राबल्य वाढण्यास सुरुवात झाली होती. त्याने इ.स.१६१४ मध्ये बुऱ्हाणपूर शहराला भेट दिली असून जहाँगिरचा मुलगा शहाजादा परवेझची भेट घेऊन व्यापारी केंद्र स्थापण्याची अनुमती मिळविली होती. तसेच विल्यम फिच नावाच्या इंग्रज व्यापाऱ्याचा या शहरात इ.स.१६०८-११ च्या काळात मुक्काम होता. त्याने बऱ्हाणपूर शहराविषयी

लिहिले आहे की, आज किल्ला पूर्णपणे नष्ट झाला आहे. पण त्यातील हमामखाण्याचा काही भाग उरला आहे. त्यावरील नक्षिकाम आणि संगमश्वरी फरशिचे सुबक बांधकाम आहे.' [११] तसेच सम्राट अकबराचा निष्ठावान सेवक बहरामखान याचा मुलगा शहानवाजची कबर आहे ती सुबक व मोठी आहे. तर मोगलांचे अधिकारी तेथे रहात होते.

## ३) अहुखाना किंवा मृगउद्यान

बऱ्हाणपूर हे शहर तापी नदीवर वसलेले असल्यामुळे नदीच्या दोन्ही तिरावर ऐतिहासिक वास्तू बांधण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी या नदीच्या दक्षिण तिरावर अहुखाना किंवा मृगउद्यान आहे. त्याला 'बाग-ओ-जैनाबाद' किंवा 'बाग आलमआरा' असे म्हणतात. मोगल सम्राट शहाजहाँन (इ.स.१६२७-१६५७) ची पत्नी मुमताज महल ही या शहरामध्ये मृत्यू पावली. तेंव्हा तिचे मृत शरीर याच अहुखान्यातील एका इमारतीत सहा महिने ठेवले होते. त्यानंतर ते मोगलांची राजधानी आग्रा येथे नेण्यात आले. योग्य पद्धतीने दफनविधी करुन तिच्या स्मरणार्थ सम्राट शहाजहाँनने ऐतिहासिक व जगप्रसिद्ध वास्तू बांधली. तिलाच 'ताजमहल' असे म्हणतात. बऱ्हाणपुरातील अहुखान्याच्या सभोवती एक संरक्षक भित आहे. आजही ती सध:स्थितीत आहे.

## ४) मिर्झाराजे जयसिंह राजाची छत्री

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात इ.स.१६६५ मध्ये मोगल सम्राट औरंगजेब याचा सरदार मिर्झाराजे जयसिंह ससैन्यासह स्वराज्यावर चालून आले होते. तेंव्हा छत्रपती शिवरायांनी मिर्झाराजाशी पुरंदरचा ऐतिहासिक तह घडऊन आणून आपले स्वराज्य वाचविण्याचे प्रयत्न केले असता तो उत्तरेत परत जात असता इ.स.१६६७ मध्ये बुऱ्हाणपूर येथे त्याचा मृत्यू झाला. तेव्हा औरंगजेबाच्या आदेशावरुन बुऱ्हाणपूर पासून ४ मैलावर असलेल्या मोहना नदीसंगमावर मिर्झाराजांची छत्री बांधण्यात आली. तिचे बांधकाम सुबक व आकर्षक आहे.

## ५) पाणी पुरवठ्याची व्यवस्था

बुऱ्हाणपूरच्या विकासाबरोबर त्यंच्या सर्वांगीन विकासासाठी मुलभूत स्वरुपाच्या योजना मोगलांनी निर्माण केलेल्या होत्या. शहराच्या उत्तर दिशेला मुळ बंधारा, सुखा बंधारा, चितहरण तलाव बांधून शहराच्या पाणीपुरवठ्याची व्य ावस्था केलेली होती. तलावाच्या पाण्याचे नियोजन करुन शहरातील बगिचे, उद्यान इत्यांदींना पुरविले जात होते. तेव्हापासून आजपर्यंत या तलावातील पाण्याचा उपयोग शहरातील लोक करतात.

या शहराच्या बाहेर नवाबपुरा, बऱ्हाणपुरा, करणपुरा, खुर्रमपुरा, शहागंजपुरा असे एकूण १७ पुरे होते. त्यातील बहादुरपुरा हा सर्वात श्रीमंत पुरा होता. येथे सोने, चांदी, हिरे, मोती, माणके, जडजवाहीर किमती वस्तु खरेदी-विक्रीचे केंद्र असल्याने अनेक व्यापारी, श्रीमंत लोक रहात होते.

अशाप्रकारे बुऱ्हाणपूर शहर हे फारुकी राजापासून मोगल सम्राट औरंगजेबच्या काळापर्यंतचे मर्मबंधाचे संबंध होते. त्यातील सम्राट औरंगजेबाच्या कुटूंबातील व्यक्तींचा सहवास लाभलेला होता. ज्यावेळी औरंगजेब दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला त्यावेळी त्याचा मुक्काम येथे होत तेव्हा हिराबाई नावाच्या हिंदू स्त्रीच्या प्रेमात पडला आणि सहा महिने केवळ तिच्या सहवासात त्याने घालवले त्याने तिचे नाव जैनाबादीमहल असे ठेवले. ज्यावेळी तिचा मृत्यू झाला तेंव्हा तिची कबर येथे बांधली. तसेच औरंगजेबाच्या रोशनआरा, गोहरआरा या बहिणींचा जन्म येथे झाला. त्याची दोन मुले आज्जम आणि मुअज्जम ही येथेच जन्मास आलेली होती. त्यामुळे बुऱ्हाणपूर शहराशी सम्राट औरंगजेबाचे भावनिक नाते होते. अशा ऐतिहासीक संपन्न व श्रीमंत शहर ावर सेनापती हंबीरराव मोहिते यांनी अचानक ३० जानेवारी १६८१ रोजी हल्ला केलेला होता.

मोगलाचा इतिहासकार खाफिखान हा या वेळी नर्मदा नदीच्या प्रदेशात येणाऱ्या जाणाऱ्यावर देखरेख ठेवणारा अधिकारी म्हणून होता. त्याने बुऱ्हाणपुरावरील हल्ल्याचे वर्णन केलेले आहे. तो लिहितो, 'यावेळी बुऱ्हाणपूरचा सुभेदार खानजमान हा होता त्याचा नायब काकरखान अफगाण हा जिजीया कराच्या वसुलीच्या कामावर होता. बुऱ्हाणपुरात त्यावेळी तोच

हजर होता. त्याच्यापाशी दोनतीनशेपेक्षा अधिक स्वार नव्हते. सुमारे २० हजार स्वारांनिशी तो दुष्ट संभाजी (सेनापती हंबीरराव मोहिते होते) वऱ्हाडात उच्छाद घालीत फिरत होता. बुऱ्हाणपुरापासून वऱ्हाडाचा सुभा पस्तीसकोसावर आहे. तो मुलूख उद्ध्वस्त करुन तो पस्तीस कोसांची मजल मारुन एकाएकी बुऱ्हाणपुरावर चालून आला. काफरांची फौज कुठल्याही दिशेने बऱ्हाणपु रावर येईल. अशी मुळीच कल्पना नव्हती तशी बातमीही पसरली नव्हती. बुऱ्हाणपुरापासून दीड कोसावर बहादुरपुरा म्हणून एक पुरा आहे. तो अतिशय संपन्न होता. लक्षाधीस असे सराफ, सावकार तेथे देशोदेशिचे जिन्नस, जडजवाहीर, सोने, नाणे, रत्ने अशा लक्षावधी रुपयांचा माल येथील दुकानांतून साठविला होता. शहराच्या तटबंदीच्या बाहेर बहादुरपुरा आणि इतर सतरा पुरे होते. त्यांना मराठ्यांनी घेरले. विशेषतः बहादुरपुऱ्यावर ते इतक्या अनपेक्षितपणे तुटून पडले की, त्या पुऱ्यातून एक माणूस किंवा एक पैसा लोकांना हलविता आला नाही. पुऱ्यात आगी लागून त्यांचा धूर आकाशपर्यंत पोचला. तेंव्हा कुठे बऱ्हाणपूरचा नायब आणि शहरातील इतर लोक यांना मराठे आल्यची खबर कळली. काकरखानाला मराठ्यांचा प्रतिकार करण्याची शक्ती नव्हती. त्यांने शहराचे दरवाजे बंद केले आणि तट, बुरुज, वेशी इत्यादींचा बंदोबस्त करु लागला. हसनपुरा, शहगंज, शहाजहानपुरा, खुर्रमपुरा, नबाबपुरा इत्यादी सतरा पुरे शहराच्या तटाला लागून होते. ती जणू काही शहराची केंद्रे होती. प्रत्येक पुऱ्यात लाखो रुपयाचा माल सराफ, व्यापारी इत्यादींच्या पाशी होता. मराठ्यांनी ते सर्व पुरे ताब्यात घेतले. त्यांची लूटकरुन त्यांना आगी लावून दिल्या. कांही अब्रुदार माणसांनी आपल्या बायकांना ठार मारले आणि ते स्वतः लढत लढत मारले गेले. कित्येक जण परमेश्वरावर हवाला ठेऊन बसले. शहराच्या तटाला लागून असलेले अनेक लोक आपल्या बायकापोरांना घेऊन त्या भयंकर संकटातून मोठ्या कष्टाने निघून शहराच्या आत पोचले. तीन दिवसापर्यंत मराठे निःशंकपणे पुरे लुटीत होते. त्यांना मुबलक लूट मिळाली. अनेक वर्षाची जमिनीखाली पुरलेली संपत्ती त्यांच्या हाती पडली. या संपत्तीचा घरमालकांनाही पत्ता नव्हता. ती मराठ्यांनी शोधून काढून हस्तगत केली. मराठ्यांनी शिड्या लाऊन तटावर चढण्याचा प्रयत्न केला. शहरातील सर्व मन्सबदारांनी वेशी, तट, बुरुज इत्यादी ठिकाणी मोर्चे बांधून निकराने मराठ्यांचा प्रतिकार केला.

त्यामुळे ते शहरात दाखल होऊ शकले नाहीत. मराठ्यांनी सोने, चांदी, जडजवाहीर आणि मुल्यवान सामान घेतले. इतर जिनसांची त्यांनी पर्वा केली नाही. त्यांनी भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे इत्यादी सर्व लूटली होती; पण ती वाहून नेणे शक्य नाही म्हणून त्यांनी ते सामान टाकून दिले व नंतर ते निघून गेले. ते गेल्यानंतर रस्त्यात जळलेल्या आणि इतर वस्तुंचा इतका सडा पडला होता की, त्याचे वर्णन करणे अशक्य आहे.

मराठे बुऱ्हाणपुरच्या भागात पसरल्याची बातमी हेरांच्याद्वारे औरंगाबादेस सुभेदार खानजहान बहाद्दूर कोकलताश याला कळली. त्याने ताबडतोब कूच करुन तीन चार दिवसाचा मार्ग एका दिवसात आक्रमिला, तो फर्दापूरच्या घाटापाशी पोहचला. औरंगाबादेहून हे ठिकाण ३२ कोसावर आहे. सैन्य कूच करुन येत होते. त्याच्या हालचालीसाठी आणि जनावरांना विश्रांती देण्यासाठी म्हणून खानजहान तेथे तीन-चार प्रहार थांबला.

पण खानजहानच्या हितशत्रुंनी उठविले की, संभाजीचा वकील खानजहान याला भेटला. त्याने त्याला भक्कम पैसे चारले आणि चार-पाच प्रहर आणि येथेच रेंगाळावे म्हणून खानजहानला विनंती केली. मराठ्यांच्यापाशी लुटिचे ओझे बरेच होते.खानजहान आपल्या पाठलागावर आहे. याची बातमी त्यांना लागली होती. त्यांचे किल्लेही दूर होते. तेथपर्यंत पोहोचणे त्यांना शक्य नव्हते. पण त्यातल्या त्यात जवळ असलेला किल्ला म्हणजे साल्हेरचा असून तो बागलाणात होता. मराठे परगणे चोपडा ऊर्फ मुस्ताफाबादच्या वाटेने चालले होते.

अशा स्थितीत खानजहानने फर्दापुरहून डावीकडे वळून धरणगाव आणि चोपडा या गावाची वाट धरुन काफरांचा मार्ग अडविण्याऐवजी तो उजवीकडच्या वाटेने एदलाबादकडे रवाना झाला. गणिमांनी ही बातमी ऐकली. बरे झाले असे त्यांना वाटले. बरोबर असलेली साने, चांदी इत्यादिची लूट जितकी त्यांना नेता आली तितकी त्यांनी नेली. त्यांनी सगळे कैदी बरोबर घेतले. खानजहान बऱ्हाणपूरला जाऊन पोहोचेपर्यंत मराठे चोपड्याच्या वाटेने तडक निघून चार-पाच दिवसात साल्हेरला पोहचले.

बऱ्हाणपुरचे प्रतिष्ठित नागरिक मौलवी, विद्वान इत्यादींनी बादशहाकडे एक अर्जी पाठविली. काफरांचा जोर झाला आमची अब्रु आणि संपत्ती नष्ट झाली. यापुढे शुक्रवारची नमाज बंद पडेल असे अर्जीत लिहिले होते. यावर बादशहाने खानजहानला चिडून पत्र लिहून कळविले की, दक्षिणेत काफरांचा बिमोड करण्यासाठी मी स्वतः येत आहे. बादशहा खानजहानवर अतिशय चिडला. त्याला मन्सबिची वाढ झाली होती, ती त्याने वहिवाटीविरुद्ध नामंजूर केली. दक्षिणेतील उच्छाद आणि शहाजादा अकबर याचे पलायन या दोन्ही गोष्टींचा विचार करुन बादशहाने आपले डेरे बुऱ्हाणपुराकडे पाठविण्याचा हुकूम केला'[१२]

बुऱ्हाणपूरच्या लुटीच्या संदर्भात औरंगजेबच्या दरबारच्या १९ फेब्रुवारी १६८१ च्या अखबरातील पुढील उल्लेख सापडतो, 'बुऱ्हाणपूरच्या वृत्तपत्रावरुन समजले की, शत्रुसैन्य एकत्र जमून आले. या बातमिमुळे खानजहान बहादुरकडून काकरखान येथे आला होता. त्याने किल्ला बंद करुन घेऊन खबरदारी बाळगली. शत्रू करणपुऱ्यावर तुटून पडला, रजपुतांना निःशस्त्र केले व तीन दिवस शहरांत राहून ते लुटून गेला.'[१३] सम्राट औरंगजेबाचा मुलगा शहाजादा अकबर हा बापाच्या विरोधात बंडकरुन दक्षिणेत आल्यानंतर बुऱ्हाणपूरच्या लुटिबाबत पत्र लिहिले होते. त्यात तो म्हणतो, 'दक्षिण प्रातांची अशीच दुर्दशा झाली आहे. वास्तविक पहाता हा विस्तीर्ण दक्षिण प्रदेश म्हणजे भूवरील स्वर्गच होय. आणि बुऱ्हाणपूर म्हणजे विश्वरुपी सुंदरीच्या गालावरील तीळ होय. पण ते शहर आज उद्ध्वस्त होऊन गेले आहे.'[१४] या सर्व वेगवेगळ्या साधनाच्या वर्णनावरुन बुऱ्हाणपूर शहरची किती ? व कशी ? लूट केली हे लक्षात येते. त्याचबरोबर मोगलाचा इतिहासकार खाफिखानाने ही लूट संभाजीने केली असा उल्लेख करतो. मात्र यावेळी छत्रपती संभाजी राजे स्वराज्यात होते नुकताच त्यंचा राज्याभिषेक सोहळा झालेला होता. त्यामुळे स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नेतृत्वाखाली बुऱ्हाणपूर शहरावर हल्ला करुन लूट केली होती. त्यामुळे संभाजी राजे 'छत्रपती' झाल्यामुळे त्यांनीच लूट केली असावी असे खाफीखानाला वाटल्याने सेनापती हंबीरराव ऐवजी संभाजीचा उल्लेख केलेला आहे.

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी आपल्या २० हजार सैनिकांच्या सहकार्याने बुऱ्हाणपूर शहर लूटले आणि स्वराज्याचा खजिण्यात मोठीच भर टाकली. अशीच लूट १७ वर्षापूर्वी छत्रपती शिवरायांनी सुरत शहराचीकेलेली होती. त्यांचाच विचार मनाशी ठेऊन स्वराज्याचा विकास करण्यासाठी एखादे संपूर्ण शहर लूटने महत्वाचे होते. त्यानुसार हंबीररावांनी बुऱ्हाणपूर शहर लूटले. या तीन दिवसाच्या लुटीमध्ये कोणत्याही मराठी सैन्यांने सामान्य लाकांना व स्त्रियांना वेठीस धरले नव्हते. किंबहुना त्यांच्या हातून वाईट कृत्य झाल्याची नोंद सापडत नाही. यावरुनकेवळ साधन संपत्ती मिळवावी आणि मोगलांना पुन्हा एकदा मराठे मोगलापेक्षा कमी नाहीत हे दाखवायचे होते. तसेच दक्षिण सुभेदार बहादुरखान याला सेनापती हंबीररावांनी शिवरायांचा राज्याभिषेक झाल्या बरोबर त्याच्या पेडगावच्या छावणीवर हल्ला करुन तेथील संपूर्ण संपत्ती लुटलेली होती. पाचशे घोडे मिळविले होते. त्यावेळी त्याला सळोकी पळो करुन सोडले होते. पुन्हा दुसऱ्यांदा छत्रपती पदावर संभाजी राजे विराजमान झाल्या बरोबर राज्याभिषेकाचा खर्च भरुन काढण्यासाठी आणि शत्रुपासून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते यांनी बुऱ्हाणपूर शहर लूटले. पुन्हा एकदा बहादूरखानाची फजिती हंबीररावांच्या या मोहिमेमुळे झाली होती. घटनेची माहिती मोगल सम्राट औरंगजेबाला उत्तरेत समजताच बहादूरखानावर चिडून त्याने एक सनसनीत पत्र पाठवून त्याची तनखा कमी करुन दक्षिण सुभेदार पदावरुन दूर करुन त्याच्या जागी ईरजखानाची नेमणूक केलेली होती.

बुऱ्हाणपूर लुटिचे मोगल साम्राज्यावर दूरगामी परिणाम झाले. त्याच बरोबर या परिसरातील डच व्यापर थंडावला. नोव्हेंबर/डिसेंबर १६८० मध्ये सेनापती हंबीरराव मोहिते यांनी सुरुकेलेली लूट पुढे बरेच दिवस चालली होती. डचाकडून मिळणारे उत्पन्न कमी झाले आणि बुऱ्हाणपुरसारखे न भूतो न भविष्यती अशी अपरिमीत हानी झाल्यामुळे तेथील व्यापार थंडावला. पुन्हा कधिही त्याचे आर्थिक संपन्नतेचे वैभव त्या शहराला प्राप्त करता आले नाही. मिळविलेली सर्व लूट साल्हेरच्या किल्ल्यात ठेऊन पुन्हा मोगलांच्या इतर प्रदेशावर हल्ले करण्यासाठी आपले सैन्य पाठविले.

## २) औरंगाबादेत दहशत (फेब्रुवारी १६८१)

सेनापती हंबीरराव मोहिते यांना बऱ्हाणपूरची लूट करताना दक्षिण सुभ्याचा मोगल सुभेदार खानजहान बहादूरखान चालून येत असल्याची खबर लागताच परगणे चोपडा ऊर्फ मुस्ताफाबादच्या मार्गाने बागलाणातील साल्हेर किल्ल्याकडे रवाना झाले. बहादूरखान बुऱ्हाणपूरला पोहचेपर्यंत मराठे पसार झाले होते. सेनापतींनी मिळविलेली लूट साल्हेरहून रायगडावर पाठविली असावी. तेथून त्यांनी आपल्या सैन्यांच्या वेगवेगळया तुकड्या करुन मोगलांच्या प्रदेशात लुटालूट करण्यास रवाना केली. सेनापतीची मोगलांच्या वऱ्हाड प्रदेशात जाऊन चौथाई वसूल करुन तेथील प्रदेश लूटल्याचे ईश्वरदास नागरच्या लिखानावरुन समजते. तसेच मोगलांची दक्षिण सुभ्याची राजधानी औरंगाबाद परिसरात धुमाकूळ घालण्यासाठी सैन्य रवाना झालेले असावेत. कारण येथील सुभेदार बहादूरखान हा बुऱ्हाणपुराकडे गेलेला होता. मोगलांचे हे ठाणे होते बुऱ्हाणपुरची लूट करुन जी संपत्ती मिळविली आणि मोगलांना मराठ्यांची ताकद दाखवून सळो की पळो करुन सोडले. त्याप्रमाणे औरंगाबाद शहर लूटने व त्या परिसरात मराठ्यांची दहशत बसवावी. त्याच बरोबर औरंगाबाद हे शहर मोगलांचा सम्राट औरंगजेबाच्या नावाचे शहर होते. त्याची थोडक्यात माहिती पाहू.

अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये वजीर मलीक अंबरने आपल्या सैन्याचे केंद्र म्हणून तेथे 'खडकी' नावाचे गाव वसविले होते. त्यानेच हर्सूलच्या नदीपासून एक कालवा खोदून पाण्याची व्यवस्था केलेली होती. तेथे एक मोठा वाडा बांधला होता. हळूहळू तेथे वस्ती वाढू लागली. या गावाला कायम स्वरुपी पाण्याची व्यवस्था करण्यासाठी एक तलाव बांधला होता. इ.स.१६३६ मध्ये निझामशाही विरुद्ध मोगल व आदिलशाही यांनी लढाई केलेली होती. निझामशाहीकडून छत्रपती शिवाजी राजाचे वडील शहाजी राजे भोसले लढले होते. पण शेवटी या संघर्षात निझामशाहिचा पराभव झालेला होता. त्यामुळे निझामशाहिचे अस्तित्व संपुष्टात आले. यावेळी मोगलबादशहा म्हणून शहाजहान होता. त्याने या प्रदेशावर दक्षिणेचा सुभेदार औरंगजेबाची नेमणूक केलेली होती. त्याने याखडकी गावास आपले स्वतःचे औरंगाबाद हे नाव दिले. तेंव्हा पासून या शहराचा

झपाट्याने विकास होऊ लागला. त्याने तेथील तलावाच्या काठावर एक प्रासाद बांधला. तेथे अमीर उमरावाची घरे बांधण्यात आली. तेथूनच तो दक्षिण सुभ्याचा कारभार पाहू लागला. त्याची एक रुपवान पत्नी दिलरसबानू (रबिया उद-दुराणी) ही येथे मृत्यू पावली असल्याने तिच्या स्मरणार्थ तिचा मुलगा अजामशहा याने कबर बांधली. आजही ती 'बीबी का मकबरा' या नावाने प्रसिद्ध आहे. ही वास्तू इ.स.१६७७ मध्ये बांधली असून आग्रा येथील ताजमहलची प्रतिकृती असल्याचे समजते.

अशा ऐतिहासीक शहरावर सेनापती हंबीररावांनी हल्ला फेब्रुवारी १६८१ मध्ये केलेला होता. ही बातमी बाभूळगाव येथे छावणी करुन थांबलेल्या बहादूरखानाला समजली. हे ठिकाण औरंगाबाद पासून ३२ मैलावर आहे. यावेळी औरंगाबाद शहराच्या रक्षणाची जबाबदारी राजा अनुपसिंह यांच्यावर होती. मराठे अहमदनगर -पैठण मार्गाने येणार आहेत. बहादूरखान ससैन्य औरंगाबादकडे निघाला. सेनापतीचे सैन्य बाईपुरा व सातारा या खेड्याजवळ आल्याची बातमी अनुपसिंहाला समजली होती. पण त्यांच्याशी लढण्याची त्याची ताकद होत नव्हती. मराठ्यांनी अतिशय जलद गतिने औरंगाबाद शहरावर हल्ला चढवून लुटालुटीला सुरुवात केली. तेवढ्याचे गतिने बहादूरखान येऊन धडकला. मराठ्यांना जेवढी लूट मिळाली तेवढी घेऊन तेथून ते निसटले. बहादूरखान उघड्या डोळ्यांनी शहराचे दृश्य पाहू लागला. मराठ्यांच्या बद्दल मनात भयंकर संताप पण काहिही करता येत नव्हते. कारण जिकडे-तिकडे मोगलांच्या प्रदेशावर मराठे तुटून पडलेले होते. लूटता येईल तेवढ प्रदेश लूटत होते. मात्र बहादूरखानाला काहिही सूचत नव्हते. मराठ्यांनी बऱ्हाणपूर लुटले. औरंगाबाद लुटले. हताश होऊन त्याने आपल्या सैन्याचा तळ शहराच्याजवळ असलेल्या तलावाच्या काठावर दिला होता.

औरंगाबाद शहराच्या लुटीचे वर्णन मोगलांचा इतिहासकार भिमसेन सक्सेना[१५] करतो, तो यावेळी बहादूरखानाबरोबर होता. तो लिहितो, 'बहादूरखान दुपारी तातडिने निघून औरंगाबादेस पोहोचला तो इतक्या तातडीने आला नसता तर अनर्थ ओढवला असता. बाईपुऱ्याच्या उपनगरात आणि जवळील सातारच्या खेड्यात मराठ्यांचे सैन्य जमले आहे अशी बातमी आली. राजा अनुपसिंग हा तयार होऊन आपल्या पुऱ्यातच उभा राहिला. पुढे चाल करुन जाणे त्याच्याने शक्य

होईना. बहादूरखान हा तातडिने पोहोचला. पण तो येण्यापूर्वीच मराठे हे बाईपुऱ्यापर्यंत चाल करुन आले होते. त्यांनी तेथे धामधूम माजविली व बहादूरखानाशी युद्ध न करता निघून गेले. बहादूरखानाने जसवंतसिंगाच्या तलावाच्या काठावर आपला तळ दिला.'

पुढे तो म्हणते, [१६] 'माझ्या बरोबर बायका माणसे होती. मी मध्यान्हाच्या वेळी औरंगाबादेत दाखल झालो जे दृश्य दिसले ते विलक्षण होते. लोकांनी आपापल्या घराचे दरवाजे बंद केले होते. ते आपआपल्या वाड्यात तयार होऊन उभे होते. बाजारात आणि गल्ल्यातून मनूष्य दिसत नव्हता. कोतवालीच्या ओट्यावर मला फक्त तीन शिपाई बसलेले आढळले. माझा चूलत भाऊ हरराय आणि इतर हे औरंगाबादेत होते. माझ्या येण्याने ते निश्चिंत झाले.

पावसाळा आला म्हणून बहादूरखान औरंगाबादेतील जुन्या राजवाड्यात राहू लागला. मराठ्यांची धामधूम पाहता औरंगाबाद शहराभोवती तट बांधा वा अशी बादशहाने आज्ञा केली. हे काम बहादूरखानाने हाती घेतले.

मी बऱ्याच दिवसांनी औरंगाबादेत आलो होतो. आमच्य घराची डागडुजी करणे मला आवश्यक वाटले. माझे चुलते धर्मदास यांच्या सल्याने मी घराच्या डागडुजीचे काम हाती घेतले. पावसाळ्यातही बांधकाम चालू होते. मला या कामावर बराच खर्च करावा लागला.'

तत्कालीन काळात परकीय फ्रेंचांच्या वखारी दक्षिण भारतात होत्या. वेगवेगळ्या घटनांच्या नोंदी त्यांच्या दैनंदिनिमधून समजतात. त्याचे भाषांतर डॉ.सुरेंद्रनाथ सेन यांनी केलेले असून ती माहिती डॉ.शिवदे शिवदास यांनी दिलेली आहे. त्यातून औरंगाबाद शहरासंबंधी माहिती मिळते. 'औरंगाबाद हे नवीन शहर आहे. ते एक भरपूर वस्तिचे गजबजलेले शहर आहे. माझ्या माहितीप्रमाणे ह्या शहरात एकच प्रेक्षणिय वास्तू आहे, ती म्हणजे मोगल बादशहा औरंगजेब ह्याचा मुलगा आज्जम याने बांधलेला महाल शहराला लागून मोठे तळे आहे. आमच्या कानावर बातमी आली ती अशी की, औरंगजेबाचा दुधभाऊ बहादूरखान याने घोडदळासहीत ह्या तलावाच्या काठी तळ दिला होता. संभाजीराजांची आक्रमणे थोपवून धरावीत हा त्याचा उद्देश होता. [१७] क्षणाचिच

सुभ्यांतून चौथाई वसूल करण्याची संभाजीराजांची मोहिम होती. आपल्या नियंत्रणाखाली चौथाईच्या दृष्टीने त्यांनी दक्षिणच्या सुभ्याचा काही भाग आणला होता. ज्यां नी चौथाई नाकारली ती गावे संभाजीराजांचे सैन्य लूटून उद्ध्वस्त करी. अशी अफवा पसरली होती की, बहादूर खान व संभाजीराजे ह्यांचे संगनमत झाले आहे. त्यामुळे संभाजीराजे ही रक्कम गोळा करीत त्याच ा काही भाग बहादूरखानाच्या वाट्याला येत असे. बहादूरखान हा अत्यंत लोभी असल्याचे जगजाहीर होते. त्यामुळे अशा अफवामुळे भर पडली असावी खाफिखानाने सुद्धा बुऱ्हाणपूरच्या लुटिच्यावेळी बहादूरखानाने येण्यास उशीर केला होता असे म्हंटले आहे. तसेच त्याने मराठ्याकडून लाच घेतल्याची शंका होती असे म्हंटले आहे.'

फ्रेंचाच्या पाँडेचरी वखारीचा प्रमुख फ्रान्सिस मार्टिन म्हणतो की, 'इ.स.१६७० मध्ये सुरतहून मछली पट्टणला जाताना आम्ही औरंगाबाद आणि बीदर या मार्गाने गेलो होतो. त्या वेळची ह्या प्रदेशाची स्थिती आणि आत्ताची स्थिती यात महदंतर पडले होते. औरंगाबाद आणि बीदर या दोन्ही प्रदेशात काही बंदिस्त गढ्यांची गावे सोडल्यास सगळा प्रांत उद्ध्वस्त दिसत होता. येथील जमीन जगातील सुपीक म्हणून नावाजलेली आहे. पूर्वी हा भाग माणसांनी गजबजलेला असे आता फक्त अर्धा भाग शेतिखाली आलेला दिसला. आम्हाला अशी कित्येक गावे दिसली की ज्यात एकही माणूस दिसत नव्हता. १० ऑगस्ट रोजी आम्हाला असे समजले की, संभाजीराजांचे सैनीक या रस्त्यावर पसरले आहेत ते सर्व प्रवाशांना लुटीत आहेत. १२ तारखेस आम्हाला असे कळले की, नवापुरपासून तीन तासांच्या अंतरावर एका लहान किल्ल्यापाशी संभाजीच्या सैनिकांनी तळ दिला आहे. तेथून ते बाहेत पडून चहूकडे आक्रमण करीत. १२ तारखेला पाऊस पडत होता. एका जंगलापासून बाहेर पडल्यावर दोन टेकड्यांच्या मध्ये बरेच तंबू उभारलेले दिसले. मला वाटले, संभाजीचे सैनीक असावेत... कपुरा नावाच्या गावाला मी आलो तेथे सराईकडे गेलो, खोलीत जातो ते कमरेपर्यंत पाणी होते. तेथील अधिकाऱ्यांनी माझे स्वागत केले. गव्हर्नरने मला कळविले की, दोन पठाण व्यापारी संभाजीच्या तावडीत सापडले. संभाजीच्या सैनिकांनी त्यांचे सर्वस्व हरण केले.' या फ्रेंचाच्या नोंदीवरुन तत्कालीन औरंगाबाद शहर व परिसरात सेनापती हंबीरराव मोहितेंच्या

नेतृत्वाखालील मराठा सैनिकांनी केलेली लूट व बसविलेली दहशत तसेच नैसर्गिक स्थितीचे वर्णन असून मोगलांच्या सैनिकांची स्थिती, लाचखावू पणा, व्यापाऱ्यांची असुरक्षितता आपणास लक्षात येते.

औरंगजेबाच्या दरबारचे अखबारमध्ये १३ मे १६८१ रोजी औरंगाबाद लुटिची माहिती मिळते. खांनजहान बहादुराचा अर्ज डाकचौकिने आला. लुत्फुल्लाहखानाच हा मार्फतिने नजरेखालून गेला. लिहिले होते की, गणिमाची फौज औरंगाबादेच्या भोवतालचा प्रदेश लुटण्यासाठी आली होती. म्हणून खानाजाद मुजफ्फरखान, रणमस्तखान, दाऊदखान वगैरे बादशाही लोक स्वार होऊन तेथे पोहचले लढाई झाली. बादशाही सुदैवाने यांनी शत्रुचे पंधराशे लोक मारले व अनेकांना जखमी केले. त्यांनी पळ काढला. बादशाही फते झाली. त्यांनी लूटलेले सामान परत आणले. शत्रुचे लोक पळून गेले. मुजफ्फरखानाने फौजेसह त्यांचा पाठलाग केला जे बादशाही लोक जखमी झाले व ज्यांनी कष्ट केले. त्याबद्दलचा संपूर्ण अर्ज बादशहाकडे पोंचेल.'[१८]

मराठ्यांनी औरंगाबाद शहरावर केलेल्या हल्ल्याचे वर्णन सुलतान अकबराने[१९] आपल्या वडिल औरंजेबाला लिहिलेल्या पत्रात केलेले आहे. तो म्हणतो की, 'औरंगाबाद शहर हे आपल्याच नावाने वसविण्यात आले आहे. पण शत्रुच्या सैन्याच्या आघाताने ते पात्यासारखे अस्थीर झाले आहे.' या सर्व माहितीवरुन सेनापती हंबीरराव मोहिते यांच्याखालील नेतृत्वात सैन्याने औरंगाबाद व त्या परिसरात लुटालूट केलेली होती. त्यामुळे त्या परिसरात मराठ्याबाबत दहशतिचे वातावरण तयार झालेले होते. मोगल सुभेदार बहादूरखान ईरजखानाला सळो की पळो करुन सोडले होते. संपूर्ण मोगलांच्या दक्षिण प्रदेशात मराठा सैनिकांनी धुमाकूळ घालून त्यांच्या मनात दहशत निर्माण केलेली होती. यावेळी सेनापती हंबीररावांच्या हालचाली विद्यूतगतिने वेगाप्रमाणे होत्या. पूर्वेकडे इंदूरबोधन (सध्याचे निजामाबाद, आंध्रप्रदेश) पर्यंत सेनापतींच्या मार्गदर्शनाखाली मराठा सैन्य गेलेले होते.

## ३) नळदूर्ग किल्ल्यावर हल्ला

छत्रपती संभाजी राजांचा राज्याभिषेक समारंभ झाल्याबरोबर सेनापती हंबीररावानी स्वराज्याचे रक्षण करत मोगलाच्या प्रदेशात लूट करुन खजिण्यात भर घालने आणि शत्रुच्य मनात दहशत व हैराण करण्यासाठी युद्धशास्त्रातील शिवरायांचे तंत्र अवलंबून मोहिम काढलेली होती. स्वराज्याच्या उत्तर व पूर्व मोगलांच्या प्रदेशात एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ले करुन त्यांना सळो की पळो करुन सोडण्यासाठी बुऱ्हाणपूर, औरंगाबाद, वऱ्हाड व नळदूर्ग परिसरात आपले सैन्य रवाना केले हे नियोजन केवळ सेनापतीचे होते. अनेक मराठा सैन्याच्या वेगवेगळ्या तुकड्या मोगली प्रदेशावर हल्ले करण्यासाठी पाठविल्या होत्या. नळदूर्ग किल्ल्यावर सेनापतींनी स्वतः हल्ला केला की नाही हे पुराव्याअभावी निश्चित सांगता येत नाही. मात्र त्यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने हा हल्ला केलेला होता. याचे नियोजन सेनापतींनी केलेले होते. मार्च १६८१ मध्ये मराठ्यांचे सैन्य नळदूर्ग किल्ल्यावर चालून गेले असता नळदूर्ग किल्ला हा किल्ला अतिशय मजबूत असून तो मराठवाड्यातील सध्याच्या उस्मानाबाद (धाराशिव) जिल्ह्यात सोलापूर-हैद्राबाद रस्त्याच्या बाजूस बोरी नदीच्या काठी असून समुद्र सपाटीपासून ६७.५६ मिटर उंचीवर १०३ एकर जमिनीवर असून त्यास ११४ बुरज आहेत. हा किल्ला इ.स.५३७ मध्ये न ळराजवटीतून चालुक्य घराण्याचा राजा किर्तीवर्मन याने जिंकला होता. त्यानंतर बहामनी राज्याचे वर्चस्व निर्माण झाले होते. त्यानंतर हा किल्ला विजापूरच्या आदिलशाहीमध्ये होता. इ.स.१६१७ मध्ये आदिलशाहीकडून मोगलांनी जिंकूण घेतलेला होता. या किल्ल्यात नावाबुरुज, उपळीबुरुज, पाणीमहाल, जामा मशीद व काही तोफा आजही सुस्थितीत आहेत. विजापूरच्या इब्राहीम आदिलशाहाने किल्ल्यात बोरी नदीला वळवून ा तिच्या पात्रात भिंत बांधून एक धरण तयार केले. त्याला 'पाणीमहाल' असे म्हणतात. किल्ल्यात पाण्याची व्यवस्था करण्यासाठी केलेला हा प्रयत्न होता. या पाणी महालावरून दोन मोठे धबधबे असून दोनशे फूट उंचीवरुन त्या धरणातील पाणी खाली पडते. हे धबधबे नर व मादी या नावाने ओळखले जातात.

नळदूर्ग किल्ला व परिसरात लुटालूट करण्यासाठी सेनापतीच्या नेतृत्वाखालील सैन्य गेले. किल्ल्याचा मोगल किल्लेदार कलंदरखान याने या सैन्यांशी मुकाबला केला. खानजहान बहादूरखानने रणमस्तखान आणि इतर अधिकात्यांना मराठ्यांना तंबी देण्यासाठी पाठविले होते. या वेळी मराठे व मोगल यांच्यात लढाई झाली. त्यात दोन्हीकडील सैनीक कामी आले होते.[२०]

जानेवारी १६८१ च्या शेवटी सुरुकेले हल्ले मार्च पर्यंत अतिशय जलद गतीने सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोगली प्रदेशात केले होते. यासाठी सेनापती हंबीररावांची फार मोठी दूरदृष्टी होती. भविष्यात मोगलांचे संकट स्वराज्यावर येणार म्हणून स्वराज्याच्या सिमा सुरक्षित व मजबूत करण्यासाठी किल्ल्यावर चार वर्ष पुरेल इतके धान्य व युद्ध साहित्य जमा करुन ठेवण्यासाठी प्रयत्न केलेले होते. तसेच मोगल बादशहा उत्तरेत रजपूत संघर्षात गूंतला होता. त्यातल्या त्यात अकबराने त्याच्या विरोधात बंड उभेकेलेले होते. त्यामुळे मोगलांचे संपूर्ण लक्ष द.भार तामध्ये नव्हते. त्यांनी दक्षिणेतून बरेचसे सैन्य उत्तरेत बोलावून घेतले होते. याचा पुरेपूर फायदा करुन घेण्यासाठी सेनापतीनी छत्रपती संभाजी राजाशी सल्ला मसलत मोगलांच्या प्रदेशात लुटालूट करण्यासाठी आपले सैन्य रवाना करुन मोगली दक्षिण प्रदेशात दहशतीचे वातावरन तयार केले होते.

## ५) मोगल सम्राट औरंगजेब याची स्वराज्यावर स्वारी

सेनापती हंबीरराव मोहिते आणि मोगल यांच्यात संघर्ष चालू असताना मोगल साम्राज्यात एक विलक्षण घटना घटली आणि संघर्षाचे स्वरुपच बदलले गेले. ती घटना म्हणजे मोगल सम्राट औरंगजेबाचा मुलगा शहाजादा अकबराने आपल्या बापाविरुद्ध बंड पुकारुन तो स्वराज्यात छत्रपती संभाजी राजान्कडे आश्रयासाठी आलेला होता. या बाबत छत्रपती संभाजी राजांनी स्वराज्याचे निष्ठावान, अनुभवी आणि कृर्तृत्ववान सेनापती हंबीरराव मोहिते यांच्याशी चर्चा केलेली असावी. कारण, या वेळी केवळ हंबीरराव मोहितेच आपल्या पाठिशी आहेत याची जाणीव त्यांना होती. स्वराज्यात अकबराची व्यवस्था सुधागड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या धोंडसे या ठिकाणी

केलेली होती. आोद रच सेनापती हंबीररावांनी बऱ्हाणपूर, औरंगाबाद लूटल्याचे शल्य सम्राट औरंगजेबाच्या मनात होते. त्यातच अकबराला छत्रपती संभाजी राजांनी आश्रय दिल्यामुळे सम्राट औरंगजेब अतिशय चिडला. या विषयी खाफीखान म्हणतो,[२१] 'दक्षिणेतील मराठ्यांचा हा उच्छाद व अकबराचे पलायन या दोन्ही गोष्टीचा विचार करुन बादशहाने दक्षिणेच्या मोहिमेवर स्वतः जाण्याचे ठरविले' आणि प्रचंड सैन्यानिशी तो दक्षिणेकडे निघाला. या अगोदर इ.स.१२९६ मध्ये दक्षिण भारत जिंकण्याचा प्रयत्न अल्लाउद्दीन खिलजीने केलेला होता. पण त्याला दक्षिणेत कायमस्वरुपी वर्चस्व निर्माण करता आलेले नव्हते. मोगलांचा सम्राट अकबराने संपूर्ण भारतावर वर्चस्व निर्माण केले होते. पण दक्षिण भारत जिंकता आलेला नव्हता. सम्राट शहाजहानने दक्षिण भारतातील अहमदनगरची निझामशाही इ.स.१६३६ मध्ये जिंकून घेतलेली होती. परंतु संपूर्ण दक्षिण भारत जिंकता आलेला नाही. त्याच्याचकाळात मोगलांच्या दक्षिण प्रदेशाचा सुभेदार म्हणून शहाजादा औरंगजेब दक्षिणेत आलेला होता. त्याला दक्षिणेच्या राजकारणाचा अनुभव आलेला होता. संपूर्ण दक्षिण भारतात मोगलांचे वर्चस्व निर्माण करावे अशी त्याची इच्छा होती. पण छत्रपती शिवराय ह्यात असेपर्यंत त्यालाकाहिही करता आलेले नव्हते. छत्रपती शिवरायांनी स्वतंत्र राज्य निर्माण केल्याचे त्याला एक प्रकारचे दुःख झालेच होते. त्यांच्या कार्यास पायबंद घालण्यासाठी मोगल सम्राट म्हणून असलेल्या औरंगजेबाने अनेक दिग्गज सरदार प्रचंड सैन्यासह स्वराज्यावर पाठविले होते. परंतु हिंदवी स्वराज्य त्याला नष्ट करता आलेले नव्हते. या सर्व गोष्टीचा विचार करुन सम्राट औरंगजेबाने स्वराज्यावर चालून जाण्याचे ठरविले.

आसेतुहिमाचल इस्लामीकरण करण्याची औरंगजेबाची धर्मवडी महत्वाकांक्षा होती. बहादूरखान खानजहान हा मराठी मुलूखात धुमाकूळ घालीत होता. त्यास मराठ्यांनी कधी गनिमी काव्याने तर कधी आमने-सामने प्रत्यक्ष तोंड देऊन दाबून ठेवले होते. आता मराठ्यांशी सामना द्यायचा, तो सर्व शक्तिनिशी 'जिहाद' पुकारुन द्यायचा असे औरंगजेबाने ठरविले. जिहाद व पुण्यसंपादन (मुर तसम जमीरे अकदम) आयुष्याच्या शेवटी दक्षिणेच्या मोहिमेबद्दलची बादशहाची इच्छा होती.' हा विचार करुन रमजान महिन्याच्या २ तारखेला म्हणजे ४ सप्टेंबर १६८१ रोजी

औरंगजेबाने दक्षिण प्रदेशातील बुऱ्हाणपूरकडे कूच करण्याची आज्ञा केली आणि तो ८ सप्टेंबर १६८१ रोजी अजमेरहून आपल्या प्रचंड सैन्यासह दक्षिणेकडे निघाला. दक्षिणेतील लोकांना आपल्या सामर्थ्याची, ताकदिची जाणीव करुन देण्यासाठी त्याने प्रचंड खजिना सोबत घेतलेला होता. आपल्याला कसल्याही प्रकारची उणीव जाणवू नये याची पुरेपूर काळजी घेतलेली होती. सम्राट औरंगजेबासोबत त्याची मुले शहाआलम, आज्जम, कामबक्ष ही होती. त्याच बरोबर इतर नातेवाईकही होते. आसदखान (मावशिचा नवरा), झुल्फिकारखान (मावसभाऊ), रहुल्लाखान (मावस बहिणीचा मुलगा), खानजहान ऊर्फ रहूल्लाखा न बरामंदखान बक्षी (आसदखानाचा मुलगा), खानजमान (दुधभाऊ) त्याच बरोबर नामांकित सरदार होते. खाजाआबीद, निजामल्मुल्क, दाऊदखान पन्नी, बहादूर खान, हिंमतखान, तरबियतखान, अनुपसिंह हाडा, रावकर्ण, राव दलपत, रामसिंह हाडा, सवाई जयसिंह व इतर लहान मोठे काही सरदार होते. तीन ते चार लाख घोडदळ, चार लाख पायदळ सैन्य होते. सेनादलासह आपल्या साम्राज्यातील कारभाराकडे लक्ष देत १३ नोव्हेंबर १६८१ रोजी तो बुऱ्हाणपूर येथे पोहचला. येथील राजवाड्यात अडीच महिने त्याने धालविले. दक्षिणेचा सुभेदार म्हणून असलेला बहादूरखानाकडून छत्रपती संभाजी राजे, सेनापती हंबीरराव मोहिते यांनी केलेल्या कारवाया बाबत विचारणा करुन हिंदवी स्वराज्यातील मराठ्याच्या शक्ती स्थळाची माहिती हेरांच्या माध्यमातून मिळविली. दक्षिणेत औरंगजेब आल्याचे कळताच विजापूरच्या दरबारातील काही सरदार, कु तूबशाहितील काही सरदार आणि स्वराज्यातील काही लोक घाबरुन औरंगजेबापुढे शरन आले. त्यांचा त्याने योग्य तो सन्मान केल्याने मोगलांचे ते गुलाम झाले.[२३] येथूनच त्याने हसनअलीखान नावाच्या सरदाराच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन स्वराज्यातील कोकणच्या प्रदेशावर स्वारी करण्यासाठी पाठविले.[२३]

## १) सम्राट औरंगजेबाच्या सैन्याच्या छावणीचे स्वरूप

मोगल सम्राट औरंगजेबाच्या सोबत आनलेल्या छावणीचे स्वरुप इतिहासाचे संशोधक डॉ.शिवदे सदाशिव यांनी[२४] 'ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा' या ग्रंथात दिलेले आहे. 'बादशहाची

लढाऊ फौज ६० हजार स्वार व ख्र्ख लक्ष पायदळ इतकी असून, ओ झ्यासाठी ५० हजार उंट, ३ हजार हत्ती असून नोकर, चाकर, कारागीर, व्यापारी इत्यादींची गणती केली तर ५ लाख मनूष्य होती. बादशाही फौज ३ लाख स्वार व चार लाख पायदळ इतकी होती असे म्हणण्यास हरकत नाही.

छावणीमध्ये एकंदर २५० बाजार बुनो असून तिचा विस्तार सुमारे तीस मैलपर्यंत असे. तोफखाना सर्वांपुढे ठेऊन लढाईस सुरुवात होई. दोन्ही बाजुकडून घोडेस्वार बाणांचा वर्षाव करीत आणि तोफांनी शत्रुच्या रांगामध्ये गोंधळ उडवून दिला म्हणजे स्वार मोठ्या वेगाने हल्ला करीत आणि मग काही वेळ हातघाईची लढाई सुरु होई. एकंदर लढाई चालू असता बादशहास आपले हत्तीवरुन न उतरण्याची खबरदारी घ्यावी लागे' एकंदरीत औरंगजेबाच्या सैन्याची छावणी म्हणजे एक फिरते मोठे शहरच होते. पाहताक्षणी माणसाचे डोळे थक्क व्हावेत असा लवाजमा होता.

## २) सम्राट औरंगजेबाचा तंबू

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात मोगल साम्राज्य हे सर्वात मोठे साम्राज्य होते. मोगल सम्राट अकबराने मोगल साम्राज्याचा सर्वांगीन विकास करुन वैभवशाली साम्राज्याची मजबूत बांधणी केलेली होती. नरंतरच्या सम्राटांनी त्यात भरच टाकली. सम्राट औरंगजेबाचा कालखंड हा एका गौरवशाली वास्तुच्या वैभवाचा शेवटचा कालखंड होता. त्याच्या वैभवाचे प्रदर्शन द.स्वारीच्या माध्यमातून दिसून येते. राजधानी पासून दूरवर जात असल्याने कोणत्याही गोष्टीची उणीव भासनार नाही याची काळजी घेण्यात आलेली होती. त्याच्या व्यवस्थेसाठी असलेले तंबू हे लाल रंगाचे होते. त्याला मौल्यवान व किमती वस्त्रांच्या कमाणी होत्या. त्या वरील कलाकूसर ही अप्रतिम स्वरुपाची होती. ज्यावेळी प्रवासात मुक्कामाचा प्रसंग असे तेंव्हा उंचवट्यावर त्याच्या दिवाण -आमखासची जागी असायची हे केवळ सम्राटाच्या व्यवस्थेचे ठिकाण होते. त्याच्या शेजारी त्याच्या राण्यांचे स्वतंत्र महाल होते. नंतर शहाजादे म्हणजे मुलांच्या रहाण्यासाठी व अमीर उमरावांसाठी तंबू असायचे. या सर्व तंबुना २४ तास पहारा ठेवला जात होता. विशिष्ट अंतरावर पहारेकरी पहारा करत.

सम्राटाच्या तंबुच्या पुढे एक उंच खांब असून त्यावर दिवा ठेवला जात असे. एकंदरीत राजधानितील महाल असल्याचे दिसून येते.

स्वारीतील पुढे जाण्याचा रस्ता दुरुस्त केल्याशिवाय मुक्काम हलवला जात नव्हता सोबत प्रचंड तोफा असल्यामुळे त्या ओढण्यासाठी बैल व घोडे असत हे सर्वांच्या पुढे असत. या तोफखाण्याच्या पाठीमागे घोडेस्वारांचा व उंटाचा ताफा असायचा उंटाच्या पाठीवर अवजड सामान, जडजवाहीर, खजिना, वस्त्रे ठेवलेली असायची. त्यानंतर सम्राट हत्तीच्या पाठीवर असलेल्या अंबारीमध्ये बसून असत. त्याच्याभोवती अमीर उमराव, सरदार, मनसबदार आपआपल्या लवाजम्यासह चालायचे. सम्राटाचा जनानखाना अंबारीतून अगदी बंदोबस्तात असे.

अशा राजेशाही लवाजम्यासह सम्राट औरंगजेब उत्तरेतून दक्षिण भारताकडे आलेला होता. ज्या दिवशी तो बऱ्हाणपूरला पोहचला तेंव्हाची नोंद जेधे शकावली मध्ये 'पौष मासी क्षयसंवछरामध्ये औरंगजेब बुऱ्हाणपुरास आला.'[२५] अशी केलेली आहे.

## ६) स्वराज्यात पुन्हा कट कारस्थाने

सेनापती हंबीरराव मोहितेंच्या नेतृत्वाखाली मोगल प्रदेशात हल्ले होऊन मिळेल तेवढी लूट जमा करण्याचे काम अव्याहतपणे चालू असताना छत्रपती संभाजी राजांनी आपल्या नेतृत्वाखाली जंजीऱ्याच्या सिद्दीशी संघर्ष चालू ठेऊन इतर प्रदेशावर मराठी सैन्य रवाना केलेले होते. शहाजादा अकबर आश्रयासाठी स्वराज्यात दाखल झालेला होता. स्वराज्याच्या दक्षिणेकडील प्रदेशाची व्यवस्था लावण्यासाठी छत्रपती संभाजी राजे गेले असता पन्हाळ गडावर त्यांच्या विरुद्ध अष्टप्रधान मंडळातील प्रधानांनी पुन्हा कट रचून संभाजी राजांवर विष प्रयोग करण्याचा प्रयत्न केलेला होता. 'संभाजींच्या विरुद्ध या दिड वर्षात तीन कारस्थाने झाली. एक त्याला गादीवर येऊ नये म्हणून मे १६८० मध्ये दुसरा कट जून १६८१ च्या सुमारास ठार मारणे तो पन्हाळ्यावर असताना त्याला विषप्रयोग करुन आणि तिसरा कट अकबराची मदत घेऊन त्याला गादीवरुन काढून टाकण्याचा हा जुलैमध्ये होऊन ऑगस्ट मध्ये फूटला.'[२६] आणि सुदैवाने या कटातून छत्रपती संभाजी राजे बाहेर

पडले होते.कारण पहिल ा कट सेनापती हंबीरराव मोहितेंच्या स्वामिनिष्ठा व स्वराज्यनिष्ठेमुळे उधळवून लावण्यात आलेला होता. जर हंबीररावांनी स्वराज्यानिष्ठा दाखविली नसती तर मराठ्यांचा इतिहास येथेच लिहीने संपवावा लागला असता. पण छत्रपती शिवरायांचा निष्ठावंत, लढवय्या असलेल्या सेनापतींना आम्ही शिवरायांचे मावळे आहोत हे दाखवून देण्याची संधी आलेली होती.

पन्हाळ्यावरील विषप्रयोगाचा कट छत्रपती संभाजी राजांच्या निष्ठावान एका नोकरामुळे उघडकीस आलेला होता. मराठ्यांच्या इतिहासाचे दु:र्देव की अशा निष्ठावान सेवकांचे नाव इतिहासाला माहित नाही. पण याही कटातून छत्रपती संभाजी राजे सुखरुपपणे बाहेर पडले.

तिसरा कट केवळ मोगल सुलतान अकबर व त्यचा साथीदार दुर्गादास राठोड यांच्यामुळे उघडकीस आला होता. या तिन्ही कटामध्ये अन्नाजी दत्तो, हिरोजी फर्जद, बाळाजी आवजी ही मातब्बर मंडळी होती. याकटात सेनापती हंबीरराव मोहिते यांची बहीण सोयराबाई सहभागी असल्यचे बरेच इतिहासकार सांगतात. पण ते चुकीचे असल्याचे लक्षात येते.

पहिल्या कटाच्यावेळी अण्णाजी दत्तोनी सोयराबाईला भावनि ाक बनवून राजाराम महाराजाला गादी मिळवून देतो असे बोलल्यामुळे सोयराबाई या कटात असल्याचे आपणास समजते. पण दुसरा व तिसऱ्या कटामध्ये सोयराबाई नव्हत्या. त्यावेळी छत्रपती संभाजी राजे पन्हाळा किल्ल्यावर होते. तेंव्हा सोयराबाई या रायगडावर होत्या. या कटाशी त्यांचा कसलाही संबंध नाही. तसा एकही पुरावा उद्याप उपलब्ध झालेला नाही. तिसरा कट अण्णाजी दत्तो, हिरोजी फर्जंद, बाळाजी यांनी रचलेला होता.कारण ज्यावेळी स्वराज्यात अकबर आश्रयासाठी आलेला होता. तेंव्हा संभाजी राजांनी त्याच्या स्वातासाठी हिरोजी फर्जद व बाळाजी आवजीला पाठविले होते. तेंव्हा अण्णाजी दत्तोने सांगण्यावरुन अकबराशी पत्र व्यवहारकेलेला होता की, 'तुम्ही आम्हाला सहकार्य करा आम्ही तुम्हाला स्वराज्याचे सिहांसन मिळवून देतो.' परंतु दुर्गादास राठोडच्या सांगण्यावरुन अकबराने आपल्याला मिळालेले पत्र छत्रपती संभाजी राजांकडे परत पाठविल्याने हा

तिसरा कट उधळला होता. सेनापती हंबीररावांच्या बहिणीचा यामध्ये कसलाही संबंध नव्हता. केवळ पहिला कट सेनापती हंबीररावानी उधळून लावल्यामुळे अण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी, हिरोजी फर्जद यांच्या मनामध्ये राग होता. मोहिते घराण्याला बदनाम करण्याचे षडयंत्र त्यांनी रचलो असावे.

सेनापती हंबीरराव मोहिते यांना छत्रपती संभाजी राजाविरुद्ध प्रधान मंडळांनी केलेल्या कट कारस्थानाची माहिती समजली. हंबीररावांचे डोळे लालबुंद झाले. कटवाल्यांबाबत मनात प्रचंड राग निर्माण झाला. पहिल्याकटाच्या वेळी केवळ आपण छत्रपती संभाजी राजांना समजावून सांगितल्यामुळे त्यांनी त्यांनाक्षमा केलेली होते. आपल्या हातून फार मोठी चूक झाली, याचा हंबीररावांना पश्चाताप झाला. आताकधी या प्रधानांची गाठ घेईल व कडेलोट करीन असा मनामध्ये विचार आला. पण य ावेळी स्वराज्यावर औरंजेबाच्या रुपाने संकट आल्याच्या वार्ता सर्वत्र पसरल्या होत्या. आपणाला स्वराज्याच्या सिमा सुरक्षित ठेऊन आलेल्या संकटाशी कसा सामना करता येईल याचा विचार ते करीत होते.

संभाजी राजांनी कटवाल्यांना पकडून कडक शिक्षा केल्या. याची नोंद जेधे शकावलीतील नोंदीप्रमाणे 'शके १६०३ दुर्भती संवत्सर भाद्रपदी मासी (४ ऑगस्ट ते २ सप्टेंबर) संभाजी राजे यांनी कवी कलशाचे बोले मागती अण्णाजी दत्तो सचिव याजवरी इतराजी करुन मार दिल्हा. त्या माराने राजश्री अण्णाजीपंत व बाळप्रभू व सोमाजी दत्तो व हिरोजी फर्जद परळीखाले कैद करुन मारले.'[२७] याच काळात सोयराबाई यांचा मृत्यू झाला. या बाबत उल्लेख २७ ऑक्टोबर १६८१ च्या पत्रात मुंबईकर इंग्रज म्हणतात[२८] 'राजारामाची आई मेली. कोणी म्हणतात की, संभाजीच्या सांगण्यावरुन तिला विष घालून मारली.' सोयराबाईचा मृत्यू विषप्रयोगाने झाला किंवा विष घेऊन आत्महत्या केली असे असले तरी सोयराबाई मुळीच कटामध्ये नव्हत्या. कटवाल्यानी आपल्या कबुलीमध्ये आपला जीव वाचविण्यासाठी सोयराबाईचे नाव गोविले असावे आणि सोयराबाई कटात असल्याच्या वावड्या त्यांच्य ाकाही हितसंबंधीय व्यक्तिनी पसरविण्याची दाट शक्यता आहे.

कारण अण्णाजी दत्तो सारख्या मधल्या गाठीच्या व्यक्तीने स्वत:बरोबर इतरांना आपल्या कटात ओढण्यासाठी प्रयत्न केलेले होते. छत्रपती शिवरायांच्या काळात अगोदरच छत्रपती संभाजी राजांबद्दल मनामध्ये द्वेष निर्माण झालेला होता. शिवरायांच्या निधनानंतर आपला द्वेष प्रकटण्याची चालून संधी आलेली होती. सोयराबाईना हाताशी धरुन राजारामालागादीवर बसवावे आणि स्वराज्याचा संपूर्ण कारभार आपण चालवावा या हेतुने त्यांनी प्रयत्न केले होते. परंतु सेनापती हंबीरराव मोहितेच्या दुरदृष्टीमुळे आपला कट उधळला गेला. आणि आपले नाव कटात असल्याचे स्वराज्यात माहिती झाले. याचे दु:ख दत्तोच्या मनामध्ये सारखे सलत होते. माझे स्वप्न कधी साकार होईल छत्रपती संभाजीचाकधी काटा काढीन या विचाराने तो ग्रासला होता. सेनापती हंबीरराव विषयी राग होता. पण सेनापती सारखे युद्ध आघाड्यांवर होते. सोबत असंख्य सैनीक ते अनुभवी, राजकरण, धुरंधर, योद्धा याची यांना साक्ष पाहिली होती. त्याच्या कृपेमुळे आपण पहिल्या कटातून वाचलो होतो. त्यांना नंतर पाहू असे समजून त्याची बहीण सोयराबाईला याही कटात असल्याचे त्यानी दाखवून दिले असावे.

दुसरी गोष्ट अशी की, पन्हाळ गडावर विषप्रयोगाचा प्रयत्न व अकबराचे साह्य घेऊन छत्रपती संभाजीचा काटा काढण्याचे कारस्थान रायगडावर सोयराबाईच्या कानावर आले असावे पूर्वी यावनिक लालसेपोटी अण्णाजी दत्तोला समर्थन दिले. त्याबद्दल बंधु आणि स्वराज्याचा सेनापती हंबीररावांनी आपली समजूत काढून टाकलेली होती. आणि आपणास क्षमा केलेली होती. आपण मोहिते घराण्याचे असून पूर्वापार आपले भोसले घराण्याशी नाते संबंध आहेत. एक वजनदार घराणे म्हणून सर्वत्र लौकीक आहे. वाईट लोकांच्या संगतिने घराण्याला बदनाम करणे हे फार वाईट कृत्य आहे. याची जाणीव ठेऊन रहा असे हंबीररावांनी सांगितले होते.

पुन्हा कटवाल्यांनी आपले नाव घेतल्याच्या बातम्या सोयराबाईच्या कानावर आल्याने त्या अतिशय दुखी झाल्या. यावेळी आपलाकसलाही संबंध नाही तरीपण आपले नाव कटात असल्याचे जाहीर झाल्याने आपण आपले वंधू सेनापती हंबीरराव मोहिते यांना कसे बोलावे ? आणि कसे तोंड दाखवावे ? ते आपणास शिक्षा करतील. त्यांना काय वाटले असावे ? आता

जिवंत राहणे नाही असा विचार करुन त्यांनी आपली जीवनयात्रा संपविली असावी. मात्र मल्हार रामराव चिटणीस यांनी बखरीमध्ये[२९] 'सोयराबाईला भिंतीत चिनून मारल्याचे सांगतात.' छत्रपती संभाजी राजे तर सोयराबाईंना अतिशय प्रेमळ असल्याचे सांगतात. 'सोयराबाई स्वच्छ पाण्यासारखा आहेत' असा उल्लेख करतात ते शिवपुत्र संभाजी राजे होते. स्त्रियांना आदराने वागविण्याचे संस्कार शिवरायांनी त्यांच्यावर केलेले होते.

एकंदरीत सोयराबाईचा मृत्यू केवळ 'आपली बदनामी झाली' या विचाराने ग्रासून व सेनापतीना आपण कसे तोंड दाखवू म्हणून त्यांनी आपली जीवनयात्रा संपविली असावी. ज्यावेळी सोयराबाईचा मृत्यू झाला तेंव्हा सेनापती हंबीरराव मोहिते रायगडावर आले असावेत. त्यांना ही दु:ख झाले. शेवटी प्रधान मंडळातील बंडखोरांनी कोणाचा तरी काटा काढला याचे त्यांना फार वाईट वाटले. भाच्चा राजारामाला धीर देऊन त्याचे सांत्वन केले. छत्रपती संभाजी राजांची भेट घेऊन शहाजादा अकबरच्या संदर्भात चर्चा झाली असावी आणि सम्राट औरंगजेब स्वराज्यावर येत आहे. त्याच्याशी कसा मुकाबला करायचा या बाबतीतही चर्चा झालेली असावी आणि मोगली आक्रमणास तोंड देण्याची तयारी सुरु झाली.

## ७) औरंगजेब दक्षिणेत दाखल

मोगल सम्राट औरंगजेब दक्षिणेकडे येण्यास निघाल्यानंतर सुद्धा छत्रपती संभाजी राजे व सेनापती हंबीरराव मोहिते यांनी स्वराज्याच्या सिमेपलीकडील मोगली प्रदेशात सर्वत्र लुटालुटीचे सत्र चालूच ठेवले होते. या विषयी मनुची म्हणतो[३०] 'औरंगजेब दक्षिणेत येत आहे ही जरी बातमी त्यास मिळाली तरी त्याने भिऊन न जाता पूर्वीप्रमाणे सर्व बाजूर लुटमार करण्याचा कार्यक्रम चालूच ठेवला. मोगल अफाट सेनेची तो कि ती पर्वाकरतो हे तो त्यायोगे निदर्शनात आनीत होता. औरंगजेब बऱ्हाणपुरला येण्यापूर्वी त्याने बादशहाच्या छावणीपासून अवघे चार कोस दूर असलेले एक ठिकाण लूटले.' यावरुन मराठा सैन्याची शक्ती आणि धाडस किती अफाट होते हे लक्षात येते.

औरंगजेब ज्या दिवशी बुऱ्हाणपूरला येवून पोहचला. त्याच दिवशी म्हणजे १३ नोव्हेंबर १६८१ रोजी छत्रपती संभाजी राजे व अकबर यांची भेट 'सुधागड' येथे झाली. इंग्रजांच्या पत्रावरुन संभाजी राजे अकबरासोबत घेऊन बुऱ्हाणपूरवर चालून जाणार, तर काही पत्रावरुन अकबर व संभाजी राजे दिल्लीवर चालकरुन जाणार असे लिहितात. यावरुन संभाजी राजांनी अकबराला हाताशी धरुन मोगली संकटाचा सामना करण्यासाठी राजकारण केलेले होते. बुऱ्हाणपुरला आलेल्या औरंगजेबाने सरदार हसनअलीखान याला १४ हजार सैन्यासह कोकणच्या स्वारीवर पाठविले. या स्वारीची माहिती मुंबईकर इंग्रजांच्या पत्रात आली आहे. 'नबाब हसन अली खान बहादुराकडून सिद्दी महमद नावाचा एक माणूस काल पत्र घेऊन आला. हसन अलीखानआपल्या बरोबर २० हजार स्वार व पंधरा हजार पायदळ घेऊन आता आलेल्या बातमी प्रमाणे कल्याण भिवंडीपर्यंत आला आहे. संभाजीच्या मुलुखात वाटेने जाळपोळ करीत येऊन तेथे तळ दिला आहे... घाटावरुन आलेल्या संभाजीच्या लोकांबरोबर नबाबाने एक लढाई दिल्यची बातमी आहे. त्यात नबाबाची सरशी झाली. पण सत्यासत्यता नीट समजली नाही.'[३१] कोकणच्या प्रदेशाचे महत्व औरंगजेबाला माहिती असल्यामुळे आणि मराठे व अकबर या मार्गाने उत्तरेत जाऊ नये म्हणून पहिल्यांदा त्याने कोकणवर ताबा मिळविण्यासाठी आपले सैन्य रवाना केले.

२८ फेब्रुवारी १६८१ रोजी औरंगजेब बुऱ्हाणपुरहून निघाला आणि २२ मार्च रोजी औरंगाबाद येथे पोंहचला. येथे आल्याबरोबर त्याने स्वराज्य लवकरात लवकर जिंकून घेण्यासाठी आपल्या सैन्याची आखनी करुन डावपेच आखले. छत्रपती संभाजी राजे व विजापूर यांची युती होऊ नये म्हणून विजापूरच्या बाजुला शहाजादा आजमला सैन्य देऊन पाठविले. अहमदनगरकडे रहुल्लाखान सरदाराला पाठविले आणि नाशिक जिल्ह्यातील रामसेजचा किल्ला जिंकून घेण्यासाठी कासिमखान किरमानी व शहाबुद्दीनखान यांची नेमणूक केली. मुंबईकर इंग्रज व गोव्याचे पोर्तूगीज यांनी मराठ्यांना कसल्याही प्रकारचे साह्य करु नये अशी धमकी दिली. तर जंजिऱ्याचा सिद्दी तर मोगलांचा मांडलिक सरदार होता. त्याचा मराठ्यांशी संघर्ष चालूच होता. त्यामुळे मराठ्यांना एकटे पाडून त्यांचे हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी प्रयत्न सुरु केले.

मोगल सम्राट औरंगजेबाच्या दृष्टीने नाशिक बागलाणचा प्रदेश अतिशय महत्वाचा होता. या प्रदेशातील मुल्हेर (औरंगगड) वगळता अहिवतगड, साल्हेर, त्रिबंक, पट्टा ऊर्फ विश्रामगड, रामसेज इत्यादी किल्ले मराठ्यांच्या ताब्यात होते. याच मार्गाने मराठ्यांनी सुरतेवर स्वारी केलेली होती. सेनापती हंबीररावांनी केलेली बुऱ्हाणपूरची लूट साल्हेरला आणून ठेवली हो ती. कोकणची स्वारी यशस्वी करायची असेल तर या सर्व किल्ल्यावर आपले वर्चस्व निर्माण करणे गरजेचे आहे असे समजून औरंगजेबाने नामांकित सेनानींना स्वराज्यावर रवाना केले.

## ८) रामसेजचा वेढा व सेनापती हंबीररावांचे सर्थिचे प्रयत्न

हिंदवी स्वराज्याच्या उत्तर दिशेला नाशिक बागलांच्या प्रदेशात रामसेज नावाचा किल्ला होता. प्राचीन काळामध्ये रामाने या किल्ल्यावर जास्त दिवस वास्तव्य केल्यामुळे रामसेज असे नाव पडल्याचे बोलले जाते. सध्या हा किल्ला नाशिक जिल्हात उत्तरेला सात मैल अंतरावर दिंडोरी तालुक्यात असून समुद्रसपाटी पासून सव्वा तीन हजार फूट उंचीवर आहे. किल्ल्यावर प्रवेश करण्यासठी म्हणून जोड प्रवेशद्वार असून बाहेर पडण्यासठी एक चोरवाट आहे. किल्ल्यात अनेक निवासस्थाने, राजवाडे,कोठारे, शिबंदिसाठी आवश्यक ती व्यवस्था केलेली होती. हा किल्ला नेमका कोणी व केंव्हा बांधला हे पुराव्या अभावी सांगता येत नाही.

मध्ययुगीन काळात मोगल सम्राट शहाजहाने दक्षिणेत स्वारी केली. त्यावेळी नाशिक बागलानचा प्रदेश जिंकण्यासाठी सरदार शाहिस्तेखानाच्या नेतृत्वाखाली अलीवर्दीखनाला नेमून तेथील सर्व किल्ले अहमदनगरच्या नि झामशाहितील वजीर म्हणून कार्य करणारे शहाजी राजे यांच्याकडून जिंकूण घेतले होते. नंतर छत्रपती शिवाजी राजांनी रामसेज हिंदवी स्वराज्यात समाविष्ट केलेला होता. मोगल सम्राट औरंगजेब दक्षिण स्वारीच्या माध्यमातून औरंगाबाद येथे आल्या बरोबर स्वारीची सर्व सुत्रे हाती घेतल्याबारोबर स्वराज्याच्या उत्तर सिमेवर असलेला रामसेज जिंकूण घेण्यासाठी नामवंत व कसलेले सेनानी ससैन्य रवानाकेले होते. यामध्ये कासीमखान किरमाणी, शहाबुद्दीनखान, बहादूरखान, उम्दतल्मुल्क असून यांच्या नेतृत्वाखाली' ३५-४० हजार सैन्य, प्रचंड

दारुगोळा, तोफखाना तसेच पीरगुलाम, मुहंमद खलील, शुभकर्ण बुंदेला, राव दलपत बुंदेला, रामसिंह बुंदेला हे रजपूत सरदार दिलेले होते.

रामसेजचा किल्ला लहान असला तरी तो उंच डोंगरावर वसलेला होता. किल्ल्यावर चारशे ते पाचशेच्या वर मराठा शिबंदी नव्हती. मात्रकिल्लेदार हा मराठा असून अनुभवी व धाडसी व्यक्तिमत्वाचा लढवय्या होता. बहुतेक इतिहासकारांनी या किल्लेदाराचे नाव इतिहासाला माहित नसल्याचे सांगितले आहे. पण ऐतिह ासिक कादंबरीकार 'विश्वास पाटील'[३२] यांनी यावेळी 'रामसेजचा किल्लेदार सुर्याजी जेधे हा होता.' असे सांगून छत्रपती शिवाजी राजांच्या तालमीत वाढलेला आणि सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या संगती त कसलेला मराठा सेनानी होता. किल्ल्यावर धान्याचा साठा मूबलक होता. पण तोफा नव्हत्या याची पुरेपूर माहिती सेनापती हंबीररावांना होती. त्यामुळे वेढ्याच्या प्रसंगी किल्ल्यावर मराठा सैन्याला कूमक पाठविण्याचे काम सेनापतींनी छत्रपती संभाजींच्या परवानगीने केलेले होते. एवढेच नसून मोगली सैन्यावर बाहेरुन हल्ले स्वतः सेनापती हंबीररावांनी केलेले होते. रामसेजच्या वेढ्या संबंधी माहिती मराठी साधनामध्ये फारशी उपलब्ध नाही.केवळ जेधे शकावलीमध्ये 'चैत्रमासी शाहादिखान येऊन रामसेजस वेढा घातला वैशाख मासी रुपाजी भोसले व मानाजी मोरे शहादिखानाशी गणेश गावापासी भांडण केले पाचशे घोडी पाडाव पुरवणी चैत्रमास केली त्यावर अश्वीन मासी रामसेजच वेढा उठिला' [३३] असा उल्लेख आहे. यावरुन मार्च/एप्रिल १६८२ मध्ये मोगलांनी वेढा दिलेला होता असे समजते.

या वेढ्याबाबतची माहिती मोगली इतिहासकर व परकिय कारवारकर इंग्रजाच्या पत्रावरुन स्पष्ट करता येते. मोगल सम्राट औरंगजेबाने किल्ल्याचे सामर्थ्य लक्षात घेऊन कासीमखान किरमाजी नावाच्या शूर व तडफदार सरदाराची नेमणूक केली होती. त्यांने रामसेज किल्ल्याला वेढा घालून मराठ्याशी लढण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यात त्याला यश आले नव्हते. त्याने केलेल्या कार्याचे वर्णन औरंगजेबाकडे लिहून कळविले होते. की, 'पूर्वी तोफांच्या माऱ्याने रामसेजच्या किल्ल्यातील बुरुजांची भिंत पाडली होती. म्हणून त्या वाटेने माझ्या माणसांनी वर बाण फेकून किल्ल्यात जावे असे मी ठरविले व तारीख २७ शाबानला रात्रीच्या वेळी पाच सहाशे मेवाती व माझे

लोक यांना किल्ल्यात जाण्यासाठी तयार करुन हल्ला केला शेवटी खंजरखानाच्या भाऊबंदापैकी कांही व माझे लोक किल्ल्याच्या दरवाज्यापाशी पोहोंचून मोठ्याने ओरडले की, 'बैलदारांनी यावे" त्या आवाजाने गनिमाचे लोक जागे होऊन त्यांनी दगड व बंदुकी याचा मारा केला. बहुतेक सर्व बादशाही लोक कामास आले व जखमी झाले. काही प्रगती झाली नाही. सध्या हे काम हातचे गेले असे बादशाही लोक बोलतात. परंतु मला ते मान्य नाही. माझ्याबाबत हुकूम होईल त्याप्रमाणे करीन'[३४] सरदार कासीमखानाच्या पत्रावरुन औरंगजेबाने असा हुकूम दिला की, सोबतच्या लोकांना शहाबुद्दीनकडे सोपवून परत यावे. यावरुन ९ सप्टेंबर १६८२ रोजी कासीमखान किरमाणी रामसेजचा वेढा सोडून औरंगाबादला आलेला होता.

नंतर शहाबुद्दीनखानाने रामसेजच्या वेढ्याचे काम चालू केले. या बाबत मोगल इतिहासकार खाफीखान म्हणतो,[३५] 'बादशहाने रामसेजचा किल्ला जिंकून घेण्याच्या कामावर शहाबुद्दीनखान याची नेमणूक केली. किल्ल्याला वेढा घालणे, सुरुंग लावणे, मोर्चे बांधणे, दमदमे तयार करुन वर चढविणे इत्यादी सर्व गोष्टी शहाबुद्दीनखानाने केल्या. पण रामसेजचा किल्लेदार हा सर्व मराठ्यात अत्यंत अनुभवी व कसलेला होता. त्याच्या प्रयत्नांमुळे आणि सावधगिरीमुळे मोगल फौजेचे काही चालेना प्रस्तुत ग्रंथकार (खाफीखान) हा त्यावेळी तेथे असलेल्या मोगल फौजेत होता. किल्ल्यात लोखंडी तोफा नव्हत्या. पण कातडे बरेच होते. किल्ल्यातील लोकांनी लाकडाच्या तोफा बनविल्या. त्यात ते कातडे भरुन तोफ उडवित. अशी एक तोफ दहा तोफांचे काम करी.'

मोगलाचा इतिहासकार भीमसेन सकसेना शहाबुद्दीनखानाने रामसेजला दिलेल्या वेढ्याबाबत माहिती सांगतो,[३६] 'शहाबुद्दीन याने किल्ल्याला मोर्चे बांधले. किल्ल्याच्या बुरुजासमोर शहाबुद्दीन याने लाकडाचा एक प्रचंड बुरुज उभा केला. त्यावर चढून पाचशे माणसे एका वेळी किल्ल्यावरील लोकावर गोळ्यांचा मारा करु शकत. इतक्यात बातमी आली की, किल्ल्यातील लोकांच्या मदतीसाठी मराठ्यांचे सैन्य चाल करुन येत आहे.' जेधे शकावलीनुसार मे १६८२ मध्ये बाहेरुन रुपाजी भोसले आणि मानाजी मोरे यांनी गणेशगावाजवळ शहाबुद्दीनखानवर हल्ला चढविला आणि मोगलाची पाचशे घोडी पाडव केली. या मराठा सैन्याची कूमक सेनापती हंबीरराव

मोहिते यांनीच पाठविली होती. दि.३०/०७/१८८२ रोजीकारवारकर इंग्रज सुरतेला कळवितात [३७] 'हंबीरराव जखमी झाला व रामसेजगड मोगलांनी घेतली' इंग्रजांना या वेढ्यासंबंधी फारशी माहिती नसल्याचे दिसते. कारण रामसेजचा किल्ला मोगलांना लवकर मिळाला नाही. मराठ्यांनी दोन-तीन वर्ष लढवला होता. मात्र शहाबुद्दीनखानाने रामसेजला वेढा दिल्याचे समजताच । सेनापती हंबीरराव मोहिते यांनी १८००० सैन्य घेऊन रामसेजकडे बाहेरुन मोगली सैन्यावर हल्ले करण्यासाठी निघाले ही वार्ता शहाबुद्दीनखानाला कळताच वेढा चालू ठेऊन तो सेनापती हंबीररावाच्या सैन्यावर चालून येताच गणेशवाडी येथे दोन्ही सैन्याची गाठ पडली. लढत असताना हंबीरराव जखमी झाल्याने मोगली सैन्याशी लढा मानाजी मोरे व रुपाजी भोसले यांनी दिला. शेवटी झालेल्या संघर्षात मराठ्यांचाच विजय झाला. मोगलांची ५०० घोडी मिळाली आणि सेनापती हंबीरराव साताऱ्याकडे निघून गेले.

शेवटी औरंगजेबाने शहाबुद्दीन खानाला परत बोलावले आणि रामसेजच्या वेढ्याची जबाबदारी खानजहान बाहादूरखान याच्याकडे दिली. या विषयी खाफीखन लिहितो[३८] 'खानजहान बहादुरनेही त्या किल्ल्यास काही दिवस वेढा देऊन पुष्कळ धैर्य व शौर्य दाखविण्याची आपली शिकस्त केली. परंतु नुकसानी करुन घेण्यापेक्षा त्याला अधिक काहिही यशप्राप्ती झाली नाही. एके दिवशी खानजहान बहादूर याने एक डाव रचला. त्याने आपल्या सर्व लोकांना किल्ल्याच्या एका बाजुला जमण्यास सांगितले. तोफखाना वगैरेलाही हुकूम देऊन त्याच बाजूस रवाना केले. आणखी इतर बाजारबुणगे जमवून एक अफवा पिकवण्यास सांगितली की, त्या बाजुने किल्ल्यावर मोठा हल्ला चढवणार आहोत. लोकही जमावयास सांगितले होते. मनात उद्देश हा की, सर्व लोक ज्या बाजुला दिसतील त्यास बाजूवर शत्रुही किल्ल्याच्या संरक्षणार्थ राहून व इतर बाजूकडे त्याचे दूर्लक्ष होईल. म्हणून त्याने दुसऱ्या बाजूस शंभर-दोनशे धीट व धष्टिंणा अशा शूर वीरांना जे अशा लढ्यात निष्णात होते व ज्यांना कोटावर चढून जाता येत होते अशा वीरांना, गुप्त रितीने व आवाज न करीता 'दोर बाजा' प्रमाणे किल्ल्यावरील लोक त्या बाजूस गाफील आहेत असे पाहून आत शिरुन हल्ला करावयाचा असा संकेत सांगितला. या लोकांनी किल्ल्यावर छापा घालण्यास उपयुक्त

तेवढेच हत्यारे बरोबर घ्यावयाची होती. दिवाबत्तीकाहिही वापरुन आतील लोकांना दखल लागेल असे काहिही करावयाचे नव्हते. परंतु किल्लेदारानी खानजहानचा डाव बरोबर ओळखला आणि आपल्या गडाच्या झुंझण्याची योग्य ती खबरदारी राखली. त्याने किल्ल्यात राहणारे आबाळेगबाळे लोकांना तुताऱ्या व नगारे घेऊन ज्या बाजूस बहादुरखानाने लोक जमवले होते तिकडे पाठविले. त्यांनी तिकडे आवाज करीत राहून तिकडील लोकांना हुलकावणी दाखवीत ठेविले. तसेच तेथील लोकांनी तटाखालच्या लोकांवर दगड फेकले व तेलाने भरलेले चिध्यांचे पलीते चांगले पेटले की, तीराच्या साहाय्याने दुरवर फेकीत ठेविले. परंतु दुसऱ्या बाजूस की, जिकडे खानजहान बहादूरने तट चढून हल्ला करण्यास लोक पाठविले होते, त्या बाजूस जीवावर उदार होऊन लढणारे तेव्हढे लोक हाताता लोखंडाची हत्यार घेऊन आवाज, नाद किंवा कानोसा लागणार नाही. अशा रितीने तिकडे ठेविले ते तटामागे कोपऱ्यात लपून राहीले होते. अनाहूत पाहुण्यांचा समाचार घेण्यास ते फार आतूर झाले होते. शेवटी मोगलाकडील दोन लोक वर चढुन आले व आत डोकाऊन पाहू लागताच लपून बसलेल्या लोकांनी आपल्या हातातील वाघनखांनी व पंजानी इतके ओरबडले, की त्यांच्या डोळ्यावरील कातडे व डोळे बाहेर आले. त्यामुळे ते खाली कोसळले. अशा रितीने बहादूरखानाचे लोक मारले गेल्याने फार मोठी हानी झाली व त्याचा डाव त्याच्या अंगावर आला नंतर काही दिवसानी एके दिवशी खानजहान बहादूरच्या पागेतील एका मोतद्दाराने काही जादुटोणा करुन किल्ला घेऊन देतो म्हणून सांगितले. त्या म्हणण्याप्रमाणे बहादूरखानाने त्यास शंभर तोळे सोन्याचा एक नाग करुन दिला. तो घेऊन गढ चढू लागला. इतक्यात किल्ल्यावरुन रेशमाचा चेंडू (गोफनितील गोळा) आला व त्याच्या छातीत जोराने बसला व कोलांट्या खात पायथ्याशी येऊन पडला.'

एकंदरीत खनजहान बहादूरने भरपूर प्रयत्न केले. पण रामसेज घेण्यास यश मिळाले नव्हते. शेवटी सम्राट औरंगजेबाने त्यालाही परत बोलावणे धाडले. परतीच्या दिवशी खानजहानच्या आदेशाने मोगली सैनिकांनी शहाबुद्दीनखानाने तयार केलेल्या लाकडी बुरुजाला आग लाऊन दिली. यावेळी रामसेजच्या किल्ल्यातील मराठे तटावर जमले, त्यांनी नगारे, चौघडे वाजविली. आणि

मोगलांच्या तावडीतून रामसेज वाचविल्याने संभाजी राजांनी किल्लेदाराला खिलतीचा पोषाख, रत्नजडीत कडे आणि नगद रक्कम पाठवून यथोचित सन्मान केला.

रामसेजच्या वेढ्याच्या प्रसंगी सेनापती हंबीररावांनी शर्थिचे प्रयत्न केले होते. हंबीररावांनी मोगली वेढ्यावर बाहेरुन हल्ला केल्याने व मोगलांना मिळणारी रसद तोडल्याने मोगल सरदार हवालदील झाले. तसेच किल्ल्यातील किल्लेदार व इतर मराठा सैनिकांना सेनापती हंबीरराव किल्ल्याच्या सभोवतालच्या परिसरात असल्याने त्यांना फार मोठा आधार वाटत होता. जिथे हंबीररावांच्या तालमीत सैन्य घडले होते. तिथे शेवटी विजयच, असे समीकरण तयार झाले होते. किल्लेदार सुद्धा हंबीररावांबरोबर युद्ध मोहिमांमध्ये सोबती असल्याने येणाऱ्या संकटाचा सामना कसा करायचा हे हंबीररावांना माहित होते. अनेकदा छत्रपती शिवरायांसोबत लढाया केल्यामुळे शिवरांचे युद्धकौशल्य हंबीररावांना माहिती होते. त्यांच्या मृत्यूनंतर तर एकमेव शिवरायांच्या विचाराचे पाईक म्हणून संपूर्ण स्वराज्य त्यांच्याकडे पहात होते. कित्येकदा या मोगली प्रदेशावर हल्ले त्यांनी केलेले होते. त्यामुळे मोगलांचा वेढा उठविण्यासाठी हंबीररावांनी मराठा सैन्यातील सेनानिंना वेढ्यावर हल्ले करण्यासाठी पाठविले होते. स्वतः हंबीररावांनी शहाबुद्दीनखानाच्या सैन्यावर हल्ले करुन त्याला सळो की पळो करुन सोडले. या काळात हंबीररावांवर फार मोठी जबाबदारी होती. औरंगजेबाने रामसेज सारख्या अनेक ल्ल्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी सैन्य रवाना केले होते. औरंगजेबाने पहिल्याच दणक्यात हिंदवी स्वराज्य जिंकावे यासाठी अनेक दिग्गज सरदारांना स्वराज्यावर रवाना केले होते. पण या दिग्गजांचा सामना केवळ हंबीररावांच्या नेतृत्वाखाली करण्यात आला. त्यामुळे रामसेजला ते अडकून पडले नव्हते. परिस्थितीचा विचार करुन बाहेर राहून किल्ल्यातील सैनिकांना मोठा धीर देऊन रसद पूरवठा कसा करता येईल. या दृष्टीने त्यांचे प्रयत्न होते. शेवटी या वेढ्याच्या काळात हंबीरराव जखमी झाले होते. तरीही मोगलांना प्रत्येक आघाडीवर पराभूत करीतच होते.

## ९) सेनापतींच्या शौर्याची मोगली सैन्यात दहशत

### १) सेनापतींचा कुलीचखानाशी सामना (आक्टो.१६८२)

रामसेजचा वेढा लश्कर उठावा म्हणून स्वराज्याच्या उत्तर सिमेवर राहून बाहेरुन हल्ले करुन सोलापूर, सातारा येथील मोगलांचा प्रतिकार करण्यासाठी सेनापती हंबीरराव ससैन्य रवाना झाले होते. स्वराज्याच्या कोणत्या प्रदेशात मोगलांनी हल्ले सुरु केलेत याची इत्यंभूत माहिती घेऊन त्याच्या पाठलागावर ते असायचे. मोगल सरदार कुलीचखान याने भिमानदीपासून जवळपास १३० कि.मी. अंतरावर सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यातील खवासपूर येथे मोगली सैन्याने तळ दिले असता हंबीरराव चालून गेले. यावेळी कुलीजखाना सोबत सरफराजखान, येलबर्गखान, कमालौद्दीनखान व एक रजपूत सरदार किशोरसिंग हाडा आणि सात हजार मोगली सैन्य होते. या विषयीची माहिती मोगल दरबारच्या अखबारमध्ये मिळते. 'भिमेपासून ४० कोस शत्रुच्या मुलुखात पोहोचलो. तेंव्हा संभाकडील २० हजार स्वार व प्यादे यासह हंबीरराव व विठोजी सामना करण्याकरीता आले. मी सराफ्राझखान, यलबर्शखान, कमालुद्दीनखान व किशोरसिंग हाडा वगैरेना सात हजार स्वारांसह फौजेच्या हरावलीस नेमून स्वारी केली, शत्रुच्या लोकाशी लढाई झाली. बादशाही सुदैवाने शत्रुच्या तीन-चारशे लोकांना यमसदनास पाठविले व पुष्कळाना जखमी केले. बादशाही फत्ते झाली. पाच कोस पर्यंत शत्रुचा पाठलाग केला. तो पळून जाऊन पहाडामध्ये लपला. बादशाही लोकांच्या हातून उत्तम कष्ट घडले आहेत. आशा करतो की, याचा परिणाम चांगला होईल.'[३९] या अखबारातील वर्णनानावरुन बादशाही फत्ते झाली आणि मराठ्यांचा पराभव झाला. पण हे अगदी चुकीचे सांगितले असावे. कारण कुलीचखानाने हुजुरास अर्ज पाठविलेला होता. त्यात 'हंबीरराव वगैरे शत्रुच्या जमेतीस त्याने उत्तम तंबी देऊन बादशाही सुदैवाने मोठा विजय मिळविला. शत्रुचे इतके लोक मारले की, शबे हुनूद प्रमाणे तो दिवस उजळला. बादशाही चाकर कृपेची आशा करीत आहे. हुकूम झाला की, (औरंगजेबा) 'माझा विश्वास बसत नाही. शत्रुच्या लोकांना जर मारले तर बादशाही लोक कामास कसे आले ? शिवाय तो मूहम्मद आजमशहाकडे का परत आला ?

अर्ज केला की, तो चाकर खोटे बोलणार नाही. हुकूम (औरंगजेबाचा) झाला की खानाच्या अर्जाची छाननी करुन व अनुपसिंगाने लुत्फुल्लाहखानास लिहिलेल्या पत्रावरुन अर्ज करावा.' [४०] हंबीररावाच्या सैन्याबरोबर मिळविलेल्या विजयाचीखात्री मोगल सम्राट औरंगजेबाला वाटली नव्हती. कारण मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते किती शुर व लढवय्या आहे याची जाणीव औरंगजेबाला होती. केवळ सेनापती हंबीररावांच्या युद्धनितिमुळे मोगलांना पराभूत केले जात होते. यावेळी मराठा सैन्याच्या हालचाली अतिशय जलदगतिने होऊन मोगली सैन्याला स्वराज्यामध्ये घूसण्यास अजिबात वावच नव्हता. छत्रपती संभाजी राजांना युद्धविषयक सल्ले हंबीरराव मोहिते देत होते. याची इत्यंभूत माहिती हेरांच्या माध्यमातून औरंगजेबाला मिळत होती.

## २) सेनापती शहाजादा आज्जमशी लढाया आणि विजय

हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी मोगल सम्राट औरंगजेबाने इ.स. १६८२ पासून प्रयत्न सुरु केले होते. आपल्या सैन्याच्या अनेक आघाड्या तयार केलेल्या होत्या. स्वराज्याच्या उत्तर भागातील किल्ले जिंकून घेण्यासाठी शहाबुद्दीन सारखे दिग्गज सेनानी पाठविले. या आघाडीचा सामना स्वराज्याचे सेनापती हंबीररावांच्या नेतृत्वाखालील मराठा सैन्याने दिला. केवळ साल्हेर किल्लेदाराने मोगलाकडील लाच घेऊन फितुराने तो किल्ला मोगलांना दिलेला होता. यावेळी सेनापतींना खूप वाईट वाटले. साल्हेचा किल्ला शिवरायांच्या काळापासून स्वराज्यात होता. हंबीररावांनी बुऱ्हाणपूर लुटल्यानंतर संपूर्ण संपत्ती तेथे आणून ठेवली होती. तसेच उत्तरेत मोगलांच्या प्रदेशात हल्ले करुन मराठा सैन्य याकिल्ल्यावर येऊन विश्रांती घेत होते.केवळ लालसी प्रवृत्तीमुळे हा मोगलांना किल्ला देण्यात आला. हंबीररावांनी स्वराज्यातील किल्लेदाराना छत्रपती संभाजीराजा करवी आदेश देण्यास सांगितले. त्याचाच एक भाग म्हणून रामसेजच्या किल्लेदाराने मोगलाशी कित्येक वर्ष हा किल्ला भांडता ठेवला. मोगलांचा वेढा पडल्यानंतर हंबीररावांनी मोगली सैन्यावर बाहेरुन हल्ले करुन शहाबुद्दीनखानाला वेढा उठविण्यास भाग पाडले होते.

मोगल सम्राट औरंगजेबाने इ.स.जाने.१६८२ मध्ये शहाजादा आज्जम याची स्वराज्याच्या दक्षिण भागात नेमणूक केलेली होती. कारण विजापूर व छत्रपती संभाजी राजे यांच्यात युती होऊ नये आणि संभाजी राजाला विजापूरची कसलीही मदत मिळू नये म्हणून दोन्ही राज्याच्या सरहद्दीवर पाठविले. कुलीचखान त्याला येऊन मिळालेला होता. पन्हाळयाच्या परिसरात ६ कोसावर येऊन थांबल्याची वार्ता सेनापती हंबीररावांना मिळताच त्यांनी २० हजार सैन्य घेऊन रवाना ते झाले. याचा उल्लेख कारवारकर इंग्रजांच्या ३० जुलै १६८२ च्या पत्रातून मिळतो. 'मोगली सैन्य येताच त्यास तोंड देण्यासाठी संभाजीचा सेनापती हंबीरराव १८००० हशमां निशी चालूनगेला. परंतु त्यास लवकरच दोन हजार लोक मारले गेल्याने परत सातात्यास आश्रयार्थ जावे लागले.'[४१] परंतु सेनापती हंबीररावांची एवढी मोठी हानी झालीच नव्हती. इंग्रजांनी सैन्य संख्या चु किची दिलेली असून हंबीररावांकडे २० हजाराची फौज होती. त्यांच्या ह्याती पर्यंत त्यांच्या जवळ असलेल्या सैनिकांची (दोन हजार ठार झाल्याची) एवढी मोठी हानीच झालेली नाही. इंग्रजांना त्यांच्याकडे असलेल्या संख्येची आकडेवारी सांगता आलेली नाही. कारण डॉ.कमल गोखले यांनी त्यांच्या 'शिवपुत्र संभाजी' ग्रंथात पान नं. २८८ मध्ये हंबीररावाजवळ १५००० हजार घोडदळ व ५००० हजार पायदळ असल्याचे नमूद केले आहे.

इ.स.१६८२ च्या सुरुवातीला मोगलांनी शिवापूर व मलकापूर लूटले होते. त्या सैन्यांचा प्रतिकार करण्यासाठी हंबीरराव गेलेले असावेत. तेथील शत्रू सैन्यांचा प्रतिकार करुन ते साताऱ्यास जाऊन थांबले असावेत. आपल्या सैन्याची हानी झाली म्हणून ते साताऱ्याला थांबले असे म्हणने चुक आहे. सेनापती हंबीरराव चाल करुन त्यांच्या सैन्याच्या पिछाडीवर येत असल्याची बातमी शहाजादा आज्जमला हेरांच्या माध्यमातून कळाली होती. तेंव्हा शहाजादा अज्जम याने कुलीजखान, हसन अलीखान, राव अनुपसिंग, अनिरुद्धासिंग हाडा, सरफराजखान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन आपल्या सैन्याच्या उजव्या व डाव्या बाजुला तैनातकेले ०   ा तो स्वतः हंबीररावांशी लढाई करण्यासाठी निघाला थोड्याच अंतरावर दोन्ही सैन्याची गाठ पडली. सुमारे १५ डिसेंबर १६८२ रोजी घनघोर लढाई झाली. या लढाईचा वृत्तांत मोगल दरबारच्या अखबारातून समज   ातो. शहाजादा

पन्हाळ्याच्या अलीकडे सहा कोसावर पोहंचला तेंव्हा हेरांनी बातमी आणली की, शत्रुच्या हंबीरराव वगैरे वीस हजार फौजेपैकी ५००० हजार स्वारांनी डेऱ्याच्या पिछाडीवर तुटून पडण्याचा बेत ठरविला. म्हणून शहाजाद्याने फिरुझखान व राव अनुपसिंग वगैरेना फौजेसह डेऱ्याच्या पिच्छाडीस ठेविले. त्याने स्वतः शत्रूस तंबी देण्यासाठी फौजेसह स्वारी केली. शत्रू लढाईसाठी समोर आल्यावर लढाई झाली. व बादशाही सुदैवाने अनेकांना मारुन व जखमी करुन त्यांचा पराजय केला. बहुतेक बादशाही लोक कामास आले व जखमी झाले. फिरुझखानाने आपल्या मुलासह कष्ट केले. व ते जखमी झाले. कुलीचखान वगैरे बादशाही लोकांनी देखिल अत्यंत कष्ट केले. ऐकूण बादशहा गप्प बसला.'[४२]

या लढाईच्या संदर्भामध्ये मोगल सम्राट औरंगजेबाच्या दरबारचे अखबार मध्ये शहाजादा आज्जमने औरंगजेबाला अर्ज केला होता आणि त्यात लिहिले होते की, [४३] 'संभाचे हंबीरराव वगैरे नोकर १५००० हजार स्वारासह लढाईसाठी आले होते म्हणून मी कुलीचखान, हसनअलीखान, राव अनुपसिंग, अनिरुद्धसिंग हाडा व सराफराझखान हरावलीस आणि उजव्या डाव्या बाजूस नेमून स्वारी केली. शत्रुशी ढाल तलवार, खंजीर वगैरे हत्यारांनी लढाई केली. बादशाही सुदैवाने शत्रुच्या आठशे लोकांना मारले व जखमी केले आणि सातशे लोकांना जिवंत पकडले. त्यांची छत्री, निशाण, बंदुका वगैरे हत्यारे हाती आली. तसेच बहुतेक बादशाही लोक कामास आले व जखमी झाले. कुलीचखान बंदुकीची जखम झाला. मोठा निजय प्राप्त झाला. बादशाही लोकांनी अत्यंत कष्ट घेतले त्याचा तपशील दिला आहे.' हा अर्ज औरंगजेबाने पाहिल्यावर शहाजादा शहाआलम याला तो पहावयास दिला.कारण शहाजादा आज्जम याने सेनापती हंबीररावांशी केलेल्या लढाई संदर्भात दोनदा हकीकत कळविली आहे. पहिल्या अर्जात सेनापती हंबीररावांचा पराभव केला असे सांगून अतिशय त्यास कष्ट केले असे सांगितले, तर दुसऱ्या अर्जात सेनापती हंबीररावांच्या आठशे लोकांना मारले कित्येकांना जखमी केले आणि सातशे लोकांना कैद करुन त्यांच्याकडील युद्धसाहित्य मिळविले आणि त्यांचा पराभव झाला. असे सांगितले होते. पण त्याच्याविषयी औरंगजेबाला खात्री नव्हती.

सेनापती हंबीरराव यांच्या बरोबर आज्जमने लढाई केली असेल मात्र आज्जमने केलेल्या पराक्रमाबद्दल औरंगजेबाला संशय होता. त्यामुळे तो गप्प बसला. एका मुलाच्या कृर्तृत्वाची वार्ता दुसऱ्या मुलाला सांगण्याचे कारण असे की, शहाआलम हा सुद्धा पराक्रमशून्य व्यक्ती होता. तसेच कोणत्याही मुलांवर त्याचा विश्वास राहिलेला नव्हता. या वरुन झालेल्या लढाईत सेनापती हंबीररावांचा विजय झाला हे स्पष्ट होते.

इ.स.१६८२ या वर्षामध्ये सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोगलां विरुद्धच्या प्रत्येक आघाड्यावर विजय मिळविलेला होता. तसेच कोकणात उतरलेल्या हसनअलीखानाच्या मोगल फौजेला छत्रपती संभाजी राजांनी पराभूतकेलेले होते. रामसेजच्या वेढ्यावर सेनापती हंबीररावांनी बाहेरुन हल्लेकेल्यामुळे शहाबुद्दीन खानाला औरंगजेबाने वेढ्यातून परत बोलावले होते. स्वराज्याच्या दक्षिण प्रदेशावर पाठविलेल्या शहाजादा आज्जमच्या सैन्याचा पराभव सेनापती हंबीररावांनी केलेला होता. औरंगजेबाला कोणत्याही आघाडीवर मोगली सैन्याला विजय मिळला. असी बातमी कदापिही त्यांच्या कानावर आलेली नव्हती. उलट मराठ्याचे सेनापती हंबीरराव मोहिते व त्यांच्या नेतृत्वाखालील सैन्य मोगलाशी किती जोमाने व मोठ्या आवेशाने लढत होते. हे औरंगजेबाच्या मनस्थितीवरुन समजते.

यानंतर पुन्हा शहाजादा आज्जमच्या कारवायांकडे लक्ष ठेऊन इतर आघाड्या सांभाळत सांभाळत मराठा सैन्याला रसद पाठवून युद्धाचे डावपेच सेनापती हंबीरराव खेळत होते. १८ जानेवारी १६८३ च्या सुमारास शहाजादा आज्जम कोल्हापूरच्या बाजुला गेल्याची बातमी त्यांना समजली. त्यांनी आज्जमच्या सैन्याचा पाठलाग केला. हा पाठलाग जवळपाव महिनाभर सुरु होता. दुर्देवाने या लढाई संबंधी मोगली दरबारच्या अख्शबारमध्ये काहिही माहिती उपलब्ध नाही. पण जेधे शकावलीमध्ये या लढाईची माहिती मिळते. 'माघ मासी सुलतान अजमशहा येऊन कोल्हापुरा पावेतो धाविला त्यास हंबीरराव यांनी फिराऊन भवरेकडे घालाविले.' [४४] शेवटी सेनापती हंबीररावांनी शहाजादा आज्जमला भीमानदीपलीकडे पिटाळून लावले. एकंदरीत मोगल सम्राट औरंगजेबाने मराठ्यांचे स्वराज्य जिंकण्यासाठी ज्या तिन आघाड्या करुन स्वराज्याच्या दक्षिणेकडे

शहाजादा आज्जमला ज्या उद्देशाने पाठविले होते. त्यामध्ये सेनापती हंबीररावांनी यश मिळू दिले नव्हते. उलट मोगली सैन्याचा कोल्हापूरच्या परिसरात झालेल्या लढाईत दारुन पराभव केला आणि शहाजादा आज्जमचा पाठलाग करुन त्याची मोठी हानीच घडवून आनली होती. शेवटी झालेल्या संघर्षात आज्जम पराभूत झाला. आणि त्याला दक्षिणेतून पळ काढावा लागला हे केवळ सेनापती हंबीररावांच्या पराक्रमाचे व स्वामिनिष्ठेचे फलित होते. केवळ लढायामध्ये विजयच मिळाला असे नसून मोगली सैन्यामध्ये हंबीररावांविषयी दहशतीचे वातावरण तयार करण्यात ते यशस्वी झाले होते. त्यामुळे मोगली सैन्याला कोल्हापूरच्या परिसरातून पळून जावे लागले.

## ३) सेनापतीची कल्याण-भिवंडीच्या परिसरातील लढाई

मोगल सम्राट औरंगजेबाने इ.स.१६८२ च्या काळात कोकणात रणमस्तनखान ऊर्फ बहादूरखान या सेनानींच्या नेतृत्वाखाली सैन्य रवाना केले होते. यापूर्वी हसनअलीखान ही सैन्य घेऊन गेलेला होता. पण छत्रपती संभाजी राजांनी त्याला पिटाळून लावले होते. यावेळी छत्रपती संभाजी राजांनीखानाशी लढा देण्यासाठी जेधे शकावली प्रमाणे नोव्हेंबर -डिसेंबर १६८२ मध्ये 'रुपाली भोसले व केसोपंत व निलोजीपंत पेशवे रवाना केले.' [४५] आणि मोगल-मराठे यांच्यात लढाई झाली.

पन्हाळा कोल्हापूरच्या परिसरातून शहाजादा आज्जमला पिटाळून लावल्यानंतर सेनापती हंबीरराव कोकणातील कल्याण-भिवंडीच्या परिसरात मोगलाचा प्रतिकार करण्यासाठी गेले होते. या बाबतची माहिती मोगल दरबारच्या अखबारमधून प्राप्त होते. [४६] संभाजीचा नोकर हंबीरराव जमेतीसह आला. म्हणून मी चालू महिण्याच्या १० तारखेस कल्याण-भिवंडी येथून स्वारीकरुन शत्रुच्या लोकांशी सामना दिला. लढाई झाली. शत्रुचे अनेक लोक मारले गेले व हंबीरराव बाण लागून जखम झाली. तसेच त्याच्या बायकोचा भाऊ व इतर तीन सरदार मारले गेले. त्यांचा पराजय झाला. आम्ही कांही कोस पाठलाग केला. तसेच बादशाही लोक कामास आले व जखमी झाले. बादशहाने खास मनन केले.' सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोगलाशी केलेल्या लढाईची वार्ता

ऐकताच औरंगजेबाने आपले डोळे लाऊन घेतले आणि काही वेळ कोणासही न बोलता गप्प नसून विचारमग्न झालेला होता.

कल्याण-भिवंडी परिसरामध्ये सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोगलाशी कसा लढा दिला. या बाबतची माहिती मराठी साधनामध्ये प्राप्त होते. 'मार्च १६८३ मध्येकल्याणजवळ टिटवाळा येथे हंबीरराव व रुपाजी भोसले या दोघांनी मोगलांच्या रुहुल्लाखान व बहादूरखान या सेनानिशी ३० हजार फौजेनिशी जंगी लढाई झाली.'[४७] तर मल्हार रामराव चिटणीस आपल्या बखरीमध्ये येथील लढ्याचे वर्णन करतो.[४८] 'रणमस्तखान कल्याण प्रांती येऊन उपद्रव केला. हे वर्तमान महाराजास कळाल्यावरी रायगडाहून निघोन फौजेसुद्धा कल्याणास गेले. रणमस्तखान याशी युद्ध देऊन रसदबंदी (करुन) व कही मारुन जेर केले असता याकुदखान जंजिऱ्याहून कुमकेस गेले. त्यांनी जहाजातून उतरुन मधीमोरचे देऊन रणमस्तखान यास रसद पोंचवणे वगैरे पुरावा केला. तो घाटावर रोहिलाखान होते त्यास कळलियावरी तेही कुमकेस येऊन रणमस्तखान यास निभावून घेऊन घाट चढून गेले. महाराज माघारे रायगडास गेले.' चिटणीसांनी कल्याण प्रांतात छत्रपती राजांचा संबध दर्शवितात आणि मराठे मोगलाशी लढण्याचे सांगतात. मात्र मोगल दरबारच्या अखबारात येथील लढाईचे विस्तृत वर्णन केलेले आहे. मोगल सरदार रुहुल्लाखान बादशहाला लढाईबाबत सांगतो.[४९] 'संभाचा सरदार हंबीरराव २० हजार स्वार व १० हजार पायदळ यासह कल्याण -भिवंडीच्या जवळ आला होता. म्हणून पद्मसिंग वगैरे पिच्छाडीच्या लोकांनी लढाई करुन बादशाही सुदैवाने शत्रुचे दोन सरदार व २०० लोक मारले. हंबीरराव जखमी होऊन पळाला पद्मसिंग हा १५०० जात व १००० स्वार असा मनसबदार होता. त्यास ३५ जखमा झाल्या. भगवंतसिंग वल्लद मानकोजी दखनी हा ५०० जात व ४०० स्वार असा मनसबदार होता. तो कामास आला. रामसिंग वलद रतन राठोड, १५०० जात व १३०० स्वार हा आजारी होता. त्याने पद्मसिंगाच्या मृत्यूनंतर चिलखत घालून शत्रुस तंबी देण्यासाठी स्वारी करण्याची इच्छा प्रकट केली. पण तो अशक्त होता तो उष्णते (तापा) मुळे मरण पावला. हरिसींग वलदपुरनमल बुंदेला जखमी होऊन लढाईच्या मैदानावर पडला होता.

शत्रुच्या लोकांनी त्यास नेले. रघुनाथसिंग वलद पद्मसिंग, भानगढचा जमीनदार काबुलीसिंग, माधोराम सिसादिया व तुकोजी वगैरे बादशाही लोक जखमी झाले.'

एकंदरीत सेनापती हंबीरराव मोहितेच्या नेतृत्वाखालील मराठा सैनिकांनी कल्याण-भिवंडी परिसरात लढाई करुन मोगलांचा पराभव केलेला होता. हंबीरराव व पद्मसिंग होडा यांच्यात घनघोर लढाई झाल्याने पद्मसिंगचा मृत्यू झाल्याने मोगली सैन्याने या मोगली प्रदेशातून काढता पाय घेतला. शेवटी औरंगजेबाने आपल्या फौजांना परत बोलावले.

## १०) सेनापतींच्या कृर्तृत्ववामुळे मोगलांच्या पढरी निराशा

मोगल सम्राट औरंगजेबाने ज्या उद्देशाने दक्षिण मोहिम हाती घेऊन नामांकित सेनानी, प्रचंड युद्धसाहित्य, मुबलक संपतीच्या जोरावर हिंदवी स्वराज्याला चोहो बाजुने खिंडीत पकडून मराठ्यांचे राज्य नष्टकरण्यासाठी प्रयत्न चालू केले होते. छत्रपती संभाजी महाराज व सेनापती हंबीरराव मोहिते मोगलाचा प्रतिकार करण्यासाठी शिवतंत्राचा वापर करुन मराठा सैन्याच्या तुकड्या करुन मोगलांच्या आघाड्यावर हल्ले करत होते. गोव्याचे पोर्तूगीज, जंजिऱ्याचे सिद्दीच्या विरुद्ध संभाजी राजांनी मोहिमा काढून त्यांना पराभूत केले होते. तर हंग्रजांनी तटस्थतेची भूमिका घेतलेली होती.

मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नेतृत्वाखालील सैन्याने मोगली सैन्यावर हल्ले करुन त्यांना मेटाकुटीस आनले होते. गनिमांच्या शहाबुद्दीनखानाने स्वराज्यातील रामसेज किल्ल्याला प्रचंड सैन्यानिशी वेढा दिला असताना हंबीररावानी त्यांच्यावर बाहेरुन हल्ले केल्यामुळे शहाबुद्दीनला आपला वेढा उठवावा लागला होता. स्वराज्याच्या दक्षिण प्रदेशातील कोल्हापूर - पन्हाळ्याच्या परिसरामध्ये शहाजादा आज्जम आपल्या सैन्यासह चालून आला असता सेनापती हंबीररावांनी त्याच्याशी निकराची लढाई करुन त्या प्रदेशातून पिटाळून लावले होते.कोकणच्या कल्याण-भिवंडी प्रदेशात रुहुल्लाखान व बहादूरखान ३० हजार सैन्यासह चालून आले असता सेनापती हंबीररावांनी १० हजार सैन्य घेऊन त्यांच्याशी घनघोर लढाईकरुन त्यांना पराभूत केल्याने सम्राट औरंगजेबाने त्यांना परत बोलावून घेतले होते. इ.स.१६८२-८३ च्या काळात मोगल-मराठा

संघर्षात मोगलांना प्रत्येक ठिकाणी पराभव स्विकारावा लागल्याने सम्राट औरंगजेब हताश झालेला होता. त्यांना मोगली सैन्याच्या आघाड्यांना व सेनानिना परत एप्रिल १६८३ पर्यंत बोलावून घ्यावे.

रामसेजचा किल्ला जिंकून घेण्यासाठी तीन-चार सेनानी प्रचंड सैन्य देऊन पाठवून देखील त्यांना रामसेजचा किल्ला जिंकून घेता न आल्याने औरंगजेब संतात झालेला होता. ३० जुलै १६८२ च्या कारखारकर इंग्रजांच्या पत्रात या बाबतची माहिती मिळते. 'औरंगजेब संभाजी राजाबद्दल इतका चिडला आहे की, त्याने आपल्या डोक्याची पाडी खाली ठेऊन अशी शपथ घेतली की, त्याला मारण्याखेरीज किंवा त्याला राज्यातून हाकलून लावल्याखेरीज पगडी डोक्यावर ठेवणार नाही.'[५०] सम्राट औरंगजेबाला जवळपास दिडवर्ष होत आलेले असताना, प्रचंड सैन्य, युद्धसाहित्य व भरमसाठ संपत्तीखर्च करुन देखील मोगलांना हिंदवी स्वराज्य संपविण्यात अपयश आल्याने औरंगजेब हताश झालेला होता. त्याची मत:स्थिती ढासाळलेली होती. १९ जून १६८३ च्या सुरतकर इंग्रज लिहीतात, 'मोगल बादशहा औरंगजेब औरंगाबादेतून हलला नाही. परंतु दाट शक्यता आहे की, तो परत दिल्लीस जाण्याच्या विचारात असून सुलतान अकबर व संभाजीराजे यांच्या बरोबरील लढाईची सुत्रे आपल्या उमरावांच्या हाती सोपविणार आहे. तो अतिशय चिडखोर झाला आहे. त्याच्या मनाची आस्थिरता सारखी वाढत आहे. त्यामुळे त्याचे उमराव फार नाराज झालेले आहेत.'[५१]

यावरुन सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोगलांचे हल्ले व डावपेच हाणून पाडल्याने आणि मोगली सैन्यात दहशत बसविल्याने औरंगजेबाला काय करावे व काय केल्याने मराठे पराभूत होतील. अशा मनास्थिती पर्यंत जावून तो पूर्णपणे हताश झालेला होता. तिनही मुलांना व मोगल सेनांनीना परत बोलावून सर्वांना तो वाटेल तो बोलू लागला. त्यामुळे तेही नाराज झालेले होते.

सेनापती हंबीररावांचे सैन्य मोगलांशी चिवटपणे लढत होते. त्याच्या प्रदेशात हल्ले करुन ते प्रदेश लुटीत होते. शेवटच्या श्वासापर्यंत मराठे लढत होते हे सर्व सेनापती हंबीरराव मोहिते

यांच्यामुळेच घडत होते. इ.स.१६८२-८४ सालातील मो लांचे हल्ले मराठ्यांनी यशस्विरित्या परतावून लावलेले होते.

## ११) सारांश :

छत्रपती शिवरायांचे ३ एप्रिल १६८० रोजीगडावर निधन झाल्याने संपूर्ण हिंदवी स्वराज्यावर दु:खाचे सावट पसरले आणि स्वराज्यात अंतर्गत व बाह्य समस्यांची मालीला सुरु झालेली होती. यातून स्वराज्य नष्ट होतेकी काय अशी अवस्था निर्माण झालेली होती. अष्टप्रधान प्रधान मंडळातील बंडखोरांनी 'छत्रपती' पदाबाबतचा वाद निर्मा ण केलेला होता. तर उत्तरेतील मोगल सर्व सामर्थ्यानिशी स्वराज्यावर चालून येत असल्याच्या बातम्या आलेल्या होत्या. प्रधान या दोन्ही समस्या मंडळातील एकनिष्ठ असलेल्या सेनापती हंबीररांनी सोडविण्याचे प्रयत्न केले. छत्रपती पदावर संभाजी राजांना बसवून मोगलांचे स्वराज्यावरील हल्ले परतावून लावण्यासाठी सेनापतींनी प्रयत्न सुरु केले. स्वराज्याच्या सिमा सुरक्षित ठेवण्यासाठी व त्याचे रक्षण करण्यासाठी म्हणून सेनापतींनी मोगलांचे बुऱ्हाणपूर सारखे ऐतिहासीक शहर लुटले. औरंगाबाद शहर व परीसरात लुटालूटकरुन दहशत बसविली. नळदुर्ग किल्ल्यावर हल्ले केले. हे हल्ले विद्यूतगती प्रमाणे केलेले होते. या मोगली प्रदेशातून प्रचंड संपत्ती त्यांनी गोळा केलेली होती. याचा उपयोग औरंगजेबाच्या विरोधात करण्यासाठी म्हणून त्यांनी हल्ले केले होते.

मोगल सम्राट औरंगजेब दक्षिणेतील बुऱ्हाणपूर व औरंगाबाद या ठिकाणी आपल्या सैन्यांचा तळ देऊन स्वराज्यावर वर्चस्व मिळविण्यासाठी युद्ध आघाड्या सुरु केलेल्या होत्या. सेनापती हंबीररावांनी आपल्या सैन्याच्या लहान लहान तुकड्या तयार करुन सिमेवर तैनात करुन ठेवलेल्या होत्या. सिमेवरील किल्ल्यावर प्रचंड दारुगोळा जमा करुन ठेवल्याने मराठा सैनिकांना मोगल सैनिकाशी लढता आले. औरंगजेबाने स्वराज्याच्या उत्तर सिमेवरील समसेज सारखा किल्ला जिंकून घेण्यासाठी अनेक मोगल सेनानी प्रचंड सैन्यानिशी पाठविले होते. सेनापती हंबीररावांनी रामसेजच्या

मोगली वेढ्यावर बाहेरुन हल्ले करुन त्यांना तेथून परत जाण्यास भाग पाडले. शहाबुद्दीनला पराभूत केले होते. मोगलांच्या प्रत्येक आघाड्यावर लक्ष ठेऊन आपले सैनीक ते रवाना करुन प्रसंगी त्यांच्याशी लढत होते.कुलीचखानाला पराभूत केले. शहाजादा आज्जमची त्यांनी दारुन पराभव केलेला होता. कल्याण-भिवंडी येथे मोगल सैन्याला पराभूत केलेले होते. या सर्व आघाड्यावर विजयच मिळविला असे नसून मोगली सैन्यात त्यांनी दहशत निर्माण केलेली होती. सेनापतीच्या आक्रमक लढायापुढे मोगल सेनानी पराभूत होऊ लागले. त्यामुळे औरंगजेबाला आपल्या लष्करी धोरणात बदल करावे लागले. आपल्या सर्व सेनानींना त्यांना परत बोलावून घेतले होते हे केवळ सेनापती हंबीररावांच्या कर्तृत्वत्वामुळे शक्य झाले होते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) बेन्द्रे वा.सी. - 'छत्रपती संभाजी महाराज', मुंबई, मनोरमाप्रकाशन, तृतीयावृत्ती मार्च २००१, पृ.२७४.

२) गोखले कमल - 'शिवपूत्र संभाजी' पुणे, कॉन्टिनेन्टल प्रका शन, आवृत्ती चौथी, २००१, पृ.२१७.

३) कुलकर्णी अ.रा. - 'जेधे शकावली-करीना', पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७, पृ.१०१.

४) बेंद्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२८१, २८२.

५) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त पृ.क्र.१०३.

६) बेंद्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२८२.

७) बेंद्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२८२.

८) पुराणिक श.श्री. - 'मराठ्यांचे स्वातंत्र्य समर' (पूर्वार्ध), पुणे, काळ प्रकाशन, आवृत्ती प्रथम, जून १९८१, पृ.क्र.७३.

९) पुराणिक श.श्री - पूर्वोक्त पृ.क्र.७५.

१०) शिवदे सराशिव - 'ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा', पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००८, पृ.क्र.११०.

११) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.१११.

१२) गोखले कमल - पूर्वोक्त पृ.क्र.२३७, २३९.

१३) खरे ग.ह., कुलकर्णी गो.त्र्य. - ऐतिहासिक फार्सी साहित्य सहावा खंड, औरंगजेबाच्या दरबारचे अखबार, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९७३, पृ.क्र.१०३.

१४) गोखले कमल - पूर्वोक्त पृ.क्र.२३९.

१५) पगडी सेतुमाधवराव - 'हिंदवी स्वराज्य आणि मोगल' पुणे, व्हिनस प्रकाशन, फेब्रु.१९६६, आवृत्ती पहिली, पृ.क्र.२१.

१६) गोखले कमल - पूर्वोक्त पृ.क्र.२४६.

१७) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.११५.

१८) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.११४.

१९) शिवदे सदाशिव - 'सेनापती हंबीरराव मोहिते' पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टो.२००७, पृ.क्र.७८.

२०) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.११०.

२१) देशमुख विजय (संपा) - 'शिवविजय' रौप्य मोहत्सव कार्य गौरव समिती, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९२, पृ.क्र.२८.

२२) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.१४१.

२३) पगडी सेतूमाधवराव - पूर्वोक्त पृ.क्र.२५.

२४) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.१४३.

२५) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त पृ.क्र.१०७.

२६) पगडी सेतूमाधवराव - पूर्वोक्त पृ.क्र.२७.

२७) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त पृ.क्र.१०७.

२८) पगडी सेतूमाधवराव - पूर्वोक्त पृ.क्र.२६.

२९) हेरवाडकर र.वि. - 'मल्हार रामराव चिटणीस -विरचित' श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले रराजाराम महाराज यांची चरित्र, पुणे, व्हिनस प्रकाशन, ऑगस्ट १९७२, पृ.६.

३०) बेन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२८३.

३१) बेन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त, पृ.क्र.२८६.

३२) पाटील विश्वास - 'संभाजी' पुणे, मेहता पब्लिसिंग हाऊस, आवृत्ती आठवी, जून २०११, पृ.क्र.४४०.

३३) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त पृ.क्र.१११.

३४) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.१६९, १७०.

३५) पगडी सेतूमाधवराव - पूर्वोक्त पृ.क्र.३४.

३६) पगडी सेतूमाधवराव - पूर्वोक्त पृ.क्र.३४.

३७) गोखले कमल - पूर्वोक्त पृ.क्र.२२६.

३८) बेन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२८९, २९०.

३९) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.२०७.

४०) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.२०९.

४१) बेन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२९१.

४२) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.२३९, २४०.

४३) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.२४३.

४४) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त पृ.क्र.१११, ११३.

४५) कुलकर्णी अ.रा. - पूर्वोक्त पृ.क्र.१११, ११३.

४६) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.२७९.

४७) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त, पृ.क्र.३२.

४८) हेरवाडकर र.चि. - पूर्वोक्त पृ.क्र.१७.

४९) खरे ग.ह., कुलकणी गो.त्र्य. - पूर्वोक्त पृ.क्र.२९३.

५०) बेन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२९२.

५१) बेन्द्रे वा.सी. - पूर्वोक्त पृ.क्र.२९७.

# प्रकरण सहावे

# औरंगजेबाचे बदलते धोरण व सेनापती हंबीररावांच्या आक्रमक लढाया

## १) प्रास्तावना :

छत्रपती संभाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी आलेल्या औरंगजेबाला दक्षिणेत येऊन दीड वर्ष झालेली होती. सुरुवातिला त्याने स्वराज्याच्या चोहो बाजुंनी एकाच वेळी आक्रमक हालचाली सुरु केलेल्या होत्या. मोगलांच्या आक्रमणाचा यशस्वी सामना करण्यासाठी छत्रपती संभाजी राजे आणि मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते यांनी तयारीकेलेली होती. पहिल्याच सपाट्यात मराठ्यांचे स्वराज्य जिंकण्यासाठी औरंगजेबाने मोहिमेची सर्वसुत्रे आपल्या हाती घऊन शहाजादा आज्जम, शहाजादा मुअज्जम, शहाजादा कामबक्ष, साम्राज्याचा वजीर आसद खान, दक्षिणेचा सुभेदार खानजहान बहादूरखान, हसनअलीखान, शहाबुद्दीन,ाान, रुहुल्लाखान इत्यादी सेनांनिच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन मराठ्यांचे किल्ले जिंकूण घेण्यासाठी पाठविले होते. सोबत प्रचंड युद्ध साहित्य, भरपूर पैसा इत्यादी दिलेला होते. सैन्याला कसल्याही प्रकारची कमतरता भासणार नाही याची पुरेपूर काळजी घेतलेली होती. मोगली सैन्याची दहशत बसवने, लालूच दाखविने, प्रचंड सैन्यानिशी चढाई करणे या धोरणाचा अवलंब करण्याचे आदेश दिलेले होते.

मोगल संकटाचा सामना करण्यासाठी म्हणून छत्रपती संभाजी राजांनी राजकीय डावपेच आखले तर सेनापती हंबीररावांनी गणिमिकावा युद्ध पद्धती विषयक धोरण उपयोगात आणून आपल्या सैन्याचे लहान-लहान सैन्य तुकड्या तयार केलेल्या होत्या. छत्रपती संभाजी राजांनी मोगलांचे मांडलिक सरदार जिंजीऱ्याच्या सिद्दीवर जरब बसावी व भविष्यात स्वराज्यावर हल्ले करु नयेत म्हणून स्वतःच्या नेतृत्वाखाली सैन्य घेऊन त्याच्याशी युद्ध चालू केले होते. तर पोर्तूगिजांनी मोगलांना सहकार्य करु नये यासाठी म्हणून त्यांच्या दंडराजपुरीला स्वतः वेढा दिलेला होता. इंग्रजांनी अलिप्तता स्विकारलेली होती. कोकणात उतरलेल्या मोगली सरदार हसनअलीचा बिमोड करण्यासाठी मराठे चालून गेल्याने तेथून त्याला माघार घ्यावा लागली होती. सेनापती हंबीररावांनी

स्वराज्याच्या उत्तर व दक्षिण प्रदेशाची बाजू सांभाळत मोगलाच्या प्रदेशात हल्ले करुन त्यांचे प्रदेश लुटने, अचानक मोगली सैन्यावर हल्ला करणे, प्रसंग पाहून माघार घेणे व रात्रिच्या वेळी छापे घालणे इत्यादी शिवतंत्राचा वापर केल्याने औरंगजेबाच्या सैन्याचा प्रत्येक आघाड्यावर पराभव झालेला होता. हेराच्या माध्यमातून रणांगनातल्या बातम्या दररोज समजत असल्याने तो आपल्या सेनांनिवर संतप्त होऊ लागला.

'मराठ्यां विरुद्ध यश मिळत नाही असे दिसताच औरंगजेबाने आपला पवित्रा बदलला. मराठी राज्यावरील आपले आक्रमन धोरण बदलून त्याने आपल्या अधिकाऱ्यांना अनेक ठिकाणचे वेढे उठविण्यास सांगितले आणि आपली छावणी अहमदनगर येथे हलवली.[१]' छत्रपती संभाजी राजांनी मोगलांचा प्रतिकार करत दक्षिणेतील विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याच्या कुतूबशाहिशी मैत्रीचा तह करुन मोगलांशी संयुक्तपणे तोंड देण्याची तयारी केलेली होती. सम्राट औरंगजेबाने संभाजी राजाला सहकार्य करणाऱ्याचा आदिलशाही व कुतूबशाही सुत्रांना जिंकूण घेण्यासाठी इ.स.१६८५ मध्ये आपले सैन्य रवाना केले. तर हिंदवी स्वराज्याच्या सरहद्दीवरील दळवी व देसाई यांना आपल्याकडे वश करुन घेण्यासाठी प्रयत्न सुरु केले. पुन्हा स्वराज्यावर नव्या दमाने चालून जाण्यासाठी शहाजादांना व सरदारांना बक्षिसे जाहीर करुन मूबलक रसद देऊन सैन्य रवाना केले. इ.स.१६८४ च्या सुरुवातिला मामूरखान याने सुपे, बारामती आणि इंदापूर या ठिकाणी आपल्या सैन्याची छावणी करुन स्वराज्यावर हल्ले सुरु केले. १३ फेब्रुवारी १६८४ रोजी शहाजादा आज्जम व त्यांचा मुलाा बेदारबख्त यांना ससैन्य पेडगाव जवळील बहादूरगडाकडे रवाना केले. ३१ मार्च १६८४ रोजी सरदार शहाबुद्दीनखान याला पुणे आणि करडे निमोणे या प्रदेशात सैन्य देऊन पाठविले. लवकरच यांच्या नेमणुकीत बदल करुन स्वराज्याची राजधानी 'रायगड' जिंकूण घेण्यासाठी औरंगजेबाने आपले धोरण बदलले.

## २) सेनापती हंबीररावांची दुसऱ्यांदा शहाबुद्दीनखाना (गाजिउद्दीन) शी लढाई (सप्टेंबर १६८४)

औरंगजेबाच्या बदलत्या धोरणानुसार हिंदवी स्वराज्याची राजधानी रायगड ही जिंकूण घेण्यासाठी शहाबुद्दीनखान ऊर्फ गाजिउद्दीन नावाच्या मातब्बर सेनांनिच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन रवाना केले होते.कारण औरंगजेबाला गुप्त हेरांच्या करवी छत्रपती संभाजी राजे रायगडावर असल्याची माहिती मिळालेली होती. तसेच त्याच्या या धोरणानुसार स्वत:ची वतने वाचविण्यासाठी अनेक विश्वासू मराठे मोगलांना जाऊन मिळालेली होती. रायगडासह छत्रपती संभाजीला पकडता येईल या हेतुने त्याने शहाबुद्दीनची नेमणूक केलेली होती. मराठ्यांचे सेनापती हंबीरराव दिवस -रात्र स्वराज्यावरती होत असलेले हल्ले परतावून लावत होते.कोणत्याही परिस्थितीमध्ये स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी सरहद्दिवरील किल्ल्याला रसद पूरवठा करणे, सैन्याची कूमक पाठविणे व मोगलांच्या प्रदेशातील गावे लूटून ती लूट छत्रपतीकडे पाठविणे. या कामात ते व्यस्त होते. छत्रपती राजधानी येथून स्वराज्यातील प्रत्येक घडामोडीवर बारीक लक्ष ठेऊन होते.

'२१ सप्टेंबर १६८४ रोजी शहाबुद्दीन ऊर्फ गाजिऊद्दीन यास बादशहा औरंगजेबाने रायगडाच्या मोहिमेवर रवाना केले.'[२] त्यानुसार शहाबुद्दीनखान प्रचंड सैन्यासह निघाला. बोरघाटातून तळकोकणात डिसेंबरमध्ये पोहचला. तेथून तो १० जानेवारी १६८५ च्या सुमारास राजधानी रायगडाच्या पायथ्याशी पोहचला. पायथ्याजवळील निजापूर सारखी तीन गावे जाळली. अनेक मराठा सैनिकांना मारुन टाकले. गावाच्या आसपासची नासधूस करुन शेतकऱ्याचे गुरे-ढोरे लूटली. छत्रपती संभाजी राजांना ही वार्ता समजताच त्यांनी सेनापती हंबीररावांच्या नेतृत्वाखाली १५००० हजार सैन्य देऊन शहाबुद्दीनला पिटाळून लावण्यासाठी रवाना केले. सोबत रुपाजी भोसले हा त्यांचा विश्वासू सेनानी होता. यावेळी खान रायगडाच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड या गावापासून केवळ ४ मैलावर होता. सेनापती व खान यांच्यात रामसेजच्या वेढा या प्रसंगी लढाई झाली होती. त्यावेळी सेनापतींची तळपती तलवार पाहिलेली होती. त्याला सडकून मार खावा

लागलेला होता. शेवटी पराभव स्वीकारुन वेढा उठवावा लागला होता. हंबीररावांना खान चालून आल्याचे दिसतानाच दोघामध्ये घनघोर लढाई झाली. पुन्हा खानाला तेथून पळून जावे लागले होते. मात्र या लढाईच्या संदर्भात मराठीकागदपत्रातून माहिती मिळत नाही केवळ मोगली अखबारातून माहिती उपलब्ध होते. ही माहिती प्रतिपक्षाकडील साधनातून असल्यामुळे खानाची बाजू त्यान ी मांडल्याचे दिसून येते.गाजीउद्दीनखान ऊर्फ शहाबुद्दीनखान सम्राट औरंगजेबाला झालेल्या लढाई बाबत लिहितो, 'मी मौजे पाचोरीवाडी, किल्ले राहिरी वगैरेवर हल्ले करुन त्या किल्ल्यांपासून दोन कोस अंतरावर डेरा दिला होता. तेंव्हा संभाने हंबीरराव व रुपा भोसले यांना पंधरा हजार फौजेसह पाठविले. बाण व बंदुका यांची लढाई झाली. आम्ही चारी बाजुंनी शत्रुंशी छोट्या हत्यारानी लढाई केल्यामुळे त्यास निभावने अशक्य होऊन त्याने पळ काढला. आम्ही सात कोसपर्यंत पाठलाग केला. त्याचे अनेक लोक मारले व जखमी केले आणि बादशाही फत्ते झाली.[३]' येथील विजयाची बातमी ऐकूण औरंगजेबाला आनंद झाला. त्याने लगेच शहाबुद्दीनखानाला 'फिरोजजंग' हा किताब बहाल केला. यावेळी मोगली सैन्यात दलपत बुंदेला, इंद्रजीत राठोड, शिरवळचा ठाणेदार नाहीरखान इत्यादी सेनानी होते. हे मोगली सैन्य राजधानी रायगडाच्या पायथ्याच्या परिसरात पसरले होते. मात्र रायगडावर हल्ला करण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. केवळ परिसरात लुटालूट, जाळपोळ करुन कोथळागडाकडे पळून गेले म्हणजे झालेल्या लढाईत शहाबुद्दीनचा विजय झाला असा त्याचा अर्थ होत नाही. यावरुन सेनापती हंबीररावांनी दुसऱ्यांदा शहाबुद्दीनला तळपती तलवार दाखविल्याने तेथून त्याला पळ काढावा लागला. तेंव्हा संभाजी राजांनी कवी कलश ाच्या नेतृत्वाखाली पुन्हा मराठा सैन्यखानावर पाठविले. त्यावेळी खानाला पळता भुई थोडी झाली असावी. कलशाने खानावर 'हल्ला चढवून त्यास तळकोकणातून हुसकावून घाटावर घातले.'[४] तेथील पुणे-शिरवळ-सातारा-वाईच्या प्रदेशात धुमाकूळ घालत होता. मोगल -मराठा हल्ले चालूच होते. २५ मे १६८५ च्या मोगल दरबारच्या अखबारात माहिती मिळते. शहाबुद्दीनखान[५] लिहीतो, 'हंबीरराव वगैरे सरदार, साताऱ्याच्या डोंगरात जमले होते. मी मुजाहिद वगैरेंना त्यांना तंबी देण्यासाठी नेमले. शत्रुपैकी अनेक जनांना ठार मारण्यात आले. शत्रुचा पराजय झाला. त्या ठिकाणी ठाणे बसविण्यात आले

आहे. यावर बादशहा म्हणाले सेवा मान्य झाली.' यानंतर मोगल दरबारच्या अखबारात हंबीररावां बाबत कसलिही माहिती मिळत नाही. नंतर 'छत्रपती संभाजी राजांनी सेनापती हंबीररावांना १३ सप्टेंबर १६८५ रोजी जुन्नरच्या प्रदेशात पाठविल्याचे समजते.'[६]

## ३) सेनापती हंबीररावांचे विजापूरची आदिलशाही वाचविण्याचे प्रयत्न

छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य हे मुलतः विजापूरच्या आदिलशाहीचे प्रदेश जिंकूनच निर्माण केलेले होते. त्यामुळे आदिलशाही व मराठे यांच्यात अनेकदा संघर्ष झालेले असून त्यात मराठे यशस्वी ठरलेले होते. भूवियात स्वराज्याचा विचार करुन शिवरायांनी दक्षिणेत असलेल्या आदिलशाही वकुतूबशाही राज्य ाशी मित्रत्वाचे संबंध निर्मा करुन उत्तरेतील मोगलांनपासून एकमेकांचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी सहकार्य करण्याविषयीचे करार केलेले होते.

पुढे छत्रपती संभाजी राजांनी शिवरायांच्या दक्षिणेतील र ाजकारणाचा वारसा चालू ठेवलेला होता. दक्षिणेत चालून आलेल्या औरंगजेबाने हिंदवी स्वराज्य जिंकूण घेण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करुनही फारसे यश येत नसल्याचे पाहून छत्रपती संभाजीराजांना दक्षिणेतील आदिलशाही व कुतूबशाही राज्य सहकार्य करीत असल्याच्या संशयावरुन औरंगजेबाने आपल्या बदलत्या धोरणानुसार दक्षिणेतील आदिलशाही प्रदेश जिंकूण घेण्याचे आदेश देण्यापूर्वी शहाजादा आज्जम याने इ.स.१६८३ मध्ये प्रयत्नकेलेले होते. स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांनी चालून आलेल्या आज्जमशी पन्हाळा-कोल्हापूर परिसरात लढाई करुन तेथून पिटाळून लावले होते. मोगलांचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्याने पुन्हा औरंगजेबाने आदिलशाहिची राजधानी विजापूरला वेढा घालण्याचे आदेश सैनिकांना दिलेले होते त्यानुसार '२७ मार्च १६८५ रोजी शहाजादा आज्जम व खानजहान बहादूर यांनी विजापूरला वेढा घातला.'[७] यावेळी औरंगजेब अहमदनगर येथे होता. विजापूरची आदिलशाही लवकर जिंकूण हिंदवी स्वराज्यावर सर्व शक्तिनिशी तुटून पडावे या करीता जलद हालचाली व्हाव्यात यासाठी आपणही जवळच गेले पाहिजे असा विचार करुन त्याने २५ मे

१६८५ रोजी सोलापूरगाठले आणि जवळपास एक वर्ष तो तेथेच थांबून आपल्या सैन्याच्या हालचाली पाहू लागला.

औरंगजेबाने आपले लक्ष विजापूर जिंकूण घेण्यासाठी केंद्रीत केल्याचे लक्षात येताच छत्रपती संभाजी राजांनी रायगडाहून आपला मुक्काम पन्हाळा येथे हलविला. मोगलांपासून विजापूरचे रक्षण करण्यासाठी 'छत्रपती संभाजी राजांनी आषाढ मासी कवी कलश यास सैन्य पाठविले.'[८] याच काळात म्हणजे 'फेब्रुवारी व मार्च १६८५ च्या सुमारास सातारा भागातील मोगली सैन्याशी मराठ्यांचे हल्ले होत होते. त्यांचे नेतृत्व हंबीररावांकडे होते. सातारच्या डोंगरात मराठ्यांचे सैन्य जमले असतागाजिउद्दीनखानाच्या सैन्यांबरोबर चकमक झाली. चंदन-वंदन या किल्ल्याजवळ त्यांच्याशी अमानुल्लाखानाने सामना केला. पंचवीस घोड्या, १५०० कैदी व जनावरे जखमी करुन २० बंदुका व २ निशाने, १ नगाऱ्याचे भांडे अशी लूट नेली.'[९] सेनापती हंबीररावांना छत्रपतींनी बोलावून घेतले. दोघांनी विजापूर बाबत चर्चा केली आणि विजापूर वाचविले पाहिजे असे समजून छत्रपती संभाजी राजांनी सेनापती हंबीररावांना विजापूर वाचविण्यासाठी ससैन्य पाठविले. सेनापती हंबीररावांच्या मोहिमेबाबतची माहिती 'बुसातिन-उस-सलातीन' या ग्रंथात फकीर महंमद झुबेरीने दिलेली असून ती डॉ.जयसिंगराव पवार[१०] यांनी 'शिव विजय' ग्रंथात दिलेली आहे. ती 'तारीख २३ तेविसावी माहे मोहरम सन १०९७ (१० डिसेंगर १६८५) रोजी हंबीरराव हा संभाजीचे फौज समागमे येऊन पोहचला. तारीख ३ तिसरी माहे सफर (१९ डिसेंबर १६८५) रोजी संभाजीची फौज मोगलाचे इलाख्यातील मुलूख लुटण्यावर रवाना झाली.' यावेळी शहाजादा आज्जमने विजापूरचा वेढा अधिक जोमाने सुरु केलेला होता. मोगलांची संपूर्ण सेना तुटून पडलेली होती. सेनापती हंबीररावांनी विजापूरला वेढा घालून बसलेल्या मोगली सैन्यावर ७-८ दिवस सतत बाहेरुन हल्ले चढविले होते. या दिवसात हंबीररावांनी मोगली सैन्याच्या हालचालिची माहिती मिळविली. स्वराज्याच्या उत्तरेतील प्रदेशात असलेल्या मोगली सेना यावेळी या वेढ्यात गुंतलेल्या होत्या. हंबीररावांनी युद्ध निती बदलली. आपण मोगलांच्या प्रदेशावर हल्ले केले तर या वेढ्यातील सेना

वेढा उठवून आपले प्रदेश वाचविण्यासाठी येईल. असा विचार करुन मोगली मुलूखात लुटालूट करण्यासाठी निघाले.

## ४) सेनापती वऱ्हाड, खानदेश व बागलाण प्रदेशात

यावेळी मराठ्यांचे सैन्य तीन आघाड्यावर लढत होते. स्वराज्यामध्ये घूसलेल्या मोगली सैन्याशी, विजापुरचा मोगली वेढा उठविण्यासाठी आणि मोगली प्रदेशात धुमाकूळ घालीत होते. विजापूर जिंकण्यासाठी औरंगजेब सोलापुरहून १४ जून १६८६ रोजी निघाला व ३ जूलैला तो विजापूरला पोहचला. लवकरच गाजिऊद्दीनखान मोठ्या सैन्यानिशी येऊन मिळालेला होता. आदिलशाहिचे मालोजी घोरपडे सारखे सरदार मोगलांचा मोठ्या कष्टाने प्रतिकार करत होते. छत्रपती संभाजी महाराज आणि सेनापती हंबीरराव यांनी वऱ्हाड, खानदेश-बागलाण या मोगलांच्या प्रदेशात जी मोहिमकाढली तिचा वृत्तांत औरंगजेबाचा चरित्रकार 'इश्वरदास नागर' याने दिलेला आहे हाच वृत्तांत 'छत्रपती संभाजी' स्मारक ग्रंथात सदानंद कदम यांनी पान नं.३५६ मध्ये याचा काळ इ.स.१६८१ डिसेंबर असा दिलेला आहे. मात्र हा काळ चुकिचा आहे. कारण या वृत्तांतामध्ये औरंगजेब विजापूरच्या वेढ्यात होता. पण सदानंद कदम यांच्यानुसार औरंगजेब हा १६८१ नोव्हेंबर मध्ये विजापुरला असल्याचे सांगितले आहे. यावेळी इ.स.१६८१ नोव्हेंबर पासून औरंगजेब बुऱ्हाणपुरास होता.

ईश्वरदास[११] लिहितो, 'बादशहा विजापुरास होता तेंव्हा त्याला वऱ्हाड, खानदेश आणि बागलाण या प्रांतातून पुढीलप्रमाणे बातम्या कळविण्यात आल्या संभाजी आणि हंबीरराव हे आपल्या सैन्यासहीत बादशाही मुलूखात पसरले. त्यांनी गावेच्या गावे उद् ध्वस्त केली. विशेषतः त्यांनी मुसलमानातील सय्यद, शेख, विद्वान मुल्लामौलवी यांची फारच दुर्दशा केली. पुष्कळ प्रतिष्ठित माणेस कोकणात जाऊन राहिली होती. त्याचा छळ करण्यात आला मोगल अधिकारी त्यांच्याशी (मराठ्यांशी) लढले, पण त्या पैकी कित्येकांना (मोगली अधिकाऱ्यांना) पकडण्यात आले. रस्ते बंदकरण्यात येऊन, अनेकांना कैद करुन त्यांना किल्ल्यात नेऊन छळण्यात आले.

सारांश मराठ्यांचा उच्छाद अतिशय झाला म्हणून त्यांचा मोड करण्यासाठी बादशहांनी विजापुराहून प्रयाण केले.' ही मोहिम जूलै ते ऑक्टोबर १६८६ च्या काळात काढलेली होती.

औरंगजेबाने विजापूर जिंकूण घेण्यासठी कसोसिने प्रयत्न चालू केलेले होते. रुहुल्लाखान, रणमस्तखान, शहाबुद्दीनखान, शहाजादा आज्जम व इतर मोगली सेनानीना बोलावून आणि स्वतः आपण तेथे थांबून किल्ल्याला वेढून व बाहेरुन येणारी रसद तोडून किल्ल्यावर तोफांचा भडिमार सुरु केलेला होता. विजापूरकडे मराठ्यांशिवाय दुसरा पर्यायही शिल्लक नव्हता. मराठे वेढ्यावर तुटून पडत होते. मोगली प्रदेशात स्वतः छत्रपती संभाजी राजे व सेनापती हंबीररावांनी वऱ्हाड, खानदेश, बागलानच्या प्रदेशात हल्ले सुरु करुन गावेच्या गावे लुटली जात होती. संभाजी राजे व सेनापतीना वाटत होतेकी, आपण मोगली प्रदेशात लुटालूट केल्यामुळे विजापूर कडील मोगली फौजा लूट थांबबियासाठी येतील. आणि विजापूरच्या किल्ल्यावर रसद पाठवता येईल. पुन्हा किल्ला लढवता ठेवता येईल. पण सेनापतींचे हे प्रयत्न यावेळी अयशस्वी झाल्याचे दिसून येतात. कारण औरंगजेबाने स्वराज्यात मोगली सैन्य, घूसवले होते. त्यांनी अनेक मराठी सरदार फोडल्याने मराठा सैन्यात संशयाचे वातावरन तयार झालेले होते. औरंगजेबाने वतनाची खैरातच सुरु केलेली होती. अनेक मराठा सरदारांना बढती देऊन आपल्या मोगली सैन्यात मानाच्या जागा दिलेल्या होत्या त्या अमिषापोटी नागोजी माने, बर्हिजी पांढरे, वाडीचे खेमसावंत, अचलोजी महाडिक अशी बरीचशी मंडळी मोगलांना सामिल झाल्याने मराठ्यांची बाजु दुबळी बनत चालली होती. सेनापती हंबीरराव, रुपाजी भोसले, संताजी चव्हाण, रायाजी सामराज इत्यादी निष्ठावान मंडळी मोगलांशी स्वराज्यासाठी लढत होती.

## ५) सेनापतींचे बेळगाव वाचविण्यासाठी प्रयत्न

इकडे विजापूरकरांनी शर्थिचे प्रयत्न करुनही विजापूर वाचवू शकले नाहीत शेवटी १२ सप्टेंबर १६८६ रोजी औरंजेबाने विजापूर जिंकूण घेतले. दक्षिणेतील आदिलशाही नावाचे राज्य संपुष्टात आले. परंतु येथील वेढ्याच्या कामात मोगलांना शक्य तितका त्रास द्यावा म्हणून सेनापती

हंबीररावांनी प्रयत्न केले. पण शेवटी विजापूरचे राज्य नष्ट झाल्यामुळे स्वराज्याची या दक्षिण आणि आग्नेय सिमेवर मोगलांचे वर्चस्व निर्माण झाले. औरंगजेबाने आता आपले लक्ष गोवळकोंड्याच्या कुतूबशाहीकडे दिले. यापूर्वीच आपले मोगली सैन्य पाठविले होते. तर काही मोगली सैन्य स्वराज्याकडे पाठविले होते. स्वराज्याच्या पन्हाळा-कोल्हापूर प्रदेशात रणमस्तखान ऊर्फ बहादूरखान आणि रुहुल्लाखान हे मोगली सरदार ससैन्य घूसले. सेनापती हंबीररावांनी त्याच्याशी निकराची लढाई केली शेवटी त्यांचा पराभव झाला. आणि ते बेळगावच्या दिशेने निघाले. बेळगावचा किल्ला हा आदिलशाहितील महत्वाचा किल्ला होता. अद्याप मोगलांनी हा किल्ला जिंकलेला नव्हता. किल्ल्याचा किल्लेदार मुरादखान हा किल्ला लढवितच होता. राजधानी विजापूर मोगलांच्या ताब्यात गेल्याने मुरादखानाचा आधारच संपलेला होता. सेनापती हंबीररावांनी किल्लेदार मुरादखानाला निरोप पाठवून 'किल्ला लढवता ठेवा मी तुमच्या साह्यास येत आहे. कोणत्याही परिस्थितीत मोगलांच्या ताब्यात किल्ला देऊ नका' या विषयिची माहिती हंबीररावांनी[१२] हुकेरीच्या देसायास २० डिसेंबर १६८६ रोजीच्या लिहिलेल्या पत्रातून लक्षात येते. हे पत्र इतिहास संशोधक सेतुमाधवराव पगडी यांनी 'हिंदवी स्वराज्य आणि मोगल' या ग्रंथात दिलेले आहे ते पुढील प्रमाण -

## राजश्री अलगौंडा देसाई पा. हुकेरी गोसावी यासी

अखंडित लक्षमी अलंकृत राजमान्य राजश्री हंबीरराऊ मोहिते सेनापती जोहार वितंती उपेरी येथील क्षेम जाणऊन स्वकीये कुशल लेखन करावयास अज्ञा केली पाहिजे. विशेष गनीम रोहिलाखान व रणमस्तखान ऐसे मिरजेहून पनाले पावेतो अला होतो. अमचे फौजेसी व गनिमासी बरा मुकाबला होऊन भांडण जाले, ते जागा गणिमांची बहुत खस्ता जाली. गणिम खटा होऊन कोल्हापुरावरुन बेळगावचे रोख जात आहे. आम्ही सेनेसमुदायेनसी गणिमाचे पाठीवर अहो. गणिमांचा हिसाब धरीत नाही. येक विजापूर जाले तरी काय झाले. विजापूर हा जागा पहिलेपासून आमचाच आहे. त्याची मदत हर बाबेने अम्हास करणे लागते. असदखान किलेदार मिरजेचा याने उतावली करुन गणिमास मिरज धिधली. त्याकरीता गणिमास राहावयास जागा होऊन पैस

मडिळला आहे. हल्ली बेळावकराने कोट देऊ केला म्हणून तिकडे गनीम जातो. यास आम्ही खानेअजम मुरादखान यास कागद पाठविले आहेत की, गनिमास आसरा न देणे. तुम्ही अम्ही येके जागा होऊन गनिमास सजा पावितो ऐसे लिहून पाठविले अहे. पहिले या मूलुकात राजश्री गोपाळराऊ होते ते लष्करास सामिल जाले आहेत. यानी तुमचे विशई कितेक रदबदल केली की आपणासी येक खुसीने चालत आहेत. तरी हे गोष्टी बहुतच उत्तम आहे. गनीम वाटेने जात अहे. तुम्हास कागदपत्र पाठविल तरी येकंदर गनिमास न भेटने असिरा न देणे. अम्ही लष्करानिसी या प्रांति असता तुम्हस कोन्हे गोष्टीचे काही भये नाही. राजश्री रुपाजी भोसले व राजश्री संताजी जगताप यासिही बोलाविले आहे. येक जागा होऊन गनीम मारुन गर्देस मेलवितच अहो. तुम्ही अपले वर्तमान साकळ्ये लिहून पाठविणे. बहूत कोये लिहीणे र।। १४ सफर'

सेनापती हंबीररावानी लिहिलेले पत्र अतिशय महत्त्वाचे आहे सदर पत्रातून स्वराज्या विषयीची तळमळ, स्वराज्यप्रेम, छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण, शिवरायांचा दक्षिणेतील शाह्या संबंधाबाबतचे विचार, शत्रुशी लढयाची जिद्द, जबरदस्त आत्मविश्वास, अक्षम्य दूरदृष्टी, स्वराज्य निष्ठा, मराठी अस्मिता इत्यादी अनेक बाबी पत्रातून प्रकट होतात.

बेळगाव वाचविण्यासाठी किल्लेदार मुरादखान याला सेनापती हंबीररावांनी केलेल्या आव्हानाचा अनुकूल परिणाम झाला. केवळ हंबीररावाच्या पत्रामुळे किल्लेदाराने मोगलांना लवकर किल्ला मिळू दिलेला नव्हता. पुढे दीड वर्षानी बेळगावचा किल्ला हंबीररावांच्या पश्चात शहाजादा आज्जमने तो जिंकूण घेतला. आजही मराठी माणसांना अभिमान वाटावा असे बेळगाव वाचविण्यासाठी हंबीररावांनी केलेले प्रयत्न अविस्मरणीय स्वरुपाचे आहेत. मात्र मराठी माणसांचे दु:र्देव असे की, बेळगाव हा मराठी प्रदेश महाराष्ट्रात उद्यापही विलीन झालेला नाही.

बेळगावचा किल्ला मुरादखान लढवित होता. मराठ्यांचे सेनापती हंबीरराव मोहिते बेळगाव जिंकूण घेण्यासाठी येत असलेल्या रोहीलाखान व रणमस्तरखान यांच्या मोगली सैन्याशी मुकाबला

करुन तेथून त्यांना पिटाळून लावले होते. त्यामुळे मोगलांच्या सैन्याला बेळगावचा किल्ला जिंकता आलेला नव्हता.

छत्रपती संभाजी महाराज स्वराज्यात चौफेर फिरुन मराठी सैनिकांना प्रोत्साहीत करीत होते. स्वराज्यात फुटीरतेचे पेव वाढलेले होते. अनेक मराठा सरदार मोगलांना जावून मिळत होते. त्यामध्ये सेनापती हंबीरराव यांच्या सोबत कर्नाटक मोहिमेच्यावेळी हुसेनखान मियानाशी लढलेले सर्जेराव जेधे व त्यांचे भाऊ शिवाजी जेधे ही मंडळी मोगलाशी हातमिळवणी करत असल्याची वार्ता हंबीररावांच्या कानी आल्याने त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला होता. त्यांनी छत्रपती संभाजी राजांची भेट घेऊन जेधे यांना स्वराज्यात आनने जरजेचे आहे. याबाबत निश्चितच चर्चा केलेली असावी. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराजानी जेधे यांना स्वराज्यात परतण्योसाठी त्यांच्या आतापर्यंत स्वराज्यासाठी केलेल्या कार्याची आठवण करुन दिली असून, आपण स्वराज्याची निष्ठेने सेवा करावी. आपण छत्रपती शिवरायांचे निष्ठावान व्यक्ती असल्याची जाण ीव करुन दिल्याने जेधे स्वराज्यात परत आलेले होते.

सेनापती हंबीररावांना जेधेच्या कार्यकर्तृत्वाची माहिती होती. स्वराज्याची जेधे घराणे हे एक निष्ठावान व कर्तव्यदक्ष असे घराणे होते. यावेळी अशा व्यक्तिची स्वराज्यासाठी निकडची गरज होती. म्हणून हंबीररावांनिही प्रयत्न केले असावेत.

मोगल सम्राट औरंगजेबाने १२ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूर जिंकून घेतल्यानंतर आदिलशाहितील सर्जाखानसारखे स नक सरदार मोगलांची चाकरी करु लागले तर काही सरदार स्वराज्यात येऊन मोगलांशी मराठ्यांसोबत लढू लागले.औरंगजेबाने आपले सैन्य कुतूबशाहाची राजधानी गोवळकोंडा जिंकूण घेण्यासाठी रवाना के ले. त्यामध्येकुलीमखान, असदखान, रुस्तमखान, फिरोजजंग, सफशिकतखान हे प्रमुख सरदार असून सोबत अगणीत सैन्य दिलेले होते. यावेळी कुतूबशाहिचे अनेक सरदार किल्ला लढवत होते. बाहेरुन मोगली सैन्यांवर अब्दूल रज्जाऊ व शेख निजाम हे ४० हजार सैन्यांनिशी हल्ले करीत होते. 'छत्रपती संभाजी राजांनीकुतूबशाही

वाचविण्यासाठी १२००० हजार घोडदौळ व ५०००० हजार पायदळ पाठविले होते. '[१३] मराठा व कुतूबशाही सैन्यापुढे मोगलांचा पराभव दृष्टीक्षेप दिसताच औरंगजेबाने फंदफितुरीचा डाव रचला आणि यामध्ये शेख निजाम नावाचा कुतूबशाही सरदार फूटला. त्याला औरंगजेबाने 'मुकर्रबखान' असा देऊन त्याचा गौरव केला. आणि अल्पावधीत म्हणजे २७ सप्टेंबर १६८६ रोजी कुतूबशाही नावाचे दक्षिण भारतीत दुसरे राज्य औरंगजेबाने जिंकूण घेतले. यावेळी मराठा सैन्याचे नेतृत्व हंबीररावानी केलेले असावेत.

औरंगजेबाने विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतूबशाही ही राज्य जिंकून घेतल्याबरोबर आपले संपूर्ण लक्ष स्वराज्यावर केंद्रीत केले गोवळकोंडा येथे थांबूनच त्यांने आपल्या सैन्यांची व्यूहरचना तयार केली. स्वराज्याच्या चोहोबाजुंनी हल्ले करण्यासाठी सर्व मोगल सैनिकांना आदेश दिले. स्वराज्याच्या उत्तरेकडे शहाजादा आज्जम याच्या नेतृत्वाखाली सैन्य रवाना केले. विजापूरचा सुभेदार म्हणून रहुल्लाखान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य देऊन स्वराज्याच्या पूर्व दिशेने हल्ले करावेत तर सर्जाखान नावाच्या सरदाराला स्वराज्यातील वाई प्रदेशात घूसण्याचे आदेश दिलेले होते.

यावेळी छत्रपती संभाजी राजे राजधानी रायगडावर होते. तर सेनापती हंबीरराव मोहते स्वराज्यच्या दक्षिण सिमेवर मोगली सैनिकांशी लढत होते. विजापूर व गोवळकोंडा ही राज्य औरंगजेबाने जिंकूण घेत असताना कोणकोणते डावपेच आखले होते. याची जाणीव हंबीररावांना होती. वास्तविक प्रत्यक्ष युद्ध करुन ती राज्य त्याला जिंकता येत नसल्याने औरंगजेबाने फंदफितुरिचा मार्ग अवलंबिलेला होता. काही लालची वृत्तीच्या सरदारांनी औरंगजेबाशी गुप्त प्रत्रव्यवहार केल्याने ही दोन्ही राज्ये संपुष्टात आलेली होती. विजापूर जिंकूण घेताना सर्जाखान नावाचा सरदाराने आदिलशाहिशी विश्वास घात करुन औरंगजेबाशी हातमिळवणी केलेली होती. आणि कळविले होते की, 'संभाजीचा नाश करण्याचे काम मी बादशहाला मदत करीन. मोगली दरबारचे लोक माझ्या राज्यात जी खंडणी वसूल करतात ती जर मला माफ केली तर मी शिपायास पगार देईन आणि संभाजीविरुद्ध चालविलेली लढाई यशस्वी करुन दाखविली'[१४] यावर औरंगजेबाने

आपली सहमती दर्शविली. अणि सर्जाखान आदिलशाहिला फितूर झाला. औरंगजेबाने त्याला 'रुस्तुमखान' ही पदवी दिलेली होती. आता स्वराज्यातील मराठा सरदाराला फोडण्यासाठी औरंगजेबाने वतने देण्यचे जाहीर केले. त्या काळात वतन मिळविण्यासाठी व त्याचे जतन करण्यासाठी मराठी सरदार कोणतेही काम करण्यास तयार होत असत. औरंगजेबाच्या फंद फितुरीच्या जाळ्यात अनेक मराठा सरदार अडकल्याच्या बातम्या हंबीररावांच्या कानी येत होत्या. हंबीररावांनी या पासून बचाव करण्यासाठी अनेकदा प्रयत्न केलेले होते. औरंगजेब ाच्या विशाल सैन्याला पराभूत करणे हे यावर एकमेव उपाय आहे. असे समजून मोगली सैन्यावर तुटून पडत होते.

## ६) वाईची लढाई - सेनापती हंबीररावांचा मृत्यू

दक्षिण भारताच्या इतिहासात इ.स.१६८७ हे वर्ष इतिहासाला कलाटणी देणारे वर्ष म्हणून ओळखले जाते. कारण हिंदवी स्वराज्याचे दक्षिण प्रदेशातील मित्रराष्ट्र म्हणून ओळखले जाणारे कुतूबशाही या राज्याचा शेवट झाला. तर स्वराज्याचा निष्ठावान सेनापती व शिवरायांच्या विचाराचा खरा पाईक असलेल्या हंबीररावांचा मृत्यू वाईच्या लढाईत होणे ही मराठ्यांच्या दृष्टीने अतिशय दु:खद प्रसंग म्हणावा लागेल. अशा वाईच्या लढाईचा वृत्तात मराठी साधनामध्ये दुर्देवाने उपलब्ध नाही. मात्र प्रतिस्पर्धी मोगल साधनावरुन या संदर्भाची थोडक्यात माहिती उपलब्ध होते.

वाई हे ठिकाण सध्या सातारा जिल्ह्यात असून कृष्णा नदीच्या काठावर बसलेले आहे. 'वायदेश' या शब्दावरुन या ठिकाणाला 'वाई' हे नाव पडले आहे. वाई व सभोवतालच्या प्रदेशावर प्राचीन काळात शिलाहार घराण्यातील राज्यकर्त्यांचे वर्चस्व होते. मध्ययुगात बिदरच्या बहामणी सुलतानाने त्यावर वर्चस्व गाजविले. त्यावेळी हे लष्करी केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. नंतर इ.स.१५६५ मध्ये या प्रदेशावर विजापूरच्या आदिलशाहाचे वर्चस्व निर्माण झाले. इ.स.१६४९-५९ च्या काळात वाईचा सुभेदार म्हणून आदिलशाहीचा सरदार अफझलखान होता. त्यावेळी त्याने तेथे स्वत:ला रहाण्यासाठी एक वाडा बांधलेला होता. अफझलखान वधानंतर वाईचा सुभेदार म्हणून सर्जाखान

नावाचा सरदार होता. इ.स.१६६४ मध्ये छत्रपती शिवरायांनी वाईचा प्रदेश स्वराज्यात विलीन करुन घेतला. तेथे शिवरायानी येसाजी मल्हार नावाच्या मराठा सरदाराची नेमणूक केलेली होती. इ.स.१६८६ मध्ये मोगल सम्राट औरंगजेबाने विजापूरची आदिलशाही जिंकूण घेताना आपणास पूर्वीचा वाईचा सुभा मिळावा या स्वार्थी हेतूने सर्जाखानाने आदिलशहाचा विश्वासघात करुन औरंगजेबाशी संधान बांधले. तेंव्हा औरंगजेबाने त्याची मागणी मान्य करुन त्याला रुस्तूमखान नावाची पदवी दिली. आणि तो मोगलांची सेवा चाकरी करु लागला.

डिसेंबर १६८६ मध्ये सेनापती हंबीरराव मोहिते कोल्हापूर -पन्हाळा येथून विजापूरच्या आदिलशाहीला मदत करीत होते. मोगली सैन्यावर हल्ले करीत होते. आदिलशाही वाचविण्यासाठी हंबीररावांनी छत्रपती संभाजी राजान बरोबर शर्थिचे प्रयत्न केले. पण शेवटी आदिलशाहितील सर्जाखान सारखी सरदार मंडळी लालची व स्वार्थी हेतुने मोगलांना मिळाल्याने आदिलशाहीचा शेवट झाला. याचे दुःख हंबीररावांना खूपच झालेले होते. कारण छत्रपती शिवरायांच्या विचाराचा प्रचंड प्रभाव त्यांच्यावर होता. दक्षिण भारत हा दक्षिणेतील तीन राज्याचा आहे. असे समजून शिवरायांनी आदिलशाही, कुतूबशाहीशी एकोप्याचे संबंध निर्माण केलेले होते. तसेच विचार हंबीररावांचे होते. आदिलशाही जर जिवंत राहीली तर आपल्या स्वराज्याला कायम आधार रहाणार. पण जर तर ते इतिहासाची मांडणी होत नसते तरिही सेनापती हंबीररावांनी ज्या हेतुनी दक्षिणेतील शह्या वाचविण्यासाठी प्रयत्न केलेले होते. त्यामागे दुरदृष्टी होती हे नक्कीच.

आदिलशाही व कुतूबशाही राज्य औरंगजेबाच्या वर्चस्वाखाली आल्याबरोबर त्याने आपले संपूर्ण लक्ष स्वराज्यावर केंद्रीत केले व सर्व मोगल फौजा स्वराज्याच्या चोहो बाजुंनी हल्ले करु लागल्या. सर्जाखान नावाच्या आदिलशाही सरदाराने वाईचा प्रदेश मिळविण्यासाठी व तेथून मराठ्यांचे वर्चस्व नष्टकरण्यासाठी औरंगजेबाच्या आदेशाने तो सैन्य वाईच्या परिसरात आला. सेनापती हंबीररावांना सर्जाखान वाईला आल्याची बातमी समजली. आणि सेनापती हंबीररावांनी सर्जाखानाशी लढा देण्यासठी ससैन्य रवाना झाले. सर्जाखानाबाबतची माहिती हंबीररावांना होती. स्वतःच्या स्वार्थासाठी विजापूर सारखे राज्य बुडविलेल्या सरदाराला ठेचून काढण्यासाठी हंबीरराव

निघाले. वाईच्या परिसरात मराठा-मोगल सैन्यांची घनघेर लढाई झाली. सेनापती हंबीरराव सर्जाखानाला धडा शिकविण्यासाठी अतिशय त्वेशाने मोगली सैन्यावर तुटून पडले. यावेळी हंबीररावांच्या तलवारी समोर मोगल सैन्य सैरवैरा पळू लागले. इतक्यात मोगली सैन्यातून तोफेचा एक गोळा सेनापती हंबीररावांच्या शरीरावर धडकला. हंबीरराव धारातिर्थी पडले. तरी मराठा सैन्य मोगलाशी लढत होते. शेवटी या युद्धात सेनापती हंबीररावांच्या सैन्यांचा विजय झाला व सर्जाखान रणांगनातून पळून गेला. मात्र यावेळी सेनापतींना तोफेचा गोळा लागल्याने मराठ्यांच्या विजयाची वार्ता एकून त्यांनी आपला प्राण सोडला. आणि मराठ्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते यांचा मृत्यू झाला. ही लढाई ऑक्टोबर १६८७ मध्ये झालेली असून नेम्की कोणत्या दिवशी लढाई झाली या विषयीची माहिती उद्यापही साधनाअभावी मिळालेली नाही.

लढाईची माहिती नाही. उलट ही लढाईंज सातारा जिल्ह्यातील गॅ झेटमध्ये गावाजवळ झाली असा उल्लेख आहे. मराठ्यांचे दुर्देव असे की, वाईचा प्रसंग हा दुर्देवी प्रसंग होता. या घटनेमुळे छत्रपती संभाजी राजांचा पाठिराखा व मराठ्यांचा मावळा काळच्या पडद्याआड गेला. आणि ही नोंद इतिहासाल माहिती नसल्याचे दुर्देव आहे.

स्वराज्याची राजधानी रायगडावर छत्रपती संभाजी राजांना सेनापती हंबीरराव मोहिते वाईच्या लढाईत मृत्यू पावल्याची वार्ता कळाली. हिंदवी स्वराज्य दुःखाच्या सागरात बुडाले. छत्रपती संभाजी राजांना अतिशय वाईट वाटले. सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कर्तृत्वाचा इतिहास त्यांच्या डोळ्यासमोर उभा राहिला सेनापती हंबीरराव मोहिते हेकेवळ नातेसंबंधाने सावत्र मामा होते. पण छत्रपती संभाजी राजांचे पाठिराखे होते. छत्रपती शिवरायांचा मृत्यू झाल्यानंतर छत्रपती संभाजी राजांना खारा आधार सेनापती हंबीररावांचा होता. त्यांच्यामुळे 'छत्रपती' पद मिळाले होते. इतकेच नसून स्वराज्याच्या अंतर्गत व बाह्य समस्या हंबीररावांनी सोडविलेल्या होत्या. स्वराज्याशी निष्ठा असलेले व्यक्तीमत्व म्हणून ओळखले जात होते. सत्याच्या विचाराने चालणारे दूर्मिळ, शिवरायांचा खरा पाईक एकमेव हंबीरराव असल्याने व त्यांना स्वराज्याबाबतचा संपूर्ण अभ्यास असल्याने छत्रपती संभाजी राजांना ज्यावेळी अडचणी येत होत्या त्यावेळी एखादा या मार्गदर्शकाची भूमिका

हंबीररावांनी बजावलेली होती. मोगलांचा सम्राट प्रचंड सामर्थ्यानिशी स्वराज्यावर चालून आलेला असताना मोगलांना प्रत्येक आघाड्यावर पराभूत करुन स्वराज्यात शिरकाव होऊ दिलेला नव्हता. सेनापती म्हणजे स्वराज्याचे एक कवचकुंडलच होते. त्यामुळे छत्रपती संभाजी निश्चिंतपणे स्वराज्याचा कारभार करत होते. मात्र हंबीररावांच्या मृत्यूमुळे छत्रपती संभाजी राजे पूर्नतः पोरके झालेले होते.



तळबीड येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांची पूर्वीची समाधी



तळबीड येथील सेनापती हंबीरराव मोहिते यांची सद्याची नुतनीकरण केलेली समाधी

सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या मृत्युनंतर वारसा संदर्भात संशोधन केले असता सेनापती हंबीररावांना संभाजी मोहिते हा मुलगा असून ताराबाई नावाची कन्या होती. त्यांच्या मुलाच्या कर्तृबगारी विषयाची फारसी माहिती ऐतिहासिक साधन ग्रंथातून उपलब्ध झालेली नाही. केवळ कृष्णाजी अनंत सभासद यांनी आपल्या बखरीत सर हवालदार म्हणून जी यादी दिलेली आहे त्या यादिमध्ये संभाजी हंबीरराव असा उल्लेख केलेला आहे. यावरुन सेनापती हंबीररावांना संभाजी नावाचा एकुलता एक मुलगा होता असे स्पष्ट होते. मात्र सेनापतींचा वारसा त्याच्याकडे आलेला नव्हता. यावरुन तो कर्तूत्ववान नसल्याचे दिसून येते. त्यानंतरचे वारस अद्यापही साधना अभावी स्पष्ट करता आलेले नाहीत. केवळ त्यांची कन्या महाराणी ताराबाई हीने स्वातंत्र्य युद्धात मोलाचे योगदान दिल्याचे इतिहासात दिसून येते.

सेनापतींच्या तळबीड गावी गावकऱ्यांनी सेनापती हंबीररावांचे स्मारक उभे केलेले आहे.



तळबीड गावातील मोहिते मंडळीनी स्वखर्चाने अत्याधुनिक स्वरुपाचे सेनापतींच्या नावांचे समाधी प्रवेशद्वार बांधलेले आहे.




## ७) सेनापतींच्या इतर कार्यासंबधीची पत्रे

छत्रपती संभाजी महाराजांच्याकाळात सेनापती हंबीररावांनी केवळ स्वराज्याचे रक्षणच केले, असे नसून छत्रपतींना प्रशासकीय कार्यात सहकार्य केलेले होते. आजमितीला केवळ सेनापती हंबीररावांचे दोन पत्र उपलब्ध झालेले आहेत. त्या पत्रावरुन सेनापती हंबीररावांनी स्वराज्याचे योग्य पद्धतिने प्रशासन केल्याचे स्पष्ट होते. हे दोन्ही पत्र इतिहास संशोधक डॉ.शिवदे सदाशिव यांनी

आपल्या 'सेनापती हंबीरराव मोहिते' नावाच्या ग्रंथात दिलेली आहे. ही मुलतः इतिहासाचार्य 'वि.का. राजवाडे' यांच्या मराठ्याच्या इतिहासाची साधने खंड-१५ यातून घेतलेली आहेत त्यातील पत्र

**पत्र क्र.-१**

श्री

१६०६ पौष शुद्ध १०

छत्रपती +++

स्वस्ति श्रीराज्या +++++++ रक्ताक्षीनाम

संवत्सरे +++++ दसमी बुधवासरे साक्षपत्र

हाजीर मजालसी स्थळ किल्ले रायगड

हंबीरराऊ मोहिते सेनापती

श्री

मछिवमाहानु

भाव सेनाधिश

हंबीरराव

सिदोजी बिन तुकोजी पाटील पोळ

मौजे कविंडे प ।। वाल्हे अर्जनीस हुजारती

(निशाणी नांगराची)

शेसो बापुजी देसकुलकर्णी

किले सातारा निविस्ते

बिलालराऊ

सेकोजी बिन मतनोजी काळे देसाई

वस्टममालकर क।।कोळे

(निशाणी नांगराची)

अबाजी बिन धारोजी

जाधव पाटील मौजे

पारिंचे पा/पुणे

(निशाणी नांगराची)

अंताजी लक्षुमण दि।। सबनिसी

लष्करी हुजराती

माऊजी बिन चांदजी

केदारजी जाधव पाटील

सोनवणी पटेल मौजे +++ मौजे पाचुंद पा। कऱ्हाड

पा । पुन्हे (निशाणी नांगराची)

लिगोजी पाटील कालगे

मौजे वर्जे पा। कऱ्हाड

(निशाणी नांगराची)

शालवान शक १६०६ या विदमाने सटवोजी बिन बाबजी भोसले यानी लिहून दिल्हे साक्षपत्र ऐसे हें माहादजी बिन सुलतानजी पाटीलक।। मसूर याच्या बापभावाचा गाऊ मौजे सिरवडे ता। उंबरज त्या गावामधे आपण स्रोतें केली होतीं व मिरासीचीं सेते पटेलमजकुराचीं घेतली होती व पटेलगीस कटकट केली होती त्याबद्दल माहादजी पाटलामध्ये वा आह्यामध्ये कुसूर पडोन मौजे कौणे गावामध्ये महादजी पाटीलावरी आपण चालोन जाऊन गदर केली. त्याकरीता महादजी पाटील हुजूर ऐऊन राजश्री साहेबांपासी वर्तमान विदीत केले की त्यावरुन साहेबी आपणांस हुजूर बोलाऊन आणून बाजीपुसी केली आणि राजश्री कवीकलश छांदोगामात्य व राजश्री सरकारकून ऐसे सदरेस बसोन बर हक्क मुनससफी केली तेथे निर्वाह जाहाला ऐसा जे महादजी पाटील क।। मजकूर यावरील आपण गदर केली ते निरर्थक केली याचे सेताचा आपण आवारा केला व त्याची वैरणी काडी नेली व त्यांची माळीची लाकडे आपण नेली व त्याची विसाती अंगावरील नेली हमणाऊन महादजी पाटीलाने हुजूर विदीत केले तरी आपल्यापासी तरवार १ व कोचकी १ व सेला १ ऐसे आहे ते आपण दतो वरकड महालीच्या कारकुनाच्या निदमाने साक्षपत्र लेहून येईल ते आपण देऊन व सिरवडे येथील पाटीलकीस व त्याच्या सेतासि आपण कथळा नसताच केला होता. तेथे पेस्तर कथळा कराव्या गरज नाही ऐसा निवाडा जाहाला. याउपरि आपण जरी पेस्तर तेथील पटेलगीचा अथवा सेताभातांचा व महादजी पाटीलांसी कथळा करुन तरी दिवाणीचा गुन्हेगार व गोताचा अत्याई त्यास आपणास अर्थात असंध नाही हे आपले वडीलांचे इनाम सही साक्षपत्र पत्र सही सही.

तेरीख ५ रेबिलोवल

सु!!खमस समानीन अलफ

पत्र सही सही ही दोन अक्षरे सटवोजी बिना बाबाजी भोसले यांच्या खुद्द हातची आहेत.[१५]

हे पत्र छत्रपती संभाजी महाराजांच्या काळातील जानेवारी १६८४ मधील असून यावर सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नावाचा शिक्का असलेले पत्र आहे. स्वराज्यातील मौजे सिरवडे तालुका उंबरज या गावातील शेती संदर्भातील तक्रार तेथील पाटलानी छत्रपतीकडे केल्याने त्याचा निकाल पत्राच्या माध्यमातून हंबीररावांनी केलेला होता.

अशाच प्रकारचे दुसरे पत्र आहे त्यावर सेनापती हंबीररावांची मुद्रा आहे.

## पत्र क्रमांक-२

श्री

१६०६ माघ शुद्ध ७

१

५

पाच बंद रास

स्वस्ति श्रीराज्याभिशेक्र शके ११ रक्ताक्षीनामसंवत्सरे माघ शुध सप्तमी मंदवासर सभा विदमान

| | |
|---|---|
| श्रीशंभुनर | लक्ष्मीनृसिंह |
| पतिहर्षनिधान मोरे | भक्तश्रीनिररायाब्धि |
| श्वरसुत नीलकंठ | सन्मेणः।। प्रल्हाद |
| मुख्य प्रधान | वर्धिनीमुद्रा प्रल्हादस्य |
| | विजयते |

श्री
मछिवमाहानु
भाव सेनाधिश
हंबीराव

कारणे जाला निवाडा ऐसा जे माहादजी पा। जगदळा कसबे मस्तूर ता। उंबरज व संताजी पा। घाडगा मौजे सिवडे व मौजे वराडे ता। म।।र यामध्यें व सितोजी व सटवोजी भोसले यामध्यें कसबे मसूर व मौजे कोणेगव्हाण व मौजे सिरवडे व मौजे सिवडे व मौजे वराडे ता। म।। र या गावीचीं सितोजी व सटवोजी भोसले एहीं धामधूमकरुन सेतेंभातें हिरोन घेतली व आणिक ही कितेक आवाडाव केली. याच्या कलमाचे कलम राजश्री कविकलश छंदोगामात्य व राजश्री सरकारकून एहीं सदरेस बैसोन निर्वाह केला बितपसील

| | |
|---|---|
| कि। कलम सेत माहादजी पाटेल दि।। वाटेकरी पिकलें सेत हरजिनसी बिघे ५० मौजे कोणेगव्हाणें खासा<br><br>माहादजी पा।<br><br>५० मौजे सीवडे बा। वाटेकरी<br><br>१००<br><br>ए। बिघे सकसे पैकीबा। कोणेगव्हाणें येथील पन्नास बिघे सटवोजी भोसलियानींगंरें व सेरडें घालोन चारिले व बा। सिरवडें बिघे पन्नास कांही मलिस्त करुन नेल्हे व काही गुराकडून चारिले मनोन माहादजी पा। याणीं विदित केलें यास सटवोजी भोसले यास यास विचारितां विदित केले की दहा वीस बिघे आपले गुराबी खादले असेल हाणोन तकरीर केली पारपत्यगार ता । म।।र यास आज्ञापत्र सादर करावे की सटवोजी भोसले यणी माहादजी पाटेलाचे सेत देखील | तुळ्या — खांब<br>६ माळीच्या — १८ माळी<br>१६ सोफा — १२ सोफा<br>२२ कड्या — ३० हसणी<br>३५ सोफा — १८ माळी<br>६५ माळी — २४ सोफा<br>१०० — ४२<br><br>यासि निर्वाह देशाधिकारी व पारत्यगार ता। म।। र यांस आज्ञापत्र ल्याहावे किं ज्या सुतारांनी माहादजी पाटेलाचा सोफा व माळी बांधली त्यास व ते समयी जे भले लोक असतील त्यास हि वणो असल त्याची हिसाक्ष मनास आणोन सफत घालोन ग्वाहीसाक्षीनसी व मौजे मजकूरचे वतनदार यांचे विदमानें बरे चौकस आकस व कोसीस न करिता परनिस्ट मनास आणोन साक्षपत्र व सिकियानसी बखेर हुजूर पाठवणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते |

वाटेकरी सदर्हू सेंभरा विधियामध्यें चारिलें किती व मलिस्तकरुन नेले किती हे देसमुख देसकुलकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार व भले लोक ग्वाही साक्ष असतील याला सफतपूर्वक आळस व कोससि न करितां बरे चौकस मनास आणेन गाहीसाक्षीनें सेंभरा बिघीयांपैकी सटवोजी भोसलियाकडे मोझ्या मुकाबलियानें शाबीत होईल याची बेरीज जे जकिसाबी होईल ते तपसीलवार बखेर सिकियानसी व ग्वाहीदाराचे साक्षीनसी साक्षपत्र हुजूर पाठवणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें की सदर्हू कलमाचा निर्वाह होय आण बदलामी नये ऐसी परनिष्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहीणे एकूण कलम १ कि ।। कलम माहादजी

२००

पाटिलावर सटवोजी भोसलियाने गुल केली । ते समयीं आपले आंगावरील वस्ता नेल्या हमणोन माहादजी पाटलें विदित केलं बिता।।

होन तरवार १
११ पा । कोचक १
।। नि ।। सेला १
११ ।। पासोडी तांबडी १

ऐसी मनास आणनें की सदर्हू कलमांचा नि र्वाह होय आण बदलामी नये ऐसी परनिष्ट साक्ष मनास आणेन हुजूर लिहीणें ए ।। कलम १

कि ।। कलम माहादजी पा । याचें सटवोजी भोसलियानें नेलें हमणोनं सटवोजी भोसलियानें नेलें हमणेन विदित केलें क डबा मौजे कोणेगव्हाण व का । मसूर ए ।। सुमार बारा हजार १२००० तुरीचे कुटाची व बाजे हरजिनसी कूट व लढई एक १ शाफर घराचा पाउसाळियाचा भारे समार याला विचारिता क्षणी लागले की सातपांचशे कडबा नेला असेल वरचील नेलें नाहींक्षणोंन तकरीर केली यासि निर्वाह देशाधिकारी व पारपत्यगार यास आज्ञापत्र लिहीणें कीं सदर्हूमधे सटवोजी भोसले याणीं काय नेलें असेल ते देसमूख देसकूलकर्णी व मौजें मजकुरचे वतनदार यांचे गाहीसाक्षीनसी बरें चौकस सफतपूर्वक मनास आणोन हुजूर लिहीणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कि सदर्हू कलमाचा, निर्वाह होय बदलामी न ये ऐसी परनिष्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहीणे ए ।। कलम १

कि ।। कलम माहादजी पा। यांचे सटवोजी

कुडकिया देखिल मोनं कि ।। होन पा ।। १९ ए ।। जोडा १ यापैकीं सटवोजी भोसले कबूल जाले ते महादजी पाटेलास देविल तरवार १ कोचकी १ सेला १ बाकी नामुकरद

आणि

| होन | कुडकिया जोड |
|---|---|
| ११ पा । | देखील मोनें १ |
| ।। नि ।। | पासोडी तांबडी १ |
| ११ ।। | |

यास निर्वाह माहादजी पाटिलावरगुल जाली ते समयी माहादजी पाटेलाचे आंगावर पासोडी होती की नव्हती याची साक्ष व कुडकिया मोतें कानी होती की नव्हती व मोतें कानी कोठें केलीं ते किमत व नख्त होन पा । अकरा व नि ।। प्रताप माहादजीजवळ लग........................ ०

होते की नव्हते ऐसी सदर्हूची गोहिसाक्षीनसी बरी चौकस मनास आणोन माहालिहून सिकियनसी बखेर हुजूर पाठवणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होय आणि बदलामी न ये ऐसी परनिष्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहीनें एकूण कलम १

भोसलियानें नेलें म्हणोन सटवोजी भोसलियानें नेलें म्हणोन विदित केलें कडबा मौजे कोणेगव्हाण व का। मसून ए।। सुमार बारा हजार १२००० तुरीचे कुटाची व बाजे हरजिनसी कूट व लढई एक १ शाफर घराचा पाउसाळियाचा भारे सुमारका। मयूरपैकी यास सटवोजी भोसले याला विचारिता म्हणो लागले की सातपांचशे कडबा नेला असेल वरचील नेलें नाहीं म्हणोन तकरीर केली यासि निर्वाह देशाधिकारी व पारपत्यागार यास आज्ञापत्र लिहीणें कीं सदर्हूमधे सटवोजी भोसले याणीं काय नेलें असेल ते देसमूख देसकूळकर्णी व मौजें मजकुरचे वतनदार यांचे गाहीसाक्षीनसी बरें चौकस सफतपूर्वक मनास आणोन हुजूर लिहीणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कि सदर्हू कलमाचा निर्वाह होय बदलामी न ये ऐसी परनिष्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहिणे ए ।

कलम १

लग ..................................... ०

लग ..................................... ०

लग ..................................... ०

लग ..................................... ०

| | |
|---|---|
| | लग .................................... ०<br>लग .................................... ०<br>लग .................................... ०<br>लग .................................... ० |
| सताजी पाटील मौजे सिवडे व मौजे वराडे ता । मजकूर येथील आपला हरासकरुन सेतेंभातें सितोजी भोसले यांनी गुराकडून चारविलें व नेलें हमणोन सताजी मजकुरानें विदित केलें बितपसील | |
| कि ।। कलम सताजी घाटगा पा । याचें पिकले सेत मौजे वराडें बिघे हरजिनसी<br>३५ ऐन<br>२ परडे<br>४ ।। पडपैकी<br>विदित<br>४१ ।।<br>ए।। साडे एकेताळीस बिघे सितोजी भोसलियानी मालिस्त करुन नेलं. आहे हामणोन सताजी पा । विदित केलें यावर सितोजीचे भाऊ सटवोजी भोसले यास विचारितांकरार केली यास निर्वाह देशाधिकारी व पारपत्यगार ता । मार यांला आज्ञापत्र सादरकरावे की सताजी पाटेलाचें पिकले सेत सितोजी भोसले यांनीं सदर्हूपैकी किती मालिस्त करुन नेंलें आहे हें देसमुख देसकूळकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार गोहीसाक्ष असतील त्यास | कि ।। कलम सताजी पाटेल याच्या तिही तिही आकणीच्या माळ्या दोन सितोजी भोसलियानें नाईकजी फडतरा मुतालिक दि ।। माइले यास सांगोन जाळविल्या हमणोन सताजींने<br><br>केलें यास सटवोजी भोसले याने विदित केलें की सितोजीनें मुतालिकाकडून माळ्या जाळविल्या नाहीं यास निर्वाह तर्फमजकूरचे पारपत्यगार यांस आज्ञापत्र सादर करावें की देसमुख देसकूळकर्णी व मौंजे वराडेचे वतनदारगोहीसाक्ष मनास आणनें कीं सिताजीनें मुतालिकास सांगोन माळ्या जाळविल्या कीं नाहीं व एकेके माळीस काय किम्मत बैसाली आहे हे बरे चौकस आकस कोसीस न करिता परनिस्ट हुजूर लिहीणें सदर्हू कलमास जे साक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणनें कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होय |

| | |
|---|---|
| सफतपूर्वक आकस व कोसीस न करितां परनिस्ट मनास आणोन जितके सेत सितोजीकडे हवकहिसाबी होईल त्याची बखरे सिकियानसी वतनदाराचे साक्षपत्र हुजूर पाठवणें सदर्हू कलमास गोहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणने की सदर्हू कलमाचा निर्वाह होय आण बदलामी न ये ऐसी परनिस्ट मनास आणोन साक्ष हुजूर लिहीणें ए ।। कलम १<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ०<br>लग ..................................... ० | आण बदलामी नये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहीणें ए ।। कलम १<br>कि ।। कलम सताजी पा । याचे पेवें गल्लियाचे राळे सोळूले नवसेरीखडिया अडिच होते ते सितोजी भोसले रात्रीचे येओले हमणोन सताजी म।।र विदित्केले. यास सटवोजी भोसले यास विचारितां सितोजी भोसलियानें पेंव गल्ला राळे खंडी अडिच नेला नाहीं हाणेन नाकाबूल गेले यास निर्वाह की त।।म।।रचे पारपत्यगार यास आज्ञापत्र ल्याहावे कींसदर्हू अडीच खंडी गल्लियाचे पेंवे सताजीचे सितोजी भोसलियानें नेंलें असें नाहीं हे मौंजे मजकुरामध्यें ग्वाहीसास असनील यास सफत घालून बरें चौकस देसमुख देसकुळकर्णी व मौजे मजकूरचे वतनदार याचे गोहीसाक्षीनसी आकस व कोसीस न करितां परनिस्ट बखरे कियानसी हुजूर लिहीणें सदर्हू कलमास ग्वाहीसाक्ष मनास आणाल ते ऐसी मनास आणेनं कीं सदर्हू कलमाचा निर्वाह होस आण बदलासी ने ये ऐसी परनिस्ट साक्ष मनास आणोन हुजूर लिहीणें ए ।। कलम १ |

एकूण कलमे ७ सात रास याचा कलमाचे कलम सदरहू प्रमाणे निर्वाह केला आहे आहे ऐसियास माहाली आकस व कोसीस कराल आणि हुजूर राजश्री स्वामी कलमाचा कलम मनास आणितील तेंव्हा आकस व कोसीस दिसोन आली म्हणजे स्वामी तुमचा मुलाहिजा करणार नाही ऐसें बरें समजोन परनिस्ट लिहिलेप्रमाणे चौकस मनास आणोन हुजूर राजश्री स्वामींचे सेवेस लिहीणें हाणोन देशाधिकारी व पारपत्यगार ताा मजकूर यांसि आज्ञा हे निवाडपत्र सत्य निदेश समक्ष रुजू

लेखन

सीस्तु समु

ल्लसति

तेरिख ५ रबिलोवल सुरु सूद वार

सु।। खमस समानीन अलफ

........

दोन कागद जोडले आहेत व जोडगिरीवर, लेखनसीमेचा शिक्का पांच वेळा आला आहे.'

हे पत्र छत्रपती संभाजी राजांच्याकाळातील असून ते निवाडापत्र आहे. फेब्रुवारी १६८४ मध्ये लिहिले असून या पत्रावर अष्टप्रधान मंडळातील पेशवा-निळोपंत, न्यायाधीश-प्रल्हाद निराजी आणि स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या मुद्रा आहेत.

यावरुन सेनापती हंबीरराव मोहिते यांनी छत्रपती संभाजी राजांच्या अष्टप्रधान मंडळाचा मंत्री म्हणून न्याय निवाड्याचे काम केलेले आहे. केवळ रणांगनावर जाऊन युद्ध करणे आणि शत्रुला पराभूत करणे हे मर्यादित काम नसून प्रशासकीय क्षेत्रात छत्रपतिला साह्य म्हणून अनेकदा सेनापती हंबीररावांनी स्वराज्याचा कारभार केल्याचे दिसून येते. या सर्व गोष्टीचा विचार केला तर सेनापती हंबीररावांनी स्वराज्य सेवा अनिष्ठेनी केलेली असून छत्रपती शिवरायाच्याकार्याचा वारसा आपल्या कार्यातून दाखवून दिल्याचे स्पष्ट होते.

## ८) सारांश :

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी स्वराज्यावर चालून आलेल्या मोल सम्राट औरंगजेबाला प्रत्येक आघाड्यावर पराभूत केल्याने औरंगजेबाला आपल्या युद्धविषयक धोरणात बदल करावा लागलेला होता. काही काळापूरता स्वराज्य जिंकण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनात बदल करुन दक्षिण भारतातील आदिलशाही व कुतूबशाही जिंकून घेऊन त्यांच्या बळावर स्वराज्य जिंकून घ्यावे असा विचार करण्यास भाग पाडले होते. उत्तरेतून दक्षिण भारतामध्ये आल्याबरोबर स्वराज्य जिंकूण घेऊ असा जो औरंगजेबाचा समज होता तो पूर्णतः चुकीचा ठरविण्यात स्वराज्याचे सेनापती हंबीररावांचा सिंहाचा वाटा होता.

औरंगजेबाने विजापूरची आदिलशाही जिंकूण घेण्यासाठी आपले मातब्बर सरदार सैन्यासह पाठविले असता सेनापती हंबीरराव व छत्रपती संभाजी राजांनी विजापूर वाचविण्यासाठी मोगली सैन्यावर बाहेरुन हल्ले केलेले होते. शेवटी औरंगजेबाला आपला मुक्काम सोलापूरहून विजापूर येथे येण्यास भाग पाडले. विजापूर जिंकूण घेण्यासाठी संपूर्ण लष्करी ताकद पनाला लावावी लागली. विजापूरचा वेढा उठवा या हेतुने सेनापती हंबीररावांनी मोलांच्या बागलानच्या प्रदेशात हल्ले स ुरु केलेले होते. औरंगजेब मोगली प्रदेश वाचविण्यासाठी विजापूरचा वेढा सैलकरील असे वाटले होते. पण त्यामध्ये सेनापती हंबीररावांना अपयश आले. यासाठी हंबीरराव जबाबदार नव्हते. तर विजापूरचे सरदाररांनी फंदफितूरीकेल्याने मोगलांचे व ार्चस्व निर्माण होऊन आदिलशाही संपूष्टात आली.

कुतूबशाहीकडे मोगली फौजा गेल्याचे समजताच सेनापती हंबीरराव १२००० हजार सैन्य घेऊन कुतूबशाहीच्या मदतीला गेले असतील. कारण शिवरायांच्या धोर णांचा प्रभाव हंबीररावांच्यावर होता. दक्षिण भारत दक्षिणेतील राज्याचा आहे. यासाठी म्हणून कुतूबशसाही वाचविण्याचे सुद्धा हंबीररावांनी प्रयत्न केलेले असावेत. पण त्यांच्या प्रयत्नांना अपयश आले आणि कुतूबशाहीचे सरदार फितूर झाल्याने त्यावर मोगलांचे वर्चस्व निर्माण झालेले होते.

आता औरंजेब आपले लक्ष स्वराज्य जिंकूण घेण्यासाठी प्रयत्न करीत असताना स्वराज्याच्या पूर्व-दक्षिण प्रदेशावर चालून आलेल्या मोगली सैन्यांचा पराभव हंबीररावांच्या सैन्याने केलेला होता. मात्र मराठ्यांचे दुर्देव की, वाईच्या प्रदेशात सर्जाखान चालून आल्याने त्याला तेथून परास्थ करण्यासाठी सेनापती हंबीरराव मोहिते वाईच्या परिसरात गेले असता मोगल-मराठा यांच्यात घनघोर लढाई झाली. आणि त्या लढाईत सेनापती हंबीररावांचा मृत्यू झाला. स्वराज्यावर दुःखाचे सावट पसरले. आयुष्याच्या शेवटच्याक्षणापर्यंत एकनिष्ठे ने स्वराज्याची सेवा करणारे व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेले. छत्रपती संभाजी राजांना जबरदस्त धक्काच बसला. ज्यांच्या बळावर मोगली संकटाचा सामना करत होते. तेच निष्ठावान, कर्तृत्ववान सेनापती युद्धात कामी आल्याने छत्रपती संभाजी राजे पोरके झाले.

**संदर्भ ग्रंथ :**


१) गोखले कमल - शिवपूत्र संभाजी, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती चौथी, २००१, पृ.क्र.२९८.

२) पगडी सेतुमाधवराव - हिंदवी स्वराज्य आणि मोगल, पुणे, व्हीनस प्रकाशन, फेब्रु. १९९६, आवृत्ती पहिली, पृ.क्र.५६, ५७.

३) खरे ग.ह., कुलकर्णी गो.त्र्य. - औरंगजेबाच्या दरबारचे अखबार, ऐतिहासीक फार्सी साहित्य सहावा खंड, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९७३, पृ.क्र.३६२.

४) कुलकर्णी अ.रा. - जेधे शकावली-करिना, पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७, पृ.क्र.११९.

५) देशमुख विजय (संपा) - शिव-विजय, रोप्य मोहत्सवीकार्य गौरव समिति नागपूर, प्रथम आवृत्ती १९९२, पृ.३३.

६) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त पृ.क्र.३३.

७) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत, उग्रप्रकृती संभाजी, स्थिरबुद्धी राजाराम, मुंबई, पॉप्यूलर प्रकाशन, १९८९, पृ.क्र.९४.

८) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा) - शिवचरित्र प्रदीप, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, २००९, पृ.क्र.३३.

९) शिवदे सदाशिव - ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा, पुणे, डायमंड पब्लिकेशन, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००८, पृ.क्र.२६८.

१०) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त पृ.क्र.३५.

११) देशमुख विजय (संपा) - पूर्वोक्त पृ.क्र.३५.

१२) पगडी सेतुमाधवराव - पूर्वोक्त पृ.क्र.७०, ७१.

१३) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.२८७.

१४) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.२९२.

१५) शिवदे सदाशिव - 'सेनापती हंबीरराव मोहिते' पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७, पृ.क्र.११८, ११९.

१६) शिवदे सदाशिव - पूर्वोक्त पृ.क्र.१२०.

# प्रकरण सातवे

# निष्कर्ष

मराठ्यांच्या इतिहासात नावारुपाला आलेल्या सेनापतीच्या तुलनेत सेनापती हंबीरराव मोहिते यांचे स्थान अद्वितीय स्वरुपाचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण भारतातील महाराष्ट्रामध्ये मराठी भाषिकांचे 'हिंदवी स्वराज्य' उदयाला आणले आणि जगाच्या इतिहासाने नोंद घ्यावी असे अभुतपूर्व कार्य केले.या त्यांच्या कार्याला इतिहासात जोड नाही. अशा अभुतपूर्व कार्याचे खरे साक्षिदार स्वराज्याचे सेनापती हंबीरराव मोहिते होते. ज्यावेळी छत्रपती शिवरायांनी स्वतः 'छत्रपती' झाल्याचे जगाला दाखवून दिले. त्याच वर्षी म्हणजे इ.स.१६७४ मध्ये हिंदवी स्वराज्याचे 'सेनापती' म्हणून हंबीरराव मोहिते यांची निवड छत्रपती शिवरायांनीकेली. या पदावर जवळपास १४ वर्ष ते राहीले. इ.स.१६८७ ऑक्टोबर मध्ये वाईच्या युद्धात सेनापतींना विरमरन आले. जर हा प्रसंग घडला नसता तर पुढील किमान १० वर्ष त्यांनी स्वराज्याची सेवा केली असती. अशा ऐतिहासिक सेनापतीच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू पुढील प्रमाणे विशद होतात.

## १) सेनापती हंबीरराव मोहिते यांनी मोहिते घराण्याचा नावलौकिक वाढविला

इ.स.१६व्या शतकामध्ये अहमदनगरच्या निजामशाहीचा सर्वेसर्वा मूर्तूझा निजामशाहाच्या कार्यकाळात मोहिते घराण्यातील रतोजी मोहिते नावाच्या सरदाराने दरबारातील बंडाळ्या मोडित काढलेल्या होत्या. तेव्हापासून 'मोहिते घराणे' इतिहासाला ज्ञात आहे. त्यांच्यानंतर तुकोजी मोहिते यांनी 'तळबीड'ची पाटीलकी मिळविली. यांच्या संभाजी व धारोजी मोहिते यांनी विजापूरच्या आदिलशाहीमध्ये शहाजी राजाच्या कृपेने मोठी मनसब मिळविली. स्वतःची तळबीडची पाटीलकी सांभाळून इमानइतबारे सेवा चाकरी करीत होते. मात्र मोहिते घराण्याला खरी प्रतिष्ठा व नौवलौकिक हे केवळ सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यामुळे मिळाली. तेंव्हापासून मराठ्यांच्या इतिहासात मोहिते घराणे हे एक कृर्तृत्ववाश्र, निष्ठावान, सामर्थ्यसंपन्न घराणे म्हणून ओळखले जावू लागले.

## २) छत्रपती शिवरायांनी सेनापतीपदी केलेली निवड हंबीररावांनी सार्थ ठरविली

'सेनापती' म्हणून हंबीरराव मोहिते यांची निवड छत्रपती शिवरायांनी वंशपरंपरेने केलेली नव्हती तर ती त्यांच्यातील गुणांच्या निकषावर झालेली होती. सेनापती हंबीररावांच्या पूर्वी सेनापती म्हणून नेताजी पालकर व प्रतापराव गुजर सारखे कृर्तृत्वान सेनापती शिवरायांना लाभलेले होते. दोघेही अतिशय पराक्रमी, शुर, लढवय्या व राजनितीज्ञ होते. सेनापतीपदी आलेली व्यक्तीकेवळ पराक्रमी असून चालत नाही तर त्याच्या अंगी कठीण प्रसंगी निर्णय घेण्याची क्षमता असणे आवश्यक असते. छत्रपती शिवरायांना मागील सेनापतींच्या कार्यकर्तृत्वाची जाणीव होती. त्यांच्या नेमक्या चुका केव्हा व कशा पद्धतीने झालेल्या होत्या याचा सारासार विचारकरुन हंबीररावांची निवड त्यांच्याकेवळ गुणावर झालेली नव्हती. तर त्यांच्या गांभिर्य शहाणपणा व्यवहारचातुर्य, राजकारण पटुत्व, स्वभावातील मार्दव व सबुरी इत्यादी गुणांना शिवरायांनी महत्व दिलेले होते. सेनापती म्हणून केलेली निवड किती अचूक होती हे इतिहासाने दाखवून दिले.

## ३) अजोड कर्तुत्वाचा महान योद्धा

छत्रपती शिवरायांनी 'छत्रपती' या नात्यानेक र्नाटक मोहिम काढलेली होती. या मोहिमेच्या माध्यमातून सेनापती हंबीररावांच्या कार्याची खरी प्रचिती आलेली होती. कोप्पल येथील आदिलशाही सरदार हुसेनखान मियाणाचा अल्पशा मराठा सैन्यानिशी सेनापती हंबीररावांनी दारुन पराभव केलेला होता. आपली तळपती तलवार दाखवून दिलेली होती. त्यांनी शेरखान, व्यंकोजी राजांचा पराभव केलेला होता. कर्नाटकातील वेल्लोर सारखा किल्ला जिंकून घेतलेला होता. एवढेच नसून छत्रपती संभाजी राजांच्या काळात रामसेजच्या किल्ल्याचा वेढा उठावा म्हणून शहाबूद्दीनखानाला पिटाळून लावले होते. मोगलाच्या बहादूरखान, शहाजादा आज्जम, हसनखान इत्यादी मातब्बर सेनांनीचा पराभव करुन शत्रू सैन्यात दहशत त्यांनी बसविली होती.

## ४) निर्लोभी सेनापती

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी निःस्वार्थ हेतूने स्वराज्याची सेवा केलेली होती. छत्रपती शिवरायानी स्वराज्याच्या विकासासाठी मोगलांच्या प्रदेशातील सध्याच्या मराठवाड्यातील जालनापूर हे श्रीमंत शहर लुटले. यावेळी सोबत सेनापती हंबीरराव होते. यांच्याजवळ लुटीतील सर्व संपत्ती देऊन शिवराय पन्हाळ गडावर युवराज संभाजी राजांना भेटण्यासाठी आले. त्यावेळी हंबीररावांनी आपल्याकडील सर्व संपत्ती छत्रपतीकडे रायगडावर पोहचती केलेली होती. तसेच छत्रपती संभाजी राजांच्या कार्यकाळात बुऱ्हाणूपर व औरंगाबाद ही मोगली श्रीमंत शहरे लुटलेली होती. यावेळी अगणित संपत्ती हंबीररावांच्या हाती लागलेली असताना ती सर्व संपत्ती छत्रपतीकडे पोहचती करुन इमानइतबारे हिशोब दिलेला होता. या व्यतिरिक्त मोगली प्रदेशावर हल्ले करुन धरणगाव सारखी परकिय इंग्रजांची वखार दोनदा त्यांनी लुटले होते. चौथाई वसूल केलेली होती. ही सर्व संपत्ती स्वराज्याच्या कार्यासाठी मिळवून दिली. पण कधीही या लुटीतील संपत्ती स्वतःसाठी घ्यावी असे कधीही त्यांना वाटले नव्हते. तर असा विचार सुद्धा त्यांच्या मनाला कधी शिवला नव्हता अशा निर्लोभी व्यक्तीमत्वाचा सेनापती लाभल्यामुळे स्वराज्याचा नावलौकीक झालेला होता.

## ५) न्यायप्रिय सेनापती

सेनापती हंबीररावांच्या जिवनामध्ये कसोटीचा काळ हा छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर सुरु होतो. कारण महाराजांच्या निधनानंतर 'छत्रपती' पदासंबंधाबाबत अष्टप्रधान मंडळातील काही प्रधानांनी वाद निर्माण केलेला होता. सेनापती हंबीरराव हे सुद्धा अष्टप्रधान मंडळातील एक प्रधान होते. मात्र सेनापती हंबीररावांनी निर्णायक भूमिका घेऊन युवराज संभाजींच्या पाठीशी उभे राहून आपण न्यायी असल्याचे इतिहासाला दाखवून दिले. त्यामुळे 'छत्रपती' पदावर संभाजी राजे आले. एक न्यायप्रिय सेनापती म्हणून स्वराज्यात त्यांना संपूर्ण जनता ओळखु लागली. यावेळी स्वतःचा स्वार्थ बाजुला ठेवून नात्याचाकोणताही विचार न करता केलेले कार्य इतिहासाने दाखवून दिले एवढेच नसून सोबतच्या सर्व सहकार्यांना त्यांनी न्यायाचा सल्ला दिलेला होता. जर हंबीररावांनी

इतर प्रधानांसारखा विचार केला असता तर हिंदवी स्वराज्य केंव्हाच लयाला गेले असते. आणि स्वराज्यावर परकिय मोगल, सिद्दी, पोर्तूगीज, इंग्रज इत्यादीचे वर्चस्व निर्माण झाले असते.

## ६) छत्रपती संभाजी राजांचा मार्गदर्शक

स्वराज्याच्या अष्टप्रधान मंडळातील काही प्रधानांनी संभाजी राजांच्या विरुद्ध कटकारस्थान केल्याने संभाजी राजांचा त्यांच्यावर विश्वास राहिलेला नव्हता. अशा परिस्थितीत स्वराज्याच्या सेनापतीने 'छत्रपती' पदावर येण्यासाठी संभाजी राजांनाकेलेले सहकार्य मोलाचे होते. सेनापती हंबीरराव सर्व प्रधान मंडळामध्ये विश्वासू प्रधान बनले होते. राजकीय व लष्करी विषयक ते छत्रपती संभाजी राजांना मार्गदर्शन करीत होते. शेवटच्याक्षणापर्यंत सेनापती हंबीरराव छत्रपतींच्या विश्वासास पात्र राहीले. मोगलांचे संकट स्वराज्यावर चालून आले असता सेनापतींनी मोगलाशी लढा देण्याविषयीचे मार्गदर्शन छत्रपतींना केलेले होते. सेनापती हयात असे पर्यंत छत्रपतीला व सैनिकांना मार्गदर्शन केल्यानेच मोगलांना स्वराज्य जिंकता आलेले नव्हते.

## ७) जेस्ठ मुत्सद्दी व राजकारणी

छत्रपती संभाजी राजांच्याकाळात सेनापती हंबीरराव हे केवळ सेनापतीच नसून एक वयोवृद्ध मुत्सद्दी व राजकारणी म्हणून स्वराज्याची सेवा करीत होते. अष्टप्रधान मंडळातील काही प्रधानांनी संभाजी राजांच्या विरुद्धकट कारस्थाने केली असता सेनापतींनी छत्रपती स सबुरीचा सल्ला दिलेला होता. कारण या काळात मोगलांचे संकट आल्याच्या बातम्या स्वराज्यात आलेल्या होत्या. आपण जर स्वराज्य अंतर्गत प्रश्नाकडे लक्ष देऊन प्रधानांना लागलीच शिक्षा छत्रपतींनी केल्या असत्या तर हेच प्रधान मोगलांना जाऊन मिळाले असते. पण सेनापतिंनी मध्यस्थी करुन पेशवा मोरोपेत पिंगळे ,अल्यानी दत्तो, बाळानी आवजी यांना जेष्ठाचा सल्ला दिलेला होता. मोगल सरदार बहादूरखान याला हूलकावण्या देऊन मोगली प्रदेश लुटले होते. विजापूरच्या आदिलशाहाला राजकीय दृष्टीकोनातून सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी म्हणून आपण स्वतः स्वसैन्यासह विजापूर वाचविण्यासाठी गेलेले होते. बेळगावचा किल्लेद मुरादखानाला पत्र पाठवून किल्ला लढवत ठेवा मी

तूमच्या रक्षणासाठी येत असल्याचे कळविले होते. स्वराज्यातील काही मराठे वतनदार मोगलाना जाऊन मिळू लागले तेंव्हा त्यांना शिवरायांच्या ा उपकाराची जाणीव पत्राव्दारे केलेली होती. स्वराज्यासाठी राजकीय डावपेच आखले होते.

## ८) स्वराज्याचा दृष्टा सेनापती

सेनापती हंबीररावांनीकर्नाटक मोहीमेच्या माध्यमातून व्यंकोजी राजांचा प ाराभव करून त्यांचे तीन सरदारकैद केले होते. यावेळी व्यंकोजी राजानाही ते कैद केले असते; पण कौटूंबीक कलह बरा नव्हे असा दुरदृष्टीचा विचार करून रणांगनातून त्यांना बाहेर जाता यंईल अशी संधी उपलब्ध केलेली होती. भविष्यात मोगलाची स्वारी स्वरांज्यावर चालून आल्यास स्वराज्याचे रक्षण करण्याच्या हूतेनी सिमेलगतच्या किल्ल्याची डागडूजी करून अन्नधान्यसाठा व दारूगोळा कमी पडणार नाही याची त्यांनी काळजी घेतली होती. साल्हेर सारख्या किल्ल्यावर प्रचंड रसद जमा केलेली होती मराठा सैन्यांची नव्याने बांधणी करून लहान लहान सैन्याचे गट तयार केलेले होते. स्वराज्याच्या सिमेलगतच्या प्रदेशात आपले सैन्य तैनातकरून ठेवले होते. स्वतः स्वराज्याच्या उत्तरेकडील प्रदेशावर लक्ष ठेवून होते. कारण मोगल पहिल्यांदा स्वराज्याच्या उत्तर सिमेवर हल्ला करतील आणि तेथून ते स्वराज्यात उतरतील या दूरदृष्टी कोणातून सेनापतींनी स्वराज्याचे शत्रुसैन्यापासून रक्षण करन्यासाठी तयारी केल्याने हयात असे पर्यंत मोगलांना स्वराज्याचा एकही किल्ला जिंकू दिलेला नव्हता. हे सर्व सेनापतीच्या दुरदृष्टीचाच एक भाग होता.

## ९) महान विजेता

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी आपल्या प्रत्येक युद्ध मोहिमेत यशस्वी झाल्याचे दिसून येते. कर्नाटक मोहिमेत त्यांना प्रत्येक ठिकाणी विजय मिळत गेले. छत्रपती संभाजी राजांच्याकाळात मोगलाशी झालेल्या प्रत्येक युद्ध आघाड्यावर विजय मिळविल्याने सम्राट औरंगजेबाला आपल्या युद्ध विषयक धोरणात बदल करावा लागला. यास १६८२-८७ पर्यंतच्या प्रत्येक मोगल -मराठा

युद्धात सेनापतींनी प्रचंड मोगली सैन्याचा प्रत्येक ठिकाणी विजय मिळविलेला होता. रामसेजचा किल्ला लढवत ठेवून तेथून मोगल सरदारांना औरंगजेबाने परत बोलावून घेण्यास हबीरराव हेच कारणीभूत होते. मोगली सैन्यावर हल्ले चढवणे, किल्ल्यावरील मराठा सैनीकांना रसद पाठवणे, मोगली प्रदेशावर हल्ले करणे हे सर्व विद्युत गतीप्रभाणे सेनापती हंबीररावांनी हल्ले चढविले होते. म्हणून मोगलाच्या सांधन ग्रंथातून मराठ्याचा सेनापती जखमी केल्याची माहिती मोगल सरदार औरंगजेबाकडे कळवित होते. पण प्रत्यक्षात प्रत्येक युध्दात मोगल सरदांचा पराभव सेनापतिंनी केल्याचे लक्षात येते. कारण जर सेनापती प्रत्येक युध्दात जखमी झाले असते तर पुढील युद्धाचे नेतृत्व ते केलेच नसते.केवळ आपल्या सम्राटाला खुश करण्यासाठी म्हणून अशा वार्ता ते पोचवित होते यावरून मराठ्यांचा सेनापती हंबीराव एक महान विजेता असल्याचे स्पष्ट होते.

## १०) सहिष्णूतावादी सेनापती

सेनापती हांबीररावाच्या व्यक्तिमत्वाचीणघडण ही छत्रपती शिवरायांच्या मार्गदर्शनाखाली झालेली असल्यामूळे परिस्थितीनुरूप निर्णय घेण्याची कला त्यांना अवगत झालेली होती. कर्नाटक मोहिमेत व्यकोंजी राजाशी झालेल्या युद्धात सेनापतीनी ठरवले असते तर त्यांनाकैद केले असते व त्याचे राज्य जिंकून घेतले असते पण सर्व गोष्टींचा विचार यावेळी त्योनी केलेला होता.छत्रपती शिवरायांच्या निधनानंतर अष्टप्रधान मंडळातील त्या मंत्र्यांनी युवराज संभाजी राजांच्या विरोधात जीकट -कारस्थाने चालू केलेली होती. तेव्हा छत्रपती संभाजी राजांनी वेळीच त्यांना शिक्षा केलेल्या असत्या पण सेनापतीच्या सल्ल्यामुळे त्या मंत्र्यांना माफ केले होते. हे केवळ सेनापतीमुळे शक्य झाले होते. तसेच या मत्र्यांना पून्हां पदावर नेमून झाल्या गोष्टीचा विचार न करता स्वराज्य सेवा करावी असा सल्ला सेनापतीनी त्यांना दिलेला होता विजापूरची आदिलशाहीचे राज्य मुस्लिम धर्मिय असतांना हंबीररावांनी ते वाचविन्यासाठी प्रयत्न केले होते. स्वराज्यातील काही वतनदार मागलांना फितूर होऊन मोगलांची सेवा चाकरी निमूटपणे करण्यास तयार होत होते.

अशावेळी जेधे घराण्यातील सरदारांना स्वराज्यात परत आणून कामाला लावले होते. यामागे केवळसहिष्णूपणा असल्याचे दिसून येते.

## ११) चारित्र्य संपन्न सेनापती

छत्रपती शिवरायांच्या विचारांचा प्रभाव सेनापती हंबीररावांवर पडलेला होता. सभासदाने हंबीररावांच्या मोगली प्रदेशातील मोहिंमेच्या संदर्भात काढलेले उद्गार अतिशय महत्वाचे आहेत.खानदेश-गुजरात-वऱ्हाड या मोगली प्रदेशावर स्वांरी करून सेनापती हंबीरराव स्वराज्यात परतल्यावर त्यांनी प्रथम राजधानी रायगडावर शिवरायांची भेट घेतली आणि 'मालमत्ता राजियास दिली' यावरून लुटीतील सर्व हिशोब छत्रपतीस दिलेला होता. शिवरायांच्या निधनानंतरकोणत्याही अमिषाला बळी न पडता युवराज संभाजीच्या पाठीशी जे उभे राहीलेगेले सम्राट औरंगजेबाने फंदफितूरीचे अस्त्र वापरून अनेक सरदारांना आपल्या पक्षात ओढले होते. किबहूना सेनापती हंबीररावांनाही तसे प्रयत्नकेले असतील पण चारित्र्यसंपन्न सेनापतीने छत्रपती संभाजी राजांची शेवट पर्यंत साथ सोडली नव्हती. हे त्याच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य होते.

## १२) शिवतंत्राचा पुरस्कर्ता

सेनापती हंबीरराव मोहिते यांनी छत्रपती शिवरायांची युध्दनिती पुढे चालविली शत्रूच्या प्रदेशात हल्ले करून श्रीमंत शहरे लुटली धरणगाव, बुऱ्हाणपूर, औरंगाबाद, जालनापूर ही महत्त्वाची होती. शत्रुला न सापडता स्वराज्यात सुखरूपणे परत येण्याची युद्धकला छत्रपती शिवरायानंतर सेनापती हंबीररावांनी विकसीत केली. पुढील काळात संताजी व धनाजी या मराठा सेनानांनी तिचा अवलंब केलेला होता. स्वराज्यात घुसलेल्या शत्रुशी प्राणपनाने हंबीररावानी लढाया केल्या. शत्रुंना स्वराज्याबाहेर पिटाळून लावले. बऱ्याचदा शत्रू सैन्यावर अचानक हल्ले करुन सळो की पळो करुन सोडले होते. प्रसंगी माघार ही घेत होते. गणिमी काव्याचा तंतोतत उपयोग हंबीररावांनी घेतलेला होता. हे तंत्र छत्रपती शिवरायांपासून घेतले होते. याचे तंत्राचे धडे सेनापतींनी

आपल्या सैन्किांना दिल्याने पुढील काळात छत्रपती संभाजी राजांच्या वधानंतर हिंदवी स्वराज्य मोगली विळख्यातून मराठा सेनानींनी सोडविले.

## १३) उत्कृष्ट प्रशासक

सेनापती हंबीररावांनी आपल्या जीवनात लढाया किंणे रणांगन गाजविने एवढेच केले नसून योय असे प्रशासन त्यांनी केलेले होते.कर्नाटक माहिमेच्या वेळी छत्रपती शिवरायांनी सेनापती हंबीररावांना पाठीमागे ठेऊन जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावण्याची जबाबदारी सोपवून स्वराज्यात आले असता हंबीररावांनी वेल्लोरकल्याची व्यवस्था लावलेली होती. सभोवतालच्या प्रदेशात वेवेगळया ठिक ाणी अधिकाऱ्यांच्या नेमणुका केलेल्या होत्या, शेतसारा ठरवून दिलेली होता. छत्रपती संभाजी राजांच्याकाळातही सेनापतिनी प्रशासन करत असताना न्यायनिवाड्याचे काम केलेले होते. अनेक पत्रावर त्यांच्या नावाचे शिक्के व सह्या आहेत. तसेच अनेकदा संभाजी राजाना योग्य असे सल्ले दिलेले होते. त्यामुळे सेनापती हयात असे पर्यंत स्वराज्यात अंतर्गत कलह व प्रशासनात ढिसाळपणा कधिही दिसून आलेला नव्हता.

## १४) आदर्श सेनापती

मराठ्यांच्या इतिहासामध्ये मानकोजी दहातोंडे, नेताजी पालकर, प्रतापराव गुजर इत्यादी सेनापती होऊन गेले. त्यांनी अनेक पराक्रम, युद्ध मोहिमा, हल्ले, लढाया करुन स्वराज्य वाढविले. त्यांच्या जीवनामध्येकाही चुका झालेल्याचे इतिहासाला ज्ञात आहे. मात्र सेनापती हंबीररावांनी आपल्या आयुष्यात एकही चुक केलेली नसून 'आदर्श सेनापती' कसा असा असावा याची दखल इतिहासाला त्यांनी घ्यावयास लावले. सेनापती हंबीररावांनी अनेक रणांगन गाजविले, मोहिमा काढल्या, प्रशासन केले. यापुढे जावून शिवरायांच्या निधनानंतर जी अराजकता निर्माण होणार होती आणि 'छत्रपती' हा सेनापतीच्या नि र्यायावर होणार अशी परिस्थिती असताना सेनापतींनी अशा काळात जी निर्णायक भुमिका घेऊन आपण शिवरायांचे खरे पाईक असल्याचे दाखवून दिले. आणि वारसा हक्कानुसार युवराज संभाजी राजांना छत्रपती पदी नेमून आदर्श सेनापती असल्याचे

इतिहासाला दाखवून दिले. असा सेनापती कधिही झालेला नव्हता यांचाच वारसा पुढे संताजी व धनाजी जाधवांनी चालवून स्वराज्याचे रक्षण केले.

## १५) मराठ्यांचा आदर्श मावळा

छत्रपती शिवरायांनी महाराष्ट्रात मराठी भाषिकांच्या सहकार्याने 'हिंदवी स्वराज्य' उदयास आनले. अशा ऐतिहासिक स्वराज्याची बांधणी करताना शिवरायांना अनेक जाती धर्माच्या मावळ्यांनी साथ दिली. कित्येक मा वळ्यांनी स्वराज्यासाठी आपले प्रण दिले. अशा मावळ्याच्या बळावर स्वराज्याचा 'छत्रपती' झाल्याचे शिवरायांनी दाखवून दिले. छत्रपती शिवरायांच्या निधनानंतर अष्टप्रधान मंडळातील प्रधानांनी सेनापती हंबीररावांच्या भगिनी सोयराबाईला हाताशी धरुन सख्खा भाच्चा राजारामाला 'छत्रपती' पदी बसविण्यासाठी प्रयत्न सुरु केले असता केवळ एकमेव प्रधान मंडळातील मंत्र्यापैकी सेनापती पदावर असलेल्या हंबीररावांनी आपल्या नात्यापेक्षा राष्ट्रहिताला, स्वराज्य हिताला महत्व दिले. सख्खा भाच्चा राजाराम याला बाजुला सारुन नात्याने सावत्र भाच्चा असलेल्या युवराज संभाजी राजांना त्यानी 'छत्रपती' पदी बसविले. हे भारताच्या इतिहासात एकमेव उदाहरण असेल की 'आदर्श मावळा' असल्याचे त्यांनी दाखवून दिले. ज्या मावळ्यांनी स्वराज्याची उभारणी केली. अशाच नाते संबंधातील मामा असल्याचे व मामाचे खरे कर्तृत्व कोणते याचे ज्वलंत उदारहण केवळ सेनापती हंबीरराव मोहिते होते.

## सारांश :

शेवटच्या क्षणापर्यंत सेनापती हंबीरराव छत्रपतीच्या विश्वासास पात्र राहिले आणि स्वराज्याची सेवा एकनिष्ठने केली वाईच्या लढाईत त्यांना विरमर ण आले आणि छत्रपती संभाजी राजांना आपला उजवा हातगेल्याचे मोठे दु:ख झाले. मोगल सम्राट औरंगजेब सर्व सामर्थ्यानिशी स्वराज्यावर चालून आला असता हंबीररावानसारखा लढवय्या, रणधुरंधर, छत्रपतीच ा पाठीराखा असलेला सेनापती महाराष्ट्राच्या क्षितीजावरुन नाहीसा व्हावा हे मराठ्यांचे दुर्देवच होते. ज्यांच्या कर्तृत्वाने स्वराज्यावर आलेली संकटे नष्ट होत होती, ज्याच्या जिवावर निर्भय राहून निवांत झोप

घ्यावी असे हंबीररावांचे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या अकाली जाण्याने एक मोठी पोकळी निर्माण झाली. ही पोकळी छत्रपती संभाजी राजांना राजारामाच्या काळात संताजीने भरुन काढली तो पर्यंत मराठी राज्यास हंबीररावांच्या उंचीचा सेनापती संभाजी राजांना लाभू शकला नाही हे मान्यच करावे लागेल.

सेनापती हंबीररावांच्या मृत्युनंतर मोगल सम्राट औरंगजेबाने शेवटचे फंदकितुरीचे अस्त्र बाहेर का ढले. गोवळकोंड्याचा फितूर सरदार शेख निजाम याला छत्रपती संभाजी राजांना पकडण्यासाठी पाठविले आणि संगमेश्वर या ठिकाणी छत्रपती संभाजी राजे कैद झाले. या विषयी इतिहास संशोधक डॉ.जयसिंगराव पवार म्हणतात, 'संभाजी राजांच्या कैदेच्या प्रसंगी हंबीरराव असते तर तो दुर्दैवी प्रसंग मराठ्यांच्या इतिहासात आला नसता.' तर सेनापती हंबीरराव मोहिते यांचे पहिले संशोधनात्मक चरित्र लिहीणारे इतिहासाचे संशोधक डॉ.सदाशिव शिवदे म्हणतात, 'हंबीररावांनी औरंगजेबाविरुद्धचा लढा आणखी तिव्र केला असता' यांच्याही पुढे जावून मला असे वाटते की, 'सेनापती हंबीरराव असते तर शेख निजामाच्या कैदेत छत्रपती संभाजी राजे अडकले नसते. कारण स्वराज्याच्या सिमांचे रक्षण हंबीरराव करीत होते. मोगली सैन्याला स्वराज्यात प्रवेशच करु दिले नसते. छत्रपती संभाजी राजांच्या रक्षणासाठी स्वत: फौज घेऊन लढले असते. पण घडलेल्या प्रसंगाबाबत जर तर च्या गोष्टी इतिहासाला मान्य नाहीत. कारण कोणताही निर्णय घेताना विचारपूर्वक घ्यावा लागतो. सबुरीचे शिवतंत्र हे केवळ सेनापती हंबीररावांजवळच होते.

मेवाडचा राजा जसवंतसिंहाच्या मृत्युनंतर त्याचा अल्पवयीन मुलगा अजितसिंह होता. तरीपण रजपूत सेनानी दुर्गादास राठोडने त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून मोगलाशी संघर्ष केला आणि त्याचा वारसा त्याने पुनर्स्थापित करुन मेवाडला वाचविले. त्याच प्रमाणे सेनापती हंबीररावांनी छत्रपती शिवरायांच्या निधनानंतर युवराज संभाजी राजांना 'छत्रपती' पदावर बसवून हिंदवी स्वराज्याचे कवच कुंडल बनून शेवटच्या श्वासापर्यंत निष्ठेने स्वराज्याची सेवा केली. असे कर्तृत्ववान व्यक्तीमत्व सेनापती हंबीरराव मोहिते हे मराठ्यांच्या इतिहासात अजरामर ठरले.

# : संदर्भ ग्रंथ सुची :


१) आपटे द.वि., दिवेकर स.म. (संपा) - शिवचरित्र प्रदीप, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, २००९.

२) काळे दि.वी. - 'छत्रपती शिवाजी महाराज' पुणे, पुणे विद्यापीठ, कार्यवाह मार्च १६९०.

३) काळे दिनकर विनायक - छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, कार्यवाह पुणे विद्यापीठ पुणे-७, मार्च १९६०.

४) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह.(संपा) - मराठ्यांचा इतिहास खंड पहिला, पुणे, कॉन्टीनेंटल प्रकाशन, २००६.

५) कुलकर्णी अ.रा. - आज्ञापत्र, पुणे, डायमंड पब्लिकेशन, २००७.

६) कुलकर्णी अ.रा.(संपा) - जेधे शकावली-करीना, पुणे, डायमंड प्रकाशन, ऑगस्ट, २००७.

७) कुलकर्णी अ.रा., खरे ग.ह. (संपा) - मराठ्यांचा इतिहास,खंड १, पुणे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, २००६.

८) कुलकर्णी अ.रा.- जेधे शकावली-करीना पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७.

९) कुलकर्णी अ.रा. - जेधे शकावली-करीना, पुणे डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७.

१०) कुलकर्णी अ.रा. - 'जेधे शकावली-करीना', पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७.

११) कुलकर्णी अ.रा. - जेधे शकावली-करिना, पुणे, डायमंड पब्लिकेशन, ऑक्टोबर २००७.

१२) कुलकर्णी अ.रा., कुलकर्णी म.रा., कंठक मा.रा. (संपा) - मराठ्यांचा इतिहास साधन परिचय, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, जून २००८.

१३) कुलकर्णी अ.रा. - मराठे आणि महाराष्ट्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती, जाने.२००७.

१४) कुंठे - अहमदनगरची निझामशाही, मुंबई, मुरली प्रकाशन, १९६२.

१५) केळकर न.चि. - शिवाजी - निबंधावली २, पुणे, रायगड स्मारक मंडळ व भारत इतिहास संशोधक मंडळ, १९३०.

१६) केळकर न.चि. व आपटे द.वि.(संपा) - शिवकालीन पत्र-सार-संग्रह-खंड १, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ.

१७) केळकर न.चि., आपटे द.वि. (प्रकाशक)-शिवकालीन-पत्र-सार- संग्रह, भाग-१, श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

१८) केळकर न.चि. व आपटे द.वि. - शिवाजी निंबधावली, पुणे, शिवचरित्र कार्यालय, १९३०.

१९) केळकर न.चि., आपटे द.वि. (प्रकाशक)-शिवकालीन-पत्र-सार- संग्रह, भाग-२, श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

२०) केळकर न.चि., आपटे द.वि. (प्रकाशक)- शिवाजी-निबंधावली ? श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, इ.स.१९३०.

२१) केळकर न.चिं., आपटे द.वि. (प्रकाशक)- शिवाजी-निबंधावली २, श्रशिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

२२) केळूसकर कृ.अ. - छत्रपती शिवाजी महाराज, पुणे, वरदा, से.बापट मार्ग, मे १९९१.

२३) केळूसकर कृ.अ. - छत्रपती शिवाजी महाराज पुो, वरदा, से बापट मार्ग, चौथी आवृत्ती, मे.१९९१.

२४) कोलारकर श.गो.- (अनुवाद) औरंगजेबाचा संक्षिप्त इतिहास, डॉ.जदुनाथ सरकार, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९९९.

२५) खरे ग.ह., कुलकर्णी गो.त्र्य. - ऐतिहासिक फार्सी साहित्य सहावा खंड, औरंगजेबाच्या दरबारचे अखबार, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९७३.

२६) खरे ग.ह., कुलकर्णी गो.त्र्य. - औरंगजेबाच्या दरबारचे अखबार, ऐतिहासीक फार्सी साहित्य सहावा खंड, पुणे, भारत इतिहास संशोधक मंडळ, १९७३.

२७) खोबरेकर वि.गो. - कोकणचा राजकीय इतिहास, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या इतिहास संशोधन मंडळाची ग्रंथ माला, क्र.२६, प्रथम आवृत्ती, १९९७.

२८) खोबरेकर वि.गो. - महाराष्ट्राचा इतिहास-मराठा कालखंड, भाग पहिला, शिवकाळ-१६३०-१७०७, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

२९) खोबरेकर वि.गो. - महाराष्ट्राचा इतिहास - मराठा कालखंड (भाग-१), मुबंई, १७२ मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

३०) गर्गे स.मा. (संपा)- मराठी रियासन, खंड २, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८९.

३१) गर्गे स.मा. (संपा) - मराठी रियासत, गो.स.सरदेसाई कृत, पुणे पॉप्युलर प्रकाशन, तिसरी आवृत्ती, १९३५.

३२) गायकवाड, सरदेसाई, थोरात, हनमाने - मराठेकालीन संस्था व विचार, कोल्हापूर, फडके प्रकाशन, १९९०.

३३) गोखले कमल - शिवपुत्र संभाजी, पुणे कॉन्टिनेन्टल प्रकाशन, आवृत्ती चौथी, २००१.

३४) चौहान देविसींग व्यंकटसिंग-(लेख-संग्रह) दक्षिनी हिंदीतील इतिहास व इतर लेख, इतिहास संशोधन मंडळ, दादर मुंबई, प्रथम संस्करण, १९७३.

३५) जोशी मुकूंद ना. - दक्षिण दिग्विजय, पुणे, मनोदय प्रकाशन, मार्च २००७.

३६) जोशी शं.ना. (संपा)- शिवकालीन-पत्र-सार-संग्रह, खंड ३, भारतीय इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३७.

३७) दळवी गो.दा.(संपा) - मराठा कुळाचा इतिहास, भाग १, जाधव घराण्याची कैकियत, मुंबई, १९९२.

३८) दिवेकर सदाशिव - शिवभारत-कविंद्र परमानंदक्रत, पुणे, शब्देवेध प्रकाशन, आवृत्ती दुसरी, १९९८.

३९) दिवेकर सदाशिव महादेव (संपा) - कविंद्र परमानन्दकृत, शिवभारत, पुणे, शब्दवेध प्रकाशन, नोंव्हे.१९९८.

४०) देशपांडे वसंत - मध्ययुगीन भारताचा इतिहास, नांदेड, अभय प्रकाशन, १९९८.

४१) देशमुख विजय (संपा) - शिवविजय रौप्य मोहत्सवी कार्य गौरव समिती नागपूर, प्रथम आवृत्ती १९९२.

४२) देशमुख विजय - शककर्ते शिवराय, खंड १, नागपूर, छत्रपती सेवा प्रतिष्ठाण, १९८२.

४३) देशमुख विजय - शककर्ते शिवराय, (उत्तरार्ध), नागपूर, छत्रपती सेवा प्रतिष्ठान प्रकाशन, ८०, जयप्रकाश खामला, ऑगस्ट १९८२.

४४) देशमुख विजय (संपा) - शिवविजय रौप्य मोहत्सवीकाय ि गौरव समिती नागपूर, प्रथम आवृत्ती १९९२.

४५) देशमुख मा.म. - मध्ययुगीन भारताचा इतिहास विश्वाभारती प्रकाशन, नागपूर, आवृत्ती तिसरी, जाने.१९९८.

४६) देशपांडे सु.रा., कामत आनंद (लेखक)- ३ तिहासाचे साक्षीदार, सह्याद्री प्रकाशन, आजरा, प्रथम आवृत्ती, जून २००३.

४७) पवार अप्पासाहेब (संपा) - ताराबाई कालीन कागदपत्रे, खंड १, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला, १९६९.

४८) पगडी सेतुमाधवराव - छत्रपती शिवाजी, नवी दिल्ली, नॅशनल ट्रस्ट, आवृत्ती सातवी, २००७.

४९) पगडी सेतुमधवराव समग्र- खंड २, शिवचरित्र एक अभ्यास, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, प्रथम प्रकाशन, १९७१.

५०) पगडी सेतुमाधवराव - छत्रपती शिवाजी, नवी दिल्ली, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, सातवी आवृत्ती, २००९.

५१) पगडी सेतुमाधवराव - 'हिंदवी स्वराज्य आणि मोगल' पुणे, व्हिनस प्रकाशन, फेब्रु.१९६६, आवृत्ती पहिली.

५२) पगडी सेतुमाधवराव - महाराष्ट्र आणि मराठे, जोशी आणि लोखंडे प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९६३ मार्च.

५३) पगडी सेतु माधवराव (संपा)- मोगल-मराठा संघर्ष (फारशी साधने), चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणे-२, आवृत्ती पहिली डिसें.१९६४.

५४) पवार अप्पासाहेब - ताराबाई कालीन कागदपत्रे खंड १ कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ ऐतिहासिक ग्रंथमाला.

५५) पवार जयसिंगराव (संपा) - छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, रिया पब्लिकेशन, आवृत्ती दुसरी, जाने.२००९.

५६) पाटील विश्वास - 'संभाजी' पुणे, मेहता पब्लिसिंग हाऊस, आवृत्ती आठवी, जून २०११.

५७) पाटील मदन - जिजाऊसाहेब, श्री स्वामी पब्लिकेशन, पुणे, तृतीयावृत्ती, नोव्हें.२००७.

५८) पाटील दशरथ - महापराक्रमी सरसेनापती, प्रतापराव गुजर, कोमल प्रकाशन, नालासोपारा, द्वितीय आवृत्ती, मे २०११.

५९) पाटील गौतम भिमराव - छत्रपती शिवाजी-संभाजी व राजाराम महाराजांचे वतनविषक धोरण, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती जानेवारी २०१०.

६०) पुरंदरे बाबासाहेब - राजा शिवछत्रपती, पूणे परंदरे प्रकाशन, आवृत्ती १४वी, एप्रिल २००१.

६१) पुरंदरे ब.मो. - राजा शिवछत्रपती, पुणे पुरंदरे प्रकाशन १२२८, सदाशिव पेठ, आवृत्ती चौदावी, २००१.

६२) पुराणिक श.श्री. - मराठ्यांचे स्वातंत्र्यसमर (पूर्वार्ध), पुणे, काळ प्रकाशन, आवृत्ती प्रथम, जुन १९८१.

६३) परचुरे नरेन (प्रकाशक) - श्री छत्रपती नित्यादी प्रभावळ, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबअी, आवृत्ती दुसरी, जानेवारी २०००.

६४) बाहेकर एस.ए. - राजमाता-राष्ट्रमाता जिजाऊ, जळगाव, कसब प्रकाशन, २००७.

६५) बाहेकर एस.ए. - शिवजन्मतिथीचे निर्णायक संशोधन कसब प्रकाशन जळगाव, प्रथमावृत्ती, ऑगस्ट, २००१.

६६) बेन्द्रे वा.सी. - मालोजी राजे आणि शाहाजी महाराज यांची चिकित्सक चरित्रे, मुंबई, पहिली आवृत्ती १९६७, १७२, नायगाव क्रॉस रोड, दादर १४.

६७) बेंद्रे वा.सी. - खाजगी दप्तर, अनुवादित बुसातीन-इ सलातीन (मराठी अनुवाद) अर्थात विजापूरची आदिलशाही.

६८) बेंद्रे वा.सी. - मालोजी राजे आणि शहाजी महाराज यांचे चरित्र, मुंबई दादर, १९६७.

६९) बेन्द्रे वा.सी. - मालोजीराजे आणि शहाजी महाराज यांची चरित्रे, मुंबई, दादर, १९६९.

७०) बेन्द्रे वा.सी. - श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चरित्र, मुंबई, १९७२.

७१) बेन्द्रे वा.सी. - श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सिक चरित्र (उत्तर ार्ध), मुंबई, १९७२.

७२) बेंद्रे वा.सी. - श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र, उत्तरार्ध.

७३) बेन्द्रे वा.सी.- 'छत्रपती संभाजी महाराज', मुंबई, मनोरमा प्रकाशन, तृतीयावृत्ती मार्च २००१.

७४) बेन्दे वा.सी. (संपा) - गोवळकोंड्याची कुत्बशाही, भारत इतिहास संशोधक मंडळ, स्वीय-ग्रंथमाला, ग्रंथक ३९, पुणे.

७५) भट भास्कर वामन - शिवाजीची राजनिती, धुळे, राजवाडे संशोधन मंडळ, १२ जाने.१९४१.

७६) वाकसकर वि.स.(संपा) - श्री शिवछत्रपतींची ९१कलमी बखर, पुणे व्हीनस प्रकाशन, १९६२, नोव्हेंबर.

७७) वाकसकर वि.स. (संपा) - श्री शिवछत्रपतींची ९१कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, नोव्हेंबर १९६१.

७८) शिखरे चंद्रशेखर - प्रतिइतिहास, पुणे, जिजाई प्रकाशन, नोंव्हे.२००७.

७९) शिखरे चंद्रशेखर - शिवरायांचे प्रेरणा स्त्रोत आणि खरे स्वराज्य द्रोही, जिजाई प्रकाशन, पुणे, पुनर्मूदण, नोव्हेंबर २००८.

८०) शिवदे सदाशिव- सेनापती हंबीरराव मोहिते, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, ऑक्टोबर २००७.

८१) शिवदे सराशिव - 'ज्वलज्ज्वलनतेजस संभाजीराजा', पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, आवृत्ती दुसरी, ऑक्टोबर २००८.

८२) शिवदे सदाशिव - स्वराज्याचे पंतप्रधान मोरोपंत पिंगळे, लोकवृत्त प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २००९.

८३) शिवदे सदाशिव (अनुवाद)- मराठ्यांची लष्करी व्यवस्था, डॉ.एस.एन .सेन, डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०११.

८४) शिवदे सदाशिव स. - दर्याराज कान्होजी आंग्रे, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, डिसेंबर २००६.

८५) शिवदे सदाशिव - छत्रपती राजाराम व ताराराणी लोकव्रत प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, ऑक्टो.२००८.

८६) शेटे वि.त्र्य. (प्रकाशक) - राज्यारोहण व जिजाबाई जीवनाखेर, पंचमंडळ, शिवाजी भारत प्रकाशक, प्रथमावृत्ती, जून १९७४.

८७) समग्र पगडी सेतुमाधवराव- खंड-२, नियतीच्या विळख्यात औरंगजेब, परचुरे प्रकाशन, मंदिर, मुंबई, प्रथम प्रकाशन, १९९३.

८८) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत, भाग १, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन,१९१०.

८९) सरदेसाई गोविंद सखाराम - मराठी रियासत, मुंबई, पॉप्युलर प्रकाशन, १९८८.

९०) सरदेसाई गो.स. - मराठी रियासत, उग्रप्रकृती संभाजी, स्थिरबुद्धी राजाराम, मुंबई, पॉप्यूलर प्रकाशन, १९८९.

९१) सहस्त्रबुद्धे पु.ग.- महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००३.

९२) सोनावणे विलास - रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराज, लोकायत प्रकाशन सातारा, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २०१०.

९३) सोनावणे विलास - स्वराज्य संकल्पक : शहाजीराजे, लोकायत प्रकाशन सातारा, प्रथमावृत्ती, ऑगस्ट २०११.

९४) हनवते उत्तम - सेनापती धनाजी जाधव, अभिजित पब्लिकेशन, लातूर, प्रथम आवृत्ती.

९५) हेरवाडकर र.वि.(संपा) - श्री शिवछत्रपतीचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, पुणे, व्हीनस प्रकाशन, डिसें.२०००.

९६) हेरवाडकर र.वि.(संपा) - शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर), पुणे, व्हीनस प्रकाशन, २००२.

९७) हेरवाडकर र.वि.(संपा) - कृष्णाजी अनंत सभासद, शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर), पुणे व्हीनस प्रकाशन २००२.

९८) हेरवाडकर र.वि. (संपा) - श्री शिवछत्रपतीचे सप्तप्रकारणात्मक चरित्र (मल्हार रामराव चिटणीस), पुणे, व्हीनस प्रकाशन, २०००.

९९) हेरवाडकर र.वि.(संपा) - कृष्णाजी अनंत सभासद विरचित, शिवछत्रपतीर्च चरित्र (सभासद बखर), पुणे, व्हीनस प्रकाशन.

१००) हेरवाडकर र.वि. (संपा) - कृष्णाजी अनंत सभासद विरचित, शिवछत्रपतीचे चरित्र (सभासद बखर) पुणे, व्हिनस प्रकाशन.

१०१) हेरवाडकर र.वि. - मल्हार रामराव चिटणीस -विरचित श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे, पुणे, व्हिनस प्रकाशन, ऑगस्ट १९७२.

१०२) हेरवाडकर र.वि. - 'मल्हार रामराव चिटणीस -विरचित' श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले रराजाराम महाराज यांची चरित्र, पुणे, व्हिनस प्रकाशन, ऑगस्ट १९७२.

१०३) हेरवाडकर र.वि. (संपा)- श्री शिवछत्रपतींचे सप्तप्रकरणात्मक चरित्र, मल्हार रामराव चिटणीस विरचित, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, डिसेंबर २०००.

१०४) हेरवाडकर र.वि. (संपा) - मल्हार रामराव चिटणीस विरचित, श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज आणि थोरले राजाराम महाराज यांची चरित्रे, व्हीनस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, ऑगस्ट १९७२.

## हिंदी संदर्भ ग्रंथ सुची :


१) गुप्त विश्वप्रकाश (अनुवादक) छत्रपती शिवाजी, लाका लाजपत राय, राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, पहला संस्करण, २००८.

२) जमादार अल्लाबक्ष (संपा) - काव्यांजलि, राधाकृष्ण प्रकाशन, नयी दिल्ली, पहला संस्करण, २००९.

३) मिश्रा एस.सी.- मराठों का इतिहास, रिसर्च पब्लिकेशन्स, जयपुर.


## इंग्रजी संदर्भ ग्रंथ सुची :


१) Grant Duff. - History of the maharatha, Bombay, Published at the times of India office, London, ३ edition, 1873.

२) Indian Historical Quartly - Calcutta, September 1993.

३) Patil V.Shalini - Maharani Taribai of Kolhapur, New Delhi, S.Chand and company LTD, 1987.